रविवार
२९
मार्च २०२६

अकोला
पाने : ८ + ४
वर्ष : १९
अंक : ३८१
स्वागत मूल्य ३ रुपये
www.ajinkyabharat.com

बातम्यांचा गतिमान पाठलाग
# अजिंक्य भारत



आयपीएल : रवींद्र जडेजाचे वादळ घोंघावले (पान ७ वर)

## थोडक्यात

### महाराष्ट्र काँग्रेसमध्ये मोठा फेरबदल होणार?



**मुंबई:** महाराष्ट्रातील काँग्रेसमध्ये मोठ्या फेरबदलांची प्रक्रिया सुरू झाली असून, पक्षाने आता थेट बूथ स्तरावर लक्ष केंद्रित करत 'संघटन सृजन अभियान' राबवण्याचा निर्णय घेतला आहे. ही मोहीम पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या मार्गदर्शनाखाली राबवली जात असून, ३७ केंद्रीय निरीक्षकांसह राज्यातील तब्बल १८३ दिग्गज नेते मैदानात उतरले आहेत. यात बाळासाहेब थोरात, नाना पटोले, सतेज पाटील, माणिकराव ठाकरे, नसीम खान, अमित देशमुख, यशोमती ठाकूर आणि नितीन राऊत यांसारख्या नेत्यांचा समावेश आहे. हे नेते थेट जिल्हा आणि बूथ स्तरावर जाऊन कार्यकर्त्यांशी संवाद साधणार आहेत. संघटनेला नवसंजीवनी देणे, निष्क्रिय पदाधिकाऱ्यांना बाजूला करणे आणि सक्रिय कार्यकर्त्यांना संधी देणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. त्यामुळे केवळ नावापुरते सक्रिय असलेल्या पदाधिकाऱ्यांना मोठा फटका बसण्याची शक्यता आहे.

### उद्योगवाढीसाठी परवाने प्रक्रिया झाली सुलभ



**मुंबई :** महाराष्ट्रात उद्योग सुलभतेसाठी परवानगी प्रक्रियेत मोठे बदल करण्यात आले असून ३३ परवानग्यांपैकी २० परवानग्या स्व-प्रमाणनावर (सेल्फ सर्टिफिकेशन) आणण्यात आल्या आहेत. उर्वरित १३ परवानग्यांची संख्याही लवकरच कमी करण्यासाठी प्रयत्न केला जाणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी दिली. मुख्यमंत्री फडणवीस यांनी उद्योजकांना विश्वास देताना सांगितले की, राज्यातील वीजदर पुढील पाच वर्षांत टप्प्याटप्प्याने कमी होणार आहेत. सध्या असलेला १०.८८ रुपये प्रति युनिट हा वीजदर पुढील पाच वर्षात १५.८७ रुपये इतका न होता कमी होऊन ९.९७ रुपयांखाली येणार असून २०२८-२९ पर्यंत महाराष्ट्र देशातील सर्वात कमी वीजदर असलेले राज्य ठरणार असल्याचा दावा त्यांनी केला.मैत्री पोर्टलमुळे एकाच ठिकाणी सर्व परवानग्या मिळणार आहेत. या प्रक्रियेत पारदर्शकता ठेवत प्रत्येक अर्जाचा मागोवा घेता येणार असून, ठराविक कालावधीत सेवा न दिल्यास संबंधित यंत्रणांवर कारवाईची तरतूद करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले.

### अशोक खरातच्या कृत्यात सहभागी नाही- केसरकर

**मुंबई :** अशोक खरात अघोरी पूजा करतोय हे माहिती असतं तर मी त्याच्याकडे कधीच गेलो नसतो, मी साईभक्त आहे. या प्रकरणात संजय राऊतांच्या कंपूकडून आपल्याला बदनाम केलं जात असल्याची प्रतिक्रिया माजी मंत्री आणि शिंदेंचे आमदार दीपक केसरकरांनी दिली. अशोक खरातच्या कोणत्याही कृत्यात आपला सहभाग नाही, कोणत्याही महिलेची त्याच्याशी ओळख करून दिली नाही, असंही केसरकरांनी स्पष्ट केलं. या प्रकरणाशी आपला संबंध जोडला जात आहे तो राजकीय द्वेषाने. ज्यावेळी शिवसेनेमध्ये संघर्ष पेटला होता, त्यावेळी आपण एकनाथ शिंदेंची बाजू महाराष्ट्रासमोर आणली. त्यामुळे ठाकरे गटाचा आपल्यावर राग आहे. त्या रागापोटी बदनाम केलं जात असल्याचा आरोप दीपक केसरकरांनी केला.

# अयोध्येत महायज्ञात भीषण आग!

## भाविकांची धावाधाव; राम मंदिरापासून हाकेच्या अंतरावर दुर्घटना

अयोध्या: दि.२८ वृत्तसंस्था

**उत्तर प्रदेशातील अयोध्येत शनिवारी मोठी दुर्घटना घडली. शरयू नदीच्या तीरावर महायज्ञाचे आयोजन करण्यात आलेले असताना आगीची घटना घडली. आगीच्या ज्वाळा वेगाने पसरल्या. त्यामुळे मंडप जळून खाक झाला. या महायज्ञात सहभागी होण्यासाठी जवळपास ५० हजार जण आले होते. आग लागताच एकच खळबळ उडाली आणि सगळ्यांचीच पळापळ सुरु झाली. अग्निशमन दलाच्या ६ गाड्या घटनास्थळी पोहोचल्या. त्यांनी आग नियंत्रणात आणली. यज्ञात आहुती म्हणून अर्पण केलेला नारळ फुटल्यानं दुर्घटना घडल्याचं सांगितलं जात आहे.**



### मोठी दुर्घटना टळली!

या महायज्ञाच्या कार्यक्रमात ५० हजार भाविक सहभागी झाले होते. अखेरच्या दिवशी १,२५१ हवन कुंड तयार करण्यात आले होते. या यज्ञांमध्ये ५ हजार जणांनी मंत्रोच्चारण करुन आहुती दिली. ज्यावेळी आग लागली, तेव्हा बहुतांश मंडप रिकामा झाला होता. त्यामुळे मोठी दुर्घटना टळली.

उत्तर प्रदेश सरकारमधील परिवहन मंत्री दयाशंकर सिंह यांच्याकडून शरयू नदीच्या तीरावर महायज्ञाचं आयोजन करण्यात आलं होतं. महायज्ञाचं ठिकाण अयोध्येतील राम मंदिरापासून केवळ ८०० मीटर अंतरावर आहे. मंत्री दयाशंकर सिंह यांनी आयोजित केलेल्या महायज्ञासाठी गोसाईगंजचे आमदार अभय सिंहदेखील आले होते. महायज्ञात टाकण्यात आलेला एक नारळ अचानक फुटला आणि त्यामुळे आग लागल्याचं सांगितलं जात आहे. आगीची तीव्रता अतिशय जास्त होती. संपूर्ण मंडप या आगीच्या भक्ष्यस्थानी पडला. घटनेची माहिती अग्निशमन दलाला तातडीनं देण्यात आली.

यानंतर पुढच्या काही मिनिटांत अग्निशमन दलाच्या ६ गाड्या घटनास्थळी पोहोचल्या. सुदैवानं या आगीत कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

यज्ञ मंडपात अचानक आग लागली. अग्निशमन दलाच्या जवानांनी आग त्वरित नियंत्रणात आणली. यामध्ये कोणतीही जीवितहानी झाली नसून परिस्थिती नियंत्रणात असल्याची माहिती परिवहन मंत्री दयाशंकर सिंह यांनी दिली. आगीची घटना शनिवारी दुपारी बाराच्या सुमारास घडली. गेल्या ९ दिवसांपासून महायज्ञ सुरु होता. आज महायज्ञाचा अखेरचा दिवस होता.

# नेपाळचे माजी पंतप्रधान केपी शर्मा ओलींना अटक!

## सत्तापालटानंतर काही तासातच कारवाई

काठमांडू : दि.२८ वृत्तसंस्था



नेपाळचे माजी पंतप्रधान के.पी. शर्मा ओली यांना त्यांच्या निवासस्थानातून ताब्यात घेण्यात आले, तर माजी गृहमंत्री रमेश लेखक यांना पहाटे ५ वाजण्याच्या सुमारास अटक करण्यात आली.नेपाळमध्ये सप्टेंबर महिन्यात आंदोलनांच्या कथित दडपशाहीशी संबंधित एका सदोष मनुष्यवधाच्या प्रकरणात नेपाळचे माजी पंतप्रधान के.पी. शर्मा ओली आणि माजी गृहमंत्री रमेश लेखक यांना शनिवारी सकाळी अटक करण्यात आल्याची माहिती पोलीस अधिकाऱ्यांनी दिली. बालेंद्र शाह यांनी शुक्रवारी नेपाळच्या पंतप्रधानपदाची शपथ घेतल्यानंतर अवघ्या काही तासातच हे अटकसत्र झालं आहे.

नेपाळचे माजी पंतप्रधान के.पी. शर्मा ओली यांना भक्तपूरमधील गुंडू येथील त्यांच्या निवासस्थानातून ताब्यात घेण्यात आले, तर लेखक यांना पहाटे ५ वाजण्याच्या सुमारास भक्तपूरमधीलच सूर्यविनायक येथून अटक करण्यात आली, अशी माहिती त्यांच्या स्वीय सहाय्यकाने दिली.

गृह मंत्रालयाने दाखल केलेल्या एका औपचारिक तक्रारीनंतर हे अटकसत्र राबवण्यात आले; या तक्रारीमुळे प्रकरणाचा तपास सुरु झाला आणि त्यानंतर अटक वॉरंट जारी करण्यात आले होते. काठमांडू पोस्टच्या वृत्तानुसार विशेष न्यायालयाचे माजी न्यायाधीश गौरी बहादूर कार्की यांच्या नेतृत्वाखालील आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्यासाठी ही कारवाई करण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. या समितीने अशी शिफारस केली आहे की, ओली, लेखक आणि तत्कालीन पोलीस महानिरीक्षक चंद्र कुबेर खापुंग यांच्यावर गुन्हेगारी निष्काळजीपणाच्या आरोपाखाली नेपाळच्या राष्ट्रीय दंड संहितेतील कलम १८१ आणि १८२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात यावा; या गुन्ह्यासाठी १० वर्षांपर्यंतच्या कारावासाची शिक्षा होऊ शकते. ५ मार्च रोजी नेपाळमध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत बालेंद्र शाह यांनी चार वेळा पंतप्रधानपदी राहिलेल्या शर्मा ओलींचा झापा-५ मतदारसंघात दारुण पराभव केला होता. या निवडणुकीत बालेंद्र यांच्या 'आरएसपी'ला २७५ पैकी १८२ जागा मिळाल्याने पक्षाचा सत्तास्थापनेचा मार्ग सुकर झाला होता.

### रॅपर ते पंतप्रधान

नेपाळच्या राष्ट्रपतींच्या शीतल निवास येथे बालेंद्र शाह यांचा पंतप्रधानपदाचा शपथविधी शुक्रवारी दुपारी १२ वाजून ३४ मिनिटांनी पार पडला. अभियंता ते रॅपर आणि काठमांडूचे महापौर ते नेपाळचे पंतप्रधानपद असा प्रवास करणारे बालेंद्र शाह हे नेपाळमध्ये लोकशाहीतून निवडून आलेले सर्वांत तरुण नेते ठरले आहेत. तर नेपाळच्या 'मधेश प्रदेशा'तील पहिलेच नेते आहेत.

### नेपाळमध्ये बालेंद्र यांच्याकडे सत्तासूत्रे

नेपाळमध्ये राष्ट्रीय स्वतंत्र पक्षाचे (आरएसपी) नेते बालेंद्र शाह यांनी शुक्रवारी पंतप्रधान पदाची सूत्रं स्वीकारली. सहा महिन्यांपूर्वी 'जेन झी' तरुणाईच्या हिंसक आंदोलनामुळे तत्कालीन पंतप्रधान के. पी. शर्मा ओली हे पायउतार झाल्यानंतर हंगामी सरकारने धुरा सांभाळलेल्या नेपाळला आता बालेंद्र (३५) यांच्या रुपाने तरुण नेतृत्व मिळालं आहे.

# अजित पवारांच्या आठवणीत सुनेत्रा पवार भावुक



## म्हणाल्या, तुमची उणीव प्रकर्षाने जाणवते

मुंबई:दि.२८ वृत्तसंस्था

माजी उपमुख्यमंत्री तथा दिवंगत नेते अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या दुर्घटनेला आज दोन महिने पूर्ण झाले. २८ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ९ वाजताच्या सुमारास अजित पवारांचे विमान दुर्घटनेत निधन झाले. दरम्यान, आज अजित पवारांच्या निधनाला दोन महिने झाल्यावर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी भावुक होत आठवणी जागवल्या आहेत.

अजित पवार यांच्या निधनानंतर सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळली. आज अजित पवारांच्या (पान २ वर)

# ८ बड्या आयएएस अधिकाऱ्यांची बदली!

## नयना गुंडे अमरावतीच्या नव्या विभागीय आयुक्त


मुंबई:दि.२८ वृत्तसंस्था

महाराष्ट्राच्या प्रशासनात मोठा उलटफेर झाला आहे. प्रशासनातील तब्बल ८ आयएएस अधिकाऱ्यांची बदली करण्यात आली आहे. या बदल्यावरुन अशोक खरात प्रकरणाचे प्रशासनातही पडसाद उमटताना दिसत आहेत. भोंदू खरातशी काही सरकारी अधिकाऱ्यांचेही संबंध असल्याचे तपासात उघड झाले आहे. काही दिवसांपूर्वी खरातशी संबंध असल्याचा ठपका ठेवत उपजिल्हाधिकारी अभिजीत भांडे पाटील यांची उचलबांगडी करण्यात आली आहे. तसेच मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातील उपजिल्हाधिकारी अभिजीत भांडे पाटील यांची प्रतिनियुक्ती रद्द करण्यात आली.



त्यानंतर त्यांना मंत्रालयातील महसूल व वन विभागात तात्काळ रुजू होण्याचे निर्देश देण्यात आले. आता ज्या ८ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये राज्य प्रशासनातील जिल्हाधिकारी आणि आयुक्त पदावरील बड्या अधिकाऱ्यांचे नाव आहे. एम. देवेंद्र सिंग यांची बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई येथे सहआयुक्त म्हणून बदली; डॉ. मैनक घोष जिल्हा परिषद, धाराशिव, यांची सांगली येथे जिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती; प्रियंवदा म्हाडुळकर यांची जिल्हा परिषद, धाराशिव येथे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून बदली; अशोक काकडे जिल्हाधिकारी, सांगली यांची व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ (एमएआयडीसी), मुंबई म्हणून नियुक्ती; राहुल रेखवार यांची महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई येथे सदस्य सचिव म्हणून बदली; श्वेता सिंघल विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांची व्यवस्थापकीय संचालक, महा मुंबई मेट्रो ऑपरेशन कॉर्पोरेशन लिमिटेड, मुंबई म्हणून नियुक्ती; रुबल प्रखेर अग्रवाल व्यवस्थापकीय संचालक, महा मुंबई (पान २ वर)

# तीन महिन्यांनी कदाचित एलपीजी गॅस बंद होईल- छगन भुजबळ



### राज्यात केरोसीन उपलब्ध

राज्यात आपल्याकडे केरोसीन उपलब्ध असताना आपण ते देऊ शकत नव्हतो. कारण उच्च न्यायालयाने त्यावेळी एक आदेश दिला होता. आता आपण न्यायालयाला कळवले आहे. साडेतीन हजार लिटर केरोसीन राज्यात उपलब्ध आहे. जिथे एलपीजी, पीएनजी कमी आहेत त्यांना केरोसीन वापरण्यासाठी परवानगी दिली आहे. जे जुने डिलर्स होते, त्यांचे रिन्युअल वगैरे प्रलंबित आहे, तिथे काम झालं असं समजावं आणि कामाला लागा. पेट्रोल पंपावर केरोसीन टँकर ठेवून तिथे मिळेल अशी व्यवस्था करु, असे छगन भुजबळ यांनी सांगितले.

मुंबई: दि.२८ वृत्तसंस्था

आखाती देशातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रासह देशभरात गॅसचा प्रचंड तुटवडा निर्माण झाला आहे. अशातच आता राज्याचे अन्न न नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी सामान्य लोकांची चिंता वाढवणारे एक वक्तव्य केले आहे. तीन महिन्यांनी कदाचित एलपीजी गॅसचा पुरवठा बंद होऊ शकतो, असे संकेत छगन भुजबळ यांनी दिले. ते शनिवारी दिल्लीत आयोजित करण्यात आलेल्या केंद्र सरकारच्या बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलत होते. यावेळी भुजबळ यांनी एलपीजी गॅसचा पुरवठा बंद करण्याबाबतच्या केंद्र सरकारच्या पत्रकाचा उल्लेख करत राज्यातील पीएनजी गॅसच्या जोडण्या वाढवण्याची गरज व्यक्त केली.

देशातील निवासी आणि व्यावसायिक आस्थापनांना एलपीजी गॅसचा पुरवठा सुलभपणे कसा करता येईल? यामध्ये कोणत्या अडचणी आहेत, याचा आढावा घेण्यासाठी आज दिल्लीत सर्व राज्यांच्या सचिवांना आणि अन्न व नागरी पुरवठा (पान २ वर)

# स्वयंघोषित बाबाला अटक

पुणे: दि.२८ वृत्तसंस्था

महाराष्ट्रातील पुण्यातून एक खळबळजनक प्रकरण समोर आले आहे. स्वतःला धार्मिक व्यक्ती म्हणवणाऱ्या एका स्वयंघोषित बाबाने महिलांना आपल्या जाळ्यात ओढून त्यांचे शोषण केले. पोलिसांनी पिंपरी परिसरात ऋषिकेश वैद्य नावाच्या एका स्वयंघोषित बाबाला अटक केली आहे. ऋषिकेशवर एका महिलेवर बलात्कार केल्याचा आरोप आहे. तो फरार होता. पोलिसांच्या माहितीनुसार, एका ३५ वर्षीय महिलेच्या तक्रारीनंतर हे प्रकरण उघडकीस आले. पीडितेने सांगितले की, २०२३ मध्ये तिची आरोपीशी सोशल मीडियाद्वारे ओळख झाली. त्यांच्या संभाषणादरम्यान, आरोपीने स्वतःची ओळख देवाचा मोठा भक्त म्हणून (पान २ वर)

# निवडणूक रोखे रद्द झाले तरी भाजपच्या तिजोरीत कोट्यवधींचे घबाड!

नवी दिल्ली: दि.२८ वृत्तसंस्था

असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स (एडीआर) अहवाल हा राष्ट्रीय पक्षांनी निवडणूक आयोगाला सादर केलेल्या लेखापरीक्षण अहवाल आणि देणगीच्या तपशिलावर आधारित आहे. राजकीय पक्षांना मिळणाऱ्या देण्यांबाबत अहवाल समोर आला आहे. यावेळीही भाजपच्या देणग्यांमध्ये प्रचंड वाढ झाली असून, त्या इतर सर्व राष्ट्रीय पक्षांच्या एकत्रित रकमेपेक्षाही जास्त असल्याचे निदर्शनास आले आहे.

अहवालानुसार २०२४-२५ मध्ये राजकीय निधीमध्ये लक्षणीय वाढ झाली असून, त्यात सत्ताधारी पक्षाचा मोठा वाटा आहे. कॉर्पोरेट देणग्या हा राजकीय निधीचा (पान २ वर)




■ एडीआरचा हा अहवाल नुकताच प्रसिद्ध करण्यात आला. या अहवालानुसार, राष्ट्रीय पक्षांना २०,००० रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या एकूण ६,६४८.५६३ कोटी रुपयांच्या देणग्या मिळाल्या. यापैकी ६,०७४ कोटी रुपये एकट्या भाजपला मिळाले. पीटीआयने दिलेल्या वृत्तानुसार, ही रक्कम काँग्रेस, आप, सीपीआय-एम आणि नॅशनल पीपल्स पार्टी यांसारख्या राष्ट्रीय पक्षांच्या एकत्रित एकूण देणग्यांच्या १० पटींहून अधिक आहे. एकूण ११,३४३ देणग्या मिळाल्या, त्यापैकी ५,५२२ देणग्या एकट्या भाजपला मिळाल्या आहेत. काँग्रेसला २,५०१ देणग्यांमधून ₹५१७.३९४ कोटी मिळाले. इतर पक्षांमध्ये, आम आदमी पार्टीला ₹२७.०४४ कोटी मिळाले. नॅशनल पीपल्स पार्टीला (एनपीईपी) ₹१.९४३ कोटी मिळाले. बहुजन समाज पक्षाने १९ वर्षांपासून सातत्याने जाहीर केले आहे की त्यांना ₹२०,००० पेक्षा जास्त कोणतीही देणगी मिळालेली नाही. यावेळीही बसपाने शून्य देणग्या मिळाल्याचे कळवले आहे.

# युद्धाच्या संकटातून देशाला एकजूट होऊन लढायचे आहे- नरेंद्र मोदी

## देशातील सर्वात मोठ्या विमानतळाचे उद्घाटन

नोएडा: दि.२८ वृत्तसंस्था

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी दुपारी १२.३० वाजता यूपीमधील जेवर येथे नोएडा आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन केले. हे सध्या भारतातील सर्वात मोठे आणि आशियातील दुसरे सर्वात मोठे विमानतळ आहे. ४ टप्पे पूर्ण झाल्यावर हे आशियातील सर्वात मोठे विमानतळ बनेल.

पंतप्रधान मोदींनी जनसभेदरम्यान लोकांना इस्रायल-अमेरिका आणि इराणमधील युद्धामुळे निर्माण झालेल्या संकटाशी एकजुटीने लढण्याचे आवाहन केले. ते म्हणाले की, काल सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी चर्चा झाली आहे. चांगली चर्चा झाली आहे. देशवासियांना मी सांगू इच्छितो की, आपल्याला शांत मनाने, धैर्याने, एकजुटीने या संकटाचा सामना



करायचा आहे. हे संपूर्ण जगाला त्रास देणारे संकट आहे. पंतप्रधान म्हणाले, देशातील सर्व राजकीय पक्षांना मी आग्रहाने सांगू इच्छितो की, संकटाच्या काळात अशा गोष्टी बोलणे टाळा, ज्या देशासाठी हानिकारक आहेत. देशाला नुकसान पोहोचवणाऱ्या कृतींना देशाची जनता कधीही माफ करणार नाही. हे सध्या भारतातील सर्वात मोठे आणि आशियातील दुसरे सर्वात मोठे विमानतळ आहे. ४ टप्पे पूर्ण झाल्यावर हे (पान २ वर)

**अपघात टळला** — इंडिगोच्या १६१ प्रवाशांचा मृत्यूला चकवा

# विमानाचे इंजिन फेल; फुल एमर्जन्सी लँडिंग सुरक्षित!

नवी दिल्ली: दि.२८ वृत्तसंस्था

दिल्लीतील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर शनिवारी सकाळी खळबळ उडाली. विशाखापट्टणमहून दिल्लीला येणाऱ्या इंडिगोच्या विमानात तांत्रिक बिघाड झाल्याची माहिती मिळताच विमानतळावर धावपळ सुरु झाली. विमानाचं इंजिन फेल झाल्याची भीतीनं २८ क्रमांकाच्या धावपट्टीवर फुल एमर्जन्सी घोषित करण्यात आली होती. सुदैवानं पायलटच्या समयसूचकतेमुळे आणि विमानतळ प्रशासनाच्या सतर्कतेमुळे मोठा अपघात टळला. विमानानं फुल एमर्जन्सी लँडिंग अगदी सुरक्षितपणे केलं.आपत्कालीन प्रोटोकॉलनुसार इंडिगोच्या ६ ई ५७९ विमानानं १० वाजून ५४ मिनिटांनी इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या धावपट्टी क्रमांक २८ वर सुरक्षित लँडिंग केलं. यावेळी अग्निशमन दलाची वाहनं आणि रुग्णवाहिका तैनात ठेवण्यात आल्या होत्या. कोणत्याही दुर्दैवी घटनेचा सामना करण्यासाठी संपूर्ण यंत्रणा अलर्टवर होती. सुरुवातीच्या माहितीनुसार विमानात तांत्रिक बिघाड झाला होता. या विमानात १६१ प्रवासी होते. या प्रवाशांचा जीव अगदी थोडक्यात वाचला. ते मृत्यूच्या दाढेतून परतले.बोईंग ७३७-८०० विमान सकाळी १० वाजून ५० मिनिटांनी दिल्लीच्या हवाई क्षेत्रात प्रवेश करत असताना इंजिनमध्ये गंभीर स्वरुपाचा बिघाड झाल्याचे संकेत मिळाले. विमान तज्ज्ञांच्या माहितीनुसार, इंजिन फेल होण्याच्या स्थितीत विमानाचं संतुलन बिघडण्याचा धोका असतो. हायड्रॉलिक यंत्रणेला फटका बसू शकतो. पायलटनं अजिबात वेळ न दवडता याची माहिती एटीसीला दिली. यानंतर १० वाजून ५३ मिनिटांनी विमानतळावर फुल इमर्जन्सी घोषित करण्यात आली. २८ क्रमांकाची धावपट्टी हाय अलर्टवर ठेवण्यात आली.




### एमर्जन्सी लँडिंगमध्ये तीन प्रकारची जोखीम

■ लँडिंगवेळी विमानाचा वेग आधीपासूनच कमी असतो. इंजिनानं पूर्णपणे काम करणं बंद केल्यास विमानाला धावपट्टीवर उतरवण्यासाठी पायलटकडे अतिशय कमी वेळ असतो.

■ तांत्रिक बिघाडाच्या स्थितीत विमानाचं वजन आणि संतुलन राखणं अतिशय आव्हानात्मक असतं. टचडाऊन करताना विमानाचं संतुलन बिघडल्यास विमान धावपट्टीवर घसरु शकतं.

■ इंजिनमध्ये बिघाड झाल्यास बहुतांश वेळा घर्षण किंवा गळती होऊ शकते. लँडिंगवेळी टायर धावपट्टीला जोरात घासले गेल्यास ठिणगी पडू शकते. त्यामुळे आग लागण्याचा धोका असतो

महत्त्वाचे

## तब्बल ४० वर्षांनंतर दिसला दुर्मीळ 'हैनान ससा'

**बीजिंग :** गेल्या चार दशकांपासून निसर्गप्रेमी आणि शास्त्रज्ञांना हुलकावणी देणारा, अत्यंत दुर्मीळ मानला जाणारा 'हैनान ससा' अखेर संशोधकांना दिसून आला आहे. मात्र, हा शोध एका दुर्दैवी घटनेतून लागला. रस्त्याच्या कडेला या प्राण्याचा मृतदेह अत्यंत चपट्या अवस्थेत आढळला.दक्षिण चीनमधील हैनान बेटावर संशोधक आपल्या क्षेत्रीय कामासाठी जात असताना, त्यांना अचानक रस्त्यावर एक मृत प्राणी दिसला. तो मृतदेह अत्यंत खराब अवस्थेत असूनही, शास्त्रज्ञांनी त्याला तत्काळ ओळखले. हा प्राणी दुसरा तिसरा कोणी नसून जगातील सर्वात कमी अभ्यासल्या गेलेल्या ससा प्रजातींपैकी एक असलेला 'हैनान ससा' होता. 'मॅमॅलिया' या नियतकालिकात १५ डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध झालेल्या अभ्यासानुसार, हा मृतदेह बेटाच्या ईशान्य भागात आढळला. विशेष म्हणजे, या भागात १९८६ नंतर या प्रजातीची अधिकृत नोंद झालेली नव्हती.सध्या हा ससा केवळ पश्चिम हैनानमधील 'दतियान नॅशनल नेचर रिझर्व्ह'मध्येच शिल्लक असल्याचे मानले जात होते.

# येमेनची रणमैदानात उडी; अबूधाबीवर क्षेपणास्त्र हल्ला

## ५ भारतीय जखमी; इराणचा थायलंडला 'स्पेशल' पास

**नवी दिल्ली : दि.२८ वृत्तसंस्था**

अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यातील युद्धाला आता २१ दिवसांहून अधिक काळ लोटला आहे. शांततेच्या सर्व वाटाघाटी फिस्कटल्या असून आता हे युद्ध अधिक हिंसक वळण घेत आहे. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, आतापर्यंत या युद्धापासून दूर असलेला येमेन आता थेट मैदानात उतरला असून त्यांनी इस्रायल आणि मित्रराष्ट्रांना लक्ष्य करण्यास सुरुवात केली आहे. या युद्धाची झळ आता भारतीयांनाही बसू लागली असून अबु धाबीतील हल्ल्यात भारतीय नागरिक जखमी झाल्याने खळबळ उडाली आहे.



येमेनकडून अबु धाबीच्या दिशेने डागलेली बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे हवेतच नष्ट करण्यात आली खरी, पण या क्षेपणास्त्रांचे अवशेष शहरात पडल्याने मोठी दुर्घटना घडली. खलिफा इकॉनॉमिक झोनमध्ये या अवशेषांमुळे भीषण आग लागली. या घटनेत ५ भारतीय नागरिक गंभीर जखमी झाले आहेत. ही बातमी समोर येताच भारतात चिंतेचे वातावरण आहे. येमेनच्या या हल्ल्याने सिद्ध केले आहे की, आता हे युद्ध केवळ इराणपुरते मर्यादित राहिलेले नाही, तर संपूर्ण आखाती देश यात ओढले जात आहेत.एकिकडे युद्ध सुरू असताना इराणने एक मोठी मुत्सद्दी खेळी खेळली आहे. थायलंडचे पंतप्रधान अनुतिन चर्नविराकुल यांनी जाहीर केले की, इराणसोबत झालेल्या विशेष करारानुसार थाई तेलवाहू जहाजांना होर्मुझच्या सामुद्रधुनीतून सुरक्षित प्रवासाची मुभा मिळाली आहे. काही दिवसांपूर्वीच थायलंडच्या जहाजावर अज्ञात हल्ला झाला होता, ज्यामध्ये ३ कर्मचारी बेपत्ता झाले होते. आता इराणने थायलंडला दिलेली ही सवलत ट्रम्प प्रशासनासाठी चिंतेची बाब ठरत आहे, कारण यामुळे अमेरिकेच्या आर्थिक निर्बंधांना खिंडार पडण्याची शक्यता आहे.

लेबनॉनच्या सीमेवरही परिस्थिती हाताबाहेर गेली आहे. इस्रायलने लिटानी नदीपर्यंत 'बफर झोन' तयार करण्याची घोषणा केल्यानंतर हिजबुल्लाहने आक्रमक पवित्रा घेतला आहे. हिजबुल्लाहने दावा केला आहे की, त्यांनी इस्रायलचे दोन 'मर्कवा' रणगाडे उद्ध्वस्त केले आहेत. रॉकेट, तोफगोळे आणि आत्मघाती ड्रोनच्या साहाय्याने हिजबुल्लाहने इस्रायली सैन्याला लिटानी नदी ओलांडण्यापासून रोखले आहे. पंतप्रधान नेतान्याहू यांनी उत्तर इस्रायलच्या रक्षणासाठी हे पाऊल उचलल्याचे म्हटले असले तरी, हिजबुल्लाहचा प्रतिकार इस्रायलसाठी डोकेदुखी ठरत आहे.

### शांततेची आशा मावळली?

ट्रम्प प्रशासन आणि इराण यांच्यात पाकिस्तानमार्फत चर्चा सुरू होणार होती, पण इराणने अमेरिकेच्या कडक अटी फेटाळून लावल्या आहेत. येमेनची युद्धात एन्ट्री आणि भारतीयांना झालेली दुखापत यामुळे आता हे युद्ध जागतिक स्तरावर संताप निर्माण करत आहे. जर येमेन आणि हिजबुल्लाहने आपले हल्ले वाढवले, तर अमेरिका थेट जमिनीवर सैन्य उतरवण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# व्हीआयपी उड्डाणांसाठी कठोर नियम जाहीर

## आता पायलटचा निर्णय अंतिम

**नवी दिल्ली : दि.२८ वृत्तसंस्था**

दोन महिन्यांपूर्वी बारामतीत महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह चौघांचं एका विमान अपघातात निधन झालं. लियरजेच ४५ हे विमान कोसळून हा अपघात झाला होता. त्यानंतर आता डीजीसीए ने व्हीव्हीआयपी व राजकीय पदाधिकाऱ्यांच्या वाहतुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या विमानांसाठी कठोर नियम जाहीर केले आहेत. पायलटने घेतलेला निर्णय अंतिम असून कोणीही या निर्णयाला आवाहन देऊ शकत नाही अशी माहिती यावेळी त्यांनी दिली.

भारतीय वायुयान अधिनियम, २०२४, अंतर्गत हा आदेश देण्यात आला आहे. यामध्ये नमूद केलेल्या नियमांनुसार लोकसभेचे अध्यक्ष, राज्यसभेचे उपाअध्यक्ष, मुख्यमंत्री, राज्यपाल, केंद्रीय मंत्रिमंडळातील मंत्री आणि भारताचे सरन्यायाधीश घेऊन जाणाऱ्या विमानांचाही समावेश आहे. या नियमांचे उल्लंघन केल्यास विमान कंपन्यांच्या परवान्यांसह वैमानिकांचे लायसन्स देखील रद्द होऊ शकतात. कोणत्याही तांत्रित कारणामुळे पायलटने विमान उड्डाण रद्द करण्याचा निर्णय घेतला तर त्या निर्णयाचेया मार्गदर्शक तत्त्वांमध्ये असे नमूद केले आहे की, विमान क्रूवर उड्डाणांसाठी अनावश्यक दबाव टाकल्यामुळे सुरक्षिततेवरती परिणाम होतो. व्हीव्हीआयपी प्रवाशांनी शेवटच्या क्षणी केलेल्या जाणाऱ्या बदलांमुळे क्रूवरती दबाव आला नाही पाहिजे. काही बदल असतील तर विमान कंपनीच्या व्यवस्थापनामार्फत केल्या पाहिजेत आणि कॉकपिटपर्यंत काही पोहचू नये.

''विमान ऑपरेटरने हे सुनिश्चित करावे की उड्डाणे नेहमी जारी केलेल्या विमान नियम आणि सूचनांनुसार होईल आणि उड्डाण कर्मचाऱ्यांवर उड्डाण करण्यासाठी अवाजवी दबाव आणला जाणार नाही, ज्यामुळे सुरक्षिततेवर परिणाम होऊ शकतो,'' असे आदेशात म्हटले आहे. ''व्हीआयपी आवश्यकतांमुळे नियोजित उड्डाणात शेवटच्या क्षणी होणारे कोणतेही बदल केवळ संस्थेच्या व्यवस्थापनामार्फतच समन्वित केले जावेत, थेट कर्मचाऱ्यांशी संपर्क साधून नये.'' डीजीसीएने सर्व व्हिआयपी उड्डाणांसाठी किमान दोन व्यक्तींच्या क्रूसह दुहेरी इंजिन असलेली विमाने अनिवार्य केली आहेत.

## भारत दोन्ही शत्रूंना आणणार एकाच टेबलावर

**नवीदिल्ली:** .मध्य-पूर्वेतील वाळवंट आता रक्ताने माखण्याची भीती निर्माण झाली आहे. एकीकडे अमेरिका इराणवर मोठा भू-हल्ला करण्याच्या तयारीत असताना, इराणने आपला मोर्चा आता इस्रायलवरून वळवून चक्क आपल्या शेजारील इस्लामिक देशांकडे, म्हणजेच संयुक्त अरब अमिराती आणि सौदी अरेबियाकडे वळवला आहे. या भीषण तणावाच्या परिस्थितीत भारताने 'ब्रिक्स' या जागतिक व्यासपीठाचा वापर करून शांतता प्रस्थापित करण्यासाठी एक धाडसी पाऊल उचलले आहे.गेल्या काही दिवसांत इराणने युएई आणि सौदी अरेबियावर शेकडो क्षेपणास्त्रे आणि आत्मघाती ड्रोन हल्ले केले आहेत. इराणचा आरोप आहे की, युएई हा अमेरिका आणि इस्रायलला मदत करून इराणविरुद्धच्या युद्धात सक्रिय भूमिका बजावत आहे. ''जर अमेरिकेचे पायदळ आमच्या भूमीवर आले, तर युएईला त्याची मोठी किंमत मोजावी लागेल,'' अशी उघड धमकी तेहरानने दिली आहे. होर्मुझची सामुद्रधुनी बंद असल्यामुळे आधीच जागतिक व्यापार ठप्प झाला असताना, आता या नव्या संघर्षामुळे कच्च्या तेलाचे संकट अधिक गडद झाले आहे.भारत सध्या ब्रिक्स देशांचे अध्यक्षपद भूषवत आहे. मे महिन्यात होणारी परराष्ट्र मंत्र्यांची बैठक आणि सप्टेंबरमध्ये दिल्लीत होणारी १८ वी ब्रिक्स शिखर परिषद, यासाठी भारताने इराण, युएई आणि सौदी या तिन्ही देशांना निमंत्रण दिले आहे. विशेष म्हणजे, हे तिन्ही देश आता ब्रिक्सचे अधिकृत सदस्य आहेत.

## व्हाईट हाऊसमध्ये मेलानिया ट्रम्प यांची 'रोबो'सोबत एन्ट्री

**वॉशिंग्टन : दि.२८ वृत्तसंस्था**

अमेरिकेच्या प्रथम महिला मेलानिया ट्रम्प यांनी व्हाईट हाऊसमध्ये एका अनोख्या पाहुण्यासोबत प्रवेश करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. हा पाहुणा दुसरा कोणी नसून 'फिगर ०३' नावाचा एक प्रगत 'ह्युमनॉईड' (मानवासारखा दिसणारा) रोबो आहे.



'फॉस्टरिंग द फ्युचर टुगेदर ग्लोबल कोलिशन समिट'च्या दुसऱ्या दिवशी मेलानिया ट्रम्प यांनी ४० हून अधिक देशांच्या प्रतिनिधींचे स्वागत केले. यावेळी त्या रेड कार्पेटवर अमेरिकेने विकसित केलेल्या या रोबोसोबत चालताना दिसल्या. या रोबोने ११ भाषांमध्ये उपस्थितांचे स्वागत करत म्हटले, 'तंत्रज्ञान आणि शिक्षणाद्वारे मुलांना सक्षम करण्याच्या या ऐतिहासिक चळवळीचा भाग होताना मला अभिमान वाटत आहे.'यावर प्रतिक्रिया देताना मेलानिया ट्रम्प म्हणाल्या, 'व्हाईट हाऊसमध्ये माझे पहिले अमेरिकन बनावटीचे ह्युमनॉईड पाहुणे म्हणून तुमचे स्वागत करताना मला आनंद होत आहे.' मेलानिया ट्रम्प यांनी यावेळी भविष्यातील शिक्षणाबद्दल महत्त्वाचे भाष्य केले. त्या म्हणाल्या की, नजीकच्या भविष्यात ह्युमनॉईड शिक्षक विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या गतीनुसार आणि त्यांच्या 'भावनिक स्थितीनुसार' गणित, इतिहास आणि इतर विषयांचे वैयक्तिकृत शिक्षण देऊ शकतील.

# युद्ध सुरू असताना रशियाची पेट्रोल निर्यातीवर बंदी

**नवी दिल्ली : दि.२८ वृत्तसंस्था**

पेट्रोल या पेट्रोलियम उत्पादनावर रशियाने बंदी घालायचा निर्णय घेतला आहे. सध्या रशिया दररोज १,२०,००० ते १,७०,००० बॅरल पेट्रोलची निर्यात करतो तर देशांतर्गत किमती स्थिर करण्यासाठी रशिया १ एप्रिलपासून पेट्रोलच्या निर्यातीवर बंदी घालणार आहे जी जुलै २०२६ पर्यंत लागू राहील.



गेल्या एक महिन्यापासून जागतिक शेअर बाजारात उलथापालथ सुरू आहे. या दरम्यान, ऊर्जा क्षेत्रातील प्रमुख देशांपैकी रशियाने एक मोठं पाऊल उचललं आहे. १ एप्रिलपासून रशिया पेट्रोलच्या (गॅसोलीनच्या) निर्यातीवर पूर्णपणे बंदी घालणार आहे. इकॉनॉमिक टाइम्समधील एका वृत्तानुसार, रशियन सरकारने या बंदीला अधिकृतपणे दुजोरा दिला.

रशियाचे उप-पंतप्रधान अलेक्झांडर नोवाक यांनी शुक्रवारी ऊर्जा मंत्रालयाला विशेष निर्देश जारी केला, ज्यामध्ये १ एप्रिलपासून पेट्रोलच्या निर्यातीवर बंदी घालण्याचा प्रस्ताव देण्यात आला आहे. रशियाची स्थानिक वृत्तसंस्था च्या अहवालानुसार, ही बंदी केवळ काही आठवड्यांसाठी नाही तर, तब्बल चार महिने, म्हणजेच ३१ जुलैपर्यंत लागू राहण्याची शक्यता आहे.

रशियन सरकार देशांतर्गत इंधनाच्या किमती स्थिर करण्यासाठी १ एप्रिलपासून पेट्रोल निर्यातीवर निर्बंध लादणार आहे. मध्यपूर्वेत अमेरिका-इराण युद्धामुळे जागतिक ऊर्जा बाजारातील अशांततेच्या पार्श्वभूमीवर रशियाने हा निर्णय घेतला असून यामुळे चीन, तुर्की, ब्राझील, आफ्रिका आणि सिंगापूर यांसारख्या रशियाकडून थेट पेट्रोल आयात करणाऱ्या काही देशांच्या ऊर्जा बाजारात आणखी व्यत्यय येऊ शकतो.

# इस्रायलवर महासंकट? तेल अवीवच्या आकाशात हजारो कावळ्यांच्या घिरट्या

**तेहरान:दि.२८ वृत्तसंस्था**

इस्रायलची राजधानी असलेल्या तेल अवीववर हजारो कावळे एकाच जागेवर घिरट्या घालताना दिसले आहेत. त्यामुळे देशाची चिंता वाढली आहे. वेगवेगळ्या चर्चांना उधाण आलं आहे. इराण युद्ध सुरु असताना या घडामोडीकडे धोक्याचा इशारा म्हणून पाहिलं जात आहे. या घडामोडीचा संदर्भ बायबलमधील आयतशी जोडला जात आहे. गेल्या महिन्याभरापासून इस्रायलचा इराणशी संघर्ष सुरु आहे. इराणच्या जोरदार पलटवारामुळे इस्रायलच्या अनेक शहरांचं प्रचंड नुकसान झालं आहे.



राजधानी तेल अवीवच्या आकाशात मंगळवारी कावळ्यांचा एक मोठा थवा पाहायला मिळाला. त्यांचा आकडा हजारांमध्ये होता. या कावळ्यांनी आकाशात घिरट्या घालायला सुरुवात केली. कावळे बराच वेळ आसमंतात घिरट्या घालत होते. त्यांचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. अनेकांनी याचा संदर्भ इराण विरुद्ध सध्या सुरु असलेल्या युद्धाशी लावला.

हजारो कावळ्यांच्या घिरट्यांचा अर्थ नेमका काय होतो, याचा शोध अनेकांनी इंटरनेटवर घेतला. कावळ्यांच्या या कृतीचा संबंध अनेकांनी प्रलयाच्या भविष्यवाणीशी जोडला. कावळ्यांची कृती काहीतरी अघटित घडणार असल्याचं सूचित करत असल्याचं काहींनी सोशल मीडियावर सांगितलं. तशा प्रतिक्रिया अनेकांनी लिहिल्या. हजारो कावळे आभाळात घिरट्या घालत असल्याचं पाहून शहरवासी चिंतेत पडले.

यानंतर बऱ्याचदा भीषण संकट येतं, विनाश होतो, अशा प्रकारच्या एक्स पोस्ट काहींनी कावळ्यांचा थवा पाहून सोशल मीडियावर केल्या आहेत. अनेकांनी याचा संबंध बायबलच्या भविष्यवाणीशी जोडला आहे. बुक ऑफ रेवेलेशनच्या अध्याय १९:१७ शी याचा संबंध आहे. आयतमध्ये एका देवदूताचं वर्णन आहे. हा देवदूत हवेतील पक्षांना बोलावतो. इश्वरानं आयोजित केलेल्या भोजनात सहभागी होण्यासाठी देवदूत त्यांना बोलावतो, अशी पोस्ट एका यूजरनं केली आहे.

हजारो कावळे अशा प्रकारे आकाशात उडतात, त्यात घाबरण्यासारखं काहीच नाही, असं तज्ज्ञ सांगतात. तेल अवीवच्या आकाशात इतक्या मोठ्या संख्येनं पक्षी दिसतात. ते आधीही दिसले आहेत. कावळ्यांचा नियमित प्रवास सुरु होता. वसंत काळात ५० कोटी पक्षी इस्रायलाच्या आकाशातून उडत जातात. ते थवे तयार करुन प्रवास करत असतात,

# अमेरिकन डॉलरवर आता ट्रम्प यांची स्वाक्षरी असणार

**वॉशिंग्टन : दि.२८ वृत्तसंस्था**

अमेरिकेचे चलन असलेल्या डॉलरच्या नोटेवर आता अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची स्वाक्षरी असणार आहे. डॉलर हे चलन अमेरिकेत १८६१ पासून अस्तित्वात आले.

तेंव्हापासून अमेरिकेच्या एखाद्या विद्यमान अध्यक्षाची स्वाक्षरी प्रथमच चलनी नोटेवर छापली जाण्याची ही अमेरिकेच्या इतिहासातील पहिलीच वेळ आहे. अमेरिकेच्या स्वातंत्र्याला यंदा २५० वर्षे पुर्ण होत असल्याच्या निमित्ताने हा निर्णय घेण्यात आला आहे.या वर्षापासून अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याबरोबर अमेरिकेचे अर्थमंत्री स्कॉट बेसेंट यांची स्वाक्षरी डॉलरच्या नोटेवर दिसणार आहे, असे अमेरिकेचे कोषाध्यक्ष ब्रँडन बीच यांनी सोशल मीडियावरच्या पोस्टमध्ये म्हटले आहे.अमेरिकेच्या स्वातंत्र्याच्या २५० वा वर्धापनदिन साजरा करण्यासाठी राष्ट्रीय कला आयोगाने ट्रम्प यांचे चित्र असलेल्या २४-कॅरेट सोन्याचे नाणे देखील तयार केले आहे.

निरीक्षण | अलाहाबाद हायकोर्टाचा निर्वाळा

# विवाहित पुरुष आणि प्रौढ मुलीचे 'लिव्ह-इन' गुन्हा नाही

**नवी दिल्ली : दि.२८ वृत्तसंस्था**

विवाहित पुरुष आणि प्रौढ मुलीने संमतीने 'लिव्ह इन'मध्ये राहणे हा कायद्यानुसार गुन्हा ठरत नाही, असे अलाहाबाद उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. न्यायमूर्ती जे. जे. मुनीर आणि न्या. तरुण सक्सेना यांच्या खंडपीठाने दोन याचिकाकर्त्यांना तात्पुरते अटकपूर्व संरक्षण देताना ही निरीक्षणे नोंदवली.

### नैतिकता आणि कायदा वेगवेगळे

'विवाहित पुरुष प्रौढ महिलेच्या संमतीने तिच्यासोबत 'लिव्ह इन'मध्ये राहत असेल, तर त्यात कोणताही गुन्हा होत नाही. नैतिकता व कायदा यांच्या गफलत करता येणार नाही. जेव्हा कायद्यानुसार गुन्हा नाही, तेव्हा सामाजातील मते किंवा नैतिकता यांचा विचार न्यायालयाला करता येणार नाही', असे न्यायालयाने स्पष्ट केले.

या प्रकरणात मुलीच्या आईने दाखल केलेल्या तक्रारीनंतर गुन्हा दाखल करण्यात आला होता. आपल्या १८ वर्षांच्या मुलीला एका विवाहित पुरुषाने जबरदस्तीने पळवून नेल्याचा आरोप तिने केला होता. मात्र याचिकेनुसार, संबंधित मुलीने शहाजहानपूरच्या पोलिस अधीक्षकांना लेखी निवेदन देऊन ती प्रौढ आहे आणि स्वतःच्या इच्छेने त्या पुरुषासोबत 'लिव्ह इन'मध्ये राहत असल्याचे स्पष्ट केले होते. आपले कुटुंबीय



आपल्या 'नात्या'ला विरोध करत असून, मानहानीच्या भीतीने तिला ठार मारण्याची धमकी दिली असल्याचाही आरोप मुलीने केला. तिच्या तक्रारीवर कोणतीही कारवाई झालेली नसल्याचे सांगण्यात आले.दोन्ही पक्षांची बाजू ऐकल्यानंतर, न्यायालयाने प्रतिज्ञापत्र दाखल करण्यासाठी दोन आठवड्यांची मुदत दिली असून, पुढील सुनावणी ८ एप्रिल रोजी होईल. तोपर्यंत याचिकाकर्त्यांवर कोणतीही सक्तीची कारवाई करू नये, असा निर्देश खंडपीठाने दिला आहे.शहाजहानपूर येथे दाखल करण्यात आलेल्या अपहरणाच्या तक्रारी प्रकरणी याचिकाकर्ते अनामिका आणि नेत्रपालयांना अटक केली जाऊ नये, असा आदेश दिला आहे. याव्यतिरिक्त, त्या तरुणाच्या कुटुंबाला त्या जोडप्याला कोणत्याही प्रकारची इजा करण्यापासून, त्यांच्या निवासस्थानी प्रवेश करण्यापासून, अथवा त्यांच्याशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे संपर्क साधण्यापासून रोखण्यात आले आहे.

# अमेरिकन सैनिकांना आधी हाकला!

## इराणने टार्गेट बदलले; निर्वाणीचा इशारा

**तेल अवीव: दि.२८ वृत्तसंस्था**

अमेरिकेनं इराण वरील हल्ले रोखले असले तरीही इराण विरुद्ध इस्रायल संघर्ष सुरुच आहे. युद्धाच्या पहिल्या टप्प्यात इराणनं आखाती देशांमधील अमेरिकेच्या नौदल आणि हवाई तळांना लक्ष्य केलं. या हल्ल्याचा अंदाज अमेरिकेला नव्हता. दस्तुरखुद्द डोनाल्ड ट्रम्प यांनी याबद्दलची कबुली दिलेली आहे. अमेरिकेच्या तळांचं अतोनात नुकसान केल्यावर आता इराणनं टार्गेट बदललं आहे. एकीकडे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणमधील ऊर्जा केंद्र आणि प्रकल्पांवरील हल्ले थांबवत असल्याची घोषणा केली आहे. ही युद्धबंदी ६ एप्रिलपर्यंत असेल. दुसरीकडे इराणनं आता पश्चिम आशियातील हॉटेलांना लक्ष्य करण्यास सुरुवात केली आहे. ज्या ज्या हॉटेलांमध्ये अमेरिकन सैनिकांचा मुक्काम आहे, त्या त्या हॉटेलांना इराणनं रडारवर घेतलं आहे. याबद्दलचा इशारा इराणी सैन्यानं दिला आहे.

तुमच्या हॉटेलांमध्ये अमेरिकन सैनिकांना राहू देऊ नका. राहत असतील तर त्यांना हॉटेल सोडायला सांगा. अन्यथा हॉटेलांवर हल्ले करु, असा स्पष्ट इशारा इराणनं पश्चिम आशियाई देशांमधील हॉटेलांच्या मालकांना दिला आहे. इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी अमेरिकन सैनिकांवर गंभीर आरोप केले. आखात सहकार्य परिषदेच्या देशांच्या नागरिकांचा वापर अमेरिकन सैनिक मानवी ढाल म्हणून करत आहेत, असा स्पष्ट आरोप अराघची यांनी केला आहे. युद्धाच्या सुरुवातीपासून अमेरिकन सैनिक जीसीसीमध्ये असलेले त्यांचे तळ सोडून हॉटेल आणि कार्यालयांमध्ये पळून गेले आहेत. हे सैनिक तिथेच लपून बसले आहेत. या सैनिकांना बुकिंग करु देऊ नका, असं आवाहन परराष्ट्र मंत्री अराघची यांनी केलं आहे. इराणनं यासंदर्भात यूएई आणि बहरिन यांना कठोर इशारा दिल्याची माहिती आहे.

ज्यावेळी अमेरिकेचे सैनिक कोणत्याही हॉटेलात जातात, तेव्हा आमच्या दृष्टीनं ते हॉटेल अमेरिकन असतं. अशा परिस्थितीत आम्ही हातावर हात ठेवून बसून अमेरिकेच्या हल्ल्यांची वाट पाहायची का, असा सवाल इराणच्या सशस्त्र दलांचे प्रवक्ते अबोलफजल शेकरची यांनी गुरुवारी सरकारी वृत्तवाहिनीवर बोलताना केला. अमेरिकन सैनिक आमच्यावर हल्ले करतात. त्यांना प्रत्युत्तर देण्यासाठी आम्हालाही हल्ले करावे लागतील आणि तिथेच करावे लागतील, जिथे त्यांचा मुक्काम आहे.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.* **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

# डिजिटल जगासोबतच ऑफलाइन जगातही जगण्याची तयारी ठेवा!



विश्व भ्रमण
रूबेन वाळके
अकोला, मो. ७०२८१७३८८०

**आजच्या डिजिटल युगात 'इंटरनेट' हे केवळ मनोरंजनाचे साधन नाही. ते जागतिक अर्थव्यवस्थेचा कणा झाले आहे. अशातच आता, 'इराण हे जगातील इंटरनेटचे जाळे तोडणार' अशा बातम्या सोशल मीडिया आणि न्यूज चॅनेल्सवर झळकत आहेत. त्यामुळे जगभरात मोठी खळबळ माजली आहे. पण, या दाव्यांमध्ये नेमके तथ्य किती आहे आणि जर खरोखरच असे घडले, तर त्याचे परिणाम काय होतील, हे समजून घेणे महत्त्वाचे आहे.**

इराणने अधिकृतपणे 'जगाचे इंटरनेट बंद करू'अशी घोषणा केलेली नाही. मात्र, या बातम्यांमागे दोन कारणे आहेत:




**-समुद्राखालील केबल्स :** जगातील सुमारे ९५ टक्के इंटरनेट डेटा हा समुद्राखालून जाणाऱ्या 'ऑप्टिकल फायबर केबल्स'द्वारे वाहून नेला जातो. लाल समुद्र आणि इराणच्या जवळ असलेला 'हार्मुझची सामुद्रधुनी'हा या केबल्सचा मुख्य मार्ग आहे. सध्य भू-राजकीय तणावामुळे, इराण किंवा त्यांच्या समर्थित गटांकडून या केबल्सना धोका पोहोचवला जाऊ शकतो, अशी भीती पाश्चात्य देशांना वाटत आहे.

**-इराणची अंतर्गत इंटरनेट बंदी:** इराणमध्ये जेव्हा जेव्हा अंतर्गत आंदोलने किंवा युद्धजन्य परिस्थिती निर्माण होते, तेव्हा तिथले सरकार देशातील इंटरनेट पूर्णपणे बंद करते. २०२६ च्या सुरुवातीलाही इराणमध्ये अशा प्रकारची दीर्घकालीन इंटरनेट बंदी पाहण्यास मिळाली आहे. यामुळेच इराण 'इंटरनेटचा शत्रू'असल्याची प्रतिमा तयार झाली असून अशा अफवांना बळमिळत आहे. थोडक्यात सांगायचे तर इराण संपूर्ण जगाचे इंटरनेट एका बटणाने बंद करू शकत नाही, पण ते महत्त्वाच्या सागरी केबल्सना हानी पोहोचवून जागतिक इंटरनेटचा वेग मंदावू शकतात किंवा काही देशांचा संपर्क तोडू शकतात. समुद्राखालील इंटरनेट केबल्स (अंडर सी सबमरिन केबल्स) हे आधुनिक जगाचे 'अदृश्य महामार्ग' आहेत.


**१. या केबल्स नेमक्या काय आहेत?** आपल्याला वाटते की इंटरनेट सॅटेलाईटद्वारे (उपग्रहाद्वारे) चालते, पण प्रत्यक्षात ९५ टक्के ते ९९ टक्के आंतरराष्ट्रीय डेटा हा समुद्राच्या तळाशी असलेल्या 'ऑप्टिकल फायबर केबल्स'द्वारे वाहून नेला जातो. या केबल्स काचेच्या अतिशय बारीक तंतूंनी बनलेल्या असतात, ज्यातून डेटा 'प्रकाशाच्या वेगाने'(लेझर लाइट्स) प्रवास करतो.

**२. केबल्सची रचना कशी असते?** समुद्राच्या लाटा, पाण्याचे प्रचंड दडपण आणि समुद्री जिवांचा विचार करून या केबल्स अतिशय मजबूत बनवल्या जातात: **जाडी:** किनाऱ्याजवळ या केबल्स एखाद्या शीतपेयाच्या कॅन इतक्या जाड असतात, कारण तिथे मासेमारी किंवा जहाजांच्या नांगरामुळे त्या तुटण्याची भीती असते. खोल समुद्रात मात्र त्या बागेच्या पाईपइतक्या (साधारण २१ मिमी.) बारीक असतात. **स्तर (लेअर्स):** यामध्ये मध्यभागी फायबर असते आणि त्यावर पेट्रोलियम जेली, तांबे, पॉलिथिन, स्टीलच्या तारा आणि सर्वांत वर नायलॉनचे संरक्षक कवच असते.

**३. हे जाळे किती मोठे आहे? लांबी:** भरात अशा सुमारे ५५० पेक्षा जास्त क्रेय केबल्स आहेत. त्यांची एकूण नांबी १४ लाख किलोमीटरपेक्षा जास्त आहे. हे अंतर पृथ्वीला ३५ वेळा वेढा घालण्याइतके मोठे आहे. **प्रमुख केंद्रे:** लंडन, न्यूयॉर्क, सिंगापूर आणि भारतात मुंबई व चेन्नई ही या केबल्सची प्रमुख 'लँडिंग स्टेशन्स'आहेत. भारताचा बहुतांश इंटरनेट ट्रॅफिक मुंबईच्या किनाऱ्यावरून समुद्रात जातो.

**४. सॅटेलाईटपेक्षा केबल्स का चांगल्या?** स्टार लिंक (स्टार लिंक) सारखे सॅटेलाइट असताना केबल्स का वापरतात? याची तीन मुख्य कारणे आहेत: **वेग (स्पीड):** सॅटेलाईटपेक्षा केबल्समधून डेटा कितीतरी पटीने वेगाने प्रवास करतो. **खर्च:** केबल्सद्वारे मोठ्या प्रमाणात डेटा पाठवणे सॅटेलाईटपेक्षा स्वस्त पडते. **विलंब (लॅटेन्सी):** सॅटेलाइट डेटा अवकाशात जाऊन परत येण्यास वेळ लागतो, तर केबल्समध्ये हा विलंब नगण्य असतो.

**५. या केबल्सना असणारे धोके :** या केबल्स कितीही मजबूत असल्या तरी त्या सुरक्षित नाहीत: **नैसर्गिक आपत्ती:** समुद्राखालील भूकंप किंवा त्सुनामीमुळे केबल्स तुटू शकतात. **मानवी हस्तक्षेप:** जहाजांचे नांगर अडकल्यामुळे किंवा मासेमारीच्या जाळ्यांमुळे ७० टक्के अपघात होतात. **शार्क मासे:** कधीकधी शार्क मासे या केबल्सना चावा घेतात, त्यामुळे आता केबल्सवर शार्क-प्रूफ कोटिंग केले जाते. **युद्धजन्य परिस्थिती:** इराण किंवा रशियासारखे देश युद्धाच्या वेळी या केबल्स कापून शत्रू राष्ट्राचा संपर्क तोडू शकतात, यालाच 'ग्रे झोन वॉरफेअर'म्हणतात.



**६. दुरुस्ती कशी केली जाते?** जर समुद्राच्या तळाशी केबल तुटली, तर विशेष 'केबल शिप्स'(केबल शिप्स) वापरल्या जातात. रोबोट्सच्या मदतीने तुटलेली केबल शोधली जाते, ती समुद्राच्या वर आणली जाते, तिचे सांधे जोडले जातात आणि पुन्हा खाली सोडली जाते. **एक रोचक तथ्य:** जर आज या सर्व केबल्स कापल्या गेल्या, तर जगाची अर्थव्यवस्था आणि दळणवळण अवघ्या काही तासांत १९ व्या शतकात पोहोचेल. भारतात समुद्राखालून येणाऱ्या या इंटरनेट केबल्स ज्या ठिकाणी जमिनीवर येतात, त्यांना 'केबल लँडिंग स्टेशन्स'(केबल लॅण्डींग स्टेशन्स-सीएलएस) म्हणतात. जर इराणने किंवा कोणत्याही अपघाताने या सागरी केबल्सना हानी पोहोचली, तर त्याचे परिणाम कल्पनेच्या पलीकडे भयानक असू शकतात: **अ) जागतिक अर्थव्यवस्था कोलमडेल** आजचे शेअर बाजार, बँकिंग व्यवहार आणि आंतरराष्ट्रीय व्यापार पूर्णपणे इंटरनेटवर अवलंबून आहेत. एका सेकंदासाठी जरी इंटरनेट बंद झाले, तर अब्जावधी डॉलर्सचे नुकसान होते. डिजिटल पेमेंट, युपीआय, क्रेडिट कार्ड बंद पडल्याने दैनंदिन व्यवहार ठप्प होतील.

**ब) माहिती आणि दळणवळण यंत्रणा ठप्प:** व्हॉट्सॲप, गुगल, ई-मेल आणि सोशल मीडिया सेवा बंद होतील. एका देशातून दुसऱ्या देशात संपर्क साधणे अशक्य होईल. विमान सेवा आणि रेल्वेचे ऑनलाइन बुकिंग तसेच ट्रेकिंग सिस्टिम विस्कळित झाल्याने प्रवाशांचे हाल होतील.

**क) आयटी आणि क्लाऊड सर्व्हिसेसवर परिणाम:** भारतासारख्या देशासाठी हे मोठे संकट असेल. आपली आयटी क्षेत्रे अमेरिकन आणि युरोपियन कंपन्यांना सेवा देतात. जर इंटरनेट तुटले, तर या सेवा बंद पडतील. तसेच गुगल ड्राईव्ह किंवा आय क्लाउडवर असलेला तुमचा डेटा एक्सेस करणे कठीण होईल.

**ड) आपत्कालीन सेवांना फटका :** हॉस्पिटल्स, संरक्षण यंत्रणा आणि सरकारी डेटाबेस हे सर्व आज इंटरनेटने जोडलेले आहेत. औषधांचा पुरवठा, रुग्णांच्या नोंदी आणि लष्करी हालचालींमध्ये यामुळे मोठे अडथळे निर्माण होऊ शकतात.

## काही महत्त्वाचे 'ऑफलाइन'ॲप्स

**१. संदेशवहनासाठी : (ऑफलाइन मेसेजिंग) जेव्हा इंटरनेट किंवा मोबाईल टॉवर नसेल, तेव्हा हे ॲप्स ब्लूटूथ किंवा 'वाय-फाय' मेश नेटवर्क वापरून जवळच्या लोकांशी संपर्क साधण्यास मदत करतात. ब्रिज-फाय: हे ॲप ब्लूटूथचा वापर करून १०० मीटरपर्यंत संदेश पाठवू शकते. जर अनेक लोक हे ॲप वापरत असतील, तर एक साखळी (मेश नेटवर्क)तयार होऊन दूरपर्यंत संदेश पोहोचवू शकते. ब्रायर: हे पूर्णपणे सुरक्षित आणि खासगी मेसेंजर आहे, जे ब्लूटूथ किंवा 'वाय-फाय'द्वारे इंटरनेटशिवाय चालते.**

**२. नकाशे आणि दिशादर्शनासाठी (ऑनलाइन मॅप्स) अनोळखी ठिकाणी रस्ता शोधण्यासाठी हेॲप्स उपयुक्त ठरतात. गुगल मॅप्स (ऑफलाइन मोड): तुम्ही विशिष्ट शहराचा किंवा भागाचा नकाशा आधीच डाऊनलोड करून ठेवू शकता. त्यानंतर इंटरनेट नसतानाही 'टर्न-बाय-टर्न' नेव्हिगेशन चालू राहते. ऑर्गेनिक मॅप्स,मॅप्स.मी : हे पूर्णपणे ऑफलाइन नकाशे आहेत. यामध्ये हायकिंग ट्रेल्स, सायकलिंग मार्ग आणि छोट्या गल्ल्यांची अचूक माहिती मिळते. ओएसएम एएनडी : हे नकाशांचे अतिशय सविस्तर ॲप आहे, जे पूर्णपणे ऑफलाइन चालते आणि यात मॅप कस्टमायझेशनचे अनेक पर्याय मिळतात.**

**३. माहिती आणि शिक्षणासाठी : रेफरन्स ॲण्ड लर्निंग : किविक्स : हे एक विस्मयकारक ॲप आहे. याद्वारे तुम्ही संपूर्ण 'विकिपीडिया'डाऊनलोड करून ठेवू शकता. इंटरनेट नसतानाही जगातील कोणत्याही विषयाची माहिती तुम्ही वाचू शकता. गुगल ट्रान्सलेट (ऑफलाइन): कोणत्याही भाषेचे 'लँग्वेज पॅक'आधीच डाऊनलोड केले असल्यास, इंटरनेटशिवाय तुम्ही मजकूर भाषांतरित करू शकता.**

**४. फाइल शेअरिंगसाठी (ऑफलाइन फाइल ट्रान्स्फर) लोकल सेन्ड : हे ॲप फोटो, व्हिडिओ किंवा डॉक्युमेंट्स एका फोनवरून दुसऱ्या फोनवर इंटरनेटशिवाय (लोकल वाय-फायद्वारे) वेगाने पाठविण्यासाठी सर्वोत्तम आहे. शेअर मी (झिया-ओमी) : हे देखील ऑफलाइन फाइल ट्रान्सफरसाठी एक लोकप्रिय साधन आहे.**

**५. उत्पादकता आणि एआय : ऑफलाइन प्रोडक्टीवीटी ॲण्ड एआय: माइंड कीप (एआय) : हे एक ऑफलाइन एआय असिस्टंट ॲप आहे, जे इंटरनेटशिवाय नोट्स घेणे, टू-डू लिस्ट बनवणे आणि काही मूलभूत प्रश्नांची उत्तरे देण्यास मदत करते. स्टॅण्डर्ड नोट्स: जर तुम्हाला तुमचे महत्त्वाचे विचार किंवा पासवर्ड सुरक्षितपणे ऑफलाइन लिहून ठेवायचे असतील, तर हे एक उत्तम एन्क्रिप्टेड ॲप आहे.**

**३. आपण कोणती खबरदारी घेऊ शकतो?** इंटरनेट ही एक जागतिक यंत्रणा असल्याने वैयक्तिक स्तरावर आपण ते वाचवू शकत नाही, पण परिस्थिती उद्भवल्यास होणारा त्रास कमी करण्यासाठी काही पावले नक्कीच उचलू शकतो: **महत्त्वाचा डेटा 'ऑफलाइन' ठेवा:** तुमचे महत्त्वाचे दस्तऐवज आधार कार्ड, पॅन कार्ड, बँक डिटेल्स केवळ 'क्लाऊड'वर न ठेवता त्यांची एक प्रत पेनड्राइव्ह, हार्ड डिस्क किंवा फिजिकल फाईलमध्ये ठेवा. **रोख रकमेचा वापर :** पूर्णपणे डिजिटल पेमेंटवर अवलंबून न राहता, आणीबाणीच्या काळासाठी घरामध्ये थोडी रोख रक्कम बाळगणे कधीही चांगले. इंटरनेट बंद असल्यास बँका किंवा एटीएम काम करणार नाहीत.

**पर्यायी संपर्क साधने:** केवळव्हॉट्सॲपवर विसंबून न राहता, साध्या फोन कॉलसाठी बॅलन्स ठेवा. तसेच रेडिओ (एफएम/एएम) हे माहिती मिळवण्याचे उत्तम साधन ठरू शकते, कारण ते इंटरनेटशिवाय चालते. **ऑफलाइन नकाशे :** प्रवासात असताना गुगल मॅप्सचे ऑफलाइन व्हर्जन डाऊनलोड करून ठेवा, जेणेकरून जीपीएस किंवा इंटरनेट नसतानाही रस्ता शोधता येईल. **सायबर सुरक्षेबाबत सतर्कता:** इंटरनेट पुन्हा सुरू झाल्यावर सायबर हल्ल्यांची शक्यता वाढते. अशा वेळी आपले पासवर्ड बदलणे आणि संशयास्पद लिंकवर क्लिक न करणे ही काळजी घेणे गरजेचे आहे. इराणने जगाचे इंटरनेट तोडण्याची शक्यता सध्या तरी कमी वाटते, कारण यामुळे इराणच्या स्वतःच्या अर्थव्यवस्थेलाही मोठा फटका बसेल. मात्र, युद्धाच्या काळात काहीही घडू शकते. 'सावध तोच सुखी' या उक्तीप्रमाणे आपण डिजिटल जगासोबतच ऑफलाइन जगातही जगण्याची तयारी ठेवायला हवी. इंटरनेट हे विज्ञानाने दिलेले वरदान आहे, पण त्यावरचे अति-अवलंबित्व कधीही धोक्याचे ठरू शकते. त्यामुळे तंत्रज्ञानाचा वापर करा, पण त्याशिवायही आयुष्य जगता येईल इतकी आत्मनिर्भरता अंगी बाळगा.

# वारसा हक्क आणि माहेरची ओढ : कायद्याने हक्क दिला, पण समाजाने हक्क सोड पत्र लिहून घेतले



संवाद
ॲड. अंजली अरुण हिवाळे
मो. 8446427320

भारतीय समाजव्यवस्थेत स्त्री ही नेहमीच एका उंबरठ्यावरून दुसऱ्या उंबरठ्यावर जाणारी उपरी मानली गेली आहे. ''मुलगी म्हणजे परक्याचे धन'' या एका वाक्याने शतकानुशतके स्त्रियांचे आर्थिक खच्चीकरण केले. पण जेव्हा ९ सप्टेंबर २००५ रोजी हिंदू वारसा हक्क (सुधारणा) कायदा अंमलात आला, तेव्हा वाटले होते की, आता खऱ्या अर्थाने पितृसत्ताक मानसिकतेचे तट कोसळतील. कायद्याने मुलीला जन्मतःच वडिलांच्या मालमत्तेत मुलासारखाच सहवारसदार म्हणून अधिकार दिला. मात्र, वकिली पेशात काम करताना आणि शोषित-मागासवर्गीय जाणिवांच्या आरशातून पाहताना एक जळजळीत सत्य समोर येतेकायद्याने तिला मालक बनवले, पण समाजाने तिला हक्क सोड पत्रावर स्वाक्षरी करायला लावून पुन्हा भिकारी बनवले. कायदेशीर प्रगल्भता विरुद्ध सामाजिक क्रूरता २००५ चा कायदा आणि २०२० मधील सर्वोच्च न्यायालयाचा विनीता शर्मा विरुद्ध राकेश शर्मा हा ऐतिहासिक निकाल, हे भारतीय न्यायव्यवस्थेचे सुवर्णक्षण आहेत. ''मुलगी ही आयुष्यभरासाठी सहवारसदार असते,'' असे ठणकावून सांगणाऱ्या या निकालाने कायद्याचे हात बळकट केले. कलम ६ ने तिला मुलाप्रमाणेच संपत्तीचे वाटप मागण्याचा, ती धारण करण्याचा आणि विकण्याचा अधिकार दिला. परंतु, न्यायालयाच्या बाहेरचे वास्तव एखाद्या भयानक क्राईम थ्रिलरपेक्षा कमी नाही. वडील वारल्यानंतर सुतकाचे १३ दिवसही उलटलेले नसतात, तोच भावांकडून आणि काकांकडून बहिणीच्या हातात एक कागद टेकवला जातो. तो कागद असतोहक्क सोड पत्र. त्यावर मजकूर असतो, ''मी माझ्या स्वेच्छेने, कोणत्याही मोबदल्याशिवाय वडिलांच्या संपत्तीतील माझा वाटा भावाच्या नावे सोडून देत आहे.'' एक वकील म्हणून मला प्रश्न पडतो, जगाच्या पाठीवर असा कोणता व्यवहार आहे जिथे माणूस लाखो-करोडोंची मालमत्ता मोफत सोडून देतो? हा व्यवहार नसून हे भावनिक आणि कायदेशीर खंडणी वसुलीचे प्रकार आहेत. शोषित वर्गाची प्रति-संवेदना आणि मालमत्तेचा संघर्ष मागासवर्गीय आणि शोषित समाजातील स्त्रियांसाठी हा प्रश्न केवळ पैशाचा नसून तो अस्तित्वाचा आहे. प्रस्थापित वर्गाकडे संपत्तीचे अनेक स्रोत असतात, पण दलित, आदिवासी आणि कष्टकरी कुटुंबांकडे असलेली एखादी गुंठा जमीन किंवा छोटेसे घर हेच त्यांच्या सन्मानाचे प्रतीक असते. अनेकदा शोषित वर्गातील पुरुषांना वाटते की, जर मुलीने वाटा नेला, तर कुटुंबाची जमीन दुसऱ्याच्या जातीत किंवा दुसऱ्याच्या घरात जाईल. हा दुसऱ्याचे घर असा शब्दप्रयोग करून स्त्रीला तिच्या रक्ताच्या नात्यापासून तोडले जाते. तसेच जेव्हा एखादी सवर्ण स्त्री आपला वाटा मागते, तेव्हा तिला हक्काची लढाई मानले जाते. पण जेव्हा एखादी मागासवर्गीय स्त्री हाच प्रश्न उपस्थित करते, तेव्हा तिला ''घर फोडणारी'' आणि ''जातीची अब्रू घालवणारी'' म्हणून वाळीत टाकले जाते. तिच्यावर माहेरची ओढ नसलेली निर्दयी स्त्री म्हणून शिक्का मारला जातो. प्रत्यक्षात, तिला तिच्या गरिबीतून आणि शोषणातून बाहेर पडण्यासाठी त्या मालमत्तेचा आधार हवा असतो, जो व्यवस्था तिला नाकारते. माहेर नावाचे मृगजळ आणि भावनिक ब्लॅकमेलिंग ''माहेरची ओढ'' हा शब्द भारतीय स्त्रीच्या आयुष्यातील सर्वात मोठा ट्रॅप आहे. तिला लहानपणापासून शिकवले जाते की, माहेर म्हणजे तुझे हक्काचे ठिकाण. पण हे हक्काचे ठिकाण तोपर्यंतच असते, जोपर्यंत तू तिथे पाहुणी म्हणून जातेस. ज्या क्षणी तू तिथे भागीदार म्हणून हक्क सांगतेस, त्या क्षणी माहेरचे पाणी विष बनते. भाऊबीज, रक्षाबंधन हे सण आजच्या काळात बहिणीला हक्क सोड पत्रावर सही करण्यासाठी तयार करण्याचे सायकोलॉजिकल

(पान ५ वर...)

# जेव्हा मेंदू गहाण टाकल्या जातो ...!



चर्चा
डॉ.सौ.प्रतिभा शिरभाते
मो. ९४०५७७१८०८

संत तुकाराम महाराज म्हणतात

**ऐसे कैसे झाले भोंदू**
**कर्म करुनी म्हणती साधू**
**अंगा लावूनिया राख**
**डोळे झाकून या करती पाप दाऊनी वैराग्याची**
**कळा भोगती विषयांचा सोहळा**
**तुका म्हणे सांगू किती**
**जळो तयाची संगती**

मानव म्हणजे संपूर्ण विश्वातील अती..... अती हुशार सर्वोत्तम प्राणी असे स्वतःलाच शहाणे समजणारे,शहाणे म्हणणारे पण नुसते डोकं असून चालत नाही, तर त्यात मेंदू असणं सुद्धा गरजेचं, नुसता मेंदू असून चालत नाही, तर त्या मेंदूत शहाणपणा सुद्धा असणे गरजेचे, म्हणजे चांगला वाईट निर्णय आपण सहज येऊ शकणार. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणायचे शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे ज्याने हे दूध प्राशन केले तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही.पण शिक्षणाचे महत्त्व सुद्धा पटायला हवे शिकल्यानंतर अडाणी व्यक्तींमध्ये व शिकलेल्या व्यक्तिमत्त्वांमध्ये जमीन आसमांचा फरक असायलाच हवा कारण शिकलेल्या माणसां मध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन असणारच आहे. विज्ञान हे शिकल्याशिवाय समजणार नाही आणि अडाणी लोकांना पुस्तके वाचता येणार नाही. त्यांच्यासाठी काला अक्षर भैस बराबर असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. वैज्ञानिक दृष्टिकोन असला की आपल्याला जगातील कोणत्याच व्यक्ती फसवू शकत नाही, अहो आपण वावरतो आहे ते वैज्ञानिक युग आहे ,एकविसाव्या शतक आहे आणि वैज्ञानिक युगामध्ये अंधश्रद्धेला जागाच नाही . अंधश्रद्धेमुळे आज भारतातील ७०% पेक्षा जास्त स्त्रियांचे डोके भानावर नाही पण ,आधुनिक भारतात स्त्रियांना ५० टक्के आरक्षण आहे ज्या आरक्षणामुळे त्या नोकरी करतात क्रांतीज्योती सावित्रीबाई व क्रांतीसुर्य जोतिबाजीमुळे आपण प्रत्येक गोष्टीत बाजी मारली .प्रत्येक ठिकाणी आपल्या व्यक्तिमत्त्वाची छाप सोडली चांगले वाईट यातील फरक समजायला लागला, अन्यायाविरुद्ध आवाज उठवू लागलो आपले मन न भिता व्यक्त करू लागलो, मिळालेल्या स्वातंत्र्याचा भरपूर प्रमाणात फायदा घ्यायला लागलो, अगदी स्वातंत्र्याचा स्वैराचार केला तरी जीवनात कमतरता जाणवायला लागली, तर देव धर्म,नवस करतो हात दाखवून भविष्य विचारतो, लिंबू मिरची लावतो, जादूटोणा करणे, अघोरी प्रथेच्या आहारी जाणे,प्राण्यांचे व नरबळी, बळी देणे एवढ्यावरच आपण थांबलो नाही तर आपण आपली अब्रू सुद्धा वेशीवर टांगायला निघालो, ते सुद्धा अगदी स्वखुशीने आपल्या मर्जीविरुद्ध बसमध्ये ,ऑटोमध्ये कुणी लगट करायला लागलं तर आपण लगेच शिव्या देतो व एखादी कानाखाली सुद्धा मारतो एवढ्यावरच न थांबता आजूबाजूच्या लोकांकडून त्या व्यक्तीला चांगला चोप सुद्धा द्यायला लावतो, जीवनात प्रत्येकाला प्रत्येक सुख मिळणारच असे नाही .अहो आपल्या हाताची पाच बोटे सुद्धा एकसारखी नाहीत म्हणून त्यांचे महत्त्व कमी होते काय ?

(पान ५ वर...)

# अनुसूचित जातींचे अ,ब,क,ड वर्गीकरण : सामाजिक न्याय की शासनाचे सूक्ष्म षडयंत्र



विचारमंथन
प्रविण बागडे
नागपूर, मो. 9923620919

भारतीय लोकशाहीत 'सामाजिक न्याय' हा केवळ शब्द नाही, तर तो संविधानाने दिलेला नैतिक आदेश आहे. पण हा आदेश प्रत्यक्षात किती पाळला जातो? अनुसूचित जातींना दिलेल्या आरक्षणाचा लाभ सर्व घटकांपर्यंत पोहोचतो का, की तो काही मोजक्यांच्याच हातात केंद्रित झाला आहे? या पार्श्वभूमीवर अ, ब, क, ड असे उपवर्गीकरण करण्याचा प्रस्ताव समोर येतो आणि एक अस्वस्थ करणारा प्रश्न उभा राहतो. हे खरोखरच न्यायाचा विस्तार आहे, की समाजातील एकजूट कमकुवत करण्याचा सूक्ष्म राजकीय प्रयोग? अनुसूचित जाती हा एकसंध, समरूपी गट आहे, ही कल्पना वास्तवाशी विसंगत आहे. या वर्गात सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक पातळीवर प्रचंड विषमता आहे. काही जातींनी शिक्षण, नोकरी आणि सत्तेच्या प्रवेशद्वारांवर आपली ठाम छाप निर्माण केली आहे; तर काही जाती अजूनही उपेक्षा, दारिद्र्य आणि संधीअभावी अंधारात चाचपडत आहेत. परिणामी, आरक्षणाचा लाभ काही मर्यादित गटांमध्येच केंद्रीत राहिल्याची टीका केवळ राजकीय नाही, तर सामाजिक वास्तवावर आधारित आहे. या पार्श्वभूमीवर वर्गीकरणाचा विचार पुढे येणे स्वाभाविक आहे.

वर्गीकरणाचे समर्थक एक मूलभूत तत्त्व मांडतात, ''समानता म्हणजे सर्वांना सारखे देणे नव्हे, तर ज्यांना जास्त गरज आहे त्यांना अधिक देणे.'' ही भूमिका सामाजिक न्यायाच्या मूळ तत्त्वाशी सुसंगत आहे. कारण आजही काही अनुसूचित जाती शिक्षण, आरोग्य आणि रोजगाराच्या मूलभूत संधींपासून वंचित आहेत.



अशा परिस्थितीत, जर आरक्षणाचा मोठा वाटा आधीच सक्षम झालेल्या घटकांकडेच गेला, तर उर्वरित घटकांसाठी न्यायाची संकल्पना केवळ कागदावरच उरते. अ, ब, क, ड वर्गीकरणामुळे सर्वात मागासलेल्या घटकांना प्राधान्य मिळू शकते, आरक्षणाचे लाभ अधिक संतुलित रीतीने वाटले जाऊ शकतात आणि सामाजिक समावेशनाला खऱ्या अर्थाने चालना मिळू शकते. म्हणूनच काहींसाठी हे धोरण म्हणजे न्यायाच्या नव्या अध्यायाची सुरुवात आहे.

मात्र, या धोरणाकडे संशयाच्या नजरेने पाहणाऱ्यांची संख्या कमी नाही. त्यांचा सरळ आरोप आहे. हे वर्गीकरण म्हणजे अनुसूचित जातींच्या एकजुटीवर घाला घालण्याचा प्रयत्न आहे. इतिहास साक्षी आहे की, एकजूट असलेला समाज हा राजकीयदृष्ट्या प्रभावी असतो.

(पान ५ वर...)

# बैठक





लघुकथा
प्रा. मोहन काळे
मो. ७०३८२७६५५८

बैठकीतील वातावरण तणावपूर्ण झालं होतं. कुणी वाद करत नव्हतं. पण प्रत्येकाला आपल्या मनाप्रमाणेच व्हायला पाहिजे असं वाटत होतं. दोन्ही पक्षांचा अहंकार आडवा येत होता. एका बाजुला अंजली, चेतन व नरेंद्र तर दुसऱ्या बाजूला तिचा भाऊ विकास, तिचे वडील सुरेश, आई सुलभा, चेतनचे आईवडील व बहीण. अंजलीला दाखवण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. अंजलीला पाहायला चेतन जाधव व त्याचे वडील नारायणराव, आई कोकिळाबाई,बहीण कोमल, जावाई नरेंद्र पाटील इत्यादी लोक आले होते. कांदेपोह्याचा कार्यक्रम झाला होता. अंजलीकडील मंडळींनी चेतनला व चेतनकडील मंडळींनी अंजलीला पसंत केले होते. अंजली व चेतन दोघंही सॉफ्टवेअर इंजिनिअर. दोघांनाही मोठ्या पगाराची नोकरी. मुलाची बाजू म्हटल्यावर साहजिकच चेतनकडील मंडळींना या लग्नाबद्दल खूप अपेक्षा होत्या. नारायणरावांनी सुरेशरावांना म्हटलं, ''सुरेशराव, आम्हांला आपलं स्थळ पसंत आहे. आपल्या घराण्याचीही समाजात खूप प्रतिष्ठा आहे. मुलाचं लग्न असल्यामुळे ते थाटामाटातच व्हायला पाहिजे अशी आमची सर्वांची इच्छा आहे. आम्हांला हुंडा वगैरे काही नको. फक्त लग्न असं झालं पाहिजे की लोकांनी तोंडात बोटं घातली पाहिजेत. असं लग्न अख्ख्या पंचक्रोशीत झालं नाही व होणार नाही असं लोकांनी म्हटलं पाहिजे. आमची पाचशे माणसं आम्ही आणू.''

''ठीक आहे, सर्व तुमच्या इच्छेनुसार होईल. आमच्या घरी हे पहिलंच लग्न आहे. त्यामुळे तुमचे व आमचे मिळून दोन अडीच हजार लोकांना आमंत्रित करू. आमच्या घराला लागून आमचं शेत आहे. त्यात मंडप टाकू. होऊन जाऊ देऊ. मुलीसाठी आम्ही कितीही खर्च करायला तयार आहोत. काय अंजली, चेतनराव खूश आहात ना?'' असं म्हणून सुरेशरावांनी अंजली व चेतनकडे पाहिलं. ते एकदम चमकले. कारण त्यांचं लक्ष मोठ्यांच्या बोलण्याकडे नव्हतं तर एकमेकांकडे होतं. ''हो, बाबा, काय म्हणता?'' अंजलीने गोंधळून म्हटलं.

''आम्ही असं ठरवत आहोत की तुमचं लग्न मोठ्या थाटामाटात करायचं. सर्व पाहुणे अचंबित झाले पाहिजेत असं लग्न करू आपण.'' सुरेशरावांनी चेहऱ्यावर हसू आणत म्हटलं. तसं अंजलीनं चमकून चेतनकडे पाहिलं. त्याच्याही चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह दिसत होतं. पण तो काहीच बोलला नाही. त्यानं खालचे व वरचे ओठ एकमेकांवर दाबत फक्त मान हलवली.

''थांबा, बाबा. मला काही बोलायचं आहे. चालेल ना मी मध्ये बोलली तर?'' अंजली आळीपाळीनं उपस्थित सर्वांकडे नजर फिरवत म्हणाली. ''हो, चालेल ना. बोल तुला काय बोलायचं आहे.'' चेतनचे बाबा म्हणाले. अंजलीला नेमकं काय म्हणायचं आहे याची उत्सुकता उपस्थित प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसू लागली.

''लग्नाबद्दल माझ्या सुद्धा काही अपेक्षा आहेत. त्या आपण पूर्ण कराल अशी मला खात्री आहे.'' अंजली म्हणाली तसे सुरेशराव उत्साहानं म्हणाले, ''बिलकुलच. तुझी कोणतीच इच्छा आम्ही अधूरी ठेवणार नाही. कितीही पैसा लागो मी तुझी प्रत्येक इच्छा पूर्ण करीन. तुझ्या आनंदापुढे सर्वच गोष्टी गौण आहेत.''

''त्यात काय एवढं? तुम्हां मुलांच्या आनंदासाठीच तर आपण सोहळे साजरे करतो. तुमच्या आनंदातच आमचाही आनंद आहे. तू आता आमची सून होणार आहेस. त्यामुळे तुला ज्यात आनंद त्यात आम्हांला आनंद. तू बोल. तुझी प्रत्येक इच्छा आम्ही पूर्ण करू.'' चेतनचे आईवडील माना हलवत म्हणाले. अंजलीनं घसा खाकरला. एक आवंढा गिळला व सर्वांच्या नजरेला नजर भिडवत म्हणाली, माझ्या अपेक्षा तुम्हांला वाटतात तशा नाहीत. आमचं घर प्रतिष्ठित आहे. आमची आर्थिक परिस्थिती बऱ्यापैकी आहे. परंतु लग्न खूप थाटामाटात केलं तर आर्थिक परिस्थिती चांगलीच राहील असं नाही. माझे आईवडील, माझा भाऊ माझे लग्न मोठ्या थाटामाटात लावण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करतील. पैशाची व्यवस्था कुठूनही करतील. त्यांच्या प्रतिष्ठेमुळे व आदरामुळे ते कितीही पैसा उभा करू शकतात व खर्च करू शकतात. परंतु त्यामुळे झालेल्या कर्जामुळे त्यांची पुढची अनेक वर्षे अडचणीत जातील. त्यामुळे लग्न एकदम साधेपणानं करावं. बडेजाव करू नये असं मला वाटतं.'' आता मात्र बैठकीत शांतता पसरली. चेतनच्या आईनं व बहिणीनं चेतनकडे आणि नारायणरावांकडे पाहिलं व मनातल्या मनात त्यांना प्रश्न विचारले. नारायणरावांनाही पत्नी व मुलीला नेमकं काय म्हणायचं आहे हे त्यांना समजलं. त्यांनी सुरेशरावांकडे पाहिलं. तसे सुरेशराव म्हणाले, ''अंजली, तू जास्त विचार करू नको. आणि पैशाचं टेन्शन तर तू मुळीच घेऊ नको. ते तुझं काम नाही. तो आमचा विषय आहे. तो आम्ही पाहून घेऊ.''

''अंजू, तू डोक्याला जास्त ताण देऊ नको. बाबा व मी ते पाहून घेऊ.'' विकास म्हणाला.

''मला माहीतच होतं की तुम्ही दोघं तसंच म्हणणार म्हणून. तुम्ही माझ्यावर प्रेम करता. माझ्या आनंदाचा विचार करता हे तुम्हांला मान्य आहे का? ''

''असं कसं बोलतं तू? आम्ही तुझ्याच आनंदाचा विचार करू ना?'' सुरेशराव व विकास सोबतच म्हणाले. ''मग मला ज्या गोष्टींत आनंद मिळतो त्या गोष्टी तुम्ही करायलाच पाहिजे. लग्न साधेपणानं व कोणताही अतिरिक्त थाटमाट न करावं अशी माझी इच्छा आहे व त्यांतच माझा आनंद आहे.''

''अंजू बेटा, ठीक आहे. तू म्हणतेस तसं आपण करूही. पण चेतनरावांकडील मंडळींना ते आवडणार आहे का? त्यांना तसं चालेल का? त्यांची मुलाची बाजू आहे. आपण मुलीवाल्यांनी त्यांच्या म्हणण्यानुसारच वागलं पाहिजे. तू फक्त स्वतःची मतं मांडत आहेस. आपल्याला सर्वांच्याच मतांचा विचार करावा लागणार आहे. '' असं म्हणून सुरेशरावांनी चेतन व चेतनकडील मंडळींकडे पाहिलं. चेतनच्या आई व बहिणीच्या चेहऱ्यावर नाराजीचे भाव होते. चेतनच्या वडिलांच्या चेहऱ्यावर आश्चर्याचे भाव होते तर चेतनच्या जावायाच्या, नरेंद्र पाटलांच्या चेहऱ्यावर मात्र कौतुकाचे भाव होते. असे विविध भाव पाहून चेतनच्या चेहऱ्यावर मात्र गोंधळल्याचे भाव होते.

'' ठीक आहे. तुझी इच्छाच आहे तर मग आपण साधेपणानं लग्नाचा कार्यक्रम करू.'' चेतनच्या वडिलांनी म्हटलं. तसं चेतनच्या आई व बहिणीच्या डोळ्यांत परत एकदा नाराजी पसरली. त्यांनी नारायणरावांकडे प्रश्नार्थक नजरेनं पाहून नाराजी व्यक्त केली. कोमल म्हणाली, ''पण आम्हांला दादाचं लग्न मोठ्या थाटामाटातच करायचं आहे. हो की नाही रे, दादा?'' पण चेतननंच नजरेनं तिला शांत राहण्याचा इशारा केला. मोठ्या मंडळींच्या उपस्थितीत आपण लहानांनी बोलू नये असा त्याच्या पाहण्याचा मतितार्थ होता. कोमलनं नाराजीनं मान दुसरीकडे वळवली.

''चेतन, तुझं मत काय?'' नारायणरावांनी थेट मुलालाच विचारलं. अचानक विचारल्या गेलेल्या प्रश्नामुळे चेतन गांगरला. काय उत्तर द्यावं हे त्याला सुचेना. तो सदैव सामंजस्याची भूमिका घेणारा युवक होता. कुणाचंच मन दुखावल्या जाऊ नये एवढंच त्याला वाटत होतं.

''सर्वजण ठरवतील ते मला मान्य राहील. परंतु अंजली विचार करूनच बोलत आहे. तिच्या बोलण्यात तथ्य आहे. त्यामुळे तिच्या विचारांचाही आदर व्हावा असं मला वाटतं.'' तो शांतपणे म्हणाला. अंजलीच्या चेहऱ्यावर आनंद व अभिमान असे मिश्र भाव होते. कारण जो जोडीदार तिनं निवडला होता तो आपल्या विचारांचा आदर करणारा आहे व आपली निवड सार्थ आहे याचा अभिमान तिच्या डोळ्यांत दिसायला लागला.

''अरे, जावाईबुवा, आपण काहीच बोलत नाही आहात. जावायचं मत तर खूप महत्त्वाचं असते.'' नारायणरावांनी नरेंद्रकडे पाहिलं. आतापर्यंत सर्वांचं बोलणं चुपचाप ऐकत असलेला नरेंद्र म्हणाला, ''मामा, मला वाटतं की अंजलीताईंचं म्हणणं बरोबर आहे. खूप थाटामाटात लग्न लावून कर्जबाजारी होण्यापेक्षा साधेपणानं लग्नविधी पार पाडणं हाच विचार योग्य आहे.''

'' हो, सांग, अंजली, तुला कोणकोणत्या गोष्टी अपेक्षित आहेत?'' चेतनच्या आईला बोलण्यापासून स्वतःला आवरता आलं नाही.

''सर्वांची मी प्रथम माफी मागते की आपण ज्येष्ठ मंडळी असताना मी बोलणं योग्य जरी असलं तरी मला लहानपणापासूनच स्पष्टपणे बोलण्याचे संस्कार मिळाले असल्याने मी बोलत आहे. मला मान्य आहे की प्रत्येक नवऱ्या मुलाला, मुलीला, त्यांच्या चरच्या मंडळींना लग्न खूप थाटामाटात झालं पाहिजे असं वाटते.आणि ते साहजिक व नैसर्गिक आहे. असं वाटणं मुळीच वाईट नाही. परंतु अशा गोष्टींचा नकारात्मक प्रभाव पुढील आर्थिक घडामोडींवर पडतो. कुटुंबाचं नियोजन पार बिघडतं. आपल्याकडे मोठ्या लग्नाला लागणारा प्रचंड पैसा आपण नातेवाईकांकडून, बँकांकडून, मित्रांकडून कर्ज घेऊन जमा करतो व तीन चार दिवसांत खर्च करून टाकतो. परंतु ते कर्ज फेडण्यासाठी पुढची अनेक वर्षं आपल्याला तंगी सोसावी लागते. अचानक आलेल्या महत्त्वाच्या कामासाठी, इतकंच काय तर आजारपणासाठी सुद्धा आपल्याकडे पैसा नसतो. ती ओढाताण आपण आपल्याच हातांनी ओढवून घेतलेली असते. हजारो लोकांना बोलावून कितीही चांगलं केलं तरी त्यांना त्यात काही ना काही उणीव दिसतेच. आहेर, आंदण, भेटवस्तू, रिटर्न्स गिफ्ट, प्रि वेडिंग शूट, या गोष्टींवर आपला हजारो रुपये खर्च होतात जे आपण टाळू शकतो. दोन्हीकडून फक्त मर्यादित शंभर दोनशे पाहुण्यांनाच आमंत्रित केलं पाहिजे. मी तर कोर्ट मॅरेजच्या विचारांची आहे. परंतु आपल्या परंपरेनुसार काही धार्मिक विधी झाले पाहिजेत म्हणून आपण ते केले तर हरकत नाही. ते सुद्धा साधेपणानंच करावे. हजारो रुपयांचा डी जे लावून , हजारो रुपयांचे फटाके फोडून ध्वनिप्रदूषण टाळायला हवं. जेवणात आवश्यक तितकेच पदार्थ हवे.

पत्रिका छापायला हजारो रुपये न घालवता आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून व्हाट्सअप वर पत्रिका पाठवून व मोबाईलद्वारे संपर्क साधून आपण वेळ, पैसा वाचवू शकतो. अनेकदा निमंत्रण पत्रिका वाटायला जाताना अपघात घडलेले आहेत. कॅमेरे व व्हिडिओग्राफी मर्यादितच असावी. आपण जो अनाठायी खर्च करतो तो वाचवला तर तोच पैसा आपल्या भविष्यासाठी कामात येतो. साधेपणानं विधी केल्यानं आपण कर्जबाजारी होत नाही व लग्नानंतरचे दिवस आनंदात जातात व आर्थिक ताण राहत नाही. असं माझं मत आहे.'' असं म्हणून अंजली बोलायचं थांबली. सर्वांनी तिच्याकडे कौतुकाने पाहिलं. चेतनची आई म्हणाली, ''जशी पाहिजे होती तशीच व्यवहारी सून आम्हांला मिळाली. सर्व गोष्टी तुझ्या मनाप्रमाणे होतील.'' आता बैठकीतील माणसांसोबत बैठकही आनंदी दिसली.

महत्त्वाचे

## लाभार्थ्यांची घरासाठी घरघर

**अमरावती :** प्रधानमंत्री आवास योजनेसह घरकुलाच्या इतर योजनांमार्फत जिल्ह्याच्या ग्रामीण भागात ९४ हजार ३२८ कुटुंबांना घरे द्यायची होती. परंतु जागाच उपलब्ध नसल्यामुळे अद्याप ८ हजार १३० घरे रखडली आहेत. प्रशासनाने या मुद्द्यावर अनेक मार्ग काढण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यात फारसे यश येत नसल्याने यंत्रणाही हतबल झाली आहे.

आजघडीला जी घरे रखडली आहेत, त्या कुटुंबांकडे स्वतःची जागा नाही. त्यामुळे सरकारी जागेवर ते विसंबून आहेत. मात्र गावात थोड्याफार प्रमाणात उपलब्ध असलेली सरकारी जागा ही गायरान जमीन असल्यामुळे ती घरकुलासाठी वापरता येत नाही. सन २०१५ चा कायदा त्यासाठी अडचणीचा ठरत आहे. त्यामुळे पर्यायी जागा शोधून या कुटुंबांना घरे देण्याचा प्रयत्न जिल्हा प्रशासनाने विशेषतः जिल्हा परिषदेने सुरू केला आहे. परंतु गायरान क्षेत्र वगळता पर्यायी सरकारी किंवा निमसरकारी जागा उपलब्ध नाही आणि खासगी जागा विकत घेऊन घरे बांधण्यास अर्थसहाय्य करतो म्हटले तर ५० हजारांपर्यंत जागा खरेदी करणे शक्य नाही. कारण कायद्यानुसार अशी जमीन खरेदी करायला रेडीरेकनरचा वापर करावा लागतो. शिवाय जमिनीची महत्तम किंमत ५० हजारपेक्षा अधिक होता कामा नये. त्यामुळे पात्रता असताना संबंधित कुटुंबे घरकुल योजनेच्या लाभापासून वंचित आहेत. ही संख्या २३ बांधण्याचा मार्ग मोकळा करायचे म्हटले त रेडी रेकनरनुसार जमीन विकायला कोणी तयार नाही, अशा विचित्र कात्रीत हे कुटुंबी अडकले. त्यामुळे आम्ही शासनाच्या नवीन मार्गदर्शक सूचनाची वाट पाहतोय, असे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

## नैसर्गिक भावनांचे नियमन गरजेचे - डॉ. निकम

**बुलढाणा :** राग, ताण आणि दुःख या नैसर्गिक भावना आहेत, त्यांना नकारात्मक न समजता त्यांचे सुव्यवस्थित नियमन होण्याच्या दृष्टीने पाल्य व पालक यांच्यात सुसंवाद असणे गरजेचे आहे , असे प्रतिपादन भारत विद्यालय, बुलढाणा येथे भावनिक बुद्धिमत्ता व पालकत्व या विषयावर पालकांसाठी आयोजित पालक समुपदेशन कार्यक्रमात डॉ. वैशाली निकम यांनी केले. दिनांक २८ मार्च रोजी वर्ग ५ ते ९ च्या पालकांसाठी दोन सत्रांत आयोजित संवाद व समुपदेशन कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

सदर कार्यक्रमासाठी भारत विद्यालय सोसायटी च्या अध्यक्ष डॉ. सीमा आगाशे ह्या प्रामुख्याने उपस्थित होत्या, त्यांनी पाल्य हा पालकांचे अनुकरण करत असतो हे ध्यानी ठेवून पालकांनी आपले वर्तन आदर्श ठेवले पाहिजे यावर भर दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय मुख्याध्यापक प्रल्हाद गायकवाड यांनी करून दिला तर आभार उपमुख्याध्यापक मोहन घोंगटे यांनी मानले.सदर कार्यक्रमासाठी बहुसंख्य पालक उपस्थित होते.

## श्रीमद् भागवत कथा सप्ताहाचा समारोप

**घाटंजी :** तालुक्यातील शिरोली येथील भगवान मुंगसाजी महाराज दरबार येथे १८ मार्च ते २४ मार्च २०२६ दरम्यान श्रीमद् भागवत कथा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. हभप सविताताई सुधाकरराव बेलोरकर यांच्या सुश्राव्य वाणीतून या कथेचे वाचन करण्यात आले. भक्तीमय वातावरणात पार पडलेल्या या सोहळ्याचा शिरोली व परिसरातील शेकडो भाविकांनी लाभ घेतला. सात दिवस चाललेल्या या कथा पर्वाचा समारोप २४ मार्च रोजी ग्रंथ दिंडी व पालखी मिरवणुकीने करण्यात आला. गावातील प्रमुख रस्त्यांवरून काढण्यात आलेल्या या मिरवणुकीत भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. हा धार्मिक कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विश्वनाथ दर्वे, बंडुजी ठाकरे, दत्तारामजी मेश्राम, निलेश चौधरी, अभिजीत चौधरी, अमोल ठाकरे, अमोल निकम आणि आशिष भोयर यांनी विशेष परिश्रम घेतले. या सप्ताहामुळे संपूर्ण गावात धार्मिक चैतन्य पसरले होते.

# संतप्त शेतकऱ्यांनी जंगलालाच लावली आग!

## वाघाने महिलेवर हल्ला केल्याने गावकरी संतप्त

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**नागपूर, दि. २८ :** भंडारा जिल्ह्यातील साकोली तालुक्यात वाघाच्या हल्ल्यात एक व्यक्ती मृत्युमुखी पडल्याची घटना ताजी असताना पुन्हा त्याच घटनेची पुनरावृत्ती झाली आहे. शेजारच्याच उमरझरी येथील शेत शिवारात मिरची तोडत असलेल्या शेतकरी महिलेवर वाघाने हल्ला केला. वाघाच्या हल्ल्यात माया सोनवाने या महिला शेतकरी गंभीर जखमी झाल्या आहेत. वाघाच्या हल्ल्यामुळे संतप्त गावकऱ्यांनी थेट जंगलालाच आग लावली.



भंडारा जिल्ह्यातील लाखनी तालुक्यात जंगलव्याप्त उमरझरी येथे ही घटना घडली. सकाळी दहा वाजता शेतात काम करणाऱ्या महिलेवर वाघाने हल्ला केला. मिळालेल्या माहितीनुसार, माया रामकृष्ण सोनावणे आणि त्यांचे पती रामकृष्ण सोनावणे हे त्यांच्या शेतात हिरव्या मिरच्या तोडत होते. ते कामात असतानाच शेतालगतच्या जंगलातून आलेल्या वाघाने अचानक माया सोनवणे यांच्यावर हल्ला केला. तीक्ष्ण दातांनी मानेला पकडून जवळपास दहा फूट फरफटत नेले. हे पाहून पती रामकृष्ण सोनवणे यांनी आरडाओरडा केला. शेजारच्या शेतात काम करणाऱ्या लोकांनी तात्काळ आरडा ओरड करून वाघाला पळवून लावले. उमरझरी येथील वाघाने महिलेवर हल्ला केल्याची माहिती नागरिकांनी वनविभाग आणि पोलीस विभागाला दिली. घटनेची माहिती मिळताच माहेश्वरी नेवारे, मनोज बोरकर, यशवंत कापगते, सागर कापगते आणि इतर गावकरी घटनास्थळी पोहोचले. त्यांनी माया सोनावणे यांना खाजगी चारचाकी वाहनाने साकोली उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. वनविभाग आणि साकोली पोलीस ठाण्याला या घटनेची माहिती देण्यात आली.

# अकोटला सातव्या अ.भा. वऱ्हाडी साहित्य संमेलनाचा मान

## संमेलनाध्यक्षपदी साधना काळबांडे स्वागताध्यक्षपदी वासुदेव महाराज महल्ले, उदघाटक अनिल गावंडे तर कार्याध्यक्ष पदी प्रकाश गायकी यांची निवड

अजिंक्य भारत। प्रतिनिधी





**बार्शीटाकळी, दि. २८ :** वऱ्हाडी साहित्य व बोलीभाषा संवर्धन संस्था बार्शीटाकळी द्वारा संचालित अखिल भारतीय वऱ्हाडी साहित्य मंच अकोला यांच्या सातव्या अ.भा. वऱ्हाडी साहित्य संमेलनाची अधिकृत घोषणा मंचाचे अध्यक्ष श्याम ठक यांच्या वतीने करण्यात आली. अकोट जि. अकोला येथे सातवे अ.भा. वऱ्हाडी साहित्य संमेलन घेण्यात येणार आहे. २०२६ मध्ये सातवे अ.भा.वऱ्हाडी साहित्य संमेलन दि.१२ एप्रिल २०२६ रविवार रोजी अकोला जिल्ह्यातील अकोट येथील श्री क्षेत्र श्रद्धासागर येथे होणार आहे. या संमेलनाच्या अध्यक्षा म्हणून ख्यातनाम वऱ्हाडी साहित्यिका सौ. साधना काळबांडे तर स्वागताध्यक्ष म्हणून श्री क्षेत्र श्रद्धासागरचे अध्यक्ष हभप वासुदेव महाराज महल्ले यांची निवड करण्यात आली. या संमेलनाचे उदघाटन सुप्रसिद्ध समाजसेवक तथा लोकजागरचे अनिल गावंडे यांच्या हस्ते होणार आहे. सदर संमेलनात प्रमुख उपस्थितीत प्रमुख उपस्थिती - हभप शुकदास महाराज गाडेकर ( राष्ट्रीय किर्तनकार - श्री. गुरुदेव सेवाश्रम पाटसुल , अकोट ), शिक्षण क्षेत्रात नामवंत असलेले गजानन नारे,डॉ प्रा. ममता इंगोले, प्रा.राजेश मिरगे, पूर्व संमेलनाध्यक्ष तुळशीराम बोबडे, पुष्पराज गावंडे, माजी सदस्य महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांचा समावेश असेल. वऱ्हाडी साहित्य व वऱ्हाडात विशेष कार्य करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांच्या कार्याचा गौरव करण्याच्या उद्देशाने दरवर्षीप्रमाणे यंदाही पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. यात कलाक्षेत्रात कार्यरत साहेबराव तायडे (तुलंगा) यांना जीवनगौरव, युवा वऱ्हाडी साहित्यिक चंद्रशेखर महाजन (अकोट) यांना ''यलाई'' पुष्पराज गावंडे पुरस्कार , पुणे येथील वऱ्हाडी साहित्यिका वैशाली गावंडे यांना स्व. सौ.सुमनबाई ठक स्मृतीप्रित्यर्थ महिला वऱ्हाड रत्न पुरस्कार,विनायक काळे (समाजसेवा), संजय खांडेकर (पत्रकारिता) अरुण मोडक (वऱ्हाडी स्तंभलेखन)ॲड. मयूर लहाने (वाचन चळवळ )देऊन गौरवण्यात येणार आहे. वऱ्हाडी बोलीभाषेवर प्रेम करणाऱ्या सर्वांनी ,संमेलनाला उपस्थित राहण्याचे संमेलनाचे कार्याध्यक्ष प्रकाश गायकी व अध्यक्ष श्याम ठक यांनी आवाहन केले आहे.

# लोककल्याणकारी व सामाजिक न्याय योजनांच्या प्रदर्शनाचे पालकमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २८ :** राज्य शासनाच्या विविध जिल्हास्तरीय विभागांमार्फत आयोजित पाच दिवसीय 'यवतमाळ महोत्सवा'त जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत जिल्हा माहिती कार्यालयामार्फत 'लोककल्याणकारी शासकीय योजनांचे आणि सामाजिक न्याय विभागाच्या योजनांचे प्रदर्शन भरविण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन मा. मृद व जलसंधारण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. संजय राठोड यांच्या हस्ते शुक्रवारी करण्यात आले.



या प्रदर्शनाच्या उद्घाटनाप्रसंगी आमदार बाळासाहेब मांगुळकर, आमदार संजय देरकर, जिल्हाधिकारी विकास मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की, प्रकल्प अधिकारी अमित रंजन, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोजकुमार ढगे, जिल्हा माहिती अधिकारी पवन राठोड आदी वरिष्ठ अधिकारी व नागरिक उपस्थित होते. या प्रदर्शनीच्या उद्घाटनानंतर पालकमंत्री ना. राठोड यांनी शासनाच्या विविध महत्वकांक्षी योजनांच्या माहितीदर्शक इन्फोग्राफिकची पाहणी केले.

त्यानंतर सामाजिक न्याय विभागाच्या योजना समाविष्ट असलेल्या दिनदर्शिकाचे लोकार्पण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या प्रदर्शनीत जिल्हा वार्षिक योजना(सर्वसाधारण) अंतर्गत लोककल्याणकारी योजना व सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजना प्रदर्शित करण्यात आल्या आहे.

या प्रदर्शनीच्या माध्यमातून नागरिकांनी शासनाच्या योजनांची माहिती मिळवून त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन पालकमंत्री ना. राठोड यांनी यावेळी केले.

## भाऊसाहेब भोरे शिवशक्ती महाविद्यालयात पदवी प्रदान सोहळा

**बाभूळगाव :** येथील भाऊसाहेब भोरे शिवशक्ती महाविद्यालयात संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या अधिसूचनेनुसार पदवी प्रदान सोहळा आयोजित करण्यात आला होता. प्राचार्य डॉ. उदय नावलेकर आणि प्राचार्य डॉ. हेमंत बारडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत बी.ए., बी.कॉम., बी.एससी., एम.ए. व एम.कॉम.च्या यशस्वी विद्यार्थ्यांना पदव्या बहाल करून त्यांच्या शैक्षणिक यशाचा गौरव करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक आबासाहेब पारवेकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उदय नावलेकर यांनी शिक्षण हे जीवन घडविण्याचे साधन असल्याचे सांगत ज्ञान आणि कौशल्याचा समतोल साधण्याचे आवाहन केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. हेमंत बारडकर यांनी पदवी ही एक जबाबदारी असल्याचे नमूद करत विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा व लघु उद्योगाकडे वळण्यासाठी महाविद्यालयाच्या पाठबळाचा विश्वास दिला.

# २४ मेला अकोला येथे शून्य सावलीचा अनुभव घेता येणार!

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २८ :** सावली आपली साथ कधीच सोडत नाही, ही एक म्हण. पण, वर्षातून दोन दिवस असे असतात, की ही सावली तुम्हाला अनुभवता येत नाही. या दिवसाला 'शून्य सावली दिवस' असे म्हटले जाते.सूर्य अगदी ९० अंशाच्या कोनात डोक्यावर येणार असल्याने ७ मे पासून महाराष्ट्रातील विविध ठिकाणी वेगवेगळ्या तारखेला दुपारी १२.०० वाजता सावली 'बेपत्ता' होण्याचा अनुभव घेता येणार आहे.



वर्षातील दोन दिवस वगळता सूर्य डोक्यावर असतानाही आपली थोडीतरी सावली दिसते. कर्कवृत्त आणि मकरवृत्त या दोन रेषांच्या मधल्या पट्ट्यातच सूर्यकिरणे क्रमाक्रमाने लंबरूप पडतात. त्यामूळे या भागातूनच वर्षातून दोनदा शून्य सावलीचा अनुभव घेता येतो. कर्कवृत्ताच्या उत्तरेकडे आणि मकरवृत्ताच्या दक्षिणेकडे सूर्य कधीच डोक्यावर येत नाही. त्यामूळे तेथे नेहमी तिरपी सावली पडते. पृथ्वीचा अक्ष जर सरळ ९० अंश कोनात असता तर विषुववृत्तावरच नेहमीसाठी शून्य सावली अनुभवता आली असती. सूर्य दररोज ०.५० अंशच सरकतो म्हणून तो एकाच अंशावर दोन दिवस राहतो. एका अक्षांशावर येणाऱ्या सर्व परिसरात एकाच वेळी शून्य सावलीचा अनुभव येतो.

७ मे कोल्हापूर, मिरज, सांगली, १० मे सातारा, अक्कलकोट, ११ मे वाई, महाबळेश्वर, १२ मे बारामती, बार्शी, १३ मे लातूर, १४ मे अलिबाग, दौंड, पूणे, १५ मे मुंबई, १६ मे नगर, कल्याण, नांदेड, ठाणे, १८ मे पैठण, १९ मे जालना, २० मे संभाजी नगर, नाशिक, २१ मे मनमाड, २२ मे यवतमाळ, २३ मे बुलढाणा, मालेगाव, २४ मे अकोला, २५ मे अमरावती, २६ मे जळगाव, भुसावळ आणि नागपूर येथे शून्य सावलीचा अनुभव घेता येणार आहे. या ठिकाणी ठिक दुपारी १२.०० वाजता सूर्य अगदी डोक्यावर येईल.

# सुधीर मुनगंटीवार यांनी केली कायदा बदलण्याची मागणी!

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**नागपूर, दि. २८ :** महाराष्ट्राचा अपमान झाल्याचा आरोप करत भाजप नेते व माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी संताप व्यक्त केला आहे. कायद्यात बदल करण्याची मागणी करत त्यांनी भोंदू बाबांविरोधात कठोर कारवाईची गरज असल्याचे ते म्हणाले. अशोक खरात यांच्याबाबत बोलताना त्यांनी अत्यंत वादग्रस्त विधान केले असून, संबंधितांवर कठोर पावले उचलावीत, असे आवाहन प्रशासनाला केले. माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधताना त्यांनी राज्याच्या अस्मितेचा प्रश्न उपस्थित करत सरकारने या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी केली.



छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्राचा अपमान झाला असल्याचा आरोप करत, ''एक दिवसाचा कायदा बदलला पाहिजे आणि भोंदू बाबा अशोक खरातला सुया टोचून, टोचून, टोचून मारायला हवे. देशातील सर्व भोंदू बाबांना यातून इशारा दिला पाहिजे-याद रखो, तुमची शिक्षा निश्चित आहे,'' असे वक्तव्य भाजप नेते व माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले. नाशिक जिल्ह्यातील सिन्नर परिसरात उघडकीस आलेल्या स्वयंघोषित 'कॅप्टन' अशोक खरात प्रकरणाने राज्यभरात खळबळ उडाली आहे. महिलांवरील अत्याचार, आर्थिक गैरव्यवहार आणि मोठ्या नेटवर्कच्या आरोपांमुळे तपासाला वेग आला असून, यावरून राजकीय वातावरणही तापले आहे. एसआयटी तपास आता निर्णायक टप्प्यात पोहोचल्याचे सांगितले जात आहे. स्वतःला 'कॅप्टन' म्हणवणारा अशोक खरात हा मर्चंट नेव्हीमधून निवृत्त झाल्यानंतर नाशिक व सिन्नर परिसरात अंकशास्त्र व कॉस्मॉलॉजी तज्ज्ञ म्हणून कार्यरत होता. सिन्नरच्या मिरगाव येथे त्याने 'श्री ईशान्येश्वर मंदिर' नावाचे संस्थान उभारले होते. एका ३५ वर्षीय महिलेच्या तक्रारीनंतर गुंगीचे औषध देऊन अत्याचार केल्याचा आरोप समोर आला आणि प्रकरण उघडकीस आले. आयपीएस अधिकारी तेजस्वी सातपुते यांच्या नेतृत्वाखालील विशेष तपास पथक या प्रकरणाचा तपास करत आहे.

## योगिता उपरे हिची महाराष्ट्र पोलिस दलात निवड

**यवतमाळ :** सहयोग ग्रुपच्या वतीने खडकडोह येथील योगिता शंकर उपरे हिची महाराष्ट्र पोलिस दलात निवड झाल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला. पुनकाबाई आश्रमशाळेची माजी विद्यार्थिनी असलेल्या योगिताने पोलिस भरतीत यश मिळवल्याने, सहयोग ग्रुपने तिच्यासह वडील शंकरराव उपरे यांचा गौरव करून ग्रामीण भागातील गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.

या छोटेखानी कार्यक्रमात सत्कारमूर्ती योगिता उपरे हिने आपले मनोगत व्यक्त करताना, भविष्यात एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण होऊन अधिकारी होण्याचे ध्येय असल्याचे सांगितले. कार्यक्रमाला सहयोग ग्रुप व निसर्ग पर्यावरण मंडळाचे अध्यक्ष सुरेंद्र गेडाम, मारोती यमजलवार, प्राचार्य सुरेश परचाके, प्रा. गजानन गद्दलवार, प्रा. भानुदास सगर, विपीन वडके, संदीप धोटे, गणेश बेलेकर, माधव चाटे, महेश मेश्राम, संदीप पोटरकर, मुरली नाकले, तुषार यमजलवार, संदीप ढेंगळे, राजेश खरवडे आणि किरण यमजलवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

# आगामी निवडणुकांना खंबीरपणे सामोरे जाऊ - शरद मैंद

## पुसद येथे राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाची विभागीय आढावा बैठक संपन्न

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**पुसद, दि. २८ :** 'अत्यंत विपरीत परिस्थितीतही नगरपरिषद निवडणुकीत पक्षाचे तीन नगरसेवक निवडून आले आहेत. संपूर्ण जिल्ह्यातून निवडून आलेले हे तीनही नगरसेवक राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे असणे ही भूषणावह बाब आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी आम्ही खंबीरपणे पक्ष बांधणी करत असून पूर्ण ताकदीने निवडणुकीला सामोरे जाणार आहोत,' असे मत पक्षाचे प्रदेश सरचिटणीस शरद मैंद यांनी व्यक्त केले.




राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाची पुसद, उमरखेड आणि महागाव या तीन तालुक्यांची विभागीय आढावा बैठक पुसद येथील पक्ष कार्यालयात शुक्रवारी (दि. २७) पार पडली. यावेळी प्रदेश सरचिटणीस शरद मैंद बोलत होते. या बैठकीला यवतमाळ जिल्हा निरीक्षक तथा प्रदेशाध्यक्ष अल्पसंख्याक सेल (महाराष्ट्र) अफजल फारूकी, पुसद विभागाच्या जिल्हाध्यक्षा वर्षा निकम, उमरखेड विधानसभा प्रभारी राजूभय्या जैस्वाल आणि प्रदीप देवसरकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी महाविकास आघाडीचे गटनेते अकील मेमन (नगरपरिषद पुसद), प्रदीप देवसरकर आणि राजुभय्या जैस्वाल यांनी आपली मनोगते व्यक्त केली. अफजल फारुकी यांनी आपल्या भाषणात शरद मैंद यांच्या नेतृत्वात पक्ष संघटनेचे कौतुक केले. 'पुढील निवडणुकीसाठी सर्वांनी आत्तापासूनच कामाला लागावे आणि मित्रपक्षांसोबत सुसंवाद ठेवून जागावाटपाच्या वाटाघाटी कराव्यात,' असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन नारायण क्षीरसागर यांनी केले, तर आभार नाना बेले यांनी मानले. यावेळी ॲड. भारत जाधव, अशंका कांबळे, परमेश्वर जैस्वाल, के.जी. चव्हाण, गणेश दिंडे, नाना बेले, चक्रधर मुळे, ॲड. गोपाल मस्के, स्वप्नील जैस्वाल, बळवंत मनवर, दीपक तायवाडे, उत्तम चापके, सय्यद नायब, नारायण जाधव, कैलास जळगावकर, भारत चव्हाण, यू. एन. वानखेडे, पांडुरंग चोपडे, अरुण ठाकरे, श्रीकांत वानखेडे, विश्वास ठाकरे, जय दळवी, प्रवीण कदम, मोहन गोदे, शेषराव राठोड, गजानन ठाकरे, दत्ता शिंदे, गौरव सुकळकर, संजय जाधव, सुमीत बोडखे, पवन चव्हाण, ॲड. जुनेद शेख, धीरज कांबळे, गुलाब मनवर, संदेश रणवीर, सागर पारवाणी, दिनेश बलखंडे, विशाल दुधाने, यश काळे, शेख आवेश, सचिन सांगडे व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या विविध सेलचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

'पुसद येथील पक्ष संघटना मजबूत आहे. संपूर्ण जिल्ह्यात पक्षाची नव्याने बांधणी करायचे आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मित्रपक्षांशी समन्वय साधून निवडणुका लढवायच्या आहेत.

# अभिता ॲग्रो चे उपक्रमच "लयभारी"...

## आता कोकणच्या फ्रेश काजूची चव चाखा बुलढाण्यात!

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**बुलडाणा, दि. २८ :** कोकण म्हटलं की डोळ्यापुढे येतात ते कोकणातील फ्रेश काजू , काजू पासून बनवलेले विविध पदार्थ,या कोकणी काजूची चव तर दीर्घकाळ जिभेवर रेंगाळणारी... आता हेच फ्रेश काजू बुलढाणेकरांच्या चवीसाठी अभिता ॲग्रो ने आणले आहे. २३ मार्च रोजी त्याचा शुभारंभ राजर्षी टावर समोर चिखली रोडवरील सेंटरवर पार पडला. विशेष म्हणजे काजू स्टोअर शुभारंभालाच ग्राहकांचा उत्तम प्रतिसाद देखील मिळाला आहे.




अभिता ॲग्रो कंपनीचे सीईओ सुनील शेळके यांच्या भन्नाट कल्पना बुलढाणाकरांना आता चांगल्याच परिचित झाल्या आहेत. वेगवेगळ्या क्षेत्रातील त्यांची मुशाफिरी वाखाण्याजोगी असते. याच अभिता ॲग्रोच्या माध्यमातून त्यांनी कोकणातील फ्रेश काजू बुलढाणा मध्ये उपलब्ध केले आहे.

कोकण आरोमा चा शुभारंभ २३ मार्च रोजी ए आर सिटी प्लाझा, दुसरा मजला राजर्षी टावर समोर, चिखली रोड बुलढाणा या ठिकाणी दणक्यात पार पडला. बुलढाणेकरांनी उपस्थिती लावली.ग्रीन चिल्ली, क्रीम ओनियन पेरी पेरी ,कच्च्या कैरी,रोस्टेड शेजवान ,लिंबू मिरी, चीज,चॉकलेट, मेथी मटार अशी चविष्ट फ्लेवर उपलब्ध करण्यात आले आहे. विशेष बाब म्हणजे मार्केट पेक्षा दरही रास्त ठेवण्यात आले आहे. काजू स्टोअर च्या ऑफिसमध्ये ग्राहकासाठी काजूचे विविध प्रकार उपलब्धआहे. कोकणातील काजूची नैसर्गिक चव आणि त्याच्यामध्ये फ्लेवर ॲड झाल्याने वेगळीच लज्जत या काजू स्टोअर ने आणली आहे.

### अभिताने घेतली शेतकऱ्याची काळजी..



**» काजू खरेदी करताना अभिता ॲग्रो ने शेतकऱ्यांची देखील काळजी घेतली आहे. कोकणच्या ग्रामीण भागातील शेतकऱ्यांशी संपर्क करून त्यांच्याकडून थेट खरेदी म्हणजे उत्पादक ते उपभोक्ता याप्रमाणे हे काजू आणले आहे.त्यामुळे ते ग्राहकांना तर परवडणारे आहेतच मात्र शेतकऱ्यांना देखील दोन पैसे वाढीव देणारे ठरले.स्वरूप पाटील, वैभव सुर्वे हे ही व्यवस्था पार पाडत आहे. अभिता ॲग्रो कंपनीच्या माध्यमातून शेतकरी हिताचे उपक्रम राबविण्याचा मानस कंपनीचे सीईओ सुनील शेळके यांनी व्यक्त केला आहे.**

# अष्टपैलू आनंदी अधिकारी प्रशासन गतिमान करतात : एसडीओ




अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**सिंदखेडराजा, दि. २८ :** जनसामान्यांच्या सेवेसाठी कार्यतत्पर राहणारा महसूल अधिकारी कायदे आणि नियमांबरोबर अष्टपैलू आणि आनंदी असावा. ज्यामुळे प्रशासनातील कार्याची गतिमानता वाढेल.प्रशासकीय योजना गरजवंतांपर्यंत कार्य तत्परतेने पोहोचतील. असे मत सिंदखेडराजा उपविभागीय अधिकारी प्रा.संजय खडसे यांनी व्यक्त केले.

स्वच्छ आणि गतिमान प्रशासन करण्यासाठी महाराष्ट्र सरकारच्या महसूल व वन विभाग अंतर्गत प्रांत स्तरावर एक दिवसीय कार्यशाळेचे निर्देश आहेत.

त्यानुसार सिंदखेडराजा आणि देऊळगाव राजा तालुक्यांतील महसूल अधिकाऱ्यांसाठी २५ मार्चला जिजाऊ सृष्टी येथील भव्य सभा मंडपामध्ये महसूल अधिकाऱ्यांच्या एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी समारोपीय सत्रात मनोगत व्यक्त करताना एसडीओ खडसे यांनी उपरोक्त मत व्यक्त केले.

# वानखेडेच्या खेळपट्टीवर कोणाचे वर्चस्व असणार?

## मुंबई इंडियन्स आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात आज सामना

**नवी दिल्ली: दि.२८ वृत्तसंस्था**

आयपीएल २०२६ ची नव्या सिझनची आज सुरूवात होणार आहे. यासाठी आता बीसीसीआयने जोरदार तयारी केली आहे. आज या स्पर्धेचा पहिला सामना आरसीबी आणि एसआरएच यांच्यामध्ये खेळवला जाणार आहे, तर दुसरा सामना हा रविवारी मुंबई इंडियन्स आणि कोलकाता नाईट रायडर्स या दोन संघामध्ये रंगणार आहे. मुंबई इंडियन्सचे नेतृत्व हे हार्दिक पांड्या करताना दिसणार आहे तर कोलकाता नाईट रायडर्सची कमान अजिंक्य रहाणे सांभाळताना दिसणार आहे.

पाच वेळचे विजेते मुंबई इंडियन्स आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात इंडियन प्रीमियर लीग २०२६ चा दुसरा सामना रविवारी होणार आहे. दोन्ही संघांसाठी या हंगामातील हा पहिलाच सामना असेल, जो वानखेडे स्टेडियमवर खेळला जाईल. या ऐतिहासिक स्टेडियमची खेळपट्टी सामन्यात महत्त्वाची भूमिका बजावेल. मुंबईने २०२० पासून आयपीएल जिंकलेली नाही आणि या हंगामात आपला विजेतेपदाचा दुष्काळ संपवण्याचा त्यांचा प्रयत्न असेल.

दुसरीकडे, कोलकाताने २०२४ मध्ये विजेतेपद पटकावले होते आणि चौथ्यांदा ही ट्रॉफी उंचावण्यासाठी ते कोणतीही कसर सोडणार नाहीत. पुढील समस्या किंवा दबाव टाळण्यासाठी प्रत्येक संघाला हंगामाची सुरुवात विजयाने करायची असते. वानखेडे स्टेडियमची



खेळपट्टी लाल मातीची असून, ती चांगला उसळी आणि वेग देते. चेंडू नवीन असल्यामुळे सुरुवातीच्या षटकांमध्ये गोलंदाजांना थोडी मदत मिळू शकते, पण संपूर्ण सामन्यादरम्यान फलंदाजांना चेंडू त्यांच्या बॅटवर चांगला मिळत राहील.सीमारेषा फार मोठ्या नाहीत, त्यामुळे चौकार आणि षटकार मारणे सोपे जाते. दुसऱ्या शब्दांत सांगायचे झाल्यास, या मैदानावर फलंदाजांचे वर्चस्व राहील. दोन्ही संघांमध्ये चांगले फलंदाज आहेत. कोलकाता संघाचे कर्णधारपद अजिंक्य रहाणेकडे आहे, जो मूळचा मुंबईचा असून लहानपणापासून याच मैदानावर खेळत आहे. येथे काय करायचे हे त्याला अचूक माहीत आहे. त्यामुळे मुंबई कोलकाताला हलक्यात घेऊ शकत नाही.

रहाणेसोबतच रोहित शर्माही लहानपणापासून याच मैदानावर खेळला आहे. रोहित आता चांगलाच तंदुरुस्त असून, प्रदीर्घ तयारीनंतर आयपीएलमध्ये येत आहे. सर्वांच्या नजरा त्याच्या फलंदाजीवर असतील. रोहितने टी-२० आंतरराष्ट्रीय आणि कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. तो आता फक्त एकदिवसीय सामने खेळतो. बऱ्याच कालावधीनंतर त्याचे मैदानावर पुनरागमन झाल्याने चाहत्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे, जे 'हिटमॅन'कडून एका मोठ्या खेळीची अपेक्षा करत आहेत.

## महत्त्वाचे

### गोल्फ टायगर पुन्हा संकटात

**फ्लोरिडा :** जगप्रसिद्ध गोल्फपटू टायगर वुड्सला फ्लोरिडा कार अपघातानंतर अटक करण्यात आली आहे. १५ वेळा मेजर चॅम्पियनशिप जिंकणाऱ्या वुड्सवर मालमत्तेचे नुकसान करणे, अपघातानंतर युरिन टेस्टला नकार दिल्याचा आरोपही असल्याची माहिती मार्टिन काउंटी शेरीफ कार्यालयाने माध्यमांना दिली. शेरीफ जॉन बुडेन्सिएक यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, वुड्सच्या लँड रोव्हर गाडीने शुक्रवारी (दि.२७ मार्च) दुपारी ज्युपिटर आयलंडवर एका ट्रकला ओव्हरटेक करताना धडक दिली. त्यानंतर कार पलटी झाली. त्याच्या देहबोलीवरुन तो नशेत असावा असे जाणवत होते. अपघातानंतर ५० वर्षीय टायगर वूड्स प्रवासी गेटच्या बाजूने रांगत बाहेर पडला. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून त्याला ताब्यात घेतले. मार्टिन काउंटी जेलमध्ये त्याची ब्रीथ अनालायझर चाचणी करण्यात आली, ज्यामध्ये त्याने मद्यपान केले नसल्याचे स्पष्ट झाले.

### 'ट्रिपल महाराष्ट्र केसरी' भाग्यश्री फंडची ऐतिहासिक माघार!

**नवी दिल्ली:** महिला कुस्ती क्षेत्रातील सर्वात मानाचा 'महाराष्ट्र केसरी' किताब सलग तीन वेळा जिंकून इतिहास रचणारी भाग्यश्री फंड यंदाच्या चौथ्या वरिष्ठ गट महिला महाराष्ट्र केसरी स्पर्धेत सहभागी होणार नाही. वजन वाढवण्यातील तांत्रिक अडचणींमुळे तिने हा निर्णय घेतला आहे. मात्र, स्पर्धेतून बाहेर असूनही तिने यंदाच्या संभाव्य विजेत्यांबाबत भाष्य केले आहे.भाग्यश्रीने स्पष्ट केले की, सध्या तिचा वजनी गट ५९ ते ६२ किलो आहे, तर महाराष्ट्र केसरी किताबासाठी ६५ ते ७६ किलो वजनी गट असणे अनिवार्य आहे. अचानक इतके वजन वाढवणे शारीरिकदृष्ट्या कठीण असल्याने तिने यंदाच्या स्पर्धेतून लांब राहण्याचा निर्णय घेतला आहे. ''गेली तीन वर्षे ट्रिपल महाराष्ट्र केसरी पद टिकवण्यासाठी मी रक्ताचं पाणी केलं, पण यंदा वजन हा मोठा अडथळा ठरला,'' असे भाग्यश्री म्हणाली.भाग्यश्रीच्या अनुपस्थितीत यंदा विजेतेपदाची माळ कोणाच्या गळ्यात पडणार, याकडे सर्वांचे लक्ष आहे.

## हात नसतानाही आमिर हुसेची लोनने क्रिकेटमध्ये अप्रतिम कामगिरी

**नवी दिल्ली: दि.२८ वृत्तसंस्था**

जम्मू-काश्मीरमधील एका छोट्याशा गावातल्या क्रिकेटरची ही कहाणी जिद्द, संघर्ष आणि आत्मविश्वासाची आहे. आमिर हुसेन लोन या हात नसलेल्या क्रिकेटपटूने कठीण परिस्थितीचा सामना करत स्वतःचा मार्ग तयार केला आणि आज तो अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे१९९७ साली, वयाच्या अवघ्या ८व्या वर्षी आमिर आपल्या भावाला जेवण देण्यासाठी गेला होता. तेव्हा झालेल्या अपघातात त्याचे दोन्ही हात गेले. या घटनेनंतर केवळ शारीरिकच नाही, तर



सामाजिक अडचणींचाही सामना करावा लागला. लोकांनी त्याच्या पालकांना त्याच्यावर पैसे खर्च करू नका, असंही सांगितलं. एका शिक्षकाने तर ''अपंग मुलांसाठी शाळा नाही'' असं स्पष्ट सांगितलं होतं.पण आमिरने हार मानली नाही. त्याने पायांच्या मदतीने दैनंदिन कामं करायला सुरुवात केली. लिहिणं, दाढी करणं, पोहणं तो सगळी काम करायला शिकला. पण त्याचं खरं प्रेम क्रिकेट होतं. पण दोन्ही हात नसताना तो क्रिकेट कसं खेळणार असा प्रश्न होता.

पण त्याने सराव केला. आता तो बॅटिंग आणि बॉलिंग दोन्ही करु शकतो.आमिरची जिद्द पाहून सचिन तेंडूलकर देखील भारावून गेला. २०२४ मध्ये सचिन स्वतः काश्मीरमध्ये जाऊन आमिरला भेटला. सचिनने त्याला सही केलेली बॅट भेट दिली आणि चॅरिटी सामन्यात त्याच्यासोबत ओपनिंगही केली. सचिनने त्याला सांगितलं ''आमिर, क्रिकेट कधीही सोडू नकोस. तू यासाठीच बनला आहेस.''आज ३४ वर्षीय आमिर फक्त खेळाडू नाही, तर कोच बनला आहे. कडून मिळालेल्या ६७.६ लाखांच्या मदतीने तो आपल्या गावात क्रिकेट अकादमी उभारत आहे. बिजबेहारा येथे उभारली जाणारी ही इनडोअर क्रिकेट अकादमी विशेषतः गरीब आणि दिव्यांग मुलांसाठी आहे. इथे सुमारे १०० मुलांना मोफत प्रशिक्षण दिलं जाणार आहे. काश्मीरच्या थंड हवामानामुळे इनडोअर सुविधा देण्यात येणार आहे, जेणेकरून मुलांना वर्षभर सराव करता येईल.

## सीएसकेचे टेन्शन वाढले

### धोनी २ आठवडे खेळणार नाही



**नवी दिल्ली: दि.२८ वृत्तसंस्था**

आयपीएलच्या १९ व्या हंगामाला आजपासून सुरुवात होत असतानाच, चेन्नई सुपर किंग्सला मोठा धक्का बसला आहे. संघाचा आधारस्तंभ आणि माजी कर्णधार एम.एस. धोनी पायाच्या स्नायूंच्या दुखापतीमुळे या हंगामातील पहिल्या दोन आठवड्यांतील सामने खेळणार नाही. फ्रँचायझीने आज अधिकृतपणे ही माहिती दिली.धोनी सध्या या दुखापतीतून सावरण्यासाठी रिहॅबिलिटेशन प्रक्रियेतून जात असल्याचे सीएसकेने सोशल मीडियाद्वारे स्पष्ट केले आहे. सोमवारी चेन्नईचा पहिला सामना राजस्थान रॉयल्सविरुद्ध होणार आहे. त्यानंतरच्या पहिल्या दोन आठवड्यांत संघाला पंजाब किंग्स, रॉयल चॅलेंजर्स बंगळूरू आणि दिल्ली कॅपिटल्स या बलाढ्य संघांचा सामना करायचा आहे. या महत्त्वाच्या सामन्यांमध्ये धोनी मैदानात दिसणार नाही.धोनीच्या अनुपस्थितीत यष्टीरक्षणाची जबाबदारी कोणाकडे असेल, याबाबत आता चर्चा सुरू झाली आहे. या शर्यतीत संजू सॅमसनचे नाव आघाडीवर आहे. सॅमसन यंदा कर्णधार ऋतुराज गायकवाडसोबत सलामीला फलंदाजी करणार आहे. याशिवाय, चेन्नईकडे उर्वील पटेल आणि युवा खेळाडू कार्तिक शर्मा हे दोन पर्यायही उपलब्ध आहेत. गेल्या वर्षी धोनीने सर्व १४ सामने खेळले होते. खालच्या क्रमांकावर फलंदाजीला येत त्याने १३ डावांत १३५.१७ च्या स्ट्राईक रेटने १९६ धावा केल्या होत्या. मात्र, सांघिक कामगिरीत चेन्नईचा संघ पूर्णपणे अपयशी ठरला होता. २०२५ च्या हंगामात केवळ ४ विजय मिळवून चेन्नई गुणतालिकेत तळाला होती. धोनीच्या दुखापतीपूर्वी चेन्नईला नॅथन एलिसच्या रूपाने मोठा धक्का बसला होता.

## आयपीएल : रवींद्र जडेजाचे वादळ घोंघावले

**नवी दिल्ली: दि.२८ वृत्तसंस्था**

**आयपीएल २०२६ स्पर्धेला आता काही तासात सुरूवात होईल. या स्पर्धेत सर्वच दहा फ्रेंचायझींनी आपल्या संघाची बांधणी केली आहे. पण या स्पर्धेपूर्वी झालेल्या एका ट्रेड डीलने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं. चेन्नई सुपर किंग्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात ही डील झाली होती. संजू सॅमसन आणि रवींद्र जडेजा यांच्यात अदलाबदल झाली होती. राजस्थान रॉयल्सने पुन्हा एकदा रवींद्र जडेजाला आपल्या संघात घेतलं आहे. रवींद्र जडेजा हा आयपीएल २००८ विजेत्या संघाचा भाग होता.**

त्यामुळे त्याच्याकडून पुन्हा एकदा तशाच कामगिरीची अपेक्षा आहे. मधल्या काळात पुलाखालून बरंच पाणी वाहून गेलं आहे. रवींद्र जडेजाचा अनुभवही दांडगा आहे. त्यामुळे त्याचा फायदा राजस्थान रॉयल्स असं वाटत आहे. त्याची एक झलक रवींद्र जडेजाने सराव सामन्यात दाखवून दिली आहे. त्याची फलंदाजी पाहून राजस्थान रॉयल्स आणि त्याचे चाहते खूश झाले आहेत.राजस्थान रॉयल्सचा स्टार अष्टपैलू खेळाडू रवींद्र जडेजाने सराव सामन्यात जुरेल ११ विरुद्ध जबरदस्त फलंदाजी केली.

त्याने ३४ चेंडूत नाबाद ९५ धावा ठोकल्या. यावेळी रवींद्र जडेजाने सर्वच गोलंदाजांची पिसं काढली. चौकार षटकारांचा वर्षाव केला. इतकंच काय तर फलंदाजीसोबत गोलंदाजीतही तितकी ताकद दाखवून दिली. त्याने या सामन्यात ४ विकेट काढल्या. रवींद्र जडेजाची ही खेळी पाहून त्याचा फॉर्म काय आहे याचा अंदाज क्रीडाप्रेमींनी बांधला आहे.आयपीएल २०२६ स्पर्धेत राजस्थान रॉयल्सचा पहिला सामना चेन्नई सुपर किंग्सशी होणार आहे. मागच्या पर्वात याच संघातून रवींद्र जडेजा खेळला आहे.

गेली अनेक वर्षे तो चेन्नई सुपर किंग्सचा भाग होता. जेतेपद मिळवून देण्यात त्याने मोलाचा हातभारही लावला आहे. त्यामुळे रवींद्र जडेजाचा हा फॉर्म पाहून धडकी भरणार हे नक्की आहे. ३० मार्चला राजस्थान रॉयल्स आणि चेन्नई सुपर किंग्स भिडणार आहेत.

रवींद्र जडेजाने आतापर्यंत आयपीएल करिअरमध्ये ३२६० धावा आणि १७० विकेट काढल्या आहेत.



# रुपयाची ऐतिहासिक घसरण

## १० वर्षातील सर्वात मोठी घसरगुंडी

**नवी दिल्ली: दि.२८ वृत्तसंस्था**

भारतीय चलनात सातत्याने घसरण होत आहे. शुक्रवारी, रुपया अमेरिकन डॉलरच्या तुलनेत आतापर्यंतच्या नीचांकी पातळीवर बंद झाला. त्याने प्रथमच ९४ चा टप्पा ओलांडला. दिवसभरात तो ९४.८४ पर्यंत घसरला आणि अखेरीस ९४.८१ वर बंद झाला. इतकंच नाही तर याचा संपूर्ण परिणाम हा शेअर बाजारावही झाल्याचे दिसून येत आहे. मात्र भारतीय रुपयाची घसरण गेल्या १० वर्षात पहिल्यांदाच इतकी झाली असल्याचे दिसून आले आहे. यामुळे आता महागाई वाढण्याची




शक्यता आहे.

परदेशी गुंतवणूकदारांकडून होणारी सततची विक्री, तसंच परदेशी गुंतणुकदारांनी मार्केटमधून काढून घेतलेला पैसा आणि इराणमधील वाढता तणाव यांचा रुपयावर स्पष्टपणे परिणाम होत आहे. आकडेवारीनुसार, या आर्थिक वर्षात आतापर्यंत रुपया सुमारे ११ टक्क्यांनी कमकुवत झाला आहे. गेल्या दशकाहून अधिक काळातील भारतीय चलनाची ही सर्वात मोठी कमजोरी मानली जात आहे.विविध माध्यमांच्या वृत्तानुसार, इराण आणि इस्त्रायल यांच्यातील युद्ध संपेपर्यंत रुपयामध्ये लक्षणीय सुधारणा होण्याची शक्यता नाही. तथापि, सरकार आपल्या स्तरावर रुपयाला आधार देण्यासाठी प्रयत्न करत आहे. तरीही हा प्रयत्न किती यशस्वी होऊ शकतो, यावर अनेक तज्ज्ञांमध्येही मतभेद आहेत. सध्या अमेरिका-इराण-इस्त्रायलच्या युद्धामुळे जगभरात त्याचे पडसाद उमटत आहेत आणि



भारतालाही त्याचा फटका पडलेला दिसून येत आहे. पेट्रोल आणि डिझेलच्या वाढत्या किमतींवर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारने उत्पादन शुल्क कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे सर्वसामान्य लोकांना काहीसा दिलासा मिळू शकतो. तथापि, या निर्णयाचा सरकारी तिजोरीवर परिणाम होऊ शकतो आणि सरकारी महसुलात घट होऊ शकते.

### सोन्याच्या दरात १७५०० रुपयांची विक्रमी वाढ

**नवीदिल्ली:** इस्त्रायल, इराण आणि अमेरिका यांच्यातील संघर्षामुळे जागतिक बाजारपेठांमध्ये मोठी उलथापालथ सुरू आहे. या संघर्षाचा परिणाम सोन्याच्या दरांवरही दिसून येत आहे. या आठवड्यात सोन्याचे दर बऱ्याच अंशी स्थिर राहिले आहेत. आठवड्यातील सर्वात नीचांकी पातळीच्या तुलनेत सोन्याच्या दरांमध्ये १७,५०० रुपयांची मोठी वाढ झाली आहे. भारतात, काल शुक्रवारी, सोन्याचा दर १० ग्रॅममागे १,४७,२७० रुपयांच्या पातळीवर पोहोचला. आठवड्यातील सर्वात नीचांकी दर १,२९,५९५ रुपये इतका होता; त्याच्या तुलनेत ही १७,५०० रुपयांची वाढ झाली आहे.या आठवड्यात आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याच्या दरांमध्ये घसरण दिसून आली. सोन्याचा दर ४,५०० डॉलर्स प्रति औंसवर बंद झाला. जरी या दराने ४,५०० डॉलर्सची पातळी ओलांडली असली, तरीही आंतरराष्ट्रीय बाजारात या आठवड्यात सोन्याच्या दरांमध्ये १.८५% ची घसरण नोंदवली गेली आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याच्या दरात घसरण दिसून आली. संबंधित एका तज्ज्ञाने नमूद केले आहे की, ब्रेंट क्रूड तेलाचे दर १२० डॉलर्स प्रति बॅरलवरून घसरून ९३ डॉलर्स प्रति बॅरलच्या आसपास आले आहेत. यामुळे महागाईच्या आघाडीवर काहीसा दिलासा मिळाला आहे. परिणामी, सोन्याच्या दरांनी त्यांच्या सर्वात नीचांकी पातळीवरून १७,५०० रुपयांची वाढ झालेली दिसून आली आहे.

## ऐन उन्हाळ्यात रसदार फळांचे दर घसरले

**मुंबई: दि.२८वृत्तसंस्था**

उन्हाळ्यात फळांना मोठी मागणी वाढते. त्यानुसार फळांच्या दरात ही वाढ होते. मात्र या पुढच्या उन्हाळ्यात फळांचे दर घसरलेले पाहायला मिळत आहेत. महिनाभर तरी हे दर असेच राहणार असल्याचे व्यापारी सांगत आहेत. त्यामुळे खवय्यांना चांगली रसदार, फळे खाताना हात आखडता घ्यावा लागणार नाहीय. उन्हाळ्यात वातावरणातील उष्णता वाढत असल्याने शीतपेये, फळांचे रस, रसदार फळे खाण्याकडे नागरिकांचा कल जास्त असतो. त्यानुसार ग्राहकांकडून बाजारात फळांची मागणी वाढते. शेतकरी ही हंगाम पाहून फळांची लागवड करत असतात. त्यानुसार बाजारात ही रसदार फळे येतात.



त्यानुसार सध्या बाजारात कलिंगड, टरबुज, पपई, द्राक्षे या फळांना मोठी मागणी आहे. त्यानुसार बाजारात ही या फळांची जास्त आवक पाहायला मिळत आहे.कलिंगडाच्या तर बाजारात दररोज चाळीस पंचेचाळीस गाड्या येत आहेत. आवक जास्त होत असल्याने बाजारात कलिंगडाची जात पूर्णपणे कमी झाले आहे. दोन आठवडवापूर्वी घाऊक बाजारात २५ ते ३० रुपये किली असणारा कलिंगड आता मात्र दहा ते पंधरा रुपये किलो झाला आहे. ३० ते ३५ रुपये किलो असणारा टरबूज १८ ते २५ रुपये किलो झाला आहे. २० ते ३० रुपये किलो असणारा पपई १५ ते २० रुपये किलो झाला आहे.भाऊ बाजारात दर कमी झाले असल्याने किरकोळ बाजारामध्ये त्याचा परिणाम पाहायला मिळत आहे. दोन आठवड्यापूर्वी एक कलिंगड १०० ते १२० रुपयांना खरेदी करावा लागत होता.

## 'एनएआर-इंडिया'च्या उच्च-प्रभावी राष्ट्रीय परिषदेनंतर नव्या नेतृत्वाची घोषणा

**मुंबई: दि.२८वृत्तसंस्था**

देशभरातील रिअल इस्टेट ट्रान्झॅक्शन अडव्हायझर्सचे प्रतिनिधित्व करणारी सर्वोच्च संस्था एनएआर-इंडियाने मुंबईत आयोजित आपल्या वार्षिक परिषदेनंतर नव्या राष्ट्रीय नेतृत्व टीमची घोषणा केली. या कार्यक्रमामुळे ३००० कोटींपेक्षा अधिक व्यावसायिक व्यवहारांना गती मिळाली आणि भारतातील संघटित रिअल इस्टेट ब्रोकरेजच्या वाढत्या प्रभावाला अधिक बळकटी मिळाली.आपल्या प्रकारातील सर्वात मोठ्या आयोजनांपैकी एक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या परिषदेत देशभरातून १,८०० हून अधिक प्रतिनिधींनी सहभाग घेतला, ज्यामध्ये रिअल्टर्स, डेव्हलपर्स, गुंतवणूकदार, वित्तीय संस्था, रिटेलर्स आणि कॉर्पोरेट ऑक्युपायर्स यांचा समावेश होता. या व्यापक सहभागामुळे प्रत्यक्ष पातळीवर व्यवहार, धोरणात्मक भागीदारी आणि निवासी, व्यावसायिक तसेच रिटेल क्षेत्रांमध्ये विविध बाजारांदरम्यान सहकार्य निर्माण झाले.हा कार्यक्रम उच्च-मूल्य असलेल्या व्यावसायिक मंचाच्या स्वरूपात समोर आला, जिथे संरचित बी२बी बैठकां, प्रकल्प सादरीकरणे आणि गुंतवणूक संबंधित चर्चांमुळे ठोस परिणाम साध्य झाले. रिलायन्स इंडस्ट्रीज, टाटा ग्रुप आणि आदित्य बिर्ला ग्रुप यांसारख्या प्रमुख कॉर्पोरेट समूहांनी मोठ्या प्रमाणावर रिअल इस्टेट संधींचा सक्रियपणे शोध घेतला, ज्यामुळे हे स्पष्ट होते की जलद आणि अधिक पारदर्शक व्यवहार सुनिश्चित करण्यासाठी संघटित ब्रोकरेज नेटवर्कसोबत काम करण्याबाबत संस्थात्मक रुची सातत्याने वाढत आहे.

या परिषदेमध्ये उद्योगातील विविध विचार आणि थॉट लीडरशिपचा समावेश ही एक विशेष बाब ठरली. डॉ. निरंजन हिरानंदानी आणि हफीज कॉन्ट्रॅक्टर यांसारख्या दिग्गजांनी घेतलेल्या विचारप्रवर्तक सत्रांसोबतच बोमन इराणी, सवजी ढोलकिया आणि जया किशोरी यांसारख्या व्यक्तींच्या प्रेरणादायी संबोधनांनी या कार्यक्रमाला व्यवसाय, धोरण आणि मानवी दृष्टिकोन यांचा समतोल साधणारे व्यासपीठ प्रदान केले, ज्यामुळे कार्यक्रमाची प्रतिष्ठा अधिक उंचावली.

## थोडक्यात

### कुख्यात गुन्हेगार वसीम चियाला अटक

**नागपूर :** कुख्यात गुन्हेगार वसीम ऊर्फ चियाला पोलिसांनी अटक केली आहे. तो पाच गुन्ह्यांत फरार आरोपी होता. गुन्हे शाखेच्या युनिट क्रमांक तीनच्या पथकाने ही कारवाई केली. शांतीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणारा वसीम ऊर्फ चिया अफजल शेख (४७) हा कुख्यात गुंड आहे. तो बऱ्याच काळापासून धान्याच्या काळाबाजारमध्ये सक्रिय आहे. २०20 मध्ये त्याच्या टोळीने बंगाली पंजा भागात फायरिंग करत राडा घातला होता. त्याच्याविरोधात यशोधरानगर, शांतीनगर, कळमना, लकडगंज व अमरावतीतील नागपुरी गेट पोलीस ठाण्यात प्रत्येकी एक गुन्हा दाखल आहे. लूटमार, खंडणी, हाणामारी, शस्त्राच्या धाकावर वसुलीसारख्या गंभीर गुन्ह्यांमध्ये त्याचा सहभाग होता.

### दरवाजा बंद न करता झोपणे पडले महाग्यात

**नागपूर :** बाहेरून आल्यानंतर थकव्यामुळे दरवाजा बंद न करता झोपणे एका व्यक्तीला चांगलेच महाग्यात पडले. अज्ञात आरोपींनी घरात शिरून ४ लाखांहून अधिकचा मुद्देमाल लंपास केला. यशोधरानगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही घटना घडली. मन्सूर अन्सारी मकबूल अन्सारी (३९, मेहबूबपुरा, टिपू सुलतान चौक) असे तक्रारदाराचे नाव आहे. ते गॅरेज मेकॅनिक आहेत. २२ मार्च रोजी ते कुटुंबीयांसह खापा येथे गेले होते. तेथून परत आल्यानंतर थकव्यामुळे मुख्य दरवाजा बंद न करताच झोपी गेले. त्यानंतर अज्ञात आरोपींनी उघड्या दरवाजातून आत प्रवेश केला व कपाटातील रोख तीन लाख तसेच दागिने असा ४.०७ लाखांचा मुद्देमाल लंपास केला.

### तीन मनपा सभापतींनी स्वीकारला पदभार

**नागपूर :** मनपाच्या तीन विशेष समितींच्या नवनिर्वाचित सभापतींनी बुधवारी त्यांच्या सभापतिपदाची सूत्रे स्वीकारली. यात विधी विशेष समिती सभापती निधी तेलगोटे, गलिच्छ वस्ती निर्मूलन व घर बांधणी विशेष समिती सभापती रूतिका मसराम आणि महिला व बालकल्याण समिती सभापती सारिका नांदुरकर यांचा समावेश आहे. मनपा मुख्यालयात आयोजित समारंभाला महापौर नीता ठाकरे, उपमहापौर लीला हाथीबेड, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे, सत्तापक्षनेते नरेंद्र बोरकर, माजी महापौर दयाशंकर तिवारी आदी उपस्थित होते.

### बसमध्ये चढताना महिलेचे दागिने लंपास

**नागपूर :** बसमध्ये चढताना महिलेचे चार तोळ्यांचे दागिने लंपास करण्यात आले. सदर पोलिस ठाण्याच्या हद्दीत ही घटना घडली. सविता देवराव काळे (३८, खैरी लकमा, कळमेश्वर) या २६ मार्च रोजी नागपुरात आल्या होत्या. दुपारी तीन वाजताच्या सुमारास कळमेश्वर येथे परत जाण्यासाठी त्या बिशप कॉटन शाळेजवळील बसस्थानकावर पोहोचल्या. त्यांनी गळ्यातील अडीच तोळ्यांची सोन्याची पोत व दीड तोळ्याचा सोन्याचा गोफ काढून पर्समध्ये ठेवला. बसमध्ये त्या चढत असताना अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेत पर्सची चेन उघडली व दागिने लंपास केले. हा प्रकार लक्षात आल्यावर सविता यांनी सदर पोलिस ठाण्यात तक्रार केली. पोलिसांनी अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# वाघाच्या हल्ल्यात महिलेचा मृत्यू

## वेलतूर हादरले; परिसरात तीव्र संताप आणि भीतीचे वातावरण, प्रशासनाकडून दखल

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**कुही, दि.२८ :** कुही तालुक्यातील वेलतूर पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या प्रतापपूर शेतशिवारात वाघाने केलेल्या भीषण हल्ल्यात एका ६५ वर्षीय महिलेचा जागीच मृत्यू झाला. निर्मला श्रीपत गभणे (वय ६५वर्षे, रा. वेलतूर) असे मृत महिलेचे नाव असून, या घटनेमुळे संपूर्ण परिसरात तीव्र संताप आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, निर्मला या नेहमीप्रमाणे शुक्रवारी (दि. २७) जंगलालगतच्या शेतात कामासाठी गेल्या होत्या. दुपारी साडेचारच्या सुमारास दबा धरून बसलेल्या वाघाने त्यांच्यावर अचानक झडप घातली. हा हल्ला इतका भीषण होता की त्यात निर्मलाचा जागीच मृत्यू झाला. रात्री उशिरापर्यंत त्या घरी न परतल्याने त्यांच्या नातवाने शोध घेतला असता, शेतात रक्ताचे डाग आणि विखुरलेले साहित्य आढळले. सावधगिरीने पाहणी केली असता समोरच्या झुडपात वाघ बसलेला दिसला. यानंतर गावकऱ्यांना आणि वनविभागाला तातडीने पाचारण करण्यात आले. विशेष म्हणजे, वाघ मृतदेहाजवळच ठिय्या मांडून बसला होता. अखेर जेसीबीच्या साहाय्याने रेस्क्यू टीमने हा मृतदेह वाघाच्या तावडीतून सोडवला.

उमरेड-करांडला अभयारण्याला लागून असलेल्या या भागात मागील काही दिवसांपासून वाघाचा वावर वाढला आहे. सध्या शेतात गहू, कापूस आणि तूर कापणीची कामे सुरू असल्याने शेते मोकळी होत आहेत, ज्यामुळे वन्यप्राणी बाहेर येऊ लागले आहेत. पोहरा, चन्ना, कुजबा, नवेगाव, राजोला, हरदोली, धानला यांसारख्या अनेक गावांच्या शिवारात वाघाने धुमाकूळ घातला आहे. वाघाने केवळ मानवावरच नाही, तर अनेक जर्सी गायी आणि पाळीव जनावरांचाही बळी घेतला आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन वनविभागाचे अधिकारी आणि पोलिस ताफा शुक्रवारी रात्रीपासूनच घटनास्थळी तैनात करण्यात आला आहे. हल्ला करणारा वाघ नेमका कोणता आहे, हे शोधण्यासाठी परिसरात ट्रॅप कॅमेरे लावण्यात आले आहेत. वनविभागाची अतिरिक्त कुमक वाघाच्या हालचालींवर लक्ष ठेवून आहे. 'वाघाचा बंदोबस्त करण्यासाठी तातडीने पिंजरा लावून त्याला जेरबंद करावे,' अशी संतप्त मागणी ग्रामस्थांनी केली आहे. शेतकरी आणि मजुरांनी शेतात जाताना समूहाने जावे आणि सायंकाळच्या वेळी जंगलालगतच्या भागात जाणे टाळावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

> 'दिवसेंदिवस वाघाच्या शिकारीच्या घटना वाढत असल्याने वनविभागाने तातडीने या घटनांची दखल घेऊन वाघाचा कायमस्वरूपी बंदोबस्त करण्यासाठी त्याला पकडून दुस?्या जंगलात सोडण्यात यावे.'
>
> -हरिदास लुटे, सचिव, कुही तालुका काँग्रेस कमिटी



> 'उमरेड-करांडला अभयारण्य लगतच्या परिसरात वाघाचा धुमाकूळसुरू आहे. पीक कापणीमुळे वाघ बाहेर येत असून संपूर्ण तालुक्यात 'वाघ आला रे' अशी चर्चा आहे. वनविभागाने यावर तत्काळ उपाययोजना करावी.'
>
> - 'मनोज तितरमारे, सभापती, कृ.उ.बा. समिती, मांढळ)




# नकली चलन प्रकरणी दोन आरोपींना शिक्षा

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. २८ :** नागपूर येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश क्रमांक १६ नितीन जाधव यांच्या न्यायालयाने नकली चलन प्रकरणात दोन आरोपींना दोषी ठरवले आहे. जमरूल उर्फ मणिरूल हुसेन आणि अजीम शेख यांना सात वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा सुनावण्यात आली आहे. यासोबतच प्रत्येकी ५०,००० रुपये दंड ठोठावण्यात आला असून, दंड न भरल्यास त्यांना अतिरिक्त सहा महिने शिक्षा भोगावी लागेल.

हे प्रकरण २८ नोव्हेंबर २०२५ रोजी उघडकीस आले. त्यावेळी तहसील पोलीस स्टेशन हद्दीत विशेष पथक गस्त घालत असताना त्यांना गोपनीय माहिती मिळाली की, मेयो हॉस्पिटल जवळील गार्ड लाईन परिसरात दोन तरुणांकडे नकली नोटा आहेत. पथकाने तात्काळ कारवाई करत आरोपी जमरूल उर्फ मणिरूल हुसेन आणि अजीम शेख (दोघेही रा. काली चौक, जिल्हा मालदा, पश्चिम बंगाल) यांना ताब्यात घेतले. आरोपींची अंगझडती आणि बॅगची तपासणी केली असता, त्यांच्याकडून ५०० रुपयांच्या एकूण २४३ नकली नोटा जप्त करण्यात आल्या. या नोटा हुबेहूब खऱ्या भारतीय चलनासारख्या दिसत होत्या, परंतु त्यात अनेक नोटांचे क्रमांक सारखेच होते. पंचांसमक्ष जप्ती पंचनामा तयार करून आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. या नोटा नकली आहेत की खऱ्या, याची खात्री करण्यासाठी नाशिक येथील नोट छपाई प्रेसकडे अभिप्राय घेण्यात आला. अहवालात सर्व नोटा नकली असल्याचे स्पष्ट झाले. पोलीस निरीक्षक रसूल शेख यांनी संपूर्ण तपास पूर्ण करून न्यायालयात आरोपपत्र दाखल केले. खटल्यात सरकार पक्षातर्फे एकूण ९ साक्षीदार तपासण्यात आले, ज्यात जप्ती पंच, चालू साक्षीदार आणि भारतीय चलनी मुद्रणालय प्रेसचा अहवाल हे प्रमुख पुरावे ठरले. सहाय्यक सरकारी वकील अॅड. अभय जिकार यांनी सरकार पक्षाची बाजू प्रभावीपणे मांडत आरोपींना दोषी ठरवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

## CAPTION भीषण आग...



**नागपूर :** मानेवाडा परिसरातील हरिहर नगरातील संयोग सोसायटीतील हर्षदीप भैसारे यांच्या दुमजली घराला आज सकाळी आग लागली या दुर्घटनेत सुमारे ६० लाख रुपयांचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती आहे फ्रिज, एसी, संगणक, दिवाण, अन्य फर्निचर अन्य साहित्य आणि उपकरणे जळाल्याचे अधिका यांनी सांगितले

# बीएड सीईटी परीक्षा: पहिल्याच दिवशी गोंधळ

## सर्व्हर बिघाडामुळे परीक्षा दोन दिवसांनी पुढे ढकलली, आता २८ किंवा २९ तारखेला होणार परीक्षा

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. २८ :** बीएड सीईटी परीक्षा पहिल्याच दिवशी तांत्रिक अडचणींमुळे पुढे ढकलण्यात आली आहे. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने सर्व्हरमधील बिघाडामुळे ही परीक्षा दोन दिवसांनी पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला. आता ही परीक्षा २८ किंवा २९ रोजी होणार आहे.



परीक्षेची सुधारित तारीख आणि नवीन प्रवेशपत्र डाउनलोड करण्याबाबतची माहिती लवकरच नोंदणीकृत ईमेल आणि मोबाईल नंबरवर एसएमएसद्वारे कळवली जाईल, असे कक्षाने स्पष्ट केले आहे. यामुळे विद्यार्थ्यांना नाहक मनस्ताप सहन करावा लागला. नागपूर येथील वैनगंगा कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड मॅनेजमेंट, डोंगरगाव येथे ३०० विद्यार्थी दुपारी ३ ते ४.३० या वेळेतील पेपर देण्यासाठी पोहोचले होते. विद्यार्थ्यांना दुपारी २ वाजता परीक्षा केंद्रांवर उपस्थित राहण्यास सांगितले होते, मात्र दुपारी ३.३० वाजेपर्यंतही पेपर सुरू झाला नव्हता. अनेक ठिकाणी विद्यार्थ्यांना बसण्यासाठी संगणक उपलब्ध नव्हते, तसेच नेटवर्कचीही समस्या होती. एमएच सीईटी परीक्षा घेण्याचे कंत्राट अॅसेस इन्फ्रा या कंपनीला देण्यात आले आहे. त्यांनी इड्यूस्पार्क या कंपनीला परीक्षा केंद्रांवर सॉफ्टवेअर चालवणे आणि परीक्षा घेण्याचे उपकंत्राट दिले आहे. महाविद्यालयाने दिलेल्या स्पष्टीकरणानुसार, परीक्षा घेण्यासाठी लागणारा सर्व्हर इड्यूस्पार्क स्वतः आणते. महाविद्यालयाचे काम केवळ संगणक आणि बैठक व्यवस्था उपलब्ध करून देणे हे असते. महाविद्यालयाने ३ ते ४ दिवस आधीच सर्व बैठक व्यवस्था आणि संगणक इड्यूस्पार्कच्या इंजिनिअर्सना दिले होते. त्यांनी परीक्षेपूर्वी सर्व संगणक व्यवस्थित सुरू असल्याची खात्री केली होती. मात्र, परीक्षेच्या अगदी अर्धा तास आधी इड्यूस्पार्कच्या इंजिनिअर्सना त्यांच्या सर्व्हरमध्ये तांत्रिक अडचण असल्याचे लक्षात आले, असे महाविद्यालयाने सांगितले.

# प्रेक्षकांशिवाय कला अपूर्ण - योगेश सोमण

## नागपूर चित्रपट महोत्सवात विशेष सत्र, सचिव अतुल गंगवार व विजय शर्मा यांची उपस्थिती

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. २८ :** प्रेक्षकांशिवाय कला अपूर्ण असल्याचे प्रतिपादन अभिनेता दिग्दर्शक तथा लेखक योगेश सोमण यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग आणि नागपूर चलचित्र फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूर चित्रपट महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवात २८ मार्च २०२६ रोजी आयोजित विशेष सत्रात मार्गदर्शन करीत होते.

कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित कार्यक्रमाला भारतीय चित्र साधनाचे सचिव अतुल गंगवार व विजय शर्मा यांची उपस्थिती होती. 'चित्रपट निर्मितीची प्रक्रिया, आव्हाने आणि संधी' या विषयावर आयोजित विशेष सत्रात विषयतज्ञ म्हणून बोलताना योगेश सोमण यांनी या क्षेत्रात येणाऱ्या नवीन कलावंतांनी आपल्या अनुभवातून ज्ञान प्राप्त करावे, असा संदेश दिला. मोबाईलच्या माध्यमातून प्रत्येकाच्या हातात आता कॅमेरा आला आहे. त्याला कसे हाताळायचे हे लहान मुलांना देखील माहिती आहे. मोबाईलचा कॅमेरा उघडला की चित्रीकरण कसे करायचे हे कळते. मात्र, शास्त्रोक्त पद्धतीने चित्रीकरण करण्यासाठी प्रशिक्षणाची गरज असते. या सोबतच प्रत्येकजण त्याला असलेल्या अनुभव आणि ज्ञानाच्या आधारे चित्रीकरण करतो. चित्रीकरण करण्याबाबत प्रत्येकाचे विचार वेगळे असतात. त्यामुळे प्रत्येकाने केलेले चित्रीकरण देखील वेगळेच राहणार आहे. या सोबतच चित्रीकरण किती जणांपर्यंत पोहोचू शकते. चित्रीकरणात कोणता कंटेंट असावा याबाबत शास्त्रशुद्ध प्रशिक्षणाची गरज व्यक्त केली. भारतीय चित्र साधनाचे सचिव अतुल गंगवार यांनी भारतीय चित्रपट सृष्टीत करिअरच्या दृष्टीने अनेक संधी उपलब्ध असल्याचे सांगितले. अभिनय, दिग्दर्शन, नेपथ्य, संगीतकार, गीतकार, कॅमेरामन, संवादक, संपादक, ट्रेलर कटर, मार्केटिंग आदी विविध प्रकारच्या संधी उपलब्ध आहे. यामध्ये संबंधित विषयात कौशल्य प्राप्त करीत आपण या संधीचा लाभ घेत चित्रपटसृष्टीत आपला पाया भक्कम करू शकतो. अभिनय कलेसह चित्रपट सृष्टीतील विविध कौशल्यांचे प्रशिक्षण घेतल्यास तुमच्या योग्यतेप्रमाणे येथे कार्य मिळेल. तंत्रज्ञानाच्या युगात संगणकाच्या माध्यमातून विविध कला सादर केल्या जात आहे. स्टोरी बोर्ड आर्टिस्ट म्हणून देखील नवीन संधी या क्षेत्रात निर्माण होत आहे. त्यामुळे आपण आपले कौशल्य तपासत चित्रपट सृष्टीतील संधींचा लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले.




# गांधीसागर तलावाची संयुक्त पाहणी; आमदार प्रवीण दटके, आयुक्त डॉ. विपीन यांची उपस्थिती

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. २८ :** आमदार प्रवीण दटके आणि आयुक्त डॉ विपीन यांनी गांधीसागर तलाव आणि उद्यान परिसराची संयुक्त पाहणी केली. आयुक्तांनी गणेश मंदिर ते नातीक चौक ते एम्प्रेस मॉलपर्यंतच्या वॉकिंग ट्रॅकचे काम लवकर सुरू करण्याचे निर्देश संबंधित विभागाला दिले.



मनपाच्या सर्व साधारण सभेत ज्येष्ठ नगरसेवक बंडू राऊत आणि मनोज साबळे यांनी गांधीसागर तलावाचे उर्वरित काम बंद असल्याचे माननीय महापौर यांच्या लक्षात आणून दिले होते. त्यानुषंगाने महापौरांनी या तलावाची पाहणी करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले होते. त्यानुसार, मनपा आयुक्त यांनी संपूर्ण परिसराची पाहणी केली. आमदार प्रवीण दटके, अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी, ज्येष्ठ नगरसेवक बंडू राऊत, मनोज साबळे, अधीक्षक अभियंता डॉ श्वेता बॅनर्जी, कार्यकारी अभियंता राजेश दुफारे, अनिल गेडाम,राजेंद्र राठोड यांच्यासह इतर अधिकारी वकर्मचारी उपस्थित होते. आमदार दटके आणि आयुक्त डॉ विपीन यांनी तलावाची पाहणी केली. तसेच त्यांनी शिकस्त भिंतीचे काम आणि खाऊ गल्लीबद्दलची कामे सुरू करण्यासह नागरिकांच्या सोयीसाठी फाऊंटन आणि लाईट शो सुद्धा येथे सुरू करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. याप्रसंगी स्थानिक नागरिकांनी आमदारांचा आणि आयुक्तांचा पुष्प गुच्छ देऊन स्वागत केले.

# नागपुरात ६९ वा अखिल भारतीय पोलिस कर्तव्य मेळावा

## शिस्त -तंत्रज्ञानाचा संगम; देशभरातून २९ संघ, १ हजार ३२७ पोलिस अधिकारी-कर्मचा-यांचा सहभाग

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. २८ :** 'कौशल्य, ' या संकल्पनेखाली नागपूर शहरात २९ मार्च ते ३ एप्रिल २०२६ दरम्यान ६९ वा अखिल भारतीय पोलिस कर्तव्य मेळावा आयोजित केला जात आहे. हा राष्ट्रीय पातळीवरील महत्त्वाचा पोलिस समारंभ दरवर्षी वेगवेगळ्या राज्यांमध्ये घेतला जातो. मागील वर्षी ६८ वा मेळावा झारखंड राज्यातील रांची येथे पार पडला होता यंदा हा सोहळा नागपुरात आयोजित करण्यात आला आहे.



पोलिस कर्तव्य मेळाव्याचा उद्घाटन सोहळा २९ मार्च रोजी संध्याकाळी ५ वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत पोलिस मुख्यालय शिवाजी स्टेडियम येथे पार पडेल.याप्रसंगी भारतभरातील वरिष्ठ पोलिस अधिका०यांची उपस्थिती राहणार आहे. पोलिस दलातील व्यावसायिक कौशल्य, कार्यपद्धती सुधारणा, स्पर्धात्मक वातावरण निर्माण करणे, आधुनिक तपास पद्धतींचा अनुभव घेणे आणि तंत्रज्ञानाचा आदान-प्रदान करण्यासाठी आयोजित केला जातो. या स्पर्धांमुळे पोलिस दलाची कार्यक्षमता, गुणवत्ता आणि आधुनिकतेकडे वाटचाल होण्यास मदत होते. मेळाव्यातील सर्व स्पर्धा नागपुरातील विविध ठिकाणी पार पडणार आहेत. कॉम्प्युटर अवेअरनेस: रामदेव बाबा अभियांत्रिकी विद्यापीठ, गिट्टीखदान, पोलिस डॉग स्पर्धा: राज्य राखीव पोलिस बल हिंगणा रोड इतर चार विषयांसंबंधित स्पर्धा पोलिस प्रशिक्षण केंद्र बजाजनगर येथे पार पडणार आहेत समारोप सोहळा ३ एप्रिल २०२६, संध्याकाळी ५ वाजता पोलीस मुख्यालय, शिवाजी स्टेडियम, नागपूर येथे पार पडेल. समारोप प्रसंगी मा. श्री. नित्यानंद गंगाविष्णु रॉय, केंद्रीय गृह राज्यमंत्री, भारत सरकार यांच्या हस्ते जनरल चॅम्पियनशिप ट्रॉफी, गोल्ड, सिल्व्हर व ब्रॉन्झ मेडल्स वितरण केले जातील. देशभरातून २९ संघ, १ हजार ३२७ पोलिस अधिकारी व अंमलदार, आणि १४४ डॉग्स स्पर्धेत सहभागी होणार आहेत. सहभागी स्पर्धकांसाठी राहण्याची, जेवणाची आणि वैद्यकीय सुविधा नागपूर शहरातील दर्जेदार ठिकाणी उपलब्ध करण्यात आली आहे. तसेच, सांस्कृतिक कार्यक्रम आणि मनोरंजनाची सोय देखील केली आहे.

**स्पर्धा अशा ...**

- कॉम्प्युटर अवेअरनेस
- पोलिस डॉग कॉम्पिटिशन
- पोलिस व्हिडिओग्राफी
- अँटी सबोटेज चेक
- सायंटिफिक एड टू
- इन्व्हेस्टिगेशन
- पोलिस फोटोग्राफी

# कंत्राटी कामगारांच्या प्रलंबित वेतन व मृत कामगारांच्या लाभांबाबत बैठक सकारात्मक

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. २८ :** तांत्रिक अप्रेंटिस कंत्राटी कामगार असोसिएशनची कामगार आयुक्त, मुंबई तसेच महावितरण प्रशासन यांच्यासोबत महत्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीला असोसिएशनचे राज्याध्यक्ष प्रभाकर लहाने व कार्याध्यक्ष विक्की कावळे उपस्थित होते.

बैठकी दरम्यान स्मार्ट सर्व्हिसेस व क्रिस्टल या कंत्राटी कंपन्यांच्या कामगारांच्या प्रलंबित वेतनाचा मुद्दा ठळकपणे मांडण्यात आला. त्यावर स्मार्ट सर्व्हिसेस कंपनीने जानेवारी २०२६ पर्यंतचे वेतन लवकरच अदा करण्यात येईल असे आश्वासन दिले, तर क्रिस्टल कंपनीने फेब्रुवारी २०२६ पर्यंतचे वेतन अदा केल्याची माहिती दिली. तसेच कंत्राटी कामगारांना नियमित व वेळेवर वेतन मिळावे यासाठी कामगार आयुक्तांनी संबंधितांना आवश्यक सूचना देण्यासाठी सकारात्मक भूमिका घेतली. इतर कंत्राटी कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांवरही सविस्तर चर्चा करण्यात आली. याशिवाय मयत कंत्राटी कामगार केशव वाकुडकर व स्व. रामभाऊ बोरकर यांच्या कुटुंबीयांना मृत्यूनंतर मिळणारे आर्थिक लाभ तातडीने देण्यात यावे, अशी मागणी असोसिएशन तर्फे करण्यात आली. यावर संबंधित लाभ लवकरच देण्यात येतील. असे प्रशासनाकडून आश्वासन देण्यात आले. असोसिएशनतर्फे सांगण्यात आले की, कंत्राटी कामगारांच्या हक्कांसाठी व न्यायासाठी संघटना भविष्यातही ठामपणे लढा देत राहील.

अजिंक्य भारत
# आपलं अकोला

अकोला, रविवार, दि.२९ मार्च २०२६ www.ajinkyabharat.com

## रिधोरा जंगलातील खून प्रकरण २४ तासांत उघड

**अकोला:** जिल्ह्यातील बाळापूर तालुक्यातील रिधोरा शेतशिवारातील जंगल परिसरात आढळलेल्या अनोळखी मृतदेहाच्या प्रकरणाचा स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या २४ तासांत छडा लावत खून प्रकरण उघडकीस आणले असून दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. स्थानिक पुणे शाखेच्या या दमदार कारवाईमुळे खुनाच्या गुन्ह्याचा एका दिवसात छडा लावण्यात यश आले आहे. २६ मार्च रोजी दुपारच्या सुमारास रिधोरा येथील दुर्गम जंगल भागात एका अनोळखी व्यक्तीचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आला होता. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता उपविभागीय पोलीस अधिकारी, बाळापूर उपविभाग, स्थानिक गुन्हे शाखा व बाळापूर पोलीस ठाण्याचे अधिकारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले आणि तपासाला सुरुवात केली. मृतदेहाची अवस्था पाहता हा घातपात असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला.

**महत्त्वाचे**

## धावून येणारे माकड अखेर पिंजऱ्यात

**अकोला:** शहरातील खडकी परिसरातील जिल्हा परिषद कॉलनीमध्ये गेल्या अनेक दिवसांपासून नागरिकांना त्रास देणारे आणि अंगावर धावून येणारे बंदर अखेर वनविभागाच्या पिंजऱ्यात अडकले असून त्याचे यशस्वी रेस्क्यू करण्यात आले आहे. या कारवाईमुळे परिसरातील नागरिकांनी मोठा दिलासा व्यक्त केला आहे. संबंधित बंदर हे अनेक दिवसांपासून परिसरात वावरत होते. खाण्याच्या शोधात ते वारंवार लहान मुलांच्या जवळ येत असल्याने मुले घाबरून पळून जात होती. परिसरात मंदिर तसेच नागरिकांची मोठी वर्दळ असल्याने महिलांमध्ये आणि पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. नागरिकांना दररोज या बंदराचा त्रास सहन करावा लागत होता.

# विकासकामांच्या निधी खर्चासाठी अखेरच्या ३ दिवसांचे आव्हान

## ३३३ कोटींपैकी ३१२ कोटी खर्च; गतवर्षी २९ कोटी राहिले होते अखर्चित

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २८ : आर्थिक वर्ष संपण्यासाठी अवघे तीन दिवस शिल्लक असताना, जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत विकासकामांसाठी प्राप्त झालेल्या ३३३ कोटींच्या निधीपैकी आतापर्यंत ३१२ कोटी रुपये खर्च झाल्याची माहिती समोर आली आहे. गतवर्षी आर्थिक वर्ष संपण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत २९ कोटी रुपये अखर्चित राहिले होते. तीच नामुष्की यंदा ओढवू नये, यासाठी नियोजन विभागाकडून युद्धपातळीवर उपाययोजना केल्या जात आहेत.**




जिल्ह्यात विविध विकासकामे पूर्ण करण्यासाठी जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत निधी प्रस्तावित केला जातो. हा निधी शासनाकडून जिल्हा नियोजन समितीला (डीपीसी) प्राप्त होतो. यामध्ये सर्वसाधारण योजना, अनुसूचित जाती उपयोजना आणि अनुसूचित जमाती उपयोजनांचा समावेश असतो. शासनाच्या विविध यंत्रणांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांना डीपीसी मान्यता देते आणि त्यानुसार निधी वितरित केला जातो. पायाभूत सुविधा, आरोग्य सेवा आणि अन्य विकासकामांसाठी आर्थिक वर्ष २०२५-२६ करिता जिल्ह्याला ३३३ कोटी रुपये प्राप्त झाले होते. त्यापैकी आतापर्यंत ३१२ कोटी रुपये खर्च झाले असून, उर्वरित २१ कोटी रुपये खर्च करण्यासाठी प्रशासकीय यंत्रणेकडे आता केवळ तीन दिवसांचा अवधी उरला आहे. हा निधी विहित वेळेत खर्च व्हावा, यासाठी सरकारी यंत्रणांकडून वेगाने हालचाली सुरू आहेत.

# मित्रांच्याच हल्ल्यात जवानाचा मृत्यू; अकोल्यात खळबळ

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २८ :** शहरात एका धक्कादायक आणि संतापजनक घटनेत सैन्यदलातील जवान सुशील दिलीप तेलगोटे यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. मित्रांकडून झालेल्या जीवघेण्या हल्ल्यानंतर तीन दिवसांनी त्यांनी अखेर प्राण गमावल्याने संपूर्ण जिल्ह्यात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सुट्टीवर घरी आलेले जवान सुशील तेलगोटे हे काही दिवसांपूर्वी आपल्या ओळखीच्या मित्रांसोबत बाहेर जेवणासाठी गेले होते. मात्र, याच दरम्यान किरकोळ कारणावरून वाद निर्माण झाला आणि वादाचे रूपांतर थेट हिंसाचारात झाले. संतापलेल्या मित्रांनीच सुशील यांच्यावर जबर मारहाण करत जीवघेणा हल्ला केला.या हल्ल्यात सुशील तेलगोटे गंभीर जखमी झाले होते. त्यांना तातडीने अकोल्यातील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. डॉक्टरांकडून उपचार सुरू असतानाही त्यांची प्रकृती अत्यंत चिंताजनक होती. अखेर उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली.

या घटनेनंतर जुने शहर परिसरात एकच खळबळ उडाली असून, कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. एका जवानाचा असा दुर्दैवी अंत झाल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना व्यक्त होत आहे. दरम्यान, जुने शहर पोलीस स्टेशनने या प्रकरणी तातडीने कारवाई करत दोन ते तीन आरोपींना अटक केली आहे. हल्ल्यामागील नेमके कारण काय, याचा सखोल तपास सुरू असून आरोपींविरुद्ध कठोर कारवाईची मागणी जोर धरत आहे. ही घटना केवळ एक गुन्हा नसून, विश्वासघाताची वेदनादायक कहाणी ठरली आहे.

> ❑ जवानावर झालेला हा हल्ला अत्यंत निंदनीय आहे. अशा प्रकारच्या घटनांवर कठोर कारवाई झालीच पाहिजे, अन्यथा समाजात चुकीचा संदेश जाईल.
> - **मनोहर चव्हाण,** अध्यक्ष, माजी सैनिक संघटना, अकोला

> ❑ या प्रकरणी काही आरोपींना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू असून, दोषींवर कठोर कायद्यान्वये कारवाई केली जाईल.
> - **नितीन लेव्हलकर,** ठाणेदार, जुने शहर पोलीस स्टेशन, अकोला

## शहरातील मुख्य रस्ते होणार अतिक्रमणमुक्त; हलगर्जीपणा करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर निलंबनाची टांगती तलवार

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २८ :** महानगरातील मुख्य रस्त्यांवर हातगाडी विक्रेते आणि अवैध पार्किंगने निम्म्याहून अधिक जागा व्यापल्यामुळे वाहतुकीचा प्रश्न गंभीर झाला आहे. शहरातील रस्ते अरुंद होऊन नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याने, महानगरपालिका प्रशासनाने आता आक्रमक पवित्रा घेतला आहे. रस्ते मोकळे करण्यासाठी अतिक्रमण हटवणाऱ्या पथकाला कठोर निर्देश देण्यात आले असून, कर्तव्यात कसूर करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर थेट निलंबनाची कारवाई करण्याचा इशारा आयुक्तांनी दिला आहे.

शहरातील ओपन एअर थिएटर ते फतेह चौक, गांधी चौक ते ताजना पेठ पोलीस स्टेशन, टिळक रोड ते अकोट स्टँड आणि जिल्हाधिकारी कार्यालय परिसर यांसारख्या अत्यंत गजबजलेल्या भागात हातगाडी विक्रेत्यांनी बेकायदेशीरपणे अतिक्रमण केले आहे. अशोक वाटिका, कापड बाजार आणि काळा चबुतऱ्यापर्यंतच्या मार्गांवर फेरीवाला क्षेत्र (हॉकर झोन) उपलब्ध असूनही, विक्रेते मुद्दाम रस्त्यावरच दुकाने थाटत असल्याचे निदर्शनास आले आहे. यामुळे भविष्यात मोठ्या अपघाताची शक्यता निर्माण झाली असून, आयुक्तांनी या स्थितीबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. महानगरपालिकेचे सहायक आयुक्त राजेश सरप यांनी अतिक्रमण निवारण पथकाला लेखी पत्र जारी करून शहरातील रस्ते कायमस्वरूपी अतिक्रमणमुक्त करण्याचे आदेश दिले आहेत. यामध्ये केवळ हातगाड्याच नव्हे, तर वाहतुकीला अडथळा ठरणारे अवैध बॅनर, होर्डिंग्ज, जाहिरात फलक, रस्त्यावरील चहाच्या टपऱ्या आणि खाद्यपदार्थांची दुकाने तातडीने हटवण्याच्या सूचना दिल्या आहेत. विशेष म्हणजे, ही कारवाई दररोज करणे बंधनकारक असून, या कामात हलगर्जीपणा आढळल्यास महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९ च्या तरतुदींनुसार संबंधित अधिकाऱ्यांच्या निलंबनाचा प्रस्ताव वरिष्ठ स्तरावर पाठवण्यात येईल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे. महानगरपालिकेच्या या मोहिमेतंर्गत गांधी चौक, सिटी कोतवाली, वाशिम स्टँड, नेहरू पार्क ते गोरक्षण रोड, सिव्हिल लाईन, कौलखेड आणि बालापूर रोड यांसारख्या प्रमुख ठिकाणांवर विशेष लक्ष केंद्रित केले जाणार आहे. महापालिकेच्या या कठोर भूमिकेमुळे आता शहरातील रस्ते पुन्हा मोकळा श्वास घेतील, अशी आशा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## जिल्हा बँक निवडणूक: ११ जागांसाठी आज मतदान



अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २८ :** अकोला व वाशिम जिल्हा कार्यक्षेत्र असलेल्या अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक पदाच्या निवडणुकीसाठी रविवार, २९ मार्च रोजी मतदान होणार आहे. २१ पैकी १० जागा अविरोध झाल्या असून, उर्वरित ११ जागांसाठी मतदानाची प्रक्रिया पार पाडण्यात येणार आहे. दोन्ही जिल्ह्यांत एकूण १३ मतदान केंद्रांवर मतदानाची व्यवस्था करण्यात आली आहे.

अकोला व वाशिम जिल्हा कार्यक्षेत्र असलेल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा नावलौकिक महाराष्ट्रातच नव्हे, तर देशात आहे. बँक आर्थिकदृष्ट्या प्रगतीपथावर असून, कर्ज वितरण व अन्य वित्तीय सेवांमध्ये अग्रेसर आहे. परिणामी, बँकेवर अनेक वर्षांपासून एकाच गटाची अर्थात सहकार पॅनेलची सत्ता आहे. गतवर्षी सत्तेला आव्हान देण्याचा प्रयत्न झाला होता, मात्र सत्तेत बसण्याच्या महत्त्वाकांक्षेला सातत्यपूर्ण कृतीची जोड मिळाली नाही, परिणामी परिवर्तन शक्य झाले नाही. दरम्यान, काही दिवसांपूर्वी जाहीर झालेला निवडणूक कार्यक्रम आता अंतिम टप्प्यात असून २९ मार्च रोजी प्रत्यक्ष मतदान होणार आहे.

### प्रत्येक तालुक्यात एक मतदान केंद्र

निवडणुकीसाठी प्रत्येक तालुक्यासाठी एक याप्रमाणे दोन्ही जिल्ह्यांत १३ मतदान केंद्रे उभारण्यात आली आहेत. यामध्ये खालील केंद्रांचा समावेश आहे. **अकोला:** आदर्श कॉलनीतील मनपा मराठी मुलांची शाळा क्रमांक १६. **बार्शिटाकळी:** गुलाम नबी आझाद महाविद्यालय. **अकोट:** श्री भाऊसाहेब पोटे विद्यालय. **तेल्हारा:** श्री शिवाजी हायस्कूल. **बाळापूर:** श्रीमती धनाबाई विद्यालय. **पातूर:** शाळा बाबू उर्दू हायस्कूल. **मूर्तिजापूर:** जयनारायण बूब न.प. माध्यमिक विद्यालय. **वाशिम:** श्री शिवाजी विद्यालय, मेन रोड. **रिसोड:** श्री शिवाजी महाविद्यालय. **मालेगाव:** जि.प. वरिष्ठ प्राथमिक उर्दू शाळा. **मंगरूळपीर:** पीएम श्री जि.प. विद्यालय. **मानोरा:** जि.प. प्राथमिक शाळा, वसंत नगर. **कारंजा:** विद्याभारती इंग्लिश हायस्कूल.

**मतदानाची वेळ:** सकाळी ८:०० ते सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत.

## जिल्ह्यातील पाणीपुरवठा योजनांकडे ३३ कोटी २५ लाखांचे वीज बिल थकले

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २८ :** जिल्ह्यातील ६९९ नळ पाणीपुरवठा योजनांकडे ३३ कोटी २५ लाख रुपयांचे विद्युत देयक थकले आहे. यामध्ये जिल्ह्यातील प्रमुख योजना असलेल्या ६४ खेडी प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेकडे २४ लाख आणि ८४ खेडी पाणीपुरवठा योजनेकडे १२ लाख रुपयांचे देयक बाकी आहे. वसुलीसाठी महावितरण कंपनीने कठोर भूमिका घेतली असून, वीजबिल भरण्यास प्रतिसाद न देणाऱ्या सार्वजनिक पाणीपुरवठा योजनांचा वीजपुरवठा कधीही खंडित केला जाऊ शकतो.

महावितरणचे अस्तित्वच वीज बिलाच्या शंभर टक्के वसुलीवर अवलंबून आहे. मार्च महिन्याचे आर्थिक महत्त्व लक्षात घेता, वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर पाणीटंचाईची समस्या निर्माण होऊ नये, यासाठी संबंधित विभागांनी तातडीने थकबाकी भरून सहकार्य करावे, असे आवाहन मुख्य अभियंता राजेश नाईक यांनी केले आहे. महावितरणकडून थकबाकी वसुलीसाठी संबंधित विभागांशी वारंवार संपर्क करण्यात आला आहे. प्रत्यक्ष भेटी, पत्रव्यवहार, स्मरणपत्रे आणि मोबाईल संदेशांच्या माध्यमातून वीजबिल भरण्याचे आवाहन करण्यात आले. मात्र, अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याने महावितरणला वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई अपरिहार्य ठरत असल्याचे स्पष्ट करण्यात आले असून, तसे निर्देश क्षेत्रीय कार्यालयांना देण्यात आले आहेत. दरम्यान, आर्थिक वर्ष संपण्यास अवघे तीन दिवस शिल्लक असल्याने महावितरणने वसुली मोहिमेला अधिक गती दिली आहे. या मोहिमेत सर्वच वर्गवारीतील थकबाकीदार ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित करण्यात येत आहे. तसेच सर्व स्तरांतील अधिकारी व कर्मचारी सक्रिय सहभागी झाले असून, थकबाकीदारांच्या थेट भेटी घेऊन वसुलीची कारवाई केली जात आहे.

## गरीबांचा फ्रिज...



**अकोला: आता ऊन्हाचे तापमान अधिक च वाढतं असुन गरीबांचा फ्रिज ओळखल्या जाणारा मातीचा काळा माठ शहरातील विविध भागात विक्री आलेले असून ग्राहकांची या माठांना चांगली च पसंती मिळत आहे.**
**(छाया. संजय ताथुरकर)**

## अकोल्यात सोशल मीडियावर अश्लील फोटो व्हायरल; आरोपी अटकेत

**अकोला :** अकोला शहरातील खदान पोलीस ठाणे हद्दीत एका महिलेचे अश्लील फोटो सोशल मीडियावर प्रसारित केल्याप्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. ही घटना २६ मार्च २०२६ रोजी सायंकाळी साडेसहा वाजताच्या सुमारास सिंधी कॅम्प ते अशोकवाटिका रोड परिसरात घडली. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिलेने खदान पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीत नमूद केल्याप्रमाणे, आरोपीने फिर्यादीच्या मोबाईल क्रमांकावरून तिचे अश्लील व आक्षेपार्ह फोटो पोस्ट केले. तसेच एका इन्स्टाग्राम आयडीद्वारे हे फोटो सोशल मीडियावर प्रसारित करण्यात आले.

याचबरोबर, संबंधित मोबाईल क्रमांकधारक आरोपीने फिर्यादीशी संपर्क साधून ''तुला भेटायचे आहे, तू खूप छान दिसतेस'' अशा प्रकारचे लज्जास्पद व त्रासदायक संभाषण केल्याचेही तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी खदान पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ७९ तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६७(अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास अधिकारी पोलीस निरीक्षक मनोज केदारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपीला अटक केली असून पुढील तपास सुरू आहे. सोशल मीडियावर अश्लील मजकूर/फोटो प्रसारित करणे हा गंभीर गुन्हा आहे नागरिकांनी अशा प्रकारच्या घटना तात्काळ पोलिसांकडे नोंदवाव्यात सायबर गुन्ह्यांविरोधात पोलिसांची सतर्कता वाढली आहे

## हनुमान जयंतीनिमित्त १ एप्रिल रोजी भव्य शोभायात्रा

### ५० गरजू कुटुंबांच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारणार

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २८ :** शहराचे आराध्य दैवत श्री राजराजेश्वर मंदिरापासून हनुमान जयंतीच्या पूर्वसंध्येला, बुधवारी (१ एप्रिल) भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. आकर्षक झाक्या, पारंपरिक दिंडी आणि ढोल-ताशांच्या गजरात निघणाऱ्या या सोहळ्याची जय्यत तयारी पूर्ण झाली असल्याची माहिती हनुमान जयंती शोभायात्रा समितीचे अविनाश देशमुख यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मान्यवरांच्या हस्ते विधिवत पूजन करून शोभायात्रेचा शुभारंभ होईल. त्यानंतर ही मिरवणूक जयहिंद चौक, मोठा पूल, सिटी कोतवाली, गांधी रोड, गांधी चौक, महानगरपालिका, पंचायत समिती मार्गे होमगार्ड ऑफिस आणि खोलेश्वर परिसरातून मार्गक्रमण करेल. सिटी कोतवाली परिसरातील हनुमान मंदिर येथे महाआरतीने या सोहळ्याचा समारोप होईल. शोभायात्रेत रामायण व हनुमान चरित्रावर आधारित जिवंत देखावे, भगव्या पताका आणि विविध सामाजिक संस्थांचा सहभाग राहणार आहे. केवळ उत्सवच नव्हे, तर सामाजिक बांधिलकी जपत समितीने ५० आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना दत्तक घेण्याचा संकल्प केला आहे. या कुटुंबातील मुलांच्या शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी, शैक्षणिक साहित्य आणि फीचा खर्च समिती उचलणार आहे. या उपक्रमात दानशूर व्यक्तींनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

या पत्रकार परिषदेला माजी आमदार बबनराव चौधरी, दिलीप वानखडे, रमाकांत खेतान, गोपीकिसन बाजोरिया, हरिदास भदे, विनायकराव पवार, पंकज साबळे, अरविंद शुक्ला, धनंजय मिश्रा, योगेश बुंदले, मनोज साहू, पूजा काळे, स्वानंदी पांडे, राजाभाऊ देशमुख, निशा ग्यारंल, उमा शर्मा, सुषमा बढे यांच्यासह समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.




**कृषि** संस्कारक्षम पिढी घडविणे ही मातृशक्तीची प्राथमिक जबाबदारी

## महिला सक्षमीकरणातून शेती क्षेत्राचा सर्वांगीण विकास – कुलगुरू डॉ. शरद गडाख

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. २८ :** आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ येथे आयोजित ''विदर्भस्तरीय महिला सक्षमीकरण मेळावा व स्त्री शक्ती उत्सव'' उत्साहात संपन्न झाला. या प्रसंगी शेती व संबंधित क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या विदर्भातील १५ महिलांना ''स्वयंसिद्धा २०२६'' पुरस्काराने गौरविण्यात आले.




कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलताना वर्षा लढ्ढा यांनी सांगितले की, ''अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात माहिती सहज उपलब्ध झाली असली, तरी तिचा योग्य वापर करण्यासाठी संस्कारक्षम पिढी घडविणे ही आजच्या मातृशक्तीची प्राथमिक जबाबदारी आहे.'' महिलांच्या जिद्द, चिकाटी आणि समर्पणामुळेच देश अन्नधान्य उत्पादनात आघाडीवर असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेले कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, ''शेती क्षेत्राच्या विकासात महिलांचे योगदान अत्यंत महत्वाचे आहे. आर्थिक प्रगतीसाठी तंत्रज्ञान व माहितीचा उपयोग करणे गरजेचे असून, कृषी विद्यापीठात उपलब्ध संसाधनांचा लाभ सर्वांनी घ्यावा.'' ग्रामीण भागात उत्पादित शेतीमालावर स्थानिक पातळीवर प्रक्रिया केल्यास गावांचा सर्वांगीण विकास साधता येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी वर्षा मीना व ईशानी आनंद यांनीही उपस्थित महिलांना मार्गदर्शन करत आत्मविश्वास वाढविणारे विचार मांडले. ''परिश्रम आणि चिकाटीच्या जोरावर आजची महिला कोणत्याही क्षेत्रात मागे नाही,'' असे त्यांनी ठामपणे सांगितले. या सोहळ्यात विदर्भातील विविध जिल्ह्यांतील १५ महिलांचा त्यांच्या संघर्षमय प्रवास व उल्लेखनीय कार्यासाठी सन्मान करण्यात आला. त्यांच्या कार्याची माहिती देणारी चित्रफीत सादर करण्यात आली, ज्यामुळे उपस्थितांमध्ये प्रेरणा व आत्मविश्वास निर्माण झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. धनराज उंदीरवाडे यांनी केले, तर सूत्रसंचालन डॉ. प्रेरणा चिकटे यांनी केले.




बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क: सुरेश देशमुख, रौंदळा मो. ९८५०२६८४८३

## महत्त्वाचे

### ४०० हून अधिक विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रदान

**बार्शीटाकळी** : येथील गुलाम नबी आझाद कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात पदवीदान समारंभ उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी प्रकाश पोहरे यांनी विद्यार्थ्यांना सोशल मीडियाच्या फसव्या दुनियेतून बाहेर पडून परमनंट मेमरी (शाश्वत ज्ञान) आत्मसात करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. मधुकरराव पवार होते, तर मंचावर प्राचार्य डॉ. बिस्मिल्ला खान, उपप्राचार्य डॉ. संतोष हुसे, डॉ. अमित वैराळे व दादाराव यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी निकिता सरकटे, रेणुका ठाकरे, रवी शेगोकार, आकाश वानखेडे व रोशन खोटरे या गुणवंतांसह ४०० हून अधिक विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रदान करण्यात आली. प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना उद्योजकतेचे धडे दिले, तर डॉ. पवार यांनी उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. या सोहळ्याला डॉ. दीपक चौरपगार, प्रा. वैशाली सोनोने, रोहिदास आडे, डॉ. मतीन, डॉ. प्रवीणकुमार राठोड, डॉ. मनोज जाधव, डॉ. शरद इढोळे, डॉ. विनोद उंडाळ, डॉ. संतोष सुरडकर, डॉ. मोहन बल्लाळ, डॉ. अजित पाटील, डॉ. भीमराव जैवळ, डॉ. कैलास काळे, प्रा. युवराज काळे, डॉ. प्रियंका मसतकर, डॉ. दीपिका जैन, डॉ. नीलिमा कंकाडे, प्रा. योगिता चव्हाण, प्रा. संजय चव्हाण, नंदकुमार राऊत व गोकुळ भड उपस्थित होते. यशस्वीतेसाठी पंजाब जाधव, आदित्य खाडे व मंगेश चव्हाण यांनी परिश्रम घेतले.

### बार्शीटाकळीत ३१ मार्च रोजी जिल्हास्तरीय हज तरबियत कॅम्प

**बार्शीटाकळी** : पवित्र हज २०२६ यात्रेसाठी जाणाऱ्या भाविकांच्या मार्गदर्शनासाठी ३१ मार्च २०२६ रोजी बार्शीटाकळी येथे जिल्हास्तरीय हज तरबियत (प्रशिक्षण) कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे. येथील बायपास रोडवरील कासम नाना चौक परिसरातील फिरदौस फंक्शन हॉलमध्ये हा सोहळा पार पडेल. अकोला येथील बडी मशीद (बैदपुरा) चे इमाम व खतीब मौलाना सफदर खान कासमी यांच्या नेतृत्वाखाली आणि जामा मशीदचे इमाम व खतीब मौलाना अब्दुल जब्बार साहेब यांच्या अध्यक्षतेखाली हे प्रशिक्षण होणार आहे. या कॅम्पमध्ये हज यात्रा कशी करावी, या विषयावर मास्टर अल्हाज मिर्झा जफर बेग आणि मास्टर मोहम्मद शफीक अहमद हे यात्रेकरूंना सविस्तर तांत्रिक व धार्मिक माहिती देणार आहेत. या शिबिरात अकोला जिल्हभरातून सुमारे ४०० यात्रेकरू सहभागी होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.

### मानवाचे मोठेपण कर्मानेच ठरते; ह.भ.प. राजेंद्र महाराज वकटे

**अकोला** : मनुष्य आपल्या कर्माने श्रेष्ठ होतो, जन्माने किंवा वर्णाने नाही. संतांनी जातीव्यवस्थेचा छेद करून समाजात समता प्रस्थापित केली,'' असे प्रतिपादन पाळोदी येथील सुप्रसिद्ध कथाकार ह.भ.प. राजेंद्र महाराज वकटे यांनी केले. दाबकी रोडवरील वानखडे नगर येथे कर्ता हनुमान मंडळाच्या वतीने आयोजित संगीतमय शिवपुराण कथेत ते बोलत होते. यावेळी तीर्थक्षेत्रांचे महत्त्व सांगताना त्यांनी निसर्ग संवर्धनाचाही संदेश दिला. उत्सवात जाऊबाई जोरात महिला भजनी मंडळाने भजने सादर केली. याप्रसंगी राजेश टेकाडे व शंकरराव देशमुख यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन गजानन धरमकर यांनी केले. २ एप्रिलपर्यंत दररोज सायंकाळी ७ ते १० या वेळेत होणाऱ्या कथेचा लाभ घेण्याचे आवाहन अध्यक्ष सुभाष म्हैसने, माजी नगरसेविका मंगला म्हैसने व कर्ता हनुमान मंडळाच्या सदस्यांनी केले आहे.

# शेतकऱ्याचा दोन एकर गहू जळून खाक

## अज्ञात नराधमाचे कृत्य की शॉर्टसर्किट?

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**जानोरी मेळ, दि. २८** : निसर्गाच्या लहरीपणातून वाचवून मोठ्या कष्टाने पिकवलेला गहू घरात येण्यापूर्वीच आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्याची हृदयद्रावक घटना मोखा (ता. अकोट) येथे घडली. निंबा परिसरातील मोखा येथील उपसरपंच पती निलेश बागडे यांचे वडील देवराव बागडे यांच्या अडीच एकर शेतातील उभा आणि सोंगलेला गहू शनिवारी दुपारी १ वाजेच्या सुमारास जळून खाक झाला. या घटनेत लाखो रुपयांचे नुकसान झाले असून, शेतकऱ्याचा आधारच हिरावला गेला आहे.

देवराव बागडे यांनी आपल्या शेतात अडीच एकर गहू पेरला होता. कापणीला आलेला हा गहू अवघ्या दोन दिवसांत घरात येणार होता. मात्र, २८ मार्च रोजी दुपारी अज्ञात कारणाने शेताला भीषण आग लागली. शेजारील शेतकरी विलास तायडे यांनी आग पाहताच बागडे यांच्या नातवाला पाचारण केले. गावकऱ्यांनी आग विझवण्याचा शर्थीचा प्रयत्न केला, मात्र आगीने रौद्र रूप धारण केल्यामुळे उभा गहू, १० हजार रुपयांच्या ताडपत्री आणि स्प्रिंकलरचे पाईप जळून कोळसा झाले.

आगीचे कारण अद्याप अस्पष्ट असले तरी, काही ग्रामस्थांनी ही आग अज्ञात इसमाने मुद्दाम लावल्याचा संशय व्यक्त केला आहे. शेतात शॉर्टसर्किट झाले असते तर इतर ठिकाणीही झळा बसल्या असत्या, मात्र केवळ गव्हालाच आग लागल्याने घातपाताची शक्यता बळावली आहे. बागडे यांचा मुलगा आणि सून कामासाठी बाहेर असताना कुटुंबाचा उदरनिर्वाहाचा एकमेव स्रोत असलेल्या शेतीवर अशाप्रकारे काळाने घाला घातल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

### प्रशासनाने पंचनामा करावा!

वर्षभर घाम गाळून पिकवलेली लक्ष्मी डोळ्यांदेखत जळताना पाहून बागडे कुटुंबाला अश्रू अनावर झाले.आता वर्षभर खायचे काय? असा प्रश्न त्यांच्यासमोर उभा ठाकला आहे. महसूल विभागाने तातडीने पंचनामा करून नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी मोखा ग्रामस्थांनी केली आहे.

# तेल्हाऱ्यात इंधन तुटवडा नाही; नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नका

## पेट्रोल पंपांवरील गर्दी टाळण्याचे प्रशासनाचे निर्देश

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

### तहसीलदारांचे आवाहन

**तेल्हारा, दि. २८** : आखाती देशांमधील युद्धाच्या तणावपूर्ण पार्श्वभूमीवर तेल्हारा तालुक्यात इंधन तुटवडा निर्माण झाल्याची अफवा काही ठिकाणी पसरत आहे. या अफवेमुळे तालुक्यातील पेट्रोल पंपांवर वाहनधारकांची मोठी गर्दी होत असून, नागरिक अतिरिक्त इंधनसाठा करण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र, तालुक्यात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असून नागरिकांनी घाबरून जाऊ नये, असे आवाहन तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी महेश रामगुंडे यांनी केले आहे. तहसीलदार महेश रामगुंडे यांनी स्पष्ट केले की, तेल्हारा तालुक्यात इंधनाचा पुरवठा नियमितपणे सुरू आहे. जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला यांच्यामार्फत सर्व पेट्रोल पंप कंपन्यांच्या विक्री अधिकारी आणि प्रतिनिधींना पुरवठा सुरळीत ठेवण्याबाबत आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. सद्यस्थितीमध्ये इंधनाचा कोणताही तुटवडा नसून नागरिकांनी पेट्रोल पंपांवर अनावश्यक गर्दी करणे टाळावे. सोशल मीडिया किंवा अन्य माध्यमांतून इंधन तुटवड्याबाबत चुकीची माहिती किंवा अफवा पसरवणाऱ्यांविरुद्ध प्रशासनाकडून कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही तहसीलदारांनी दिला आहे. अधिकृत माहितीसाठी नागरिकांनी थेट जिल्हा किंवा तालुका प्रशासनाशी संपर्क साधावा आणि संयम बाळगून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन प्रसिद्धी पत्रकाद्वारे करण्यात आले आहे.

# पशुसंवर्धन योजनेत भ्रष्टाचाराचा आरोप; चौकशी सुरू

## सहआयुक्तांचे अकोला पशुसंवर्धन विभागाला कडक निर्देश

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. २८** : अकोला जिल्हा पशुसंवर्धन विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विशेष घटक योजनेमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता आणि भ्रष्टाचार झाल्याचा आरोप मानवाधिकार सामाजिक न्याय सुरक्षा संघटनेने केला आहे. या तक्रारीची गंभीर दखल घेत प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त डॉ. वासुदेव वंजारी यांनी प्रकरणाच्या सखोल चौकशीचे आदेश दिले आहेत.



अनुसूचित जाती-जमाती व मागासवर्गीय लाभार्थ्यांसाठी असलेल्या या योजनेत जनावरांची प्रत्यक्ष खरेदी न करताच केवळ कागदोपत्री प्रक्रिया पूर्ण करून निधी हडपल्याचा संशय संघटनेने व्यक्त केला आहे. काही ठिकाणी जनावरे नसतानाही विम्याचे सोपस्कार पार पडल्याचे तक्रारीत नमूद आहे. यासंदर्भात संघटनेचे अध्यक्ष संदेश गोपनारायण यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने २० मार्च रोजी अमरावती येथे सहआयुक्तांना निवेदन दिले होते. सहआयुक्तांनी या पत्राची दखल घेत अकोल्याच्या जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्तांना सखोल चौकशी करून स्वयंस्पष्ट अहवाल सादर करण्याचे निर्देश अधिकृत पत्राद्वारे दिले आहेत. या प्रकरणात दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी संतोष कोलटके, सुनील चोटमल, भूषण हिवराळे, शीला सोनवणे व अन्य कार्यकर्त्यांनी केली आहे. आता प्रशासकीय चौकशीनंतरच या आरोपांमधील सत्यता स्पष्ट होणार आहे.

### भगवान महावीर जयंती उत्सवाचे आयोजन

**अकोला** : जैन धर्माचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीर यांचा जयंती महोत्सव ३० मार्च २०२६ रोजी स्थानिक सैतवाळ दिगंबर जैन मंदिर (किल्लाजवळ) येथे उत्साहात साजरा होणार आहे. यानिमित्त सकाळी ७:३० वाजता गांधी जवाहर बागेतील महावीर स्तंभाचे पूजन व प्रभावना वितरण होईल. सकाळी ९ वाजता मंदिरात जन्मोत्सव, पाळणा आणि अंगाई गीताचा कार्यक्रम महिला मंडळाद्वारे पार पडेल. त्यानंतर १० वाजता १०८ कलशांनी अभिषेक व महाआरती होईल. सायंकाळी ५ वाजता जुन्या शहरातील सेनगण जैन मंदिरापासून भव्य शोभायात्रेला प्रारंभ होऊन गांधी चौकमार्गे सैतवाळ मंदिरात समारोप होईल. या महोत्सवास उपस्थित राहण्याचे आवाहन अध्यक्ष रवींद्र उन्होने व कार्यकारिणीने केले आहे.



# कांदा उत्पादक शेतकरी संकटात; कोसळलेल्या भावाने कंबरडे मोडले

## उत्पादन खर्चही निघेना; अकोट तालुक्यातील उमरा परिसरात शेतकरी हवालदिल

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**उमरा, दि. २८** : अकोट तालुक्यातील उमरा सर्कल परिसरात यंदा कांद्याचे उत्पादन भरघोस झाले असले तरी, बाजारपेठेत मिळणाऱ्या अत्यल्प दरामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. घाम गाळून पिकवलेल्या कांद्याला उत्पादन खर्चाच्या तुलनेत मातीमोल भाव मिळत असल्याने, शासनाने या प्रकरणी तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी जोर धरत आहे.



अनुकूल हवामानामुळे सुरुवातीला पिकाची वाढ चांगली झाली होती. मात्र, आता काढणीच्या ऐन टप्प्यावर बाजारभावात मोठी घसरण झाली आहे. त्यातच बदलत्या हवामानामुळे कांद्यावर करपा, मावा आणि मानमोडी यांसारख्या रोगांचा प्रादुर्भाव वाढला आहे. या रोगांच्या नियंत्रणासाठी शेतकऱ्यांना महागड्या औषधांची फवारणी करावी लागत असून, औषधांचा खर्च आणि मजुरी पाहता वाहतुकीचा खर्च निघणेही कठीण झाले आहे.

आर्थिक टंचाईमुळे अनेक शेतकऱ्यांना पिकावर आवश्यक उपाययोजना करणे अशक्य झाले आहे. या पार्श्वभूमीवर, कांद्याला योग्य हमीभाव जाहीर करावा, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी आणि पीकविमा योजनेचा लाभ मिळवून द्यावा, अशी मागणी उमरा परिसरातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांकडून केली जात आहे. शासनाने वेळीच दखल न घेतल्यास आगामी काळात कांदा उत्पादनावर याचे गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे.

# पिंप्री जैनपुरात श्रीराम नवमी उत्सवाचा जल्लोष

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अकोट, दि. २८** : तालुक्यातील पिंप्री जैनपुर येथील ग्रामदैवत आणि गावाचे वैभव असलेल्या श्रीराम नवमी उत्सवाचा सोहळा दिवाळीप्रमाणेच मोठ्या उत्साहात आणि पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर बसलेल्या तीर्थापासून सुरू झालेल्या या उत्सवाची सांगता भव्य शोभायात्रा आणि दहिहंडीने झाली.

श्रीराम नवमीच्या दिवशी प्रभू रामचंद्रांचा जन्मोत्सव भक्तीमय वातावरणात साजरा झाला. या उत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे वर्षानुवर्षे चालत आलेली पारंपरिक सोंगांची परंपरा. पारंपरिक पोशाख आणि मुखवटे परिधान करून गावातील पुरुष व युवकांनी रात्रभर मनोरंजनाचे कार्यक्रम सादर केले. हे पाहण्यासाठी महिला, पुरुष आणि तरुण मंडळींनी मोठी गर्दी केली होती. उत्सवाच्या दुसऱ्या दिवशी भव्य शोभायात्रा काढण्यात आली. यामध्ये सजवलेली पालखी, दमनीमध्ये बसलेले राधा-कृष्ण, विविध पौराणिक देखावे, झांज पथक आणि ढोल-भजनी मंडळांनी नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. जय श्रीराम आणि जय हनुमानच्या जयघोषाने संपूर्ण पिंप्री जैनपुर नगरी दुमदुमून गेली होती. मिरवणुकीदरम्यान भाविकांसाठी चणा-पोहे आणि सरबताचे वाटप करण्यात आले. गुढीपाडव्यापासून ते दहिहंडीपर्यंत सलग नऊ दिवस भव्य भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये परिसरातील पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. उत्सवात सहभागी झालेल्या सर्व भजनी मंडळांचा शाल, श्रीफळ आणि मानधन देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. हा सोहळा मारोती महाराज संस्थान, गावातील महिला-पुरुष मंडळी आणि तरुण कार्यकर्त्यांच्या विशेष सहकार्याने यशस्वी झाला.


# इंग्रजी चिंचेला मागणी; नागरिक सुखावले

## उन्हाळ्यात वाढला गोड चिंचेचा गोडवा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**उमरा, दि. २८** : उन्हाळ्याची चाहूल लागताच बाजारपेठेत विविध हंगामी फळांची आवक वाढली असून, यंदा विशेषतः इंग्रजी चिंच (गोड चिंच) खरेदीसाठी नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. आंबट चिंचेपेक्षा कमी आंबट आणि अधिक गोड चव असल्यामुळे या चिंचेची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. स्थानिक बाजारपेठेत सध्या विक्रेत्यांची संख्या वाढली असून, ग्राहकही मोठ्या उत्साहाने या फळाची खरेदी करताना दिसत आहेत.

विशेषतः लहान मुले आणि तरुणांमध्ये ही चिंच अधिक लोकप्रिय असून, थेट खाण्यासाठी तिला पहिली पसंद दिली जाते.



आरोग्यदृष्ट्या देखील इंग्रजी चिंच फायदेशीर मानली जाते. यामध्ये नैसर्गिक शर्करा, लोह (आयर्न) आणि विविध जीवनसत्त्वे असल्यामुळे शरीराला ऊर्जा मिळते. तसेच ही चिंच पचनक्रिया सुधारण्यास मदत करते आणि उन्हाळ्याच्या तीव्र झळांपासून काही प्रमाणात दिलासा देते. यामुळेच आहारतज्ज्ञ देखील मर्यादित प्रमाणात याचा आहारात समावेश करण्याचा सल्ला देतात.

दरम्यान, अनेक ठिकाणी या चिंचेपासून थंडगार सरबत आणि विविध गोड पदार्थ तयार करून विक्री केली जात आहे. यामुळे स्थानिक लघुव्यापाऱ्यांना आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळत आहे. विक्रेत्यांच्या मते, वाढत्या उष्म्यासोबतच पुढील काही आठवड्यांत या चिंचेची मागणी आणि भाव आणखी वाढण्याची दाट शक्यता आहे. चव आणि आरोग्य अशा दोन्ही दृष्टीने फायदेशीर ठरणारी इंग्रजी चिंच सध्या बाजाराचे मुख्य आकर्षण ठरत आहे.

### आरोग्यासाठी अत्यंत गुणकारी

इंग्रजी चिंचेमध्ये व्हिटॅमिन-सी आणि अँटी-ऑक्सिडंट्स मुबलक प्रमाणात असतात. ही चिंच केवळ पचनच सुधारत नाही, तर रक्तातील हिमोग्लोबिन वाढवण्यासही मदत करते. उन्हाळ्यात शरीरातील पाण्याचे प्रमाण संतुलित ठेवण्यासाठी या फळाचे सेवन फायदेशीर ठरते.


**श्री जयाजी महाराज यात्रा** | मूर्ती नसलेले अनोखे ग्रामदैवत

# पाच बैलगाड्या ओढून भक्तांची भक्तीची कसोटी!

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मुर्तिजापूर, दि. २८** : ालुक्यातील हिरपूर येथे श्री संत जयाजी महाराजांचा वार्षिक यात्रा महोत्सव ३० एप्रिल २०२६ रोजी मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. शेकडो वर्षांची परंपरा लाभलेल्या या उत्सवात गाडपगार ही प्रथा भाविकांच्या आकर्षणाचे केंद्र असते.

मनोकामना पूर्ण करण्यासाठी भाविक सात दिवस केवळ दुधावर उपवास करतात. यात्रेच्या दिवशी पाच बैलगाड्या, ज्यात साधारण १०० ते १५० लोक बसलेले असतात, त्या एकाच वेळी कमरेला आकडा लावून ओढण्याची चित्तथरारक परंपरा येथे जोपासली जाते. यालाच स्थानिक भाषेत गाडपगार म्हटले जाते. बलंग घराण्यात जन्मलेल्या जयाजी महाराजांची महादेवावर नितांत श्रद्धा होती. शिखर शिंगणापूरची पायी वारी करणाऱ्या महाराजांच्या भक्तीचा वारसा आजही त्यांचे भक्त जपून आहेत.



चैत्र शुद्ध द्वादशीला होणाऱ्या या उत्सवासाठी गावातील सासुरवाशीण मुली आवर्जून माहेरी येतात. या दिवशी गावातील प्रत्येक घरात महाप्रसाद म्हणून रोडगे बनवण्याची प्रथा आहे. दौलतराव उंबरकर आणि त्यांच्या पूर्वजांनी सुरू केलेली ही भक्तीची परंपरा आजही संपतराव उंबरकर आणि ग्रामस्थ समर्थपणे पुढे नेत आहेत. मंदिर व्यवस्थापनाने सर्व भाविकांना या सोहळ्याचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

### मूर्ती नसलेले जागृत देवस्थान

हिरपूरच्या या देवस्थानाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे येथे श्री जयाजी महाराजांची कोणतीही मूर्ती किंवा छायाचित्र नाही. केवळ त्या पवित्र जागेचे दर्शन घेऊन भाविक नतमस्तक होतात. तसेच, पूजेवेळी तेलात भिजवलेली वात पाण्याने भरलेल्या ग्लासवर ठेवून पेटवली असता, ती रात्रभर जळत राहते, असा भाविकांचा अनुभव आहे.

# माना येथील श्रीराम जन्मोत्सवात भक्तांची मांदियाळी; सात दिवसीय रामकथेची सांगता

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मुर्तिजापूर, दि. २८** : तालुक्यातील माना येथील प्रसिद्ध श्री रामकृष्ण संस्थानमध्ये श्रीराम नवमी निमित्त आयोजित जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. १९ मार्च रोजी तीर्थस्थापना आणि गुढी उभारून सुरू झालेल्या या महोत्सवाची सांगता भव्य महाप्रसाद आणि दहीहंडीने झाली. या सोहळ्याचा लाभ परिसरातील हजारो भाविक भक्तांनी घेतला.

महोत्सवाच्या प्रारंभी प्रभू श्रीरामचंद्रांचा अभिषेक करण्यात आला. त्यानंतर रामायण वाचक राजेंद्रजी मस्के यांच्या सुमधुर वाणीतून सात दिवसीय श्रीराम कथेचे आयोजन करण्यात आले होते. त्यांनी आपल्या ओघवत्या शैलीत रामचरित्रावर प्रकाश टाकत भाविकांना मंत्रमुग्ध केले. श्रीराम नवमीच्या दिवशी सकाळी पूजन व आरती करण्यात आली. ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज बोडे यांचे कीर्तन संपन्न झाले, त्यानंतर जल्लोषात राम जन्मोत्सव साजरा झाला. यावेळी अभय रवींद्र सोळंके व सौ. आरती अभय सोळंके यांच्या हस्ते अभिषेक करण्यात आला.



जन्मोत्सवानंतर आयोजित भव्य महाप्रसादाचा लाभ पंचक्रोशीतील हजारो भक्तांनी घेतला. उत्सवाच्या दुसऱ्या दिवशी काल्याचे कीर्तन होऊन दहीहंडी फोडण्यात आली. मंदिर परिसरातील यात्रेने भाविकांचे लक्ष वेधले. या सोहळ्यादरम्यान माना पोलीस स्टेशनचे ठाणेदार व त्यांच्या सहकाऱ्यांनी चोख बंदोबस्त ठेवला.

## महत्त्वाचे

### नंदकिशोर भोयर यांना आदर्श शिक्षक पुरस्कार




**कारंजा लाड :** धुळे येथे २२ मार्च रोजी आयोजित राज्यस्तरीय सोहळ्यात कारंजा येथील शिक्षक नंदकिशोर भोयर यांना आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नैसर्गिक मानवाधिकार सुरक्षा परिषद कोरम या संस्थेच्या वतीने हा गौरव करण्यात आला. राष्ट्रीय अध्यक्ष गोरख देवरे आणि प्रदेशाध्यक्ष प्रफुल पाटील यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या प्रसंगी आमदार राम भराणे, आमदार सौ. मंजुळा गावीत आणि पोलीस उपअधीक्षक वासुदेव देसले यांची प्रमुख उपस्थिती होती. नंदकिशोर भोयर हे जि.प. शाळा सुकळी येथे विज्ञान शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी नेहरू युवा केंद्राच्या माध्यमातून सामाजिक कार्य, साक्षरता अभियान आणि २००२ मधील शिक्षणसेवक भरती प्रकरणात २८८ शिक्षकांना न्याय मिळवून देण्यासाठी मोठे योगदान दिले आहे. त्यांच्या या यशाबद्दल गटविकास अधिकारी पुनम राणे आणि गटशिक्षणाधिकारी श्रीकांत माने यांनी त्यांचे कौतुक केले आहे.

### विनयभंग करून मारहाण; पती, सासऱ्यावर गुन्हा दाखल!



**मंगरूळपीर :** विवाहित महिलेचा विनयभंग करून मारहाण आणि धमकी दिल्याप्रकरणी पती व सासऱ्याविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. तालुक्यातील एका गावातील २५ वर्षीय विवाहितेने दिलेल्या तक्रारीनुसार, २२ मार्च २०२६ रोजी रात्री ती लाखपुरी येथील घरी झोपलेली असताना तिचा पती शेतात गेला होता. यावेळी सासऱ्याने तिचा विनयभंग केला. घटनेनंतर तिने सासूला माहिती दिली असता, आजारी असल्याने तिने या प्रकरणाकडे दुर्लक्ष केले. नंतर पती घरी आल्यानंतर फिर्यादीने घडलेला प्रकार सांगितला असता, पतीने वडिलावर आरोप करते का, असे म्हणत शिवीगाळ करून मारहाण केली, तसेच कोणाला काही सांगितल्यास हात-पाय तोडून टाकीन, अशी धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. तसेच, सासऱ्याने छेडछाड करून माहेरहून पैसे आणण्याचा तगादा लावत मानसिक त्रास दिल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

# जिल्हा परिषदेचा ३०५ कोटींचा निधी बँकांमध्ये पडून

## विकासकामांना खो, प्रशासकीय वर्तुळात खळबळ

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**वाशिम, दि. २८ :** आकांक्षित जिल्हा म्हणून ओळख असलेल्या वाशीम जिल्ह्याच्या ग्रामीण भागात आजही मूलभूत सुविधांचा वानवा आहे. रस्ते, पाणी आणि आरोग्याच्या प्रश्नांनी जनता होरपळत असताना, जिल्हा परिषद प्रशासनाने मात्र चक्क ३०५ कोटी ७० लाख रुपयांचा विकास निधी नियमबाह्यरीत्या बँकांमध्ये मुदत ठेवींच्या स्वरूपात अडकवून ठेवल्याचा खळबळजनक आरोप आम आदमी पार्टीचे नेते राम पाटील डोरले यांनी केला आहे. या गंभीर प्रकरणाने जिल्ह्याच्या राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली असून, या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

राम पाटील डोरले यांनी पुराव्यांसह दिलेल्या माहितीनुसार, सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात जिल्हा परिषदेकडे विविध योजनांचा मिळून कोट्यवधींचा निधी उपलब्ध होता. यामध्ये प्रामुख्याने जिल्हा निधी १६५.८५ कोटी, अभिकरण निधी ३२ कोटी, उपकर निधी ६८ कोटी, ईएफटी निधी १७ कोटी, अल्पसंख्याक विकास निधी ४.२० कोटी, देखभाल-दुरुस्ती निधी ६ कोटी, आरटीजीएस निधी ५.५० कोटी, घरभाडे निधी १५ लाख आणि बयाणा रक्कम ६ कोटी रुपयांचा समावेश आहे. ही सर्व रक्कम एकत्रित केल्यास ३०५ कोटी ७० लाख रुपये होते.

वास्तविक, हा निधी ग्रामीण भागातील विकासकामे मार्गी लावण्यासाठी तातडीने खर्च होणे अपेक्षित होते. मात्र, प्रशासनाने शासनाच्या वित्तीय नियमांना हरताळ फासत ही प्रचंड मोठी रक्कम अत्यंत कमी व्याजदराने विविध बँकांमध्ये मुदत ठेव म्हणून ठेवली. विशेष म्हणजे, ज्या रकमा तातडीने खर्च करणे किंवा परत करणे कायदेशीररीत्या बंधनकारक असते, अशा रकमांचाही यात समावेश असल्याने प्रशासनाच्या हेतूवर शंका उपस्थित केली जात आहे.

या प्रकरणातील सर्वात गंभीर बाब म्हणजे, आरटीजीएस आणि ईएफटी सारख्या तातडीच्या व्यवहारांसाठी असलेल्या निधीचा वापर मुदत ठेवींसाठी करण्यात आला आहे. तसेच कंत्राटदारांची बयाणा रक्कम जी कामाच्या आवश्यकतेनुसार कधीही परत करावी लागते, ती देखील बँकांमध्ये अडकवण्यात आली आहे. यामुळे केवळ आर्थिक जोखीम निर्माण झाली नाही, तर आकांक्षित जिल्हा कार्यक्रमाच्या मूळ उद्देशालाच तडा गेला आहे. कमी व्याजदरामुळे शासनाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाल्याचा दावाही डोरले यांनी केला आहे.

दोषी अधिकाऱ्यांवर शिस्तभंग आणि फौजदारी कारवाई करावी, तसेच या प्रकरणाचे विशेष लेखापरीक्षण करावे, अशी मागणी आता आक्रमकपणे केली जात आहे.

### पत्राची दप्तरदिरंगाई की जाणीवपूर्वक लपवाछपवी

या प्रकरणातील धक्कादायक वळण म्हणजे, या गैरप्रकाराबाबत राम पाटील डोरले यांनी ६ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रशासनाला लेखी पत्र दिले होते. मात्र, महिना उलटूनही त्यावर कोणतीही कारवाई झाली नाही. जेव्हा २५ मार्च रोजी त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांशी थेट चर्चा केली, तेव्हा त्यांना सांगण्यात आले की, 'असे कोणतेही पत्र माझ्यापर्यंत पोहोचलेले नाही'. वित्त विभागाने हे पत्र मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांपासून जाणीवपूर्वक लपवून ठेवले का? असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.

## दीड कोटींच्या घोटाळ्यातील 'जनसंघर्ष'चे साहित्य जप्त

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मानोरा, दि. २८ :** गेल्या अनेक दिवसांपासून कुलूपबंद असलेल्या मानोरा येथील वादग्रस्त जनसंघर्ष अर्बन निधी शाखेतील फर्निचर, लॅपटॉप आणि अन्य तांत्रिक साहित्य २८ मार्च रोजी पोलिसांनी न्यायालयाच्या आदेशानुसार ताब्यात घेतले. पांढरकवडा उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाचे उपनिरीक्षक राजेश लाखकर यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली.

मानोरा शहरात जनसंघर्ष अर्बन निधी शाखेच्या माध्यमातून मुख्य सूत्रधार प्रणित मोरे याने खातेदारांना जादा व्याजाचे प्रलोभन दाखवून तब्बल १ कोटी ५३ लाख रुपयांच्या ठेवी जमा केल्या होत्या. मात्र, अचानक ही शाखा बंद पडल्याने सर्वसामान्यांची हक्काची पुंजी अडकली आणि मोठी खळबळ उडाली. या प्रकरणी दिग्रस पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर, यवतमाळ गुन्हे शाखेच्या पथकाने २७ डिसेंबर रोजी या बँकेला सील ठोकले होते. या घोटाळ्यातील मुख्य आरोपी सध्या कारागृहात आहेत.

ठेवीदार आपली जमापुंजी परत मिळवण्यासाठी न्यायालयीन लढा लढत असतानाच, शनिवारी न्यायालयाच्या आदेशाने बँकेतील सर्व साहित्य जप्त करण्यात आले. यामध्ये फर्निचर, संगणक प्रणाली (पीसी), लॅपटॉप आणि अन्य उपकरणांचा समावेश आहे. पांढरकवडा येथील रायटर रवी शिहे, महेश नाईक आणि दिग्रसचे पोलीस उपनिरीक्षक राजेश लाखकर यांनी ही प्रक्रिया पार पाडली. या कारवाईच्या वेळी शाखेचे व्यवस्थापक कृष्णा रणखांब, कर्मचारी गौतम बरडे, अजिंक्य इंगोले, प्रतीक काडदाते, पिग्मी प्रतिनिधी गिरीश तापडिया आणि इमारत मालक स्वप्नील ठाकरे उपस्थित होते. या जप्तीमुळे आता या घोटाळ्याच्या तपासाला नवीन वळण मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## मतदार पुनरीक्षण प्रक्रियेत हलगर्जी करणाऱ्या बीएलओवर होणार फौजदारी कारवाई!

### एमआयएमचे तहसीलदारांना निवेदन; अन्याय न करण्याचे आश्वासन

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**कारंजा लाड, दि. २८ :** मतदार यादीच्या विशेष पुनरावलोकन (एसआर) प्रक्रियेत कोणत्याही पात्र नागरिकावर अन्याय होऊ नये, या मागणीसाठी ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन (एमआयएम) पक्षाच्या वतीने २८ मार्च रोजी तहसील प्रशासनाला धडक निवेदन देण्यात आले. यावेळी प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेत, कामात कुचराई करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर थेट एफआयआर नोंदवण्याचा इशारा दिला आहे.

एमआयएमचे प्रदेश उपाध्यक्ष मो. युसूफ पुंजानी यांच्या मार्गदर्शनाखाली नगर परिषदेचे उपाध्यक्ष ॲड. फिरोज शेकुवाले, विविध सभापती आणि नगरसेवकांच्या शिष्टमंडळाने नायब तहसीलदार लक्ष्मण बनसोडे व नायब तहसीलदार विनोद हरणे यांची भेट घेऊन चर्चा केली.

चर्चेदरम्यान नायब तहसीलदार बनसोडे यांनी स्पष्ट केले की, पुनरावलोकन प्रक्रियेत पूर्ण पारदर्शकता ठेवली जाईल. जर एखादा मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) योग्यरीत्या काम करत नसल्याचे किंवा हलगर्जीपणा करत असल्याचे आढळल्यास, त्याच्यावर तात्काळ कायदेशीर कारवाई करून प्रथम माहिती अहवाल (एफआयआर) नोंदवण्यात येईल. प्रशासनाच्या या कडक पवित्र्यामुळे मतदार नोंदणी प्रक्रियेला गती मिळण्याची शक्यता आहे.

यावेळी नायब तहसीलदार हरणे यांनी उपस्थितांना दिव्यांगांचे प्रमाणपत्र, स्मार्ट ओळखपत्र आणि केवायसी (आपल्या ग्राहकाची ओळख पडताळणी) प्रक्रियेबाबत सविस्तर माहिती देऊन मार्गदर्शन केले. प्रशासनाच्या या आश्वासक भूमिकेमुळे नागरिकांच्या हिताचे रक्षण होईल, असा विश्वास एमआयएमच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

या निवेदनावेळी शिक्षण सभापती जाकीर शेख, आरोग्य सभापती अनिस खान, नियोजन सभापती नदीम अहमद, ॲड. सुभान खेतीवाले, इरफान खान, नगरसेवक इमरान पारेख, इर्शाद पहिलवान, अब्दुल एजाज, युनुस पहलवान, नगरसेवक सलमान विराणी, ॲड. मिलिंद खंडारे, मुन्ना ठेकेदार, अमन शाह, रमजान पप्पूवाले, रहमत ठेकेदार, अब्दुल नईम यांच्यासह पक्षाचे अनेक लोकप्रतिनिधी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गर्भाशय मुखाच्या कर्करोगाला रोखण्यासाठी लसीकरण काळाची गरज!

### इंझोरी येथील मुंगसाजी महाराज विद्यालयात विद्यार्थिनींना मार्गदर्शन

अजिंक्य भारत । प्रतिनिधी




**इंझोरी, दि. २८ :** महिलांमध्ये वाढता गर्भाशय मुखाचा कर्करोग रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक लसीकरण हाच प्रभावी उपाय आहे. या लसीकरणाबाबत समाजात कोणतेही गैरसमज न ठेवता, पात्र विद्यार्थिनींनी उत्स्फूर्तपणे पुढे यावे, असे आवाहन प्राथमिक आरोग्य केंद्र कूपटा येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. रवींद्र ठाकूर यांनी केले.

स्थानिक मुंगसाजी महाराज विद्यालयामध्ये २८ मार्च रोजी आयोजित विशेष मार्गदर्शन सभेत ते बोलत होते. वाशिमचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. ठोंबरे, मानोरा तालुका आरोग्य अधिकारी तथा जिल्हा माता-बाल संगोपन अधिकारी डॉ. चापे यांच्या मार्गदर्शनाखाली या सभेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी डॉ. ठाकूर यांनी विद्यार्थिनींना गर्भाशय मुखाच्या कर्करोगाची लक्षणे आणि त्यावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून 'एचपीव्ही' लसीचे महत्त्व सविस्तरपणे समजावून सांगितले. ''ही लस पूर्णपणे सुरक्षित असून, भविष्यातील गंभीर आजारांपासून संरक्षण देणारी आहे. त्यामुळे कोणत्याही अपप्रचाराला किंवा अफवांना बळी न पडता पात्र लाभार्थ्यांनी लसीकरण करून घ्यावे,'' असे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

या सभेच्या यशस्वीतेसाठी आरोग्य निरीक्षक श्रीरंग कानडे, आरोग्य सहाय्यिका सविता पवार, आरोग्य सेवक गणेश घोटकर तसेच आशा सेविका सुनिता राठोड, संगीता विरयकार, सोनू डवरे आणि पुष्पा वानखडे यांनी परिश्रम घेतले. शाळेचे प्राचार्य संतोष कुटे व शिक्षक वृंदाने या जनजागृती मोहिमेसाठी विशेष सहकार्य केले.

## भक्तीसोबतच जपली सामाजिक बांधिलकी; ५०० महिलांना साडी वाटप!

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**मानोरा, दि. २८ :** जगदंबा माता आणि संत सेवालाल महाराज यांची पावन भूमी असलेल्या श्रीक्षेत्र पोहरादेवी येथे भक्तीचा जागर सुरू असतानाच, सामाजिक सेवेचा एक नवा आदर्श घालून देण्यात आला आहे. रामनवमी उत्सवाचे औचित्य साधून तपस्वी संत डॉ. रामराव महाराज समाधी स्थळाचे मुख्य पुजारी शेखर महाराज यांच्या हस्ते ५०० गरजू महिलांना साडी वाटप करून सामाजिक बांधिलकी जपण्यात आली. २७ मार्च रोजी पार पडलेल्या या सोहळ्याने भाविकांची मने जिंकली आहेत.

पोहरादेवी येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही रामनवमीनिमित्त भव्य यात्रा भरली होती. २३ मार्च ते २७ मार्च या कालावधीत पार पडलेल्या या यात्रेत देशभरातून सुमारे ३ ते ४ लाख भाविकांनी माथा टेकवला. समाधी स्थळावर येणाऱ्या भाविकांना उन्हाचा त्रास होऊ नये, यासाठी भव्य मंडप, थंड पिण्याचे पाणी आणि महाप्रसादाची चोख व्यवस्था करण्यात आली होती. या सर्व नियोजनात मंदिर प्रशासनाने भाविकांच्या सोयीला सर्वोच्च प्राधान्य दिले.

मुख्य यात्रा महोत्सव २६ मार्च रोजी उत्साहात पार पडल्यानंतर, दुसऱ्याच दिवशी म्हणजेच २७ मार्चला साडी वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी महंत संजय महाराज, महंत जोगेंद्र महाराज आणि सुभाष महाराज यांची प्रमुख उपस्थिती होती. ''भक्तीसोबतच दीन-दलितांची सेवा आणि महिलांचा सन्मान करणे हीच खरी संतांची शिकवण आहे,'' असे प्रतिपादन यावेळी मान्यवरांनी केले.

**वन्यजीवांची तृष्णा** | **रखरखत्या उन्हात माणुसकीचा ओलावा**

# वनोजाच्या जंगलात श्रमदानातून साकारले कृत्रिम पाणवटे

। श्याम अपूर्वा ।




**शेलूबाजार, दि. २८ :** उन्हाचा पारा चाळिशी पार गेल्याने निसर्ग होरपळून निघाला आहे. नद्या, नाले आणि पाण्याचे नैसर्गिक स्रोत आटल्याने वनोजा येथील प्रादेशिक जंगलातील वन्यप्राणी पाण्यासाठी कासावीस होत आहेत. अशा कठीण प्रसंगी, केवळ शासकीय मदतीची वाट न पाहता, सामाजिक कार्यकर्ते आदित्य इंगोले आणि त्यांच्या मित्रमंडळींनी लोकसहभागातून वनोजाच्या विस्तीर्ण जंगलात कृत्रिम पाणवटे कार्यान्वित केले आहेत. या संवेदनशील उपक्रमामुळे रखरखत्या उन्हात व्याकुळ झालेल्या मूक प्राण्यांना मोठा आधार मिळाला आहे.

वनोजाचे जंगल अत्यंत खडतर आणि दुर्गम भागात आहे. उन्हाळ्यामुळे हे जंगल सध्या ओसाड पडले असून, दूरवर पाण्याचा थेंबही दिसत नाही. अशा परिस्थितीत जंगलाच्या खोल भागात असलेल्या पाणवठ्यांची दुरुस्ती करणे मोठे आव्हान होते. मात्र, आदित्य इंगोले आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी हे आव्हान स्वीकारले. उन्हाची तमा न बाळगता या तरुणांनी चक्क आपल्या डोक्यावरून रेती, विटा, सिमेंट आणि पाणी वाहून नेले. दुर्गम भागात वाहने जात नसल्याने पायी चालत जाऊन श्रमदानातून हे पाणवटे बांधले आणि जुन्यांची स्वच्छता केली. त्यांच्या या जिद्दीमुळे आज जंगलात ठिकठिकाणी वन्यजीवांसाठी पाणी साठा उपलब्ध झाला आहे.

केवळ पाणवटे बांधून हे तरुण थांबले नाहीत, तर त्यामध्ये नियमित पाणी राहील याचीही दक्षता घेतली जात आहे. वन विभागाच्या सहकार्याने आणि खासगी टँकरच्या माध्यमातून या पाणवठ्यांमध्ये पाणी सोडले जाते. जेव्हा हे कासावीस झालेले वन्यप्राणी या पाणवठ्यावर आपली तहान भागवतात, तेव्हा ते दृश्य पाहून श्रम करणाऱ्या तरुणांच्या डोळ्यांत समाधान तरळते. हे केवळ पाणी देण्याचे काम नसून, एका अर्थाने वन्यजीवांचे प्राण वाचविण्याचे पवित्र कार्य आहे, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

मानवाच्या अतिक्रमणामुळे आधीच संकटात असलेल्या वन्यजीवांना या तरुणांच्या रुपाने जणू देवदूतच भेटले आहेत.

### वन्यजीव प्रेमींच्या कार्याचे सर्वत्र कौतुक

आदित्य इंगोले यांची ही संकल्पना आणि त्यांच्या टीमचे हे सातत्यपूर्ण कार्य परिसरासाठी प्रेरणादायी ठरत आहे. जंगलातील जैवविविधता टिकवून ठेवण्यासाठी आणि उन्हाळ्यात होणारे वन्यप्राण्यांचे स्थलांतर रोखण्यासाठी हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. निसर्ग आणि वन्यप्राण्यांप्रती असलेल्या या ओढीमुळे आदित्य इंगोले आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे वन अधिकारी, पर्यावरण प्रेमी आणि ग्रामस्थांकडून भरभरून कौतुक होत आहे.

## गोगरी येथे श्रीराम जन्मोत्सव उत्साहात



**शेलुबाजार:** जवळच असलेल्या गोगरी येथे चैत्र शुक्ल नवमीनिमित्त श्रीराम जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. दुपारी १२ वाजता प्रभू श्रीरामांचा जन्मोत्सव साजरा करण्याची परंपरा असून, गोगरी येथील श्रीराम मंदिरात या निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

दिनांक २६ मार्च २०२६ रोजी आयोजित या सोहळ्यात धोंडोपंत शिंदे महाराज यांच्या हस्ते श्रीराम जन्माचे आख्यान वाचण्यात आले. या प्रसंगी मंदिरात होम-हवन आणि विशेष पूजेचे विधी पार पडले. तसेच भाविकांमार्फत संपूर्ण रामायण पठण आणि पारायण देखील करण्यात आले. या धार्मिक अनुष्ठानाने संपूर्ण वातावरणात भक्तीमय चैतन्य निर्माण झाले होते. या जन्मोत्सवासाठी गोगरी परिसरातील नागरिक आणि भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. दुपारी जन्मोत्सवानंतर फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. उपस्थित बालकांना चॉकलेट व बिस्किटांचे वाटप करून आनंद व्यक्त करण्यात आला. शेवटी सर्व भाविकांसाठी भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. अशा प्रकारे अत्यंत साध्या आणि शिस्तबद्ध पद्धतीने हा सोहळा संपन्न झाला.

महत्त्वाचे

## प्रशांत शिरसाट यांना आचार्य पदवी प्रदान



**मूर्तिजापूर** : अकोला येथील श्रीमती एल.आर.टी. वाणिज्य महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. प्रशांत शामराव शिरसाट यांना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने आचार्य (पी.एच.डी.) पदवी प्रदान केली आहे. त्यांनी ''महाराष्ट्र राज्यातील नॅक प्रक्रियेत महाविद्यालयीन ग्रंथपालाची भूमिका'' या विषयावर आपला शोधप्रबंध सादर केला होता.
प्राचार्य डॉ. के. ओ. मांडगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी यवतमाळ येथील आबासाहेब पारवेकर महाविद्यालय संशोधन केंद्रातून हे कार्य पूर्ण केले. त्यांच्या या यशाबद्दल प्राचार्य डॉ. उदय नावलेकर, डॉ. संजय तामगाडगे, डॉ. जगदीश कुलकर्णी, डॉ. संजय शेनमारे, डॉ. संदीप सत्तुरवार, डॉ. सुरेश फुलकर, डॉ. विवेक जगताप तसेच सहकारी डॉ. अनिल तीरकर, डॉ. महेश डाबरे, डॉ. दिपिका बियाणी व डॉ. आशालता रमण यांनी त्यांचे अभिनंदन केले. प्रा. शिरसाट यांनी आपल्या यशाचे श्रेय आई निर्मला, पत्नी सुजाता शिरसाट व गुरुजनांना दिले आहे.

## शिवाजी महाविद्यालयात अर्थशास्त्र विषयावर मार्गदर्शन संपन्न



**अकोट** : येथील श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात अर्थशास्त्र विभागाच्या वतीने स्पर्धा परीक्षा आणि अर्थशास्त्राचे महत्त्व या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान पार पडले. स्पर्धा परीक्षांच्या केंद्रस्थानी अर्थशास्त्र हा विषय असून, बँकिंग, बजेट आणि सरकारी योजनांचे सखोल ज्ञान आत्मसात केल्यास विद्यार्थ्यांना प्रशासकीय सेवांत यश मिळवणे सोपे जाते, असे प्रतिपादन प्रमुख मार्गदर्शक प्रा. राजकुमार मेश्राम यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुनील पांडे होते. प्रमुख उपस्थिती म्हणून मानवविज्ञान शाखा प्रमुख प्रा. डॉ. अशोक इंगळे व प्रभारी सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. डॉ. संतोष कायंदे उपस्थित होते. प्राचार्य डॉ. पांडे यांनी विद्यार्थ्यांना केवळ पदवीधर न होता स्पर्धा परीक्षेसाठी सज्ज होण्याचे आवाहन केले. प्रा. डॉ. अशोक इंगळे यांनी अभ्यासाच्या नियोजनावर प्रकाश टाकला. प्रास्ताविक विभाग प्रमुख प्रा. डॉ. एम. के. नन्नावरे यांनी केले. सूत्रसंचालन कु. नेहा राऊत हिने, तर आभार प्रा. अमोल बोचे यांनी मानले.

## निसर्ग संवर्धन ही काळाची गरज – डॉ. सुनील लहाने

**अकोला**: निसर्गातील जैवविविधता टिकवण्यासाठी प्राणी आणि पर्यावरणाचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाणे यांनी केले. स्थानिक नेहरू पार्क येथे शिवतेज प्रतिष्ठानतर्फे आयोजित पक्ष्यांसाठी पाणीपात्र व धान्य वाटप कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी आयुष मंत्रालयामार्फत योग व नॅचरोपॅथीसाठी निवड झाल्याबद्दल योगगुरू मनोहर इंगळे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बाळासाहेब काळे यांनी केले, तर ॲड. अनंत खेडकर यांनी निसर्ग संगोपनावर मार्गदर्शन केले. याप्रसंगी बी. एस. देशमुख, उत्तम डुकरे, नारायणराव गावंडे, गणेशराव देशमुख यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन डॉ. गोविंद जाधव यांनी केले, तर आभार ॲड. वामन चौधरी यांनी मानले.

# समृद्धीवर यंत्रणेच्या हलगर्जीने घेतला चालकाचा बळी!

## क्रेनमध्ये डिझेल नसल्याचे धक्कादायक कारण

अजिंक्य भारत । प्रतिनिधी




**कारंजा (लाड), दि. २८** : समृद्धी महामार्गावरील मुंबई कॉर्नरजवळ (लोकेशन १९७) २८ मार्च रोजी पहाटे ५ वाजेच्या सुमारास उभ्या असलेल्या ट्रकला पाठीमागून येणाऱ्या ट्रकने जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात फुलचंद यादव (३९, रा. आजमगड, उत्तर प्रदेश) या चालकाचा जागीच मृत्यू झाला, तर अरविंद यादव (२९) हे गंभीर जखमी झाले. रात्री २ वाजेपासून मदतीसाठी महामार्ग हेल्पलाईनला वारंवार फोन करूनही प्रशासन वेळेवर न पोहोचल्याने आणि जखमीला बाहेर काढण्यासाठी आलेल्या क्रेनमध्ये डिझेल नसल्याच्या संतापजनक प्रकारामुळे हा जीव गेल्याचा आरोप प्रत्यक्षदर्शींनी केला आहे.

प्राप्त माहितीनुसार, २८ मार्च रोजी रात्री २ वाजेच्या सुमारास नागपूरहून मुंबईकडे जाणारा ट्रक डिझेल पाईप फुटल्यामुळे १०० किमी वेगाच्या लेनमध्येच बंद पडला. ट्रक चालकाने तत्काळ समृद्धी महामार्ग हेल्पलाईनवर संपर्क साधून मदत मागितली आणि अपघाताची शक्यता टाळण्यासाठी बॅरिकेट लावण्याची विनंती केली. मात्र, पहाटेपर्यंत कोणतीही शासकीय मदत घटनास्थळी पोहोचली नाही. दरम्यान, स्वतः चालकाने पुढे जाऊन इतर वाहनांना हाताने इशारे देत अपघात टाळण्याचा प्रयत्न केला, ज्यामुळे रात्री काही मोठे अपघात टळले.मात्र, पहाटे ५ वाजताच्या सुमारास कोलकाताहून मुंबईकडे जाणाऱ्या एका दुसऱ्या ट्रकने या उभ्या असलेल्या ट्रकला पाठीमागून भीषण धडक दिली. धडक इतकी जोरात होती की चालक केबिनमध्येच अडकून गंभीर जखमी झाला. घटनास्थळी उपस्थित असलेल्या इतरांनी पुन्हा हेल्पलाईनवर संपर्क साधला, तरीही बचाव पथक पोहोचण्यास विलंब झाला. अखेर कारंजा ग्रामीण पोलीस आणि १०८ रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाली. केबिनमध्ये अडकलेल्या जखमीला बाहेर काढण्यासाठी क्रेनची तातडीची गरज असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

परंतु, संबंधित ठेकेदाराच्या क्रेनमध्ये डिझेल नसल्याचे धक्कादायक कारण पुढे आल्याने बचावकार्यात मोठा अडथळा निर्माण झाला. क्रेन वेळेत आली असती तर चालकाचे प्राण वाचू शकले असते, अशी संतप्त प्रतिक्रिया प्रत्यक्षदर्शींनी दिली आहे. समृद्धी महामार्गावर नादुरुस्त वाहने वेगाच्या लेनमध्ये उभी असताना वेळेत बॅरिकेट न लावल्यामुळे अपघातांची मालिका सुरू असून, दोषी ठेकेदारावर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे. कारंजा ग्रामीण पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत.

## रामपीर नगराचा २० वर्षांचा पाणीप्रश्न सुटणार; मुख्य जलवाहिनीची जोडणी पूर्ण!



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. २८** : शहरातील रामपीर नगर भागातील नागरिकांना गेल्या दोन दशकांपासून भेडसावणारी पिण्याच्या पाण्याची भीषण समस्या अखेर सुटण्याच्या मार्गावर आहे. अनेक वर्षांपासून लोकप्रतिनिधींनी केवळ आश्वासने दिली, मात्र प्रत्यक्ष कृती शून्य असल्याने ही समस्या जैसे थे होती. नवनिर्वाचित नगरसेविका प्रिया अश्विन शिरसाट यांनी पुढाकार घेतल्याने या भागातील पाणीप्रश्नाला आता खऱ्या अर्थाने गती मिळाली आहे.
रामपीर नगरमध्ये पाईपलाईन असूनही पाणी का येत नाही, याची नगरसेविका प्रिया शिरसाट यांनी सखोल तांत्रिक माहिती घेतली. त्यानंतर महापालिका आयुक्तांशी चर्चा करून या भागात पाईपलाईनच्या खोलीकरणाचे काम तातडीने हाती घेतले. २७ मार्च रोजी गुलजारपुरा येथून आलेल्या मुख्य जलवाहिनीला रामपीर नगरची पाईप लाईन जोडण्याचे महत्त्वपूर्ण काम पूर्ण करण्यात आले.

या मोहिमेत नगरसेविका प्रिया शिरसाट यांच्यासह नगरसेवक अफसर कुरेशी, नगरसेवक फजलू, नगरसेवक इलियास खान तसेच महापालिका पाणीपुरवठा विभागाचे पद्माकर गवई, मोदीराज आणि देवानंद शिरसाट यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून तांत्रिक अडथळे दूर करण्यासाठी प्रयत्न केले. मुख्य जलवाहिनीशी ही जोडणी झाल्यामुळे आता रामपीर नगरवासीयांना लवकरच नियमित पाणीपुरवठा सुरू होणार आहे. २० वर्षांचा प्रलंबित प्रश्न सुटण्याची चिन्हे दिसू लागल्याने परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

## अकोटमध्ये रामनवमीच्या मिरवणुकीत शोककळा; ढोल पथक प्रमुखाचे निधन

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अकोट, दि. २८** : अकोट शहरात मोठ्या उत्साहात सुरू असलेल्या रामनवमीच्या मिरवणुकीला शनिवारी रात्री एका अत्यंत दुर्दैवी घटनेने विषण्णता आली. मिरवणुकीत सहभागी असलेल्या खामगाव येथील वरदायिनी ढोल पथकाचे प्रमुख राहुल खरात यांना वादन सुरू असतानाच अचानक हृदयविकाराचा तीव्र झटका आला. या घटनेत त्यांचे दुःखद निधन झाले असून, अकोट आणि खामगाव परिसरात मोठी हळहळ व्यक्त होत आहे.
मिळालेल्या माहितीनुसार, बजरंग दल आणि स्थानिक कार्यकर्त्यांच्या पुढाकाराने खामगाव येथील प्रसिद्ध वरदायिनी ढोल पथकाला पाचारण करण्यात आले होते. मिरवणूक पूर्ण रंगात असताना रात्री ९ वाजेच्या सुमारास मुख्य सोनू चौकात पोहोचली. यावेळी उत्साहाने वादन सुरू असतानाच राहुल खरात यांची प्रकृती अचानक बिघडली. त्यांना तातडीने उपचारासाठी हलवण्यात आले, मात्र वाटेतच त्यांची प्राणज्योत मालवली.
मिरवणूक सोनू चौकातून संत नरसिंग महाराज मंदिर मैदानावर पोहोचल्यानंतर ही वार्ता कार्यकर्त्यांना समजली. एका तरुण सहकाऱ्याचा आणि निष्ठावान रामभक्ताचा असा अचानक मृत्यू झाल्याचे समजताच, मिरवणुकीचा पुढील सर्व उत्साह थांबवून तिचा तातडीने समारोप करण्याचा निर्णय घेण्यात आला. एका कलाकाराच्या अशा जाण्याने रामभक्तांमध्ये दुःखाचे वातावरण पसरले आहे.

## घरगुती वादातून काकाचा काटा काढला; वहिनीसह पुतण्याला बेड्या!

### वाई माना येथील खुनाचे रहस्य अवघ्या काही तासांत उलगडले; नैसर्गिक मृत्यूचा बनाव फसला

अजिंक्य भारत । प्रतिनिधी




**मूर्तिजापूर, दि. २८** : मूर्तिजापूर जवळील वाई माना येथे घरगुती वादातून एका ४७ वर्षीय व्यक्तीचा गळा आवळून खून करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी माना पोलिसांनी अवघ्या काही तासांत तपासचक्र फिरवून मृताची वहिनी आणि पुतण्याला अटक केली आहे. सुरुवातीला नैसर्गिक मृत्यूचा बनाव रचणाऱ्या आरोपींचा पोलिसी खाक्या दाखवताच निभाव लागला नाही.

पोलीस सूत्रांनुसार, मृत संजय रामकृष्ण भटकर हे २६ मार्च रोजी घरामागील कोठ्यात मृतावस्थेत आढळले होते. पुतण्या स्वप्नील भटकर याने चुलत भाऊ गोपाळ भटकर यांना फोन करून काकांचा मृत्यू झाल्याची माहिती दिली होती. रात्री जेवण करून झोपलेले काका सकाळी मृत आढळल्याचे त्याने सांगितले. या माहितीवरून पोलिसांनी सुरुवातीला मर्ग क्रमांक ८/२०२६ (कलम १९४ बीएनएस) नुसार आकस्मिक मृत्यूची नोंद केली.

ठाणेदार गणेश नावकर यांनी मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी लक्ष्मीबाई देशमुख रुग्णालय, मूर्तीजापूर येथे पाठवला. दुसऱ्या दिवशी प्राप्त झालेल्या वैद्यकीय अहवालात संजय भटकर यांचा मृत्यू गळा आवळल्याने झाल्याचे स्पष्ट झाले. या धक्क्याने पोलिसांनी तातडीने तपासाची सूत्रे हलविली.

तपासादरम्यान ठाणेदार नावकर यांना गोपनीय माहिती मिळाली की, २६ मार्च रोजी घरगुती वादातून वहिनी संगीता विनोद भटकर (४८) आणि पुतण्या स्वप्नील विनोद भटकर (२५) यांनी संजय भटकर यांना मारहाण करून त्यांचा गळा आवळला होता. संशयावरून ताब्यात घेऊन विचारपूस केली असता, पोलिसी खाक्या दाखवताच दोघांनीही गुन्हा कबूल केला.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी, स्थानिक गुन्हे शाखा अकोला यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार गणेश नावकर, पीएसआय गणेश महाजन, संदीप सरोदे, जावेद खान, मंगेश पवार आणि जयश्री मेंढे यांनी यशस्वीपणे पार पाडली.

## मुंडगावात महिलांचे आमरण उपोषण तिसऱ्या दिवशीही कायम

### अमीनपूर येथील जागेच्या वादाचा प्रश्न पेटला; सरपंच, ग्रामसेवकांकडे फिरकण्यासाठीही वेळ नाही

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**मुंडगाव, दि. २८** : अकोट तालुक्यातील मुंडगाव गट ग्रामपंचायतीसमोर अमीनपूर येथील ८ नागरिकांनी गेल्या तीन दिवसांपासून आमरण उपोषण सुरू केले आहे. हक्काच्या जागेचा ८-अ उतारा मिळवण्यासाठी सुरू असलेल्या या आंदोलनाकडे सरपंच, ग्रामसेवक आणि गटविकास अधिकाऱ्यांनी सपशेल पाठ फिरवल्याने संताप व्यक्त होत आहे.
अमीनपूर येथील शांतीदूत बुद्धविहार चॅरिटेबल ट्रस्टच्या समाजमंदिरामागील मोकळ्या जागेचा वापर अनेक वर्षांपासून सामाजिक व धार्मिक उपक्रमांसाठी केला जातो. या जागेचा रीतसर ८-अ उतारा मिळावा, यासाठी वारंवार निवेदने देऊनही ग्रामपंचायत प्रशासनाने दाद दिली नाही. उलट, त्या जागेवर त्रयस्थ व्यक्तीला बांधकाम करण्यास मूक संमती देऊन सामाजिक सलोखा धोक्यात आणल्याचा आरोप उपोषणकर्त्यांनी केला आहे.
मंगला पोहोरकर, सिंधु सोनोने, निता गवई यांच्यासह सहा महिला व दोन पुरुष २७ मार्चपासून पाण्याचा थेंबही न घेता उपोषणास बसले आहेत. प्रशासनाने वेळीच दखल न घेतल्यास नाईलाजाने आत्मदहन करावे लागेल, असा इशारा आंदोलकांनी दिला आहे. या आंदोलनाला त्रिमूर्ती प्रतिष्ठानचे अध्यक्ष शेषराव सरकटे यांनी जाहीर पाठिंबा दर्शविला असून, ग्रामपंचायत प्रशासनाच्या या मगरमठ्ठ धोरणाविरोधात तालुक्यात तीव्र पडसाद उमटत आहेत.

## देवाची देवरी सज्ज! पंचमुखी महादेव यात्रा महोत्सवाचा उत्साह

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**रौंदळा, दि. २८** : अकोट तालुक्यातील देवाची देवरी म्हणून प्रसिद्ध असलेल्या देवरी येथे दरवर्षीप्रमाणे यावर्षीही श्री पंचमुखी महादेव यात्रा महोत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. २३ मार्चपासून सुरू झालेल्या या सोहळ्यात सध्या ह.भ.प. सुरेश महाराज जोशी यांच्या सुमधुर वाणीतून श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सुरू असून, परिसरातील भाविक भक्तीरसात न्हाऊन निघाले आहेत.
देवरी येथील पंचमुखी महादेव मंदिर हे संपूर्ण जिल्ह्यात जागृत देवस्थान म्हणून ओळखले जाते. सुमारे २५० वर्षांपूर्वी बांधलेल्या या मंदिरात महादेवाची पंचमुखी पिंड अत्यंत सुबक आणि विलोभनीय आहे. मंदिर परिसरात प्राचीन रथ असून, सध्या जुन्या भूमिगत शिवालयाचा जिर्णोद्धार प्रगतीपथावर आहे. तसेच भाविकांच्या सोयीसाठी भव्य सभागृहाचेही निर्माण करण्यात आले आहे.
देवरीची यात्रा ही नवसाची यात्रा म्हणून प्रसिद्ध असल्याने या दिवसांत गावातील लेकी-सुना माहेरी येतात. प्रत्येक घरी पाहुण्यांची मोठी वर्दळ असते. यात्रेतील लोटांगण आणि बाराचे जेवण हे मुख्य आकर्षण असते. ३१ मार्च रोजी महाप्रसादाने या उत्सवाची सांगता होणार आहे. या सर्व धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घेण्याचे आवाहन मंदिर संस्थान व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

**उत्सवाचे आकर्षण आणि नियोजित कार्यक्रम**

**२६ मार्च:** देवाधिदेव महादेवाचा विवाह सोहळा. **२९ मार्च:** लोटांगण आणि मंदिर परिक्रमा. **३० व ३१ मार्च:** भव्य यात्रा महोत्सवास प्रारंभ. **३१ मार्च:** काल्याचे कीर्तन, ढोल-ताशांच्या गजरात मिरवणूक आणि भव्य महाप्रसाद.

लग्नसराईचा धूमधडाका | नवरी-नवरदेवांसह नातेवाईकांचा उत्साह

# बाजारपेठेत खरेदीसाठी अलोट गर्दी!

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**उमरा, दि. २८** : सध्या लग्नसराईचा हंगाम जोमाने सुरू असल्याने उमरा सर्कलसह परिसरातील बाजारपेठांमध्ये मोठी तेजी पाहायला मिळत आहे. शुभविवाहाच्या तारखा जवळ आल्याने नवरी-नवरदेवांच्या खरेदीसाठी कुटुंबांची लगबग वाढली असून, बाजारपेठा ग्राहकांच्या गर्दीने फुलून गेल्या आहेत. या खरेदी उत्सवात नातेवाईकांचाही मोठा सहभाग दिसून येत असून, ग्रामीण अर्थचक्राला मोठी गती मिळाली आहे.
नवरीसाठी पैठणी, साड्या आणि लेहेंग्यांसोबतच दागिन्यांच्या खरेदीवर भर दिला जात आहे. तर नवरदेवासाठी शेरवानी, जोधपुरी सूट आणि नवनवीन फॅशनच्या कुर्ता-पायजमा यांसारख्या पोशाखांना विशेष मागणी आहे. केवळ मुख्य विवाह सोहळ्यासाठीच नव्हे, तर आता मेहंदी, हळद आणि संगीत अशा प्रत्येक कार्यक्रमासाठी स्वतंत्र आणि आकर्षक पेहराव खरेदी करण्याकडे तरुणाईचा कल वाढला आहे.
लग्नकार्यात उठून दिसण्यासाठी नातेवाईकांमध्येही जणू खरेदीची स्पर्धा लागली आहे. लहान मुलांपासून ते ज्येष्ठांपर्यंत प्रत्येकजण आपल्या आवडीनुसार नवीन ट्रेंडचे कपडे आणि अक्सेसरीज खरेदी करत आहे. स्थानिक व्यापाऱ्यांनीही लग्नसराईचा अंदाज घेऊन नवनवीन व्हरायटी उपलब्ध करून दिल्या आहेत. ग्राहकांच्या या गर्दीमुळे कापड दुकानदारांसह सराफा व्यावसायिक, पादत्राणे आणि सौंदर्य प्रसाधने विक्रेत्यांनाही चांगला व्यवसाय मिळत आहे. दोन कुटुंबांचा हा आनंद सोहळा साजरा करण्यासाठी प्रत्येकजण उत्साहाने सहभागी होत असल्याचे चित्र उमरा परिसरात दिसत आहे.

### थीम बेस्ड लग्नांचा वाढता ट्रेंड

आजकाल लग्नांमध्ये थीम बेस्ड कपड्यांची क्रेझ वाढली आहे. हळदीसाठी पिवळे, तर संगीतासाठी विशिष्ट रंगांचे कपडे परिधान करण्याकडे कल आहे. यामुळे एकाच वेळी मोठ्या प्रमाणावर कपड्यांची खरेदी होत असून, रेडिमेड कपड्यांच्या बाजारात मोठी उलाढाल होत असल्याचे व्यापारी सांगत आहेत.

## मुंडगावात श्री संत श्रीकृष्ण अवलिया महाराज यात्रा उत्सवाचा जल्लोष!

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मुंडगाव , दि. २८** : अकोट तालुक्यातील संतनगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंडगाव येथे श्री संत श्रीकृष्ण अवलिया महाराज यात्रा महोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. या निमित्ताने आयोजित भव्य महाप्रसादाचा लाभ परिसरातील हजारो भाविक भक्तांनी घेतला. रात्री उशिरापर्यंत महाप्रसाद वितरण सुरू असूनही भाविकांनी शिस्तबद्ध पद्धतीने दर्शनाचा आणि प्रसादाचा आनंद घेतला.
दरवर्षीप्रमाणे यावर्षीही श्रीकृष्ण अवलिया महाराजांच्या दर्शनासाठी अकोट तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यातून भाविकांची मोठी गर्दी झाली होती. महाप्रसादाचे वाटप सुरळीत व्हावे, यासाठी मंदिर विश्वस्त मंडळ, यात्रा महोत्सव समिती आणि स्थानिक कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. रांगेत उभा असलेला कोणताही भाविक महाप्रसादापासून वंचित राहणार नाही, याची चोख खबरदारी समितीकडून घेण्यात आली होती. यात्रेनिमित्त मुंडगाव येथे विविध दुकाने आणि पाळणे थाटण्यात आले आहेत. केवळ भाविकच नव्हे, तर यात्रेनिमित्त आलेल्या सर्व दुकानदारांनी आणि कारागिरांनीही या महाप्रसादाचा लाभ घेतला. मुंडगावची ओळख संतनगरी म्हणून असल्याने येथे दरवर्षी भाविकांची मोठी रेलचेल असते, हे पुन्हा एकदा या यात्रेच्या निमित्ताने अधोरेखित झाले.
ग्रामस्थांच्या सहकार्याने आणि भक्तीमय वातावरणात हा सोहळा अत्यंत शांततेत पार पडला. रात्री उशिरापर्यंत चाललेल्या या भंडाऱ्याने संपूर्ण मुंडगाव नगरी भक्तीच्या रंगात न्हाऊन निघाली होती.

अजिंक्य भारत
आपलं बुलडाणा

बुलडाणा, रविवार, दि.२९ मार्च २०२६ www.ajinkyabharat.com



## महत्त्वाचे

### जुगाराच्या डावावर छापा; ५ अटकेत

**जळगाव जामोद :** जळगाव जामोद तालुक्यातील पिंपळगाव काळे येथे छुप्या पद्धतीने सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर जळगाव जामोद पोलिसांनी शुक्रवारी, २७ मार्च रोजी दुपारी छापा टाकला. या कारवाईत ५ जुगारी पकडले असून त्यांच्याकडून रोख रकमेसह जुगाराचे साहित्या जप्त करण्यात आले आहे. पोलीस कॉन्स्टेबल परमेश्वर देवीदास ढोण व त्यांच्या पथकाने पिंपळगाव काळे शिवारात पंचासमक्ष रेड केली. यावेळी काही इसम ताशपत्यांवर पैसे लावून जुगार खेळताना रंगेहाथ मिळून आले. पोलिसांनी जावेद शहा अख्तर शहा (२८), बाबुराव नंदु इसोकार (३२), साबीर शहा गफार शहा (२८), शेख आसीफ शेख दिलदार (२८), अशफाक शहा मलंग शहा (२५) सर्व राहणार पिंपळगाव काळे, ता. जळगाव जामोद यांना ताब्यात घेतले. पोलिसांनी केलेल्या कारवाईत १८५० रुपये नगदी, जुगाराच्या डावावर लावलेले ४५० रुपये, ५० रुपये किमतीचे जुगाराचे बावन ताशपत्ते असा एकूण २३५० रुपयांचा माल पोलिसांनी हस्तगत केला आहे. या प्रकरणी जळगाव जामोद पोलीस स्टेशनमध्ये अपराध क्रमांक २२३/२०२६, कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अमोल पंडित हे करत आहेत.

### पैशाच्या वादातून काकूवर हल्ला

**खामगाव :** तालुक्यातील जनुना (माळीपुरा) येथे पैशांच्या मागणीवरून झालेल्या वादात एका २५ वर्षीय तरुणाने आपल्याच काकूवर लाकडी काठीने हल्ला करून त्यांना गंभीर जखमी केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी शिवाजीनगर पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी सौ. मंगला गजानन खंडारे (४५), रा. जनुना या २७ मार्च रोजी दुपारी ३ वाजेच्या सुमारास घरी असताना, त्यांचा नात्याने भाचा असलेला आरोपी गोपाल गजानन खंडारे (२५) याने त्यांच्याकडे पैशांची मागणी केली. मंगलाबाई यांनी पैसे देण्यास नकार दिला, ज्याचा आरोपीला प्रचंड राग आला. पैसे मिळत नसल्याचे पाहून संतापलेल्या गोपालने फिर्यादीला अश्लील शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. वादाचे पर्यावसान हाणामारीत झाले. आरोपीने मंगलाबाई यांचे केस धरून त्यांना जमिनीवर पाडले आणि जवळच असलेल्या लाकडी काठीने त्यांच्या तोंडावर व मानेवर जोरात प्रहार केले. या हल्ल्यात त्या गंभीर जखमी झाल्या असून, तुम्हाला जीवाने मारून टाकतो, अशी धमकीही आरोपीने दिली. जखमी अवस्थेत मंगलाबाई यांनी पोलीस स्टेशन गाठून तक्रार दिली. वैद्यकीय तपासणीच्या अहवालावरून (इंज्युरी सर्टिफिकेट) शिवाजीनगर पोलिसांनी रात्री १०.१३ वाजता गुन्हा नोंदवला. याप्रकरणी अप.क्र. ११८/२०२६ कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(३) बीएनएस नुसार गुन्हा दाखल केला आहे.

### कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव

| वान | भाव |
|---|---|
| ज्वारी | २०५० - २१५० |
| गहू | १७०० -२२७५ |
| तुर | ४६२५ - ८०२५ |
| हरभरा | ४२०० - ५२०० |
| सोयाबीन | ४५०० - ५४६० |
| उडीद | ३५०० - ६००० |
| मुग | ४८०० - ४८०० |
| मका | ११०० - १६०० |

# मेंडगाव लघु पाटबंधारे तलावाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर

## आरक्षित गावांना पाणी टंचाईच्या झळा

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**अंढेरा दि. २८ :** मेंडगाव येथील लघु पाटबंधारे विभागाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला असून उपविभागीय अभियंता पाटबंधारे विभाग चिखली यांनी एकदा पाणी आरक्षित मुळे वीज पुरवठा खंडित करण्याचे पत्र तर पुन्हा शेतकरी वर्ग यांच्या अर्जावरून वीज पुरवठा जोडून देण्याचे पत्र कनिष्ठ अभियंता अंढेरा यांना दिल्याने हा विषय परिसरात चर्चेचा बनला असून उपविभागीय अभियंता चिखली यांनी धरणात पाच गावांच्या पाण्याचा प्रश्न व धरणातील पाणी स्थिती लक्षात घेता धरणावरील अवैध मोटार पंप बंद करून त्या आरक्षित गावांना दिलासा देण्यासाठीमार्च रोजी अंढेरा कनिष्ठ अभियंता यांना वीज पुरवठा खंडित करण्याचे पत्र देऊन बायगाव बु येथील शेतकरी वर्ग यांनी भुईमूग पिके असल्याचे पत्र उपविभाग चिखली यांना दिल्यानंतर परत उपविभागीय अभियंता चिखली यांनी परत कनिष्ठ अभियंता अंढेरा यांना



पाटबंधारे विभाग यांनी बजावले दोनदा वीज पुरवठा खंडित व जोडणीचे पत्र देण्यात आले असून एकदा अज्ञात व्यक्तीने कालवा गेट सुद्धा उघडले होते त्यावर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला नाही हे विशेष! ''शेतकरी वर्ग यांची पिके अंतिम टप्प्यात असल्यामुळे आठ दिवस साठी वीज जोडणी जोडण्याचे आदेश देण्यात आले आहे
आकाश शिंदे, उपविभागीय अभियंता चिखली

२७मार्च रोजी परत वीज पुरवठा जोडणी साठी पत्र काढल्याने पाणी आरक्षण असणाऱ्या ग्रामपंचायत याची डोखेदुखी वाढली असून उपविभागीय अभियंता चिखली यांनी दिलेल्या दोन वेगवेगळ्या पत्राने उन्हाची दाहकता वाढत असतांना पाणी पातळी झपाट्याने कमी होत आहे व प्रत्यक्षात धरणात पाणी साठा केवळ मृद असून केवळ तेरा टक्के साठा शिल्लक असतांना त्या धरणावरील नळ योजना असलेल्या गावांना लवकरच पाणी टँचाई ला सामोरे जावे लागणार असून लवकरच पाणी टंचाईचा उद्रेक होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मेंडगाव लघु पाटबंधारे तलाव हा वरिष्ठ अधिकाऱ्याच्या मनमानी कारभारामुळे रामभरोसे पाणी आरक्षण पाच गावाचे असून नियमानुसार तलावामध्ये ३० टक्के पाणी आरक्षित असायला पाहिजे होते असे असे असताना संबंधित शाखा अभियंता श्री शिंदे यांनी ११/३/२०२६ रोजी महावितरण शाखा अभियंता अंधेरा यांना मेंडगाव तलावावर पाणी आरक्षण असल्यामुळे उपसा सिंचनाचे चालू असलेले विद्युत पंप ताबडतोब बंद करा असे लेखी पत्राद्वारे आदेशित केले व पुन्हा संबंधित शाखा अभियंता यांनी सद्यस्थितीमध्ये धरणामध्ये १३ टक्के पाणी असताना संबंधित तलावावर विद्युत कनेक्शन पुन्हा सुरळीत करा असे महावितरण अंधेरा यांना लेखी पत्राद्वारे आदेशित केले त्यामुळे संबंधित चार ते पाच गावांमध्ये भीषण पाणीटंचाई सद्यस्थितीमध्ये निर्माण झालेली असून त्यामध्ये संबंधित शाखा अभियंतां यांनी पुन्हा विद्युत कनेक्शन जोडून धरणांमधील पाणी कमी करण्याचा एक प्रकारचा छडा उचललेला दिसतो.

# ज्येष्ठांचा सन्मान म्हणजे संस्कृतीचा मान!

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी



**डोणगाव दि.२८ :** ज्येष्ठ वयोवृद्ध नागरिक हेच गावाचे खरे वैभव असून ते अनुभव, ज्ञान आणि संस्काराचा अमूल्य खजाना आहेत असे प्रतिपादन अप्पर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड यांनी केले. मेहकर तालुक्यातील घाटबोरी येथे आयोजित जातीय सलोखा ,सुसंवाद आणि सन्मान कार्यक्रमात ते विद्यार्थ्यांना व ग्रामस्थांना मार्गदर्शन करत होते. यावेळी त्यांनी तरुण पिढीने ज्येष्ठांचा आदर करण्याचे महत्व अधोरेखित केले.

धोती - टोपीची परंपरा जपणारी ही शेवटची पिढी आहे. त्यांच्या संस्कारातून समाज समृद्ध होतो, असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना संस्कार आणि मूल्यांचे धडे दिले, कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ज्ञानबा पाटील नवले होत. व्यासपीठावर उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खाडे, गट विकास अधिकारी दिनकरराव खरात, कृषी अधिकारी संदीप मेटांगळे ,मंडळ अधिकारी महादेव गायकवाड ,ठाणेदार अमरनाथ नागरे, ज्येष्ठ पत्रकार सिद्धेश्वर पवार, सरपंच राजकुमार पाखरे, माजी सरपंच गजानन चेनेवार आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी संतोष खाडे यांनी स्वतःच्या संघर्षमय जीवनाचा अनुभव सांगत विद्यार्थ्यांना प्रेरित केले. माझे आई-वडील ऊसतोड मजूर होते. त्यांच्या कष्टातून मला शिक्षणाची जाणीव झालीआणि त्यातूनच मी पोलीस अधिकारी झालो. विद्यार्थ्यांनीही आपल्या पालकांच्या मेहनतीची जाणीव ठेवून प्रगती साधावी, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमात गावातील ज्येष्ठ नागरिकांचा टोपी व रुमाल देऊन सलमान करण्यात आला. तसेच गुणवंत विद्यार्थ्यांना विविध पुरस्काराने गौरवण्यात आले. उज्वल वानखडे यांना सैनिक स्कूल पुरस्कार, तर योगिता हिवराळे, मयुरी सोनुने, राणी पवार, यश जाधव, संजीवनी चव्हाण, प्रतीक्षा मुळे, अदिती धेवडे, निकिता मोरे यांना क्रीडा गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आले. याशिवाय पत्रकारिता, आरोग्य, समाजसेवा, शिक्षण ,आणि पशुप्रेम या विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. ''सत्याशोधक लेखणीचा शिलेदार '' ,''मानवतेचा आरोग्यदूत '', ''समाजसेवा गौरव,'' ''आदर्श शिक्षक'' आणि विविध पुरस्कारांनी अनेकांना गौरवण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन गजानन चेनेवार व संतोष अवसरमोल यांनी केले , तर डॉक्टर कृष्णा हावरे यांनी प्रभावी सूत्र संचालन केले. दरम्यान, मान्यवरांची पारंपारिक बैलगाडी तून काढण्यात आलेली मिरवणूक हे कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले .टाळ - मृदंगाच्या गजरात आणि फुलांच्या उधळणीत पार पडली.

# जागतिक चिमणी दिवस उत्साहात



**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**खामगाव दि.२८ :** स्थानिक विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळ, द्वारा संचालित गो.से. महाविद्यालय,खामगांव येथील प्राणीशास्त्र विभागाद्वारे दिनांक २० मार्च २०२६ रोजी जागतिक चिमणी दिवसाचे औचित्या साधून एक मूठ धान्य पक्ष्यांसाठी या संकल्पनेवर आधारित उपक्रमाचा पुढील टप्पा साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी.एस. तळवणकर अध्यक्षस्थानी होते , प्रमुख उपस्थितीमध्ये डॉ. ए. व्ही.पडघन, प्रमुख मार्गदर्शक प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. जी. बी. काळे, कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. मनोज बाभळे, प्रा अनिकेत वानखडे हे उपस्थित होते.

# खामगाव बसस्थानकावरुन महिलेचे सोन्याचे दागिने लंपास

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**खामगाव दि.२८ :** येथील मध्यवर्ती बसस्थानकावर प्रवाशांच्या गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने एका महिला प्रवाशाच्या पर्समधील सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण ६०,७०० रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना उघडकीसआलीआहे. याप्रकरणी खामगाव शहर पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून तपास सुरू केला आहे. बोरीपुरा येथील रहिवासी इरफान खान गुलाब खान यांची बहीण समरीननाज हिला पातूर येथे जायचे असल्याने, इरफान खान आणि त्यांचे वडील तिला सोडण्यासाठी २६ मार्च रोजी सकाळी १० वाजेच्या सुमारास बसस्थानकावर आले होते. मलकापूर ते नांदेड ही बस लागल्यानंतर समरीननाज आपल्या मुलाबाळांसह बसमध्ये चढली. बसमध्ये प्रवाशांची मोठी गर्दी होती.

बस सुटल्यानंतर जेव्हा समरीननाजने तिकीट काढण्यासाठी आपली पर्स उघडली, तेव्हा तिला सोन्याचे इअर रिंग (कानफुले) अंदाजे ४ ग्रॅम वजनाचे किंमत ६० हजार रुपये, नगदी ७०० रुपये असा मुद्देमाल गायब असल्याचे तिच्या लक्षात आले. बसमध्ये चढतानाच गर्दीचा फायदा घेऊन कोणीतरी अज्ञात भामट्याने तिची पर्स उघडून हातसफाई केली होती. तिने तातडीने बस थांबवून भावाला फोन केला आणि खामगाव बसस्थानकावर परतली. या प्रकरणी फिर्यादी इरफान खान यांनी दिलेल्या तक्रारीवरून खामगाव शहर पोलिसांनी अपराध क्रमांक १८४/२०२६, कलम ३०३(२) नुसार अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून, पोलीस बसस्थानक परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासून चोरट्याचा शोध घेत आहेत.

# श्रीराम नवमीनिमित्त निघालेल्या शोभायात्रेचे मा.आ.दिलीपकुमार सानंदा यांनी केले स्वागत



**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**खामगाव दि.२८ :** दि.२६ मार्च २०२६ रोजी प्रभु श्रीराम नवमीनिमित्त विश्व हिंदु परिषद व श्रीराम जन्मोत्सव समितीच्या वतीने सिव्हील लाईन भागातील श्री प्रल्हाद महाराज राम मंदिर येथून सायं.५ वाजता भव्य शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेत ढोल पथक,भजनी दिंडी, आकोट येथील जय श्री महाकाल झाँज पथक, आकर्षक श्रीराम रथ आणि भगवान श्रीराम यांची पालखी काढण्यात आली. ही शोभायात्रा केला नगर,मोठी विहिर, देशमुख प्लॉट परिसरातुन श्री चंदनशेष चौक येथे आली असता चंदनशेष क्रिडा व व्यायाम प्रसारक मंडळाच्या वतीने फटाक्यांची आतीषबाजी करुन स्वागत केले.

# किनगांव राजा येथे श्रीराम जन्मोत्सव उत्साहात साजरा

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**किनगाव राजा दि.२८ :** किनगांव राजा येथे श्रीराम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. प्रल्हाद श्रीराम मंदिर परिसरात सकाळपासूनच भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली, जय श्रीरामच्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता.श्रीराम जन्मोत्सवानिमित्त पूजा,विविध धार्मिक विधी पार पडले. श्रीराम मंदिर समितीचे अध्यक्ष सुभाषराव घिके यांच्या हस्ते मुख्य पूजन संपन्न झाले.

यावेळी गांवातील मान्यवर, ग्रामस्थ तसेच महिला-पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.सात दिवस गांवामध्ये



विविध प्रसिध्द कीर्तनकार यांचे किर्तन संपन्न झाले.महिलांनी पाळण्यात श्रीरामाच्या जन्माचे प्रतीकात्मक दर्शन घडवत पाळणा गीते सादर केली, ज्यामुळे वातावरण अधिकच भक्तिमय झाले. दुपारी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून शेकडो भाविकांनी त्याचा लाभ घेतला. सायंकाळी ४ ते ६ वाजेच्या दरम्यान रामभक्त केवट समाजाच्या वतीने आकर्षक झाकी सादर करण्यात आली.रात्री गावातील प्रमुख मार्गांवरून भव्य मिरवणूक काढण्यात आली.या मिरवणुकीत राम, सीता आणि लक्ष्मण यांच्या वेशभूषेत सजलेले युवक विशेष आकर्षण ठरले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्रीराम मंदिर समिती व ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.यावेळी ठाणेदार संजय मातोंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली बिट जमादार अनिल नागरे यांनी चोक बंदोबस्त ठेवला होता.

# गणपती नेत्रालयाच्या तज्ज्ञांकडून शेंदुर्जनमध्ये तपासणीचा धडाका!

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**शेंदुर्जन राजा दि.२८ :** राजकारणा पलीकडे जाऊन समाजकारणाचा वारसा कसा जपावा, याचा आदर्श वस्तुपाठ आज शेंदुर्जनमध्ये पाहायला मिळाला. राज्याचे खंबीर नेतृत्व, माजी मंत्री ना. डॉ. राजेंद्र शिंगणे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून, शेंदुर्जनचे लोकप्रिय उपसरपंच नकुल शिंगणे यांच्या पुढाकाराने आयोजित भव्य मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराला जनसामान्यांचा ऐतिहासिक प्रतिसाद लाभला.

तज्ज्ञ डॉक्टरांचा ताफा आणि अत्याधुनिक सेवा केवळ वाढदिवस साजरा न करता, गरजूंच्या



डोळ्यांतील अंधकार दूर करण्याचा संकल्प नकुल शिंगणे यांनी पूर्णत्वास नेला. या शिबिरात जागतिक कीर्तीच्या श्री गणपती नेत्रालय, जालना (महिको रिसर्च फाउंडेशन) येथील तज्ज्ञ पथकाने आपली सेवा दिली. यामध्ये: डॉ. दिपांशा गुप्ता ऑप्टो. गणेश नायडू ऑप्टो. अभिषेक भुरेवाल ऑप्टो. शकुंतला आणि अभिजीत, त्यांचा खंबीर समर्थन संघ या पथकाने अत्याधुनिक यंत्रसामग्रीद्वारे रुग्णांची अत्यंत बारकाईने तपासणी केली. सकाळी ९ वाजल्यापासूनच शिबिरस्थळी रुग्णांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्याा, ज्यावरून या उपक्रमाची गरज आणि व्याप्ती स्पष्ट झाली. भूतो न भविष्यती प्रतिसाद: आकड्यांच्या पलीकडची सेवा या शिबिराचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे पारदर्शकता आणि पूर्णतः मोफत सेवा. तपासणीनंतर शेकडो रुग्णांना तत्काळ मोफत चष्मे आणि औषधे वाटप करण्यात आली. विशेष म्हणजे, प्राथमिक नोंदणीपेक्षाही कितीतरी पटीने अधिक रुग्णांनी या संधीचा लाभ घेतला. प्राथमिक स्तरावर गंभीर रुग्णांची शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात आली असून, त्यांना लवकरच शस्त्रक्रियेच्या तारखा दिल्या जाणार आहेत.जनसेवा हीच ईश्वर सेवा'' उपसरपंच नकुल शिंगणे यावेळी बोलताना उपसरपंच नकुल शिंगणे भावूक झाले. ते म्हणाले, ''आदरणीय डॉ. राजेंद्रजी शिंगणे साहेबांनी नेहमीच गोरगरिबांच्या आरोग्याला प्राधान्य दिले आहे.

## आठवणी

### करवंड महोत्सव ''लोकोत्सव'' व्हावा - विद्याधर महाले

# ऐतिहासिक सोहळ्याच्या स्मृतींना उजाळा देणार महाराष्ट्र सरकार

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**चिखली दि. २८ :** छत्रपती शिवाजी महाराज आणि गुणवंताबाई इंगळे यांच्या ऐतिहासिक विवाह सोहळ्याला यंदा ३७० वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर चिखली तालुक्यातील करवंड येथे १५ व १६ एप्रिल रोजी भव्य 'करवंड महोत्सवा'चे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाच्या पूर्वतयारीची पाहणी करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे खाजगी सचिव श्री. विद्याधर महाले यांनी नुकताच दौरा केला. यावेळी ''हा केवळ सरकारी कार्यक्रम न राहता जनसामान्यांचा 'लोकोत्सव' व्हावा,'' अशी भूमिका त्यांनी मांडली.

महोत्सवाच्या अनुषंगाने ऐतिहासिक वास्तूंची स्वच्छता आणि परिसर सुशोभीकरणासाठी रविवारी दि. १९ एप्रिल सकाळी ८:३० वाजता 'महा-श्रमदान' मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. करवंड महोत्सव समितीचे अध्यक्ष श्री. अरविंद देशमुख यांनी जिल्ह्यातील सर्व युवक, शिवभक्त, धारकरी तसेच विविध सामाजिक मंडळांना मोठ्या संख्येने



सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. या उपक्रमात श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान या संघटनेची संपूर्ण जिल्हा टीम सक्रिय सहभाग घेणार असून, ऐतिहासिक वारशाचे जतन आणि स्वच्छता हे आपले 'परम कर्तव्य' म्हणून पार पाडले जाणार आहे. दरम्यान, या महोत्सवाच्या भव्य आयोजनासाठी चिखली विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सौ. श्वेताताई महाले पाटील यांनी सांस्कृतिक मंत्रालयाकडून १ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून आणला आहे. स्थानिक युवकांनी आधीच केलेल्या श्रमदानाचे श्री. विद्याधर महाले यांनी विशेष कौतुक करत, या उपक्रमामुळे महोत्सवाला लोकसहभागाचे बळ मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. ३७० वर्षांपूर्वी ज्या विवाह सोहळ्यात आपल्या पूर्वजांनी सहभाग घेतला होता, त्याच परंपरेचे वारसदार म्हणून आजच्या पिढीनेही मोठ्या संख्येने उपस्थित राहून या ऐतिहासिक स्थळाची सेवा करावी, असे विद्याधर महाले म्हणाले. याप्रसंगी करवंड महोत्सव समितीचे अध्यक्ष अरविंद देशमुख,भाजपा तालुकाध्यक्ष अमोल साठे, प्राचार्य अण्णासाहेब म्हळसणे, प्रा. विजय घ्याळ, भास्करराव अडाळकर, सचिन गरड, अनिल सपकाळ, गजानन पवार आणी असंख्य गावकरी व शिवप्रेमी मंडळी हजर होती.

# लोणार येथे योग महोत्सवाच्या अनुषंगाने नियोजन बैठक उत्साहात

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**लोणार दि.२८ :** जागतिक पर्यटन स्थळ असलेल्या लोणार या ठिकाणी दिनांक ७ एप्रिल २०२६ या दिवशी पार पडणाऱ्या भव्य योग महोत्सवाच्या अनुषंगाने नियोजन बैठक पार पडली या बैठकीला विशेष अतिथी व मार्गदर्शक म्हणून लाभलेले डॉ. अनंत बिरादार साहेब अध्यक्ष इंटरनॅशनल नॅचरोपॅथी ऑर्गनायझेशन तसेच आयुष मंत्रालय सदस्य तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानीशिवसेना पक्षाचे जिल्हाप्रमुख बळीराम मापारी हे होते तसेच विशेष अतिथी म्हणून लाभलेले नंदुभाऊ मापारी,भगवान पाटील सुलताने, पांडुरंग सरकटे कार्यक्रमामध्ये आलेल्या योगशिकांनी कार्यकर्माच्या सुरुवातीला योगगीतातून व योगाच्या प्रात्यक्षिक करून बैठकीला सुरुवात झाली डॉ. अनंत बिरादार सरांनी आपल्या मार्गदर्शनातुन योग महोत्सव या दिवशी योगशिक्षकांना पार पाडण्यासाठी काही समित्यांची नेमणूक करून त्यांना विशेष अशी जिम्मेदारी देऊन योग हा फक्त कार्यकर्माचे नियोजन करणार्यांसाठीच नसून सर्वांसाठी निरोगी



जीवन जगण्यासाठी जगातल्या प्रत्येक व्यक्तीला योग आवश्यक आहे असे ते म्हणाले तरी या कार्यक्रमामध्ये जुडण्यासाठी विशेष अशी लिंक तयार करण्यात आली त्या लिंकवरून नोंदणी करून प्रत्येकाणे योग महोत्सव मध्ये सामील व्हावे असे आवाहन त्यांनी यावेळेस केले तसेच या कार्यकरमाला लाभलेले अध्यक्ष बळीराम जी मापारी यांनी आलेल्या सर्व योगशिक्षकांचे विशेष असे आभार मानले त्यांनी यावेळेस बोलताना सांगितले कि योगशिक्षकांना लागणाऱ्या सर्व मदतीसाठी आम्ही तयार आहोत आम्ही त्यांना सर्वोतपरी लागेल ती मदत करू तसेच त्यांनी बोलताना मा. ना. प्रतापरावजी जाधव साहेब आरोग्य राज्यमंत्री तथा आयुष मंत्री भारत सरकार यांचे सुद्धा विशेष आभार मानले ते म्हणाले कि आपल्या छोटयास्या लोणार या ठिकाणी एवढा मोठा योग महोत्सव हा होत आहे यांचे सर्व श्रेय मा. ना. प्रतापरावजी जाधव साहेबानाचं जाते त्यांनिसुद्धा या योग महोत्सव कार्यक्रमामध्ये जास्तीत जास्त संख्येने नागरिकांनी उपस्थित राहावे व आपल्याला योगाच्या ज्ञानामध्ये भर पाडून घ्यावी व निरोगी जीवन जगण्यासाठी प्रत्येकाने रोज योग करावा असेही त्यांनी यावेळेस आवाहन केले शेवटी आलेले योग शिक्षकांचे त्यांनी आभार मानले. या कार्यक्रमाला विशेष उपस्थित म्हणून डॉ. नारायण अंभोरे सर विदर्भ अध्यक्ष, डॉ. शेख शेककील सर मराठावडा अध्यक्ष, डॉ. संजना सूर्यवंशी मॅडम बुलढाणा जिल्हाध्यक्ष तसेच विशेष सहकार्य म्हणून लाभलेले डॉ गजानन बाजड, डॉ.प्रेमदास वाकोडे, डॉ.गजानन चेके या बैठकीसाठी विशेष असे परिश्रम घेतले.

## महत्त्वाचे

### मंगळवारी पंचायत समितीची आमसभा व सरपंच मेळावा

**डोणगाव :** पंचायत राज समितीच्या शिफारशीप्रमाणे पंचायत समिती लोणार येथे सन २०२५-२६ ची वार्षिक आमसभा व सरपंच मेळावा मंगळवार ३१ मार्च रोजी आमदार सिद्धार्थ खरात यांच्या अध्यक्षतेखाली तसेच केंद्रीय मंत्री ना. प्रतापराव जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत क्रृषी वैभव लॉन डोणगाव रोड मेहकर येथे संपन्न होणार आहे. यामध्ये सन २०२५ ते सन २०२६ मधील काम काजाचा आढावा घेणे, काम ाची रूपरेषा ठरविणे, अध्यक्ष यांच्या परवानगीने वेळेवर येणारे विषय व महिला सरपंच यांनी स्वतः हजर राहून कुणीही प्रतिनिधी पाठवू नये. नागरिकांनी व सरपंचानी अडचणी, प्रश्न असल्यास २८ मार्चपर्यंत पंचायत समि तीमध्ये लेखी स्वरूपात देणे. खाते प्रमुख यांनी माहितीसह न चुकता हजर राहण्याचे गटविकास अधिकारी दिनकराव खरात व सहाय्यक गटविकास अधिकारी धिरज जाधव यांनी कळविले आहे

### पिं. राजामध्ये मटका पकडला

**खामगाव :** पिंपळगाव राजा येथील छोटया पुलाजवळ २६ मार्च २६ रोजी सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास राजु समाधान वाकोडे (वय ४२ वर्ष, रा. हिवरा बु.) हा वरली मटका खेळतांना व खेळवितांना पोलिसांना मिळुन आला. त्याचेजवळुन रोख व वरली मटका साहित्य असा एकुण २९५ रूपयांचा मुद्देमाल जप्त केला, याप्रकरणी पोकों. दत्तात्रय पवार यांनी पिंपळगाव राजा पोस्टेला फिर्याद दिली. फिर्यादीवरून पोस्टेमध्ये उपरोक्त आरोपीविरुध्द मजुका कलम १२ अ नुसार गुन्हा दाखल केला आहे

### पैसे दिले नाही म्हणून आईस मारहाण

**खामगाव :** तालुक्यातील जनुना येथील माळीपुरा भागातील रहिवासी सौ. मंगला गजानन खंडारे (४५) यांनी काल २७ मार्च २६ रोजी शिवाजी नगर पोस्टेला फिर्याद दिली. त्यामध्ये नमुद केले आहे की, काल २७ मार्च २६ रोजी दुपारी ३ वाजताच्या सुमारास मुलगा गोपाल गजानन खंडारे (२५) याने पैश्यांची मागणी केली असता नकार दिल्यामुळे त्याने चिडुन जावुन त्याने आईला शिवीगाळ करून काठीने मारहाण करून जखमी केले. तसेच जीवे मारण्याची धमकी दिली. फिर्यादीवरून उपरोक्त आरोपीविरुध्द पोस्टेमध्ये कलम ११८ (१), ११५ (२), ३५२, ३५१ (३) भान्यासं नुसार गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोकों सुरुज राठोड करीत आहेत.

### जिजाऊ नगरात २ लाखाची वीज चोरी

**खामगाव :** भरारी पथकाने वीज चोरी शोध खामगाव म हावितरणच्या मोहिमे अंतर्गत २६ फेब्रुवारी २६ रोजी दुपारी २.३० वाजताच्या सुमारास जिजाऊ नगरातील प्रकाश भगवानराव टिकार यांच्या घरी विद्युत मिटरची तपासणी केली असला मागील १९ महिन्यापासुन ६ हजार २५७ युनिट (किं. १ लाख ८० हजार ७७४ अधिक तडजोड रक्कम १४ हजार रू.) अशी एकुण १ लाख ९४ हजार ७७४ रूपयांची वीज चोरी केल्याचे उघडकीस आले. याप्रकरणी भरारी पथकाचे अति. कार्यकारी अभियंता प्रशांत उत्तमराव कलोरे यांनी काल २७ मार्च २६ रोजी शहर पोस्टेला फिर्याद दिली. फिर्यादीवरून पोस्टेंमध्ये वीज वापरकर्ते प्रकाश भगवानराव टिकार व सौ. अनिता प्रकाश टिकार यांच्या विरुध्द भाविका कलम १३५ नुसार गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास एपीआय विकास पाटील करीत आहेत.

# उद्धव ठाकरे व आमदार सिद्धार्थ खरात यांच्याबाबत आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्या विरोधात कारवाई करा : निवेदन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**मेहकर दि. २८ :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख माननीय उद्धव बाळासाहेब ठाकरे व मेहकर लोणार मतदार संघाचे आमदार सिद्धार्थ खरात यांच्या बद्दल आक्षेपार्ह वक्तव्याचा व्हिडिओ समाज माध्यमांवर प्रसारित करून सामाजिक व राजकीय तेढ निर्माण केल्याप्रकरणी संदीप तट्टे व इतर दोषीवर कारवाई करावी, अशा मागणीचे निवेदन आज दिनांक २८ मार्च रोजी शिवसेना उबाठा पक्षाच्यावतीने उपविभागीय पोलीस अधिकारी, मेहकर व ठाणेदार, मेहकर यांना दिले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, दिनांक २२ मार्च २०२६ रोजी दुपारनंतर प्रसार माध्यमावर माननीय उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षप्रमुख यांच्या विषयी निंदाजनक वक्तव्य करून आमदार सिद्धार्थ खरात यांना मारण्याची धमकी दिली. तसेच हा व्हिडिओ समाज माध्यमांद्वारे (फेसबुक, व्हाट्सअ‍ॅप, इंस्टाग्राम) प्रसारित करून धमकी देऊन दादागिरीची भाषा वापरून आमदार सिद्धार्थ खरात यांना घरातून ओढून मारू, आमच्यावर असे वीस-पंचवीस गुन्हे आहेत आम्ही गुन्ह्याला घाबरत नाही,अशी आक्षेपार्ह भाषा संदीप तट्टे याने केली आहे. यामुळे दहशत निर्माण होऊन सामाजिक व राजकीय तेढ निर्माण करण्यात आली आहे. याप्रकरणी संबंधित आरोपीवर तात्काळ कठोर कारवाई करावी, अन्यथा आमदार सिद्धार्थ खरात यांच्या जीविताला काही धोका निर्माण झाल्यास होणाऱ्या परिणामास प्रशासन जबाबदार राहील, असा इशाराही दिला आहे. निवेदन देताना उपजिल्हाप्रमुख आशिष भाऊ रहाटे, तालुकाप्रमुख निंबाभाऊ पांडव, शहर प्रमुख तथा नगराध्यक्ष किशोरभाऊ गारोळे, युवा शहर प्रमुख आकाशभाऊ घोडे, तालुका समन्वयक संजय वडकर, नगरसेवक महेश रिंढे, नितीन तुपे, निसार अन्सारी, एडवोकेट संदीप गवई, डॉ. शेषराव बदर, साहेबराव हिवाळे, दत्तात्राय घनवट, परमेश्वर दहातोंडे, पंडित बापू देशमुख, अमोल बोरे, राजेक अली, सनी सांगळे, गोपाल गायकवाड, अमोल मोरे, विकास शिंदे, शुभम पानखेडे, विलास शिंदे, गणेश गावंडे, संतोष लाड, पवन टाले, गबाजी गवई, छट्टू गवळी, गजानन जाधव, राजू दांदडे, छगन सांगोळे, समाधान सरदार, महिला आघाडी प्रमुख स्वाती नवले आदींसह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

# पक्षासोबत ठामपणे राहण्याचा काँग्रेसजनांचा निर्धार!

## संदीप शेळकेंच्या जिल्हा संवाद दौऱ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.२८ :** काँग्रेस नेते संदीप शेळके यांच्या २४ व २५ मार्च रोजीच्या जिल्हा संवाद दौऱ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद ळिाला. आजी, माजी पदाधिकारी, कार्यकर्त्यांसोबत त्यांनी हितगुज साधले. काँग्रेसजणांनी पक्षाच्या विचारांसोबत राहण्याचा ठाम निर्धार व्यक्त केला. तसेच संघटना बांधणीबाबत तळमळ व्यक्त केली.

पक्षाचे राष्ट्रीय नेते खा. राहुल गांधी यांच्या संघटन सृजन संकल्पनेतून ज्येष्ठ आणि युवा यांच्या एकत्र मोट बांधणीवर लक्ष केंद्रित केले जात आहे. आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीच्या अनुषंगाने काँग्रेसचा विचार तळागाळापर्यंत पोहचवण्यासाठी पक्षीय स्तरावर प्राधान्य देण्यात येत आहे. याच धर्तीवर प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, ज्येष्ठ नेते मुकुल वासनिक, जिल्हाध्यक्ष राहुल बोंद्रे यांच्या मार्गदर्शनात काँग्रेस नेते संदीप शेळके यांनी जिल्हा संवाद दौरा केला. दोन दिवसात १३ तालुक्यांतील काँग्रेसजणांच्या गाठीभेटी घेतल्या. दौऱ्याची सुरुवात घाटाखालील मोताळा, नांदुरा, मलकापूर, जळगाव जामोद, संग्रामपूर, खामगाव, शेगाव तालुक्यांपासून करण्यात आली. त्यानंतर घाटावरील मेहकर, लोणार, सिंदखेड राजा, देऊळगाव राजा, चिखली, बुलढाणा अशा तालुकानिहाय बैठका घेण्यात आल्या. आजी, माजी नगराध्यक्ष, माजी आमदार, नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी त्यांचे उस्फुर्त स्वागत केले.



**प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचे नेतृत्व प्रेरणादायी**

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचे नेतृत्व प्रेरणादायी आहे. महात्मा गांधी यांच्या विचारांवर मार्गक्रमण करीत त्यांनी पक्षाचा विचार मनामनांत रुजवला. अत्यांत कमी वयात जिल्हा परिषद अध्यक्ष, आमदार, प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रीय स्तरावर संघटनात्मक पदे भूषवून जबाबदारीला न्याय दिला. जिल्ह्यात कार्यकर्त्यांची फळी उभी करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. सामान्य कार्यकर्ता म्हणून पक्षाचे काम करीत असतांना हर्षवर्धन सपकाळ यांचे पाठबळ नवी ऊर्जा देणारे आहे. त्यांचे नेतृत्व प्रेरणादायी आहे, असे संदीप शेळके यांनी सांगितले.

# भुरटे चोर सक्रिय; पोलिस प्रशासन मात्र सुस्त?

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**नरवेल दि.२८ :** गावातील कोटेश्वर मंदिर परिसरात भुरट्या चोरट्यांचा सुळसुळाट वाढला असून शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दिनांक २६ मार्च रोजी मध्यरात्रीच्या सुमारास शिवारातून तीन शेतकऱ्यांच्या पाण्याच्या मोटारी चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. काही दिवसांपासून मोटार चोरीच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असल्याने शेतकरी वर्ग चिंतेत आहे. उन्हाळी पिकांना पाणी देण्यासाठी अत्यावश्यक असलेल्या मोटारी चोरीला जात असल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. परिसरात अज्ञात चोरट्यांनी पिकअप वाहनाच्या साहाय्याने मोटारी चोरी केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. घटनास्थळी वाहनाच्या टायरचे ठसे आढळून आले आहेत. दरम्यान, २७ मार्च रोजी शेतात गेलेल्या शेतकऱ्यांना चोरी झाल्याचे लक्षात येताच त्यांनी तत्काळ एमआयडीसी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांकडून चौकशीसाठी येण्याचे आश्वासन देण्यात आले; मात्र दिवसभर शेतकरी उन्हात थांबूनही एकही पोलीस कर्मचारी घटनास्थळी पोहोचला नाही, अशी खंत शेतकऱ्यांनी व्यक्त केली. नरवेल परिसरात काही दिवसांपासून भुरट्या चोरींसह अवैध दारू विक्री व वाळू उपसा वाढल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे. या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून, चोरीच्या घटनांवर तातडीने आळा घालण्याचे आव्हान उभे ठाकले आहे.

# दांडगे यांना महात्मा गांधी राज्यस्तरीय सामाजिक पुरस्कार प्रदान

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**डोणगाव दि.२८ :** बुलढाणा गुरुदेव सेवा मंडळाच्या माध्यमातून व्यसनमुक्तीचे प्रभावी कार्य करणाऱ्या प्रमोद दांडगे यांना महात्मा गांधी व्यसनमुक्ती राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. केंद्रीय मंत्री रामदास आठवले व सामाजिक न्याय राज्यमंत्री शिरसाठ यांच्या हस्ते सदर पुरस्कार देण्यात आला.

जिल्हा गुरुदेव सेवा मंडळाचे शिवाधिकारी प्रमोद दादा दांडगे यांना महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मुंबई येथे केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदासजी आठवले, त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ, यांनी प्रदान केला.सोबतच सत्यपाल महाराज विदर्भभूषण यांच्या समवेत पुरस्कार सोहळा संपन्न झाला. दांडगे हे बुलढाणा जिल्ह्यातील सातगाव मसला येथील रहिवासी असून सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत शासना कडून पुरस्कार देण्यात आला. हा पुरस्कार वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारधारेवर आधारित कार्याचा पुरस्कार होईल असे शाहीर दुर्गादास दांडगे म्हणाले.प्रमोद दादा यांनी व्यसनमुक्ती, समाज प्रबोधन असे कार्य केले व करीत आहे. पुरस्कार दिल्याबद्दल बुलढाणा जिल्हा गुरुदेव सेवा मंडळ व तहसील मित्र मंडळाच्या वतीने दांडगे यांचे स्वागत करण्यात आले.

# ज्ञानगंगा अभयारण्य मार्ग रात्री बंद

**बुलडाणा दि.२८ :** बुलढाणा जिल्ह्यातील महतत्वाचे पर्यटन व जैववैविध्य स्थळ असलेल्या ज्ञानगंगा अभयारण्यातून जाणारा खामगांवबोथाबुलढाणा राज्य मार्ग क्र. २४ हा दररोज रात्री १० ते सकाळी ५ वाजेपर्यंत वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात येणार असल्याची माहिती वन विभागाने दिली आहे.

वन्यजीव संवर्धन व वन संरक्षणाच्या दृष्टीने जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी, बुलढाणा यांच्या आदेशानुसार हा निर्णय लागू करण्यात आला आहे. या मार्गावर खामगांव, बोथा, गोंधनखेड आणि वरवंड येथे एकूण चार वनउपज तपासणी नाके कार्यरत असून संबंधित वेळेत वनकर्मचारी वाहनांची तपासणी करून नोंदी घेतात. तथापि, काही वाहनचालकांकडून रात्रीच्या वेळी नियमांचे उल्लंघन करून तपासणी नाक्यांवरील कर्मचाऱ्यांशी वाद घालण्याचे प्रकार समोर येत आहेत. अशा कृतींमुळे वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ अंतर्गत दंड व शिक्षेची तरतूद असून संबंधितांवर फौजदारी कारवाई होऊ शकते, असा इशारा प्रशासनाने दिला आहे. वन विभागाच्या माहितीनुसार, रात्रीच्या वेळेस या परिसरात वाघ, बिबट्या आणि अस्वल यांसारख्या वन्यप्राण्यांचा मुक्त संचार असतो. त्यामुळे वाहनांमुळे अपघात होण्याची तसेच वन्यजीवांच्या अधिवासाला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. म्हणूनच नागरिकांनी रात्री १० ते सकाळी ५ या वेळेत या मार्गावर प्रवास टाळावा आणि खामगांव,उंद्री,वरवंड, बुलढाणा या पर्यायी मार्गाचा वापर करावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# प्रा.रत्नदीप सम्दुर यांना पीएचडी प्रदान

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**खामगाव दि.२८ :** खामगाव येथील सुप्रसिद्ध अ‍ॅड. प्रकाश सम्दुर यांचे ज्येष्ठ पुत्र तथा महात्मा फुले कनिष्ठ महाविद्यालय, खेर्डा तालुका जळगाव जामोद येथील प्रा. रतदीप सम्दुर यांची इंग्रजी विषयांमध्ये नालंदा विद्यापीठाने पीएचडीसाठी निवड केलेली आहे. प्रा. रतदीप सम्दुर यांचे इंग्रजी विषयामधील अध्यापनशैली ही वाखाणण्यासारखी असून मुलांच्या मनातील इंग्रजी विषयातील भीती दूर करण्यासाठी ते सतत विविध उपक्रम राबवित असतात. बोली भाषेतून इंग्रजी अध्यापन केल्यास विद्यार्थ्यांच्या मनातील इंग्रजी विषयाची भीती कमी होते. या विषयावर त्यांनी सतत तीन वर्ष कार्य प्रा डॉ पुरुषोत्तम उपर्वट यांचे मार्गदर्शनाखाली केल्यामुळे त्यांची निवड करण्यात आलेली आहे. प्रा. रत्नदीप सम्दुर यांचे शैक्षणिक क्षेत्रात उत्तम कार्य आहे.

त्यांच्या इंग्रजी अध्यापनातील कौशल्यामुळे त्यांच्या कार्याची दखल घेऊन नालंदा फाउंडेशन, महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या मानद पीएचडी साठी त्यांची निवड करण्यात आलेली आहे. हा समारंभ२१ मार्च रोजी मान्यवरांच्या हस्ते त्यांना एका भव्य समारंभामध्ये ही पीएचडी प्रदान करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे सर्व क्षेत्रामधून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. संस्थेचे अध्यक्ष संजय उमरकर, सचिव अविनाश उमरकर, विनोद धर्माळ, मुख्याध्यापक बोंबटकर सर तसेच कृष्णाई स्कूलचे अध्यक्ष जनार्दन हेंड पाटील, हर्षद हेंड पाटील, चेतन हेंड पाटील यांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले असून त्यांनी त्यांचे अभिनंदन केले तसेच विविध क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होते.

# एल.टी.टी. बल्लारशहा रेल्वेला शेगांव येथे थांबा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.२८ :** संतनगरी शेगांव रेल्वे मार्गाने नियमीत धावणाऱ्या परंतु थांबा नसणाऱ्या एल.टी.टी. बल्लारशहा एक्स्प्रेसला शेगांव रेल्वे स्थानकावर थांबा मंजुरी केल्याप्रकरणी केंद्रिय रेल्वे मंत्री आश्विनी वैष्णव यांची आज केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन आभार व्यक्त केले. तर खामगांव-जालना रेल्वे मार्गा संदर्भात गोड बातमी लवकरच देऊ असे सुचक वक्तव्य केंद्रिय रेल्वे मंत्र्यांनी चर्चेदरम्यान केले. त्यामुळे खामगांव-जालना रेल्वेमार्गाबद्दल केंद्र सरकारची सकारात्मकता दिसुन आली. या रेल्वे मार्गासंदर्भात अंतिम मंजुरातीची घोषणा होण्याची शक्यता आहे.

विदर्भाची पंढरी म्हणुन ओळख असलेल्या बुलढाणा जिल्हयातील संत नगरी शेगांव येथे दररोज देशभरातुन लाखो भाविक येत असतात. शेगांव रेल्वे मार्गावरील नियमीत धावणाऱ्या एल.टी.टी. बल्लारशहा एक्स्प्रेस सह इतर ३ सुपर फास्ट एक्स्प्रेसला शेगांव रेल्वे स्थानकावर थांबा मिळावा, अशी मागणी केंद्रिय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी गेल्या महिन्यामध्ये केंद्रिय रेल्वे मंत्र्यांची भेट घेऊन केली होती. त्यातील एल.टी.टी. बल्लारशहा एक्स्प्रेसला रेल्वे मंत्रालयाच्या वतीने थांबा मंजुर करण्यात आला आहे. आज २७ मार्च ला केंद्रिय रेल्वे मंत्री आश्विनी वैष्णव यांची दिल्ली येथे भेट घेऊन बल्लारशहा एक्स्प्रेसला थांबा दिल्याबद्दल केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव यांनी आभार व्यक्त केले. याचवेळी खामगांव-जालना रेल्वे मार्गासंदर्भात रेल्वे मंत्र्यांसोबत चर्चा करत असतांनाच त्यांनी रेल्वे मंत्रालय या रेल्वे मार्गासंदर्भात वेगाने काम करत असुन लवकरच तुम्हाला आनंदाची बातमी देऊ असे सुचक विधान त्यांनी केले.

खामगांव-जालना रेल्वे मार्गासंदर्भात रेल्वे मंत्र्यांनी अत्यंत सकारात्मक भुमिका दर्शविल्याने खामगांव-जालना रेल्वे मार्गासंदर्भात केंद्र सरकारच्या वतीने लवकरच घोषणा होण्याची शक्यता आहे. केंद्रिय रेल्वे मंत्र्यांनी खामगांव-जालना रेल्वे मार्गाबद्दल विस्तृत चर्चाही यावेळी मंत्री महोदयांसोबत केली. इंग्रज काळापासुन हा रेल्वे महामार्ग प्रलंबित असुन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी खामगांव येथे झालेल्या जाहीर सभेत हा रेल्वे मार्ग करण्याचे आश्वासन बुलढाणा जिल्हयातील जनतेला दिले असल्याचे सांगुन या रेल्वे मार्गामुळे मध्य रेल्वे व दक्षिण रेल्वे जोडल्या जाणार आहे. हा रेल्वे मार्ग व्हावा हि जिल्हयातील नागरीकांची जनभावना आहे. असेही त्यांनी रेल्वे मंत्र्यांसोबत चर्चेत सांगीतले. केंद्रिय रेल्वे मंत्र्यांनी दर्शविलेल्या सकारात्मक भुमिकेमुळे या रेल्वे मार्गाला अंतिम मंजुरात मिळण्याची शक्यता आहे.

**आयोजन** — मल्टीमीडिया छायाचित्र प्रदर्शनाचे उत्साहात उद्घाटन

# शासकीय योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवा: उपविभागीय अधिकारी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**बुलडाणा दि.२८ :** शासनाच्या सामाजिक न्याय विभागाच्या विविध लोककल्याणकारी योजना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणे, ही काळाची गरज आहे. मल्टीमीडिया छायाचित्र प्रदर्शनाच्या माध्यमातून या योजनांची अचूक माहिती लाभार्थ्यांना मिळाल्यास त्यांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडून येईल, असे प्रतिपादन खामगावचे उपविभागीय अधिकारी रामेश्वर पुरी यांनी केले.

शेगांव येथील डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी नगर भवनात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग आणि जिल्हा माहिती कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या मल्टीमीडिया छायाचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन पुरी यांच्या हस्ते आज संपन्न झाले. यावेळी ते मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलत होते. या प्रसंगी जिल्हा माहिती अधिकारी यासेरोद्दीन काझी, उपसंपादक सतिश बगमारे, समाजकल्याण अधीक्षक विलास बघे, नेहा पवार, टीव्ही अँड डिजिटल मीडिया असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष फाहिम देशमुख यांच्यासह पत्रकार, विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुरी पुढे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक न्यायाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी अशा उपक्रमांची सातत्यपूर्ण आवश्यकता आहे. प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी छायाचित्र प्रदर्शन हे प्रभावी माध्यम आहे. यामुळे केवळ माहितीच मिळत नाही, तर विद्यार्थी आणि नागरिकांमध्ये प्रशासनाप्रती विश्वास निर्माण होतो. अनुसूचित जाती, मागासवर्गीय आणि दुर्बल घटकांसाठी राबविल्या जाणाऱ्या योजनांचा जास्तीत जास्त विद्यार्थी व नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

जिल्हा माहिती अधिकारी श्री. काझी यांनी सांगितले की, शासनाच्या योजनांची संपूर्ण माहिती एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात आली आहे. हे प्रदर्शन ३० मार्च पर्यंत दररोज सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत नागरिकांसाठी खुले राहील. जिल्ह्यातील नागरिकांनी आणि विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनास भेट देऊन शासकीय योजनांची माहिती करून घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले. दरम्यान उपस्थित मान्यवर, अधिकारी कर्मचारी यांनी प्रदर्शनीची पाहणी केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वरिष्ठ लिपिक जयंत वानखडे, ललित ढोकणे, नामदेव गट्टे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# अनुपसिंग राजपूत यांच्या पुढाकाराने विद्युत कर्मचाऱ्यांचे परिश्रम

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**पिंपळगाव दि.२८ :** महावितरणच्या खामगाव उपविभागांतर्गत येणाऱ्या पिंपळगाव राजा-२ या शाखा कार्यालया अंतर्गत १०० टक्के स्मार्ट (टीओडी) मीटर बसविण्यात आले असून विदर्भातील हे पहिले-वहिले चं वीज वितरण केंद्र ठरले आहे. मुख्य अभियंता राजेश नाईक यांच्या हस्ते ग्राहक चंद्रकांत देशमुख यांचे शेवटचे स्मार्ट मीटर बसवून या केंद्राचे शंभर टक्के स्मार्ट मीटरीकरण चे कामं पूर्ण झाल्याची घोषणा करण्यात आली.

यावेळी मुख्य अभियंता नाईक यांनी सांगितले की, स्मार्ट मोबाइल व स्मार्ट टीव्हीप्रमाणेच स्मार्ट मीटर ही सध्यास्थितीत काळाची गरज असून,यामुळे वीज वितरण चॅंक ग्राहकांना अधिक पारदर्शक,अचूक आणि विश्वासार्ह सेवा मिळणार आहे.स्मार्ट मीटरमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला असून, मीटर वाचन स्वयंचलित पद्धतीने होत असल्याने सरासरी बिल, तसेच मीटर वाचन न झाल्याच्या तक्रारी कमी होणार आहेत. याशिवाय ग्राहकांना त्यांच्या वीज वापराची माहिती दर तासाला मोबाइलवर पाहता येणार असल्याने वीज वापरावर नियंत्रण ठेवणे सुलभ होणार आहे.



**४२३३ ग्राहकांकडे टीओडी मीटर**

पिंपळगाव राजा भाग-२ च्या वीज वितरण केंद्रात घरगुती, वाणिज्यिक,औद्योगिक व इतर वर्गवारीतील एकूण ४,२६३ ग्राहक असून, सर्वांकडे स्मार्ट टीओडी मीटर बसविण्यात आले आहेत. ही प्रक्रिया ऑक्टोबर २०२५ पासून टप्प्याटप्प्याने राबविण्यात आली. या सहा महिन्यांत फीडर इनपुटमध्ये सुमारे ३३ टक्क्यांनी घट झाली असून, बिलिंग कार्यक्षमता ८४.४५ टक्क्यांवरून ९५.४ टक्क्यांपर्यंत वाढली आहे, तसेच वीजबिलांशी संबंधित तक्रारी जवळपास शून्यावर आल्याने ग्राहकांनी समाधान व्यक्त केले आहे.अशी माहिती अधीक्षक अभियंता सुरेंद्र कटके यांच्या मार्गदर्शनाखाली कामं करणारे कार्यकारी अभियंता विरेंद्र जसमतिया,उपकार्यकारी अभियंता हिराळकर, कनिष्ठ अभियंता अनुपसिंग राजपूत यांनी दिली.

## महत्त्वाचे

### दहा मतदान केंद्रीय अधिकाऱ्यांवर गुन्हा

**जालना :** मतदार यादीच्या कामात हलगर्जीपणा केल्याप्रकरणी दहा मतदान केंद्रीय अधिकारी (बीएलओ) यांच्याविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. हलगर्जी केल्यानंतर वारंवार नोटिसा देऊनही त्यांनी खुलासा सादर केला नाही. या प्रकरणात नायब तहसीलदार विष्णुपंत घुगे यांच्या फिर्यादीवरून रमेश कल्याण खरे, पुरुषोत्तम संपतराव चौरे, एस.पी. लगड, शिवाजी गोविंदराव घोगरे, एस.एल.गुंजकर, सचिन दामोदर खंदारे, एस.एस. गोसावी, अतिक रहीम शेख, भरत सोपानराव होनमाने, संजय शंकरराव चव्हाण यांच्यावर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### वन्यजीवांसाठी पाणवठ्यांच्या निर्मितीची मागणी

**भोकरदन :** वाढत्या उन्हाळ्याच्या झळा तीव्र होत असताना जंगलात वन्यजीवांसाठी पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. नैसर्गिक पाणवठे आटू लागल्याने वनविभागाने तातडीने ठिकठिकाणी कृत्रिम पाणवठ्यांची निर्मिती करण्याची गरज असून, वनविभागाने त्यात टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा, अशी मागणी होत आहे. भोकरदन तालुक्यातील धावडा, वडोद तांगडा, शेलूद आदी परिसरात मोठ्या प्रमाणावर वनक्षेत्र असून हरिण, ससा, रानडुक्कर, कोल्हा यांसह विविध वन्यजीवांचे वास्तव्य आहे. मात्र, उन्हाळा वाढू लागला की, येथील नैसर्गिक जलस्रोत आटतात. परिणामी वन्यजीवांना पाण्यासाठी भटकंती करावी लागते. अनेकदा पाण्याच्या शोधात ते गावाच्या दिशेने वळतात, त्यामुळे मानव-वन्यजीव संघर्षाची शक्यता अधिक वाढली आहे.

### मनपाकडून दहा क्विंटल प्लास्टिक जप्त

**जालना :** शहराला प्लास्टिकमुक्त करण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाने आपली मोहीम अधिक तीव्र केली असून शहरातील नवीन मोंढा परिसरात धडक कारवाई केली आहे. या कारवाईत महानगरपालिकेच्या स्वच्छता पथकाने सुमारे १० क्विंटल प्रतिबंधित सिंगल युज प्लास्टिक जप्त केले असून संबंधित दुकानदारांकडून ३० हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे. महानगरपालिकेच्या सर्व स्वच्छता निरीक्षकांनी एकत्रितपणे नवीन मोंढा बाजारपेठेत ही शोधमोहीम राबवली. यामध्ये पारसमल मोहनलाल जैन, महालक्ष्मी ट्रेडर्स व इतर काही प्रतिष्ठाणांकडे प्रतिबंधित प्लास्टिकचा मोठा साठा आढळून आला. शासनाने प्रतिबंधित केलेले सिंगल युज प्लास्टिक बाळगणे आणि त्याची विक्री करणे या कारणास्तव ही दंडात्मक कारवाई करण्यात आली. ही कारवाई महानगरपालिकेच्या आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात आली.

# जायकवाडी डाव्या कालव्यातील पाणी वापर संस्थांकडून ११.६५ लाखांची विक्रमी वसुली

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**जालना, दि. २८ :** जायकवाडी डाव्या कालव्यावरील वितरिका क्रमांक २३ व २४ परिसरातील पाणी वापर संस्थांनी उत्कृष्ट समन्वय, नियोजन आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्याच्या जोरावर वसुलीत उल्लेखनीय यश मिळवले आहे.

या दोन्ही वितरिकांमधील संस्थांकडून एकूण रु.१९, ६५. ६३४ इतकी विक्रमी वसुली करण्यात आली असून ही कामगिरी समाधानकारक व प्रेरणादायी ठरत आहे, वितरिका क्र.२४ अंतर्गत कार्यरत असलेल्या मत्स्योदरी, गोदावरी च जलसमृद्धी पाणी वापर संस्थांनी प्रभावी कार्यपद्धतीचा अवलंब करत अनुक्रमे १,७०,२५०, ४,१५,००० व २,१४,५९२अशी एकूण



७,९९,८४२ इतकी रकम वसूल केली आहे. गोदावरी पाणी वापर संस्थेचे विठ्ठलराव पघळ तसेच जलसमृद्धी पाणी वापर संस्थेचे राजेंद्र परदेशी यांनी शेतकऱ्यांशी सातत्यपूर्ण संपर्क ठेवत बसुली मोहीम यशस्वी केली. तसेच वितरिका क्र.२३ अंतर्गत कपिलेश्वर पाणी वापर संस्थेनेही सक्रिय भूमिका बजावत ३,६५,७९२ इतकी वसुली करून आपला मोलाचा वाटा उचलला आहे. या संस्थेचे लक्ष्मण कोपरे यांनी पुढाकार घेत शेतकऱ्यांचा विश्वास संपादन करत बेळेवर वसुली करण्यास प्राधान्य दिले, ज्यामुळे ही उल्लेखनीय कामगिरी साध्य झाली. दोन्ही वितरिकांवरील संस्थांनी एकत्रितपणे केलेल्या या वसुलीमुळे जलसंपदा विभागाच्या महसूल वाढीस मोठी

मदत झाली आहे. या निधीचा उपयोग पाणी व्यवस्थापन अधिक कार्यक्षम करण्यासाठी होणार असून सिंचन व्यवस्थेत सुधारणा होऊन भविष्यात शेतकयांना अधिक सक्षम व सुलभ सुविधा उपलब्ध होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

या उल्लेखनीय कामगिरीबद्दल सर्व संबंधित पाणी वापर संस्थांचे जलसंपदा विभागामार्फत कौतुक करण्यात आले आहे. तसेच यापुढेही अशाच प्रकारे समन्वय ठेवून वसुलीत वाढ करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. इतर संस्थांनीही या कामगिरीतून प्रेरणा घेऊन वसुलीत भर घालावी, असे आवाहन शाखाधिकारी कटकझोल यांनी केले आहे.

## मंठ्यात कुंटणखान्यावर छापा; दोघांविरुध्द गुन्हा दाखल

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**मंठा, दि. २८ :** मंठा शहरातील उस्वद रोडवरील तुकारामनगर भागात सुरू असलेल्या कुंटणखान्यावर पोलिसांनी छापा मारून कारवाई केली आहे. यात दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात मंठा पोलिस ठाण्यातील सतीश लक्ष्मणराव आमटे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी डमी ग्राहक पाठवून या व्यवसायाची खात्री केली.

### ड्रोनच्या साहाय्याने बिबट्या केला जेरबंद

**भोकरदन :** तालुक्यातील धावडा येथे वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी बिबट्याला जेरबंद केले. येथील समतानगरपासून अर्धा किलोमीटर अंतरावरील शिवारात ही कारवाई करण्यात आली. फत्तेपूर रोडच्या बाजूला मका कापणीसाठी गेलेल्या मजुरांना बिबट्या दिसला होता, त्याची माहिती वन विभागाला देण्यात आली. वन विभागाने ड्रोनच्या साह्याने शोध घेत हा बिबट्या जेरबंद केला. शुक्रवारी सकाळी येथील जुनेद सौदागर यांच्या शेतात मजूर मक्का कापणीसाठी गेले होते. त्यावेळी त्यांना शेजारच्या शेतातून एक बिबट्या सौदागर यांच्या कापणीच्या मका पिकात शिरताना दिसून आला होता.

## पारधी समाजातील महिलांना झालेल्या मारहाणप्रकरणी 'वंचित'चे आंदोलन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**जालना, दि. २८ :** तालुक्यातील पुणेगांव येथील पारधी समाजातील महिला मारहाण प्रकरणातील आरोपी व तालुका पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक संतोष साबळे यांच्या कडून सदर महिलेस जातीय व्देशातुन वागणूक दिल्याबद्दल जबाब न नोंदवणाऱ्यां दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, या प्रमुख मागणीसाठी जालना डीवायएसपी अनंत कुलकर्णी यांच्या कार्यालयासमोर वंचित बहुजन आघाडीच्यावतीने भव्य निदर्शने आंदोलनाचे आयोजन करण्यात आले होते. या आंदोलनाचे नेतृत्व वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा उपाध्यक्ष दिपक डोके यांनी केले. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा संघटक राजेंद्र



खरात, महिला जिल्हाध्यक्षा रमाताई होर्शिळ, सम्यक विद्यार्थी आंदोलन जिल्हाध्यक्ष सुरज सोनोवने, विष्णुकुमार शेळके तालुकाध्यक्ष भानुदास साळवे, अंबड तालुकाध्यक्ष किशोर तुपे, संजय आदमाने, सुशीलाताई गायकवाड, मैनाताई खंडागळे, निलाताई काकडे, विलास नरवडे, दिलीप मगर, गणेश खरात, शत्रुघ्न कोळी, अमोल लोखंडे, सत्यपाल गायकवाड, बुध्दाजी भोसले, कपिल सूर्यनारायण, शत्रूधन कोळी, दत्ता आदमाने, पांडुरंग मगर, सोनाली चव्हान, बिरजू भोसले, आलानबाई भोसले, सुनील चव्हाण, अर्केस्ट्रा बाई चव्हान, लक्ष्मी चव्हान, धनराज गिरी, हनुमंत मोर, परमेश्वर खरात, संजय सरोदे, माणिक पाढमुख, रविदास पाडमुख, पंडित पाडमुख, शरद वाघमारे, प्रकाश म्हस्के यांच्यासह पारधी समाजातील महिला व बांधव तसेच वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दोन दुचाकींची समोरासमोर धडक; एक ठार, तिघे गंभीर

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**जाफराबाद, दि. २८ :** दोन दुचाकींची समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात एक जण ठार तर तिघे गंभीर जखमी झाल्याची घटना जाफराबाद-टेंभुर्णी रोडवर शुक्रवारी दुपारी ४ वाजेच्या सुमारास घडली. जखमींची प्रकृती चिंताजनक आहे.

गाडेगव्हाण येथील तिघेजण दुचाकीने (एमएच २१ सीडी ६४१२) जाफराबादहून टेंभुर्णीकडे जात होते. त्याच वेळी समोरून जाफराबादकडे येणाऱ्या दुचाकी (एमएच २८ ५५०९) सोबत शहरालगतच्या खामखेडा पाटीजवळील वळणावर समोरासमोर जोरदार धडक झाली. दोन्ही दुचाकी भरधाव होत्या. चालकांना अंदाज न आल्याने हा अपघात घडल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. धडक इतकी भीषण होती की दोन्ही दुचाकी चक्काचूर झाल्या. चालक व मागील प्रवासी रस्त्यावर फेकले गेले. ते गंभीर जखमी झाले. या अपघातात मृत्यू पावलेल्याची ओळख पटलेली नव्हती. संजय हिवाळे (४५, रा. गाडेगव्हाण, ता.जाफराबाद), रामदास घोरपडे (६०, रा. गाडेगव्हाण, ता.जाफराबाद), संभाजी घोडे (२५, रा. गाडेगव्हाण, ता.जाफराबाद) अशी जखमींची नावे आहेत. ठार झालेला अनोळखी युवक विदर्भातील बुलढाणा जिल्ह्यातील असावा, असा अंदाज वर्तवला जात आहे. दुचाकीवर तो एकटाच होता. जखमी तिघे गाडेगव्हाणचे होते.

## बस-दुचाकीच्या धडकेत तरुण जागीच ठार

**जालना :** भरधाव बस व दुचाकीची समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात दुचाकीवरील तरुण जागीच ठार झाल्याची घटना जालना शहरातील छत्रपती संभाजी उद्यानाजवळील रेल्वे ओव्हरब्रिजवर शुक्रवारी घडली. आदिब अकील शेख (१८, शेरसवारनगर, जालना) असे मृत तरुणाचे नाव आहे.जळगाव आगाराची जालना-लातूर एसटी बस (एमएच २० बीएल २४२३) अंबडहून जालन्याकडे येत होती. दुचाकीस्वार (एमएच २१ सीई २९४५) तरुण एका मित्रासोबत अंबड चौफुलीकडे जात होता. रेल्वे ओव्हरब्रिजवर बस व भरधाव दुचाकीची समोरासमोर धडक झाली. बसच्या धडकेत दुचाकीवरील आदिब शेख गंभीर जखमी झाला. स्थानिकांनी त्याला जिल्हा सामान्य रुग्णांलयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासून त्यास मृत घोषित केले. या प्रकरणी कदीम पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

## थकित करापोटी मनपाने केल्या चार मालमत्ता सील

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**जालना, दि. २८ :** थकित करापोटी जालना शहर महानगर पालिकेने शहरातील चार मालमत्ताधारकांच्या मालमत्ता सील केल्या आहेत. शुक्रवारी दुपारी ही कारवाई करण्यात आली.

शेख नदीम नबी शेख थकबाकी १ लाख ७२ हजार ४९, अलफिया बानो म.अफरोज डड्डा ९९ हजार ८२४ तसेच नवीन एमआयडीसी भागातील मारूती स्टील कंपनीकडे ६ लाख १५१०, जालना इंडस्ट्रीजकडे ५ लाख ६ हजार ६२४ इतर कर थकल्याने सदर मालमत्तांना सील करण्यात आले आहे.

महानगर पालिकेने आत्तापर्यंत ५५ मालमत्तांना सील ठोकले असून त्यापैकी ४७ मालमत्ताधारकांनी थकित कराचा भरणार केला आहे तर आठ जणांचे सील कायम आहेत. ही कारवाई आयुक्त आशिमा मित्तल यांच्या सूचनेनुसार व अतिरिक्त आयुक्त अर्जुन गिराम यांच्या मार्गदर्शनाखाली पथक प्रमुख त्र्यंबक कांबळे, सहाय्यक आयुक्त अपर्णा जाधव, कर अधिकारी राहुल देशमुख, कर निरीक्षक सुधील डहाळे, अमृत जैस्वाल, विनोद कुरील यांनी केली.

## शेती कामासाठी कॅनमध्ये डिझेल देण्याची मागणी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**जालना, दि. २८ :** शेतीकामासठी ट्रॅक्टर तसेच जेसीबी व शेतीकामासाठी चालणाऱ्या वाहनांसाठी कॅनमध्ये डिझेल द्यावे, अशी मागणी किसान काँग्रेसने जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. किसान काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष नारायण वाढेकर यांनी जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांना निवेदन सादर केले.

सध्या शेतात नांगरणी व इतर मशागतीच्या कामासाठी ट्रॅक्टर जे.सी.बी. व छोटी डिझेलवर चालणारी वाहने वापरली जात आहेत; परंतु, इंधन टंचाई आणि ती वाहने पंपावर आणणे जिल्हा पुरवठा विभागाने बंधनकारक केले आहे. त्यामुळे शेती कामावर परिणाम होत आहे. शेतकऱ्यांची गैरसोय टाळण्यासाठी आणि शेती कामासाठी ट्रॅक्टर, जे.सी.बी प्रत्यक्ष वापरता यावीत यासाठी कॅनमध्ये इंधन द्यावे, अशी मागणी वाढेकर यांनी केली आहे.

## भटक्या-विमुक्त समाजाचा जनआक्रोश मोर्चा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अंबड, दि. २८ :** भटके विमुक्त समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी शुक्रवारी अंबड येथील तहसील कार्यालयावर जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. विविध मागण्यांचे निवेदन तहसील प्रशासनाला यावेळी देण्यात आले.

मत्स्योदरी देवी मंदिर प्रवेशद्वारापासून या मोर्चाला सुरुवात झाली. छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापर्यंत निघालेल्या या मोर्चात समाजातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला. भटक्या विमुक्त समाजासाठी एन.टी./डी.एन.टी. जातीनिहाय जनगणनेचा स्वतंत्र कॉलम तयार करण्यात यावा, समाजाला घटनात्मक आरक्षण देऊन एस.सी./एस.टी. आयोगाच्या धर्तीवर स्वतंत्र घटनात्मक आयोग स्थापन करावा, फिरस्ती ओळख प्रमाणपत्र, आधार कार्ड आणि रेशन कार्ड यांसारखी कागदपत्रे एकाच छताखाली शिबिर घेऊन उपलब्ध करून द्यावीत आदी मागण्या यावेळी करण्यात आल्या.

या मोर्चात डॉ.अभय जाधव, धर्मराज बाबर, गुलाब तुराब सय्यद, शाहरुख सय्यद, राजू सुर्वे यांच्यासह समाजबांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी तहसील कार्यालयासमोर मोर्चाचे रूपांतर सभेत झाले. मागण्यांची दखल घेतली नाही तर भविष्यात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला.

**स्मरण** जालना शहरात बहुजन समाज पार्टीच्यावतीने पुढाकार

# मस्तगड परिसरात सम्राट अशोक जयंती उत्साहात साजरी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**जालना, दि. २८ :** येथील मस्तगड परिसरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे जंबूद्वीपातील प्रियदर्शी महान सम्राट चक्रवर्ती राजा अशोक यांची २०३० वी जयंती बहुजन समाज पार्टीच्यावतीने उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात सर्वप्रथम डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास बसपाचे प्रमोद खरात यांनी पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर सम्राट अशोक यांच्या प्रतिमेस जिल्हाध्यक्ष अनिल चित्तेकर यांनी पुष्पहार अर्पण केला. यावेळी उपस्थितांनी "सर्वजन हिताय, सर्वजन सुखाय" या समतेच्या तत्त्वाचा उच्चार करत मानवकल्याणाचा संदेश दिला.

याप्रसंगी जिल्हाध्यक्ष चितेकर व प्रमोद खरात यांनी मार्गदर्शन



करताना सांगितले की, मौर्य साम्राज्य हे भारतातील अत्यंत प्रगत, संघटित आणि लोककल्याणकारी राज्य म्हणून ओळखले जाते. सम्राट अशोक यांच्यावर तथागत गौतम बुद्धांच्या करुणा, प्रज्ञा आणि समतेच्या विचारांचा प्रभाव पडला होता. त्यांनी आपल्या पुत्र महेंद्र व कन्या संघमित्रा यांना धम्मप्रसारासाठी समर्पित करून बौद्ध धम्माचा जगभर प्रसार केला. त्यांच्या राज्यात मानवांसोबतच पशु-पक्ष्यांचीही विशेष काळजी घेतली जात होती. अशोकांचा काळ हा भारताचा 'स्वर्णयुग' काळ म्हणून संबोधला जातो. सामाजिक कार्यकर्ते व बसपा युवा नेते राहुल सत्यनारायण करनाडे यांनी आपल्या भाषणात नमूद केले की, मान्यवर कांशीराम यांनी सम्राट अशोकांच्या न्याय, समता व लोककल्याणावर आधारित युगाचे स्वप्न पाहिले होते. "मेरे सपनों का भारत, सम्राट अशोक का भारत" हे स्वप्न साकार करण्यासाठी संघटन, जागृती आणि राजकीय सहभाग आवश्यक आहे. सम्राट अशोक तुम्हारा मिशन अधूरा, बीएसपी करेगी पूरा, असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन राहुल करनाडे यांनी केले. प्रास्ताविक दिलीप हिवाळे यांनी केले तर समारोप जिल्हा सचिव भैय्यासाहेब साळवे यांनी केला.

या कार्यक्रमास बसपाचे शेख फ रोज, अर्जुन अशोक वाहुळे, मधुकर गंगावणे, अशोक वाहुळे, भोकरदन विधानसभा अध्यक्ष सुखदेव हिवाळे, चंद्रमुनी गाडेकर, भरत मेहत्रे, ज्ञानेश्वर हिवाळे, घनश्याम हळदे, सचिन सदाशिव आदी कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी

**"जय भीम ! जय भारत !"**

**"सम्राट अशोक तुम्हारा मिशन अधूरा, बीएसपी करेगी पूरा!"**

**"मेरे सपनों का भारत, सम्राट अशोक का भारत!"**

अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता.

## बौद्ध महासभा घनसावंगी तालुकाध्यक्षपदी पटेकर तर महासचिवपदी गायकवाड यांची निवड



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**जालना, दि. २८ :** जिल्ह्यातील घनसावंगी तालुक्याची कार्यकारणी जाहीर करण्यात आली. दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया तथा भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.राजरत्न आंबेडकर यांच्या मार्गदर्शनानुसार जालना जिल्ह्यातील घनसावंगी तालुक्यातील ढाकेफळ येथील धम्मालय महाविहारात बैठक संपन्न झाली.

मराठवाडा विभागीय महासचिव भास्कर घेवंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत, जालना जिल्हाध्यक्ष संजय हेरकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत घनसावंगी तालुका कार्यकारणी गठित करण्यात आली. सर्वप्रथम चक्रवर्ती सम्राट अशोक यांची जयंती साजरी करून पंचशील घेऊन सदर कार्यकारणीची निवड करण्यात आली. घनसावंगी तालुकाध्यक्षपदी बाळासाहेब पटेकर, उपाध्यक्ष कैलास जाधव, सुरेश गरड, महासचिव बाबासाहेब गायकवाड, कोषाध्यक्ष अंबादास शरणागत, सचिव सुनिल तुपसुंदर, संस्कारप्रमुख शिवाजी वाहुळे, विहार समन्वयक अशोक शिंदे, संघटक विलास जाधव, सहसचिव गणेश म्हस्के, सदस्य दिपक हराळे, विठ्ठल येडे आदिंची निवड करण्यात आली. यावेळी जालना जिल्हा महासचिव राजकुमार दांडगे, जयकुमार खरात, अण्णासाहेब बाळराज, राहूल येडे, शेषराव पटेकर, संदिप येडे, भागवत येडे, अंबादास येडे यांची उपस्थिती होती.

अजिंक्य भारत

# आपलं अमरावती

अमरावती, रविवार, २९ मार्च २०२६

## थोडक्यात

### लक्ष्मी नारायण मंदिरातून ऐवज लंपास

वरूड : तालुक्यातील ग्राम लोणी येथील लक्ष्मी नारायण मंदिरात २३ मार्च रोजी मध्यरात्रीनंतर कोणीतरी अज्ञात चोरट्याने मंदिराचे कुलूप तोडून मंदिराच्या गाभाऱ्यात प्रवेश केला. गाभाऱ्यातील पितळच्या दोन मोठ्या समया, तांब्याचे मोठे गंगाळ, तांब्याचा गडवा, तांब्यांचे ग्लास व चम्मच, आरतीचे पितळी ताट, पितळी दोन पंचआरत्या, पितळी नंददिप, पितळचे २० टाळ व दानपेटीतील ७०० रुपायांची रोकड असा एकूण २१,७०० रूपयांचा मुद्देमाल चोरट्यांनी लंपास केला.

### चिंचरगव्हान येथून गुरांची चोरी

वरूड : तालुक्यातील ग्राम चिंचरगव्हान येथील विशाल वामन बांबल यांच्या घरासमोरील गोठ्यातील १ लक्ष ३९ हजार रूपयांच्या एकूण ११ बकऱ्यासह ४ बोकड २४ मार्चच्या रात्री कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी २५ मार्च रोजी फिर्यादीने वरूड पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. त्या अनुसार अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

### वरूड उपविभागीय कार्यालय फोडले

वरूड : शहरातील महावितरणच्या उपविभागीय अभियंता कार्यालयात २३ मार्च रोजीच्या रात्री उपविभागीय कार्यालयाचे शटर अज्ञात चोरट्यांनी उघडून लाकडी कपाटातील लोखंडी पेटीतील ३ लाख २२ हजार ७४० रूपये रोख व एक ३५ हजार ८४० रुपयांचा लिहिलेला धनादेश असा एकूण ३ लक्ष २२ हजार ७४० रुपयांचा मुद्देमाल चोरुन नेला आहे. याप्रकरणी उपविभागीय अभियंता अभिजित अरविंद फरकाडे यांनी वरूड पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. त्या आधारे अज्ञात चोरट्यांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

### तळेगाव-बाघापूर मार्गावर वाळूचा ट्रक पकडला

धामणगाव रेल्वे : तळेगाव-बाघापूर मार्गावर वाळूची अवैध वाहतूक करणारा ट्रक तळेगाव दशासर पोलिसांनी पकडून त्यातील ४ ब्रास वाळूसह वाहन असा ५.२० लाखांचा मुद्देमाल हस्तगत केला. पोहेकॉ जितेंद्र राऊत यांच्या फिर्यादीवरून आशिष सुभाष कारमोरे, सुरज चौधरी, कार्तीक राऊत, पवन दानफुले, सौरभवरठी यांच्या विरूध्द तळेगाव दशासर पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

### महिलेच्या दागिन्यांची पर्स लंपास

तिवसा : कपडे खरेदीसाठी ऑटोरिक्षाने बिझीलॅन्ड येथे आलेल्या एका महिलेचे २१ ग्रॅम सोने किंमत अंदाजे ६२ हजार असलेली पर्स अज्ञाताने चोरून नेल्याची घटना २५ मार्च रोजी उघडकीस आली. याप्रकरणी मालिनी देविदास खाकसे वय ६०, रा. शिवनगरी, तिवसा यांच्या तक्रारीवरून तिवसा पोलीस ठाण्यात अज्ञात चोराविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

या घटनेचा पुढील तपास तिवसा पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली तिवसा पोलीस करीत आहे.

### अंगणातून दोन बकऱ्यांची चोरी

अंजनगाव सुर्जी : अंगणासमोरील रस्त्यावर बांधून ठेवलेल्या २४ हजार रूपये किंमतीच्या दोन बकऱ्या अज्ञात चोराने चोरून नेल्याची घटना नवगज्जी प्लॉट, अंजनगाव येथे घडली. याप्रकरणी शाहरूख खान यांच्या तक्रारीवरून अंजनगाव सुर्जी पोलीस ठाण्यात अज्ञात चोराविरूध्द गुन्हा दाखल केला.

# प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसन जागेवरच 'ले-आऊट'चा घाट!

## ग्रामस्थ संतप्त: पेढी बॅरेज प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनात पुन्हा खोडा

अजिंक्य भारत| प्रतिनिधी



**अमरावती, दि.२८ :** गेल्या १५ वर्षांपासून पुनर्वसनाच्या प्रतीक्षेत असलेल्या पेढी बॅरेज प्रकल्पग्रस्त रोहनखेडा आणि पर्वतापूरच्या ग्रामस्थांची प्रशासनाकडून पुन्हा एकदा फसवणूक होत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. ज्या जमिनीवर प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन प्रस्तावित आहे, त्याच जमिनीवर आता खासगी लेआऊट पाडण्याचा डाव रचला जात असल्याचा आरोप प्रकल्पग्रस्तांनी केला आहे. या गंभीर प्रकारामुळे संतप्त ग्रामस्थांनी थेट जिल्हाधिकारी कार्यालय गाठून प्रशासनाला जाब विचारला.

पेढी बॅरेज प्रकल्पामुळे रोहनखेडा व पर्वतापूर ही गावे पूर्णत: बाधित झाली आहेत. या गावांच्या पुनर्वसनासाठी मौजा रामगाव येथील शेत सर्व्हे नंबर ११९ मधील ८.७१ हेक्टर जमिनीचे भूसंपादन करण्याचे प्रशासनाने निश्चित केले होते. उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) यांच्या आदेशानुसार या जमिनीवर भूसंपादन कायदा २०१३ च्या कलम ११, १९ आणि २१ नुसार कायदेशीर प्रक्रिया पूर्ण होऊन अधिसूचनाही काढण्यात आली होती. प्रशासकीय प्रक्रियेनुसार, ज्या ठिकाणी प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन होणे अपेक्षित आहे, त्याच सर्व्हे नंबर ११९ च्या जमिनीवर सध्या जमिनीचे सपाटीकरण सुरू करण्यात आले आहे. धक्कादायक बाब म्हणजे, या जागेवर खासगी लेआऊट मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव नगररचना विभागाच्या संचालकांकडे पाठवण्यात आल्याची माहिती उघड झाली आहे. ज्या जागेवर आमचे पुनर्वसन होणार होते, तिथेच लेआऊट पाहून आमचे हक्क हिरावले सहायक जात आहेत, असा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. पुनर्वसनासाठी प्रस्तावित असलेल्या जागेवर लेआऊट पाडण्याचे काम सुरू असल्याचे समजताच रोहनखेडा आणि पर्वतापूरच्या ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली. २०११ पासून केवळ आश्वासने देणाऱ्या प्रशासनाने आता चक्क भूधारकाशी हातमिळवणी केल्याचा संशय व्यक्त होत आहे. यावेळी सरपंच वीणा भिलकर, उपसरपंच राजेश तायडे, सतीश गोटे, किशोर भिलकर, संजय भिलकर, किरण बरवट, दीपक सरोदे, सचिन ठोंबरे आणि प्रणव तायडे यांच्यासह शेकडो ग्रामस्थांनी निवासी उपजिल्हाधिकारी व नगररचना विभागाच्या अधिकाऱ्यांना निवेदन देऊन वस्तुस्थिती मांडली.जर या जमिनीवर लेआऊट मंजूर झाला किंवा बेकायदेशीर सपाटीकरण थांबले नाही, तर पेढी बॅरेजचे काम पूर्णत: बंद पाडण्याचा इशारा प्रकल्पग्रस्तांनी दिला आहे. भविष्यात काही अघटित घडल्यास त्याला सर्वस्वी जिल्हा प्रशासन जबाबदार राहील, असेही निवेदनात ठणकावून सांगण्यात आले आहे. प्रशासनाच्या या दुटप्पी भूमिकेमुळे प्रकल्पग्रस्तांच्या जखमेवर मीठ चोळले गेले असून, आता जिल्हाधिकारी यावर काय भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### ते काम बंद केले

प्रकल्पबाधितांच्या आरोपांनुसार प्रत्यक्ष पाहणी केली असता, सपाटीकरणाचे काम दिसून आले. ते काम बंद करण्यात आल्याची माहिती उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) प्रसन्नजित चव्हाण यांनी दिली. कलम ११ नुसारच त्या जागेचा कुठलाही व्यवहार करता येत नाही. या प्रकरणात कलम ११, १९ व २१ ची नोटीस प्रसिद्ध करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

# चित्रा कॉलनीत देहविक्रीचा पर्दाफाश

अजिंक्य भारत| प्रतिनिधी



**अमरावती, दि.२८ :** शहरातील दस्तुरनगर परिसरात सुरू असलेल्या अनैतिक देहविक्री रॅकेटवर पोलिसांनी थेट हल्ला चढवत मोठी कारवाई केली. चित्रा कॉलनीतील घरात सुरू असलेला हा अवैध धंदा महिला सेल, अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष आणि दामिनी पथकाने संयुक्त छाप्यात उद्ध्वस्त केला. या कारवाईत तीन महिला आणि एका पुरुषाला ताब्यात घेण्यात आले असून संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे.

गुप्त माहितीवरून पोलिसांनी आखलेला हा सापळा अत्यंत नियोजनबद्ध होता. दोन बनावट ग्राहक (पंटर) पाठवून व्यवहाराची खात्री करताच पोलिसांनी थेट धाड टाकली आणि रॅकेटचा पर्दाफाश केला अवघ्या काही मिनिटांत सुरू असलेला हा अवैध व्यवसाय पोलिसांच्या कारवाईने कोलमडून पडला. कारवाईदरम्यान सुदेश शेंडे (वय २२, रा. राहुलनगर) याला ताब्यात घेण्यात आले असून त्याच्यासह एका महिला आरोपीविरुद्ध फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात पिटी ॲक्ट अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच घटनास्थळी सापडलेल्या अन्य दोन महिलांची चौकशी सुरू आहे.

१२०० रुपयांत ग्राहकांना देहविक्री चालत असल्याचे धक्कादायक वास्तव प्राथमिक तपासात या ठिकाणी ठराविक दराने, सुमारे १२०० रुपयांमध्ये देहविक्रीचा व्यवसाय समोर आले आहे. एकीकडे सामान्य वस्ती, दुसरीकडे घराच्या आडून सुरू असलेला हा अवैध व्यापार पोलिस तपासात स्पष्टपणे उघड झाला आहे. या संपूर्ण रॅकेटचा सूत्रधार घरमालकच असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. बाहेरून सामान्य दिसणाऱ्या या घरातूनच अवैध धंद्याचे जाळे पसरविले जात असल्याची माहिती पुढे येत आहे.पोलिस आता या संपूर्ण नेटवर्कच्या गुळाशी जाण्यासाठी तपास अधिक तीव्र करत आहेत. ही कारवाई पोलीस निरीक्षक दिप्ती ब्राम्हणे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. एपीआय मेघाली गावंडे, पोलीस हवालदार राजेश यादव तसेच दानिनी पथकातील कर्मचाऱ्यांनी निर्णायक भूमिका बजावली. अमरावती पोलिसांच्या या धडाकेबाज कारवाईने अवैध धंदेवाल्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, शहरातील अशा रॅकेटवर पुढील काळात आणखी कठोर कारवाई होणार असल्याचे स्पष्ट संकेत गिळत आहेत.

# पाणीटंचाईच्या ५८ प्रस्तावांना जिल्हाधिकाऱ्यांची मान्यता

## जिल्हा परिषदेकडून नळ योजनांच्या विशेष दुरुस्तीचे अंदाजपत्रके प्राप्त



अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि.२८ :** मार्च महिन्यातच उन्हाच्या झळा लागल्याने पाणीटंचाईची तीव्रता वाढणार आहे. या पार्श्वभूमीवर नळ योजनांच्या विशेष दुरुस्तीसाठी जिल्हा परिषद सीईओ कार्यालयाकडून ५८ अंदाजपत्रकांचे प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी जिल्हा प्रशासनाकडे सादर झाले होते. या सर्व प्रस्तावांना जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

पाणीटंचाईच्या कामांना ३० लाखांपर्यंत प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार शासनाद्वारा जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहेत. त्यानुसार हे प्रस्ताव जिल्हा प्रशासनाकडे प्राप्त झाले होते. याशिवाय पाणीटंचाईच्या उपाययोजनां संदर्भात ५० लाखांपर्यंत प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार विभागीय आयुक्तांना असल्याचे प्रशासनाने सांगितले.

जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाद्वारा जिल्ह्यातील संभाव्य पाणीटंचाई निवारणार्थ कृती आराखडा तयार केला आहे. त्यानुसार ज्या गावांना पाणीटंचाईची झळ पोहोचण्याची शक्यता आहे. तेथे उपाययोजना केल्या जाणार आहे.सद्य:स्थितीत चिखलदरा तालुक्यात मोथा येथे तीन टँकरद्वारा पाणीपुरवठा करण्यात येत आहे. या ठिकाणी मजीप्रामार्फत जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठ्याची कामे प्रगतीत असले तरी अद्याप पूर्ण झालेले नाही. याशिवाय मोर्शी तालुक्यात गणेशपूर व दाभेरी तसेच मोथा येथे बोअरवेलचे अधिग्रहण करून गावांना पाठपुरवठा करण्यात येत असल्याचे प्रशासनाने सांगितले. टंचाईच्या गावांमध्ये उपाययोजनांसाठी यंत्रणांद्वारा अंदाजपत्रक तयार केले जातात व प्रशासकीय मान्यतेनंतर निविदा प्रक्रिया पार पडते. त्यामुळे यंदा कामांना लवकरच सुरुवात होणार आहे.

### खासगी विहिरींचे अधिग्रहण वाढणार

पाणीटंचाई निवारणार्थ अनेकदा खासगी विहिरींचे अधिग्रहण करण्यावर भर दिल्या जातो. यावर्षदिखील मार्चपश्चात अनेक गावांमध्ये या प्रकारच्या उपाययोजनांवर भर दिल्या जाईल.

# जावयाकडून अल्पवयीन मेहुणीचे लैंगिक शोषण

अजिंक्य भारत| प्रतिनिधी



**अमरावती, दि.२८ :** बहिणीच्या घरी राहायला आलेल्या अल्पवयीन साळीचे जावयाने लैंगिक शोषण केल्याने तीला गर्भधारणा राहिली. दरम्यान कुटुंबातील सदस्याने बदनामी होऊ नये, यासाठी तिचे घाईने - एका तरुणासोबत लग्न सुध्दा केले. त्यामुळे तिच्या - पतीनेही अल्पवयीन मुलीशी शारीरीक संबंध प्रस्थापीत - केले. हा धक्कादायक प्रकार मुलीला प्रसव वेदना सुरु - झाल्यानंतर रुग्णालयात उघडकीस आला. - याप्रकरणात पोलिसांनी तिच्या पतीसह तिघांविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी जून २०२५ मध्ये पावसाळ्याच्या दिवसांत कामासाठी आपल्या बहिणीच्या घरी गेली होती. तिथे वास्तव्यास असताना तिच्या जावयाने तिच्या असहायतेचा - फायदा घेत तिच्यावर अनेक वेळा जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केले. या सततच्या अत्याचारामुळे पीडित मुलगी ७ महिन्यांची गरोदर राहिली. ही बाब जेव्हा मुलीने आपल्या आईला सांगितली, तेव्हा समाजात बदनामी होईल, या भीतीने आईने पीडितेचे घाईघाईत लग्न लावून दिले. लग्नानंतर तिच्या पतीनेही तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. पीडितेच्या प्रसूतीची वेळ जवळ आल्याने तिला अकोला येथील एका शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रसूती प्रक्रियेदरम्यान कागदपत्रांची पूर्तता करताना पीडितेचे आधार कार्ड तपासले असता, प्रशासनाच्या लक्षात आले की तिचे वय केवळ १६ वर्षे आहे. ही बाब अत्यंत गंभीर असल्याने रुग्णालय प्रशासनाने तातडीने अकोल्यातील रामदासपेठ पोलीस ठाण्याला याची माहिती दिली.

अकोला पोलिसांनी तत्काळ रुग्णालयात पोहोचून पीडितेचा जबाब नोंदवला. पीडितेने दिलेल्या जबाबाच्या आधारे, रामदासपेठ पोलिसांनी दीर, पती आणि लग्नाशी संबंधित अन्य एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ही घटना अमरावती जिल्ह्यातील धारणी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडल्याने, अकोला पोलिसांनी हा गुन्हा पुढील तपासासाठी धारणी पोलिसांकडे वर्ग केला आहे. सध्या धारणी पोलीस या प्रकरणाचा सखोल तपास करत आहे.

# वनोजा बाग येथे शेतकऱ्याची आत्महत्या

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि.२८ :** शेतीतील सततचे नुकसान, कुटुंबातील आजारपण आणि वाढत्या आर्थिक संकटाच्या ओझ्याने आणखी एक तरुण शेतकरी जीवनाच्या टोकाला पोहोचल्याची हृदयद्रावक घटना तालुक्यातील वनोजा बाग येथे घडली आहे. ३२ वर्षीय सागर रामदास सोनावणे या तरुण शेतकऱ्याने घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. सागर सोनावणे याच्याकडे केवळ २ एकर शेती होती. मात्र वारंवार होणारे पीक नुकसान आणि अल्प उत्पन्न यामुळे कुटुंबाचा उदरनिर्वाह दिवसेंदिवस कठीण होत चालला होता. त्यातच कुटुंबावर संकटांची मालिकाच कोसळली होती. काही दिवसांपूर्वीच वडिलांचे आजारपणामुळे निधन झाले होते, तर दोन वर्षांपूर्वी रस्ते अपघातात भावाचा मृत्यू झाला होता. घरातील या सलग दु:खद घटनांनी सागर पूर्णपणे खचला होता. त्यातच त्याची आई गंभीर आजारी असून सध्या दर्यापूर उपजिल्हा रुग्णालयात उपचार घेत आहे. तिच्या उपचाराचा वाढता खर्च आणि आर्थिक ताण सागरच्या मनावर मोठा आघात करत होता.बुधवार (२५ मार्च) रोजी सागरने रुग्णालयात जाऊन आईची भेट घेतली होती. मात्र दुसऱ्या दिवशी सकाळपासून त्याच्याशी संपर्क होऊ शकला नाही.

**उपक्रम** राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्यावतीने सामाजिक कार्याचा परिचय

# छत्रपती संभाजी महाराज चौकात थाटली दादा स्मृती पाणपोई






अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि.२८ :** सद्या कडाक्याची ऊन तापत असून रखरखत्या उन्हाने जीवाची लाही लाही होत आहे. अशावेळी तृष्णा-तृप्तीसाठी वाटसरुंची भटकंती होऊ नये, म्हणून पाणपोई थाटण्यात येत आहे. अशाच रीतीने अमरावती शहर राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने आपल्या सामाजिक कार्याचा परिचय देत छत्रपती संभाजी महाराज चौक नवसारी रिंगरोड येथे दादा स्मृती पाणपोई थाटण्यात आली. श्रीरामनवमीच्या पावन पर्वावर या पाणपोईचा शुभारंभ करण्यात आला. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते आमदार -संजय खोडके व अमरावतीच्या आमदार -सौ. सुलभाताई खोडके यांच्या मार्गदर्शनात राष्ट्रवादी युवक काँग्रेस हि अमरावती शहरात सामाजिक कार्य व विविध उपक्रम राबविण्यात अग्रणी असून महाराष्ट्र राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री लोकनेता स्व. अजितदादा पवार यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दादा स्मृती पाणपोई च्या माध्यमातून अजितदादांच्या स्मृतीचे जतन करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष ऋतुराज राऊत, सामाजिक कार्यकर्ता संकेत महल्ले राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष- आकाश हिवसे, अभिमन्यू तायवाडे, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे शहर अध्यक्ष संकेत बोके, रायुकॉ शहर उपाध्यक्ष मनीष पाटील, राष्ट्रवादी युवक काँग्रेस अमरावती विधानसभा अध्यक्ष- प्रमोद धनाडे, अभिलाष नलोडे, सार्थक खोरगडे, जयेश सोनोने, प्रथमेश बोके, मनीष फाटे, सुजल तेलखडे, सागर इंगळे, अभिजित लोयटे, तेजस पोटे, धिरज तायडे, पंकज शर्मा , अक्षय पळसकर, पंकज खंडाळकर , आदेश भोकरे, ऋतुराज साबळे, वैभव वऱ्हाडे , तौसिफ हुसेन, प्रणव हिवसे , सारंग देशमुख, शिवकुमार कैथवास, दीपक खंडारे, सर्वेश खेडकर, शास्वत मालपे , अमोल गुल्हाने , राहुल इंगोले, रोशन शेनोडे, सोमेश्वर रोहणकर , आदींसह राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे पदाधिकारी व सर्व सहकारी उपस्थित होते.

# विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांची मुंबई येथे बदली

अजिंक्य भारत| प्रतिनिधी





**अमरावती, दि.२८ :** अमरावतीच्या वर्तमान विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांची मुंबई येथे बदली करण्यात आली असून राज्य शासनाने याबाबत अधिकृत आदेश जारी केला आहे. त्या आता मुंबईत महत्त्वाची प्रशासकीय जबाबदारी स्वीकारणार आहेत. त्यांच्या जागी पुणे येथील वरिष्ठ अधिकारी नयना गुंडे यांची अमरावती विभागीय आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. नयना गुंडे या अमरावती विभागीय आयुक्तपदी सलग रुजू झालेल्या तिसऱ्या महिला आयुक्त आहेत. यापुर्वी डॉ. निधी पांडे, श्वेता सिंगल यांनी अमरावतीच्या विभागीय आयुक्त म्हणून जबाबदारी पाहिली. सूत्रांच्या माहितीनुसार, हा बदल प्रशासकीय फेरबदलाचा भाग असून अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. श्वेता सिंघल यांच्या कार्यकाळात अनेक महत्त्वपूर्ण योजना गतिमान झाल्या होत्या. आता नवीन आयुक्तांकडूनही विकासकामांना नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा प्रशासनात व्यक्त केली जात आहे.

अजिंक्य भारत
# आपलं अमरावती
अमरावती, रविवार, २९ मार्च २०२६


## थोडक्यात

### संशयितरित्या फिरणारा पोलिसांच्या ताब्यात

अमरावती : साईनगरात नितीन विहार परिसरात गुन्हा करण्याच्या उद्देशाने संशयितरित्या फिरणाऱ्यास पोलिसांनी गस्तीदरम्यान ताब्यात घेतले. स्वप्नील मनोज इथापे वय २६, रा. विठ्ठल वाडी वडरपुरा, ता. आष्टी जि. वर्धा असे त्याचे नाव आहे. पोहेकॉ सुधीर प्रांजळे यांच्या फिर्यादीवरून बडनेरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

### मिटरमध्ये छेडछाड करून वीजचोरी

अमरावती : चपराशीपुरा येथे एका रेस्टारंन्टमध्ये मिटरमध्ये छेडछाड करून वीज चोरी केल्याचे भरारी पथकाच्या धाडीत उघड झाले. एकूण १६ हजार ७०० रूपयांची वीज चोरी केल्याप्रकरणी अझररूद्दीन अजोजद्दीन वय ३९ याच्याविरूध्द बडनेरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. महावितरणच्या भरारी पथकातील श्रीकांत तळेगावकर यांनी याप्रकरणी तक्रार दाखल केली.

### जुगार अड्डयावर धाड

अमरावती : वलगाव येथे जुगारावर धाड घालून खुशाल गणपत भांबूरकर याला रंगेहात ताब्यात घेत त्याच्याजवळून जुगार साहित्यासह ६०० रूपयांचा मुद्देमाल हस्तगत करून गुन्हा दाखल करण्यात आला.

### दारू विक्रेत्यावर कारवाई

अमरावती : देशी दारूची अवैध विक्री करणाऱ्या निलेश मकेश्वर याला ताब्यात घेत त्याच्याजवळून ७२० रूपयांच्या देशी दारू बॉटल्स जप्त करून गुन्हा नोंदविला. वलगाव पोलिसांनी ही कारवाई केली.

### अल्पवयीन मुलीची आत्महत्या

अमरावती : संत कबीरनगरात १७ वर्षीय एका मुलीने राहत्या घरात गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना २४ मार्च रोजी घडली. याप्रकरणी गाडगेनगर पोलिसांनी मर्ग दाखल केला असून पुढील तपास सुरू केला आहे.

### सुर्योदय चौकात इसमाचा मृतदेह आढळला

अमरावती : सुर्योदय चौक परिसरात बसण्याच्या ओट्यावर अंदाजे ३५ ते ४० वय वर्ष असलेला एक अनोळखी इसम मृतावस्थेत आढळून आल्याची घटना उघडकीस आली. घटनेची माहिती मिळताच राजापेठ पोलिसांनी पोहचून मृतदेह उत्तरीय तपासणीकरीत सरकारी रूग्णालयात हलविला. याप्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद घेतली.

### इसमाची गळफास लावून आत्महत्या

अमरावती : एका ४५ वर्षीय इसमाने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना राजापेठ पोलीस ठाणे हद्दीत घडली. संतोष किसन सौदागर असे आत्महत्या केलेल्या इसमाचे नाव आहे. याप्रकरणी राजापेठ पोलिसांनी मर्ग दाखल केला आहे. सदर इसमाने आत्महत्या का केली याचे कारण स्पष्ट होवू शकले नाही. पोलीस पुढील तपास करीत आहेत.

### बेनोड्यात वाळूची वाहतूक करणारा टिप्पर जप्त

वरूड: बेनोडा पोलिस स्टेशन हद्दीतील माणिकपूर, धामणधस चौफुलीवर वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्या टिप्परवर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने करून २६ लाखांचा मुद्देमाल जप्त करून तिघांवर गुन्हा दाखल केला आहे. गेल्या दहा दिवसातील ही दुसरी कारवाई आहे. पोलिसांनी मंगळवारी सकाळी ६ वाजता माणिकपूर, धामणधस चौफुलीवर नाकाबंदी केली. या दरम्यान एमएच ४० सीडी ६२०० क्रमांकाचा टिप्पर थांबवण्यात आला.

# मोर्शी शहरातील आठवडी बाजार भरतो गल्लीबोळात!

## बाजारातील ओटे मात्र रिकामे, वाहतुकीला त्रास, नागरिकांना अडचणी

अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**मोर्शी, दि.२८ :** शहरात गेल्या अनेक वर्षापासून आठवडी बाजार हा मंगळवारीच भरत असतो. मागील २० ते २५ वर्षापासून आठवडी बाजारातील छोट्या-मोठ्या दुकानदारांना दुकाने लावण्याची नगरपालिकेने कोणतीच व्यवस्था न केल्यामुळे पावसाळ्याच्या दिवसात आठवडी बाजार हा चिखलात भरत होता. त्यामुळे बाजारात खरेदी करण्याकरिता आलेल्या ग्राहकांना व दुकानदारांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. सन २०१४ मध्ये तत्कालीन आमदार डॉ. अनिल बोंडे यांनी आठवडी बाजारातील ओटे बांधकामाकरिता कोट्यवधी रुपयांचा निधी मोर्शी नगर परिषदेला प्राप्त करून दिला.

सन २०१९ मध्ये मोर्शी नगरपालिकेच्या वतीने निविदा काढून आठवडी बाजारात सिमेंटचे ओटे व रस्ते तयार करण्यात आले. आठवडी बाजारात मोठ-मोठे ओटे बांधून तयार करण्यात आले. मागील पाच वर्षापासून आठवडी बाजारातील एकाही दुकानदाराने आपले दुकान ओट्यावर लावलेले नाही. कारण, बांधकाम करण्यात आलेले ओटे उंचीने व आकाराने मोठे असल्यामुळे दुकानदार व ग्राहकांना त्याचा त्रास होत आहे. परिणामी अनेक दुकानदार आपली दुकाने आठवडी बाजाराच्या दिवशी रस्त्यावर लावत असतात. शहरात भरणारा हा आठवडी बाजार मोठा असल्यामुळे तालुक्यातील तसेच मध्य प्रदेशातील अनेक मजूर वर्ग बाजारहाट करण्याकरिता येत असतात. आठवडी बाजारात दुकाने मांडण्याकरिता जागा उपलब्ध नसल्यामुळे अनेक भाजीपाल्याचे दुकानदार आपली भाजीपाल्याची दुकाने गल्लीबोळयात लावतात. आठवडी बाजारात असलेले ओटे मात्र रिकामेच राहतात.

> पेठपुरातील दमयंती नदीच्या पुलापासून ते गांधी मार्केट मार्गावर बाजाराच्या दिवशी अनेक दुकानदार दुकाने लावत असल्यामुळे पेठपुरा भागात जर एखाद्याचा मृत्यू झाला, तर त्याला अंत्ययात्रा दुसऱ्या मार्गाने न्यावी लागते. आठवडी बाजाराच्या दिवशी स्थानिक नगरपालिकेने मुख्य रस्त्यावर हातगाड्या व दुकाने लावू देऊ नये, अशी मागणी आहे.

## स्व.पवन देशमुख यांचे द्वितीय वर्षश्राद्ध गाडगे महाराज बालग्रहामध्ये संपन्न





अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**दर्यापूर, दि.२८ :** सुख दुःखात सहभागी होणारा, गावातील प्रत्येक कार्यात अग्रेसर असणारा,सर्व सामाजिक कार्यात भाग घेणारा, व सर्वांना हवा हवासा वाटणारा दोन वर्षे आधी आपल्यातून निघून गेला असा खोलापूर येथील प्रसिद्ध स्व पवन देशमुख यांचे दुसरे वर्षश्राद्ध हे दर्यापूर येथील श्री संत गाडगे महाराज बालगृह बनोसा दर्यापूर येथे आयोजित करण्यात आले होते त्यावेळी त्यांचा आप्त परिवार सौ किरण रविंद्र पतींगे, कु. रेवती रविंद्र पतींगे, कु. रिद्धी रविंद्र पतींगे, श्रीमती कोकिळा विनायकराव तायडे, प्रज्वल संजय काळे, आर्यन गंधे, शौर्य गंधे यांनी बालगृहातील बालकांना नवीन कपडे त्यांना अन्नदान करून स्व.पवन देशमुख यांच्याप्रमाणे सामाजिक दायित्व पार पाडले सर्वप्रथम स्व पवन देशमुख यांच्या प्रतिमेला हार अर्पण करून त्यांच्या आप्त स्वकीय यांनी बालगृहातील बालकांना स्वतः जेवण वाढले व येणाऱ्या काळात स्व पवन देशमुख यांच्या संकल्पनेतून सामाजिक कार्यात सहभागी होणार आहे असे सौ किरण रविंद्र पतींगे व श्रीमती कोकिळा विनायकराव तायडे यांनी म्हटले त्यावेळी विशेष करून रोहिणी फाउंडेशन दर्यापूर चे सर्व पदाधिकारी अध्यक्ष किशोर ठाकूर, उपाध्यक्ष संतोष मिसाळ, सचिव निलेश पारडे, सहसचिव अमोल कंटाळे,संचालक स्नेहल धानिस्कर ,गन्ना का फन्ना यू ट्यूब चॅनेल चे संचालक गणेश साखरे व जगदीश बरडे उपस्थित होते.

# मृणाली आणि विशाखा उत्तीर्ण

अजिंक्य भारत| प्रतिनिधी



**अमरावती, दि.२८ :** जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक मराठी शाळा निरूळ गंगामाई येथील कु. मृणाली संतोषराव कथे व कु. विशाखा गुणवंतराव जामनेकर या दोन्ही विद्यार्थीनींनी जवाहर नवोदय विद्यालयाची परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण करीत यश संपादन केले.

शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मा. अनंताभाऊ अवघड तसेच उपस्थित सदस्य व शाळेच्या मुख्याध्यापीका मा. मंडपे मॅडम, शिक्षक मा. काकड सर, व शिक्षिका मा. नांदणे मॅडम यांनी दोन्ही विद्यार्थिनींचा पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले. त्या दोन्ही विद्यार्थिनींना शाळा व सर्व शिक्षकांतर्फे खूप खूप अभिनंदन.



**अमरावती :** देवी रेसिडेन्सी कॉलनी शेगाव - रहाटगाव रोड येथे दीप प्रज्वलन करून राम जन्मोत्सव साजरा करतांना शुभांगी धांडे, जोत्सना बिजवे, सीमा घवळे, रीना साव, नितु मैदानकर, रंजना अलोने, सौ. देशमुख, रूपाली शिरभाते, अमृता शिंदे, छकुली नेवे, रूपाली काळे यांच्यासह परिसरातील नागरिक.

# समतादुतांनी समताधिष्ठित समाज निर्मितीसाठी योगदान द्यावे

## बार्टीचे समतादूत विभाग प्रमुख डॉ.बबन जोगदंड यांचे आवाहन

अजिंक्य भारत| प्रतिनिधी



**अमरावती, दि.२८ :** भारतीय संविधान, थोर समाज सुधारकांचा समतेचा विचार, वैज्ञानिक दृष्टिकोन, अट्रॉसिटी ॲक्ट, महिला सक्षमीकरण, सामाजिक न्याय विभागाच्या योजना, तसेच बार्टीमार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनांना समाजातील वंचित घटकांपर्यंत पोहोचवून समताधिष्ठित समाज निर्मितीसाठी काम करावे, ,असे आवाहन डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टीचे समतादूत विभागाचे प्रमुख डॉ.बबन जोगदंड यांनी केले.


अमरावती विभागातील अमरावती, बुलढाणा, वाशिम, अकोला, यवतमाळ येथील समतादुतांची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी त्यांनी समतादूतांशी संवाद साधून त्यांना कोणकोणती कामे हाती घ्यावयाची याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी समतादूतांनी प्रत्यक्ष शहरातील प्रत्येक वस्ती, खेड्यापाड्यात जाऊन नागरिकांचे प्रबोधन करावे, समाजातील अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरांचे उच्चाटन करण्यासाठी समाजामध्ये जनजागृती करावी, असे आवाहनही केले. विविध शासकीय यंत्रणांशी समन्वय साधत गरजुंना विविध योजनांचा लाभ मिळवून द्यावा, सामाजिक सलोखा व बंधुभाव निर्माण करण्यासाठी लोकांचे कल्याणदूत म्हणून समतादूतांनी काम करावे. येणारी पिढी समताधिष्ठित घडावी, यासाठी बार्टीच्या विविध योजना समाजापर्यंत पोहोचवाव्यात. तसेच सामाजिक आणि आर्थिक सशक्तीकरणाकरिता कार्य करावे. असेही ते म्हणाले. यावेळी विभागातील जिल्हा प्रकल्प अधिकारी अनिता गवई- राऊत, प्रकल्प अधिकारी वसंत गव्हाळे, प्रकल्प अधिकारी महेंद्र शामदे व विभागातील सर्व समतादूत उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकल्प अधिकारी वसंत गव्हाळे यांनी तर आभार प्रकल्प अधिकारी अनिता गवई -राऊत यांनी मानले.

# दोन दिवसात दोन दुचाकी लंपास




**अमरावती :** शहरात सलग दोन दिवसात दुचाकी चोरट्यांनी दोन दुचाकी (एमएच २७-डीएन १३९६ व एमएच २७-सीएम ४७४९) चोरून नेल्यात. त्यांची अंदाजे किंमत ८० हजार रुपये आहे. या घटना बडनेरा येथील आठवडी बाजार व डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय रुग्णालयाच्या गेटजवळ घडल्यात. या संदर्भात राजदीप जगदिश रंगारी (२७, रा. पिंपरी यादगीरे) यांनी बडनेरा, तर सईद अहफाज सैय्यद समद (२७, रा. शिरजगाव कसबा) यांनी गाडगे नगर पोलिसात तक्रार दिली.

# गॅस टंचाईमुळे हॉटेल व्यवसाय संकटात



> पालकमंत्री आणि संबंधित प्रशासन याकडे लक्ष देऊन या समस्येवर ठोस उपाययोजना का, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे
>
> **पुरुषोत्तम पोटोडे, बेनोडा ( श. )**

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**बेनोडा ( श. ), दि.२८ :** वरुड शहर व तालुक्यातील ग्रामीण भागातील हॉटेल व्यावसायिक सध्या मोठ्या अडचणींना सामोरे जात आहेत. आंतरराष्ट्रीय घडामोडींमुळे, विशेषतः इराण-अमेरिका तणावाच्या पार्श्वभूमीवर गॅस पुरवठ्यात अडथळे निर्माण झाले आहेत. परिणामी अनेक हॉटेल चालकांना गॅसऐवजी लाकडी भट्टूयांचा वापर करून व्यवसाय करावा लागत आहे. गॅस टंचाईमुळे हॉटेल व्यवसाय संकटात आल्याची खंत शहरासह तालुक्यातील अनेक हॉटेल व्यावसायिकांनी व्यक्त केली. एकीकडे वातावरणातील उकाडा आणि दुसरीकडे लाकडी भट्टीचा प्रचंड ताप यामुळे हॉटेल व्यावसायिकांचे हाल होत आहेत. जगणे कठीण झाले असून पोट भरणेही अवघड झाले आहे, अशी भावना अनेक हॉटेल व्यावसायिकांनी व्यक्त केली.


गॅस उपलब्ध नसल्यामुळे खर्च वाढत आहे, तसेच किराणा दुकानदारांचे उधार कसे फेडायचे हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. काही व्यावसायिकांनी पर्यायी उत्पन्नासाठी बॅटरी चार्जिंगसारखे छोटे व्यवसायही सुरू केले आहेत. स्थानिक लोकप्रतिनिधींकडून या समस्येकडे दुर्लक्ष होत असल्याचा ओरड नागरिक आणि व्यावसायिकांकडून होत आहे. हॉटेल व घरगुती वापरासाठी गॅस सिलेंडर घरपोच उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

उत्सव

## २ एप्रिलला होणार कार्यक्रमाचा समारोप व महाप्रसाद

# महारूद्र हनुमान व विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात भागवत सप्ताह व कीर्तन महोत्सव

अजिंक्य भारत | प्रतिनिधी







**अंजनगाव बारी, दि.२८ :** अकरावा महारूद्र हनुमान हनुमान व विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात हनुमान जन्मोत्सवा- निमित्त भव्य संगीतमय भागवत सप्ताह, कीर्तन महोत्सव व विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून दरवर्षी प्रमाणे ग्रामस्थ व भाविकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. हा धार्मिक सोहळा २६ मार्च २०२६ रोजी सुरू झाला असून २ एप्रिल २०२६ रोजी समारोप होणार आहे.

उद्घाटन दिनी गुरुवारी दुपारी १२ वाजता कलश स्थापना विधी मोठ्याभक्तीभावाने संपन्न होणार असुन यावेळी सुप्रसिद्ध प्रवचनकार सौ. प्रियंकाताई भोसले ( राजगड, जि.पुणे, झि. टॉकीज फेम ) यांच्या सुमधुर वाणीतून श्रोत मंत्रमुग्ध होणार आहे. दररोज दुपारी भागवत कथा व सायंकाळी हरिपाठामुळे मंदिर परिसरात दिवसभर आध्यात्मिक वातावरण निर्माण होणार आहे. संगीतमय भागवत सप्ताहात विविध कलाकारांचे पारंपरिक वाद्यवादन, भजन, ताल-संगत यांचा समावेश असून भक्तिमय प्रस्तुतीमुळे भाविक तल्लीन होणारा आहे. तसेच कीर्तन महोत्सवात अनेक नामवंत कीर्तनकारांनी उपस्थित राहून संतपरंपरा, भक्ती, इतिहास व संस्कृतीचा वेध घेणारी कीर्तने सादर केली जाणार आहेत. या धार्मिक पर्वाचा मुख्य आकर्षण असलेला भव्य महाप्रसाद शुक्रवार, ३ एप्रिल रोजी दुपारी ४ ते १० या वेळेत आयोजित केला आहे. ग्रामस्थ, महिला मंडळे, विविध उत्सव मंडळे यांचे विशेष सहकार्य लाभत असून संपूर्ण गाव एकत्र येऊन हा उत्सव यशस्वी करण्यासाठी कार्यरत आहे. संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन अकरावा महारूद्र हनुमान मंदिर मित्र मंडळ, अंजनगाव बारी बारी यांच्या वतीने करण्यात आले असून भाविकांनी व ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्रमदान करण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. संत परंपरेचे स्मरण जागवणारा व भाविकांना भक्तिरसात न्हाऊ घालणारा कीर्तन महोत्सव अंजनगाव बारी येथे उत्साहात होणार असुन विविध कीर्तनकार, प्रवचनकार व भजन मंडळांच्या सहभागामुळे परिसरात दिव्य भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. महोत्सवाची सुरुवात दि. २७ मार्च रोजी ह.भ.प. संस्कार महाराज अळसपुरे (बाल कीर्तनकार) आळंदीकर यांच्या प्रेरक कीर्तनाने होणार असून. त्यांच्या सुरेल आवाजाने व प्रभावी वाणीतून हजारो भाविक मंत्रमुग्ध होणार आहे दि. ३० मार्च रोजी ह.भ.प. ओम महाराज किंदरले आळंदिकर यांनी समाजप्रबोधन, भक्ति आणि संत परंपरेवरील प्रभावी कीर्तन सादर होणार आहे दि. २८ मार्च रोजी अंजनगाव बारी खंजरी भजन मंडळाने भक्तिरसपूर्ण भजनी कार्यक्रम सादर होणार आहे. दि.३१ मार्च रोजी ह.भ.प. रूपेश महाराज परिमल, अडगाव बु.(अमरावती) यांच्या संतवाङ्मय, नामस्मरण आणि अध्यात्मविषयक विचार मांडून भाविकांना प्रेरित करणार आहे.

रविवार, दि.२९ मार्च रोजी ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज गुल्हाणे (अमरावती) यांच्या प्रभावी कीर्तनाने महोत्सवाला वेगळीच दिशा मिळाणार आहे त्यांचे ज्ञानपर विचार आणि प्रसंगकथन भाविकांच्या मनावर ठसा उमटवणारे ठरेल. दि.१ एप्रिल रोजी ह.भ.प. हर्षल महाराज उके यांच्या कीर्तनाने भक्तिमय वातावरण अधिक रंगतदार होणार आहे. महोत्सवाचा भव्य समारोप दि.३ एप्रिल रोजी अंजनगाव बारी येथील रामगीर महाराज देवस्थान मठाधिपती ह.भ.प शंकरगीरी महाराज यांच्या काल्याच्या हरिकिर्तनाने होणार असून, कीर्तन महोत्सवाचे आयोजन स्थानिक मंडळ, कार्यकर्ते आणि नागरिकांनी एकत्र येऊन केले असून, अंजनगाव बारी परिसरात भक्तीचा उत्सव सध्या चांगलाच रंगला आहे.

# कामाचा पत्ता नाही अन् टोलची वसुली कशी?

## वाहनधारकांचा संताप!; राष्ट्रीय महामार्ग १६१ (ए) दिग्रस-आर्णी मार्गावर सोयीसुविधांचा अभाव

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ फारूख अहेमद



**दिग्रस, दि.२८ :** आर्णी-दिग्रस-वाई गौळ-भुलाई या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६१ (ए) चे काम अद्याप अनेक ठिकाणी रखडलेले असतानाच, दिग्रसपासून ८ कि.मी. अंतरावरील तुपटाकळी टोल नाक्यावर वसुली सुरू करण्यात आली आहे. काम पूर्ण झाले नाही, तर टोल कशाचा?' असा संतप्त सवाल विचारत स्थानिक नागरिक आणि वाहनधारकांनी या अन्यायी वसुलीला जोरदार विरोध दर्शविला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आर.एन.एस. कर्नाटक प्रा. लि. या कंपनीमार्फत या महामार्गाचे काम सुरू आहे. रायगड ढाबा ते छत्रपती संभाजी महाराज चौक दरम्या रस्त्याचे काम पूर्ण झाल्याचा दावा केला जात असला, तरी वास्तवात रस्त्याच्या दुभाजकावरील विद्युत खांब आणि पथदिव्यांचे काम अद्याप कागदावरच आहे. त्यामुळे रात्रीच्या वेळी हा संपूर्ण महामार्ग 'काळोखाच्या साम्राज्यात'बुडलेला असतो, ज्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. आर्णी बायपास परिसरात पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी नाल्यांची सोय केलेली नाही. स्मशानभूमी रोड परिसरातही हीच समस्या असल्याने पावसाळ्यात पाण्याचे डबके साचण्याची भीती आहे. तसेच शहरातील मुख्य चौकांमध्ये हायमास्ट टॉवर नसल्याने रात्रीच्या वेळी वाहन चालवणे कठीण झाले आहे. 'सर्व सुखसोयी आणि कामे पूर्ण झाल्याशिवाय टोल वसुली सुरू करणे म्हणजे सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री लावण्यासारखे आहे,' अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे. जोपर्यंत पथदिवे, नाले आणि पुलांचे काम पूर्ण होत नाही, तोपर्यंत टोल वसुली स्थगित करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

### भ्रष्ट कारभाराचे नमुने

**शाळेजवळील लोखंडी पूल गेल्या दोन वर्षांपासून 'जैसे थे'अवस्थेत पडून आहे. काही ठिकाणी पथदिव्यांचे खांब चक्क नाल्यांमध्ये रोवण्यात आले आहेत, तर काही ठिकाणी खासगी जागेत अतिक्रमण करून रस्ता बांधल्याचा आरोप होत आहे. या सर्व प्रकारामुळे कामाच्या दर्जावरच आता 'प्रश्नचिन्ह' निर्माण झाले आहे.**

## जिल्ह्यात १० हजार शेत पाणंद रस्ते बांधणार

**यवतमाळ, दि. २८ :** यवतमाळच्या महसूल भवनात २७ मार्च २०२६ रोजी पालकमंत्री संजय राठोड आणि आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेचा आढावा घेतला. जिल्ह्यात १० हजार रस्ते बांधण्याचे नियोजन असून, शेतकऱ्यांना शेतमाल बाजारपेठेत नेणे सुलभ व्हावे या उद्देशाने एप्रिल महिन्यात या कामांचा शुभारंभ करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या बैठकीस आमदार राजू तोडसाम, बाळासाहेब मांगुळकर, किसन वानखेडे, संजय देरकर, जिल्हाधिकारी विकास मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की व मुख्य वनसंरक्षक अभिजीत वायकोस उपस्थित होते. संजय राठोड यांनी रस्त्यांचे मजबुतीकरण व गुणवत्ता जपण्याचे आदेश दिले, तर अशोक उईके यांनी विभागांनी समन्वयाने काम करून योजनेला गती देण्याच्या सूचना केल्या. प्रकल्प अधिकारी अमित रंजन व इतर अधिकाऱ्यांना कालबद्ध नियोजन करून एप्रिलमध्ये कामांचे उद्घाटन करण्यास सांगितले आहे.

## घाटंजी नगरपालिका थकीत मालमत्ता व पाणीकरासाठी जप्तीचा इशारा

### ५० हजारांवरील थकबाकीदारांची नावे बॅनरवर

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**घाटंजी, २८ :** घाटंजी नगरपालिकेने शहरात थकीत मालमत्ता व पाणीकर वसुलीसाठी मुख्याधिकारी राजू घोडके यांच्या नेतृत्वाखाली कठोर मोहीम हाती घेतली आहे. वसुलीची टक्केवारी कमी असल्याने प्रशासनाने ३१ मार्चपासून थकबाकीदारांची मालमत्ता जप्त करण्याचा इशारा दिला आहे. ५० हजारांपेक्षा जास्त थकबाकी असलेल्यांची नावे बॅनरवर प्रसिद्ध करण्यात आली असून, २० हजारांवरील थकबाकीदारांची नावेही लवकरच जाहीर होणार आहेत.

नगरपालिकेचे उत्पन्न वाढवण्यासाठी मालमत्ता कर हा मुख्य स्त्रोत असला तरी नागरिकांकडून मिळणारा प्रतिसाद अत्यंत कमी आहे. थकबाकीदारांना यापूर्वीच नोटिसा बजावण्यात आल्या असूनही कर भरण्याची गती संथ आहे. परिणामी, मुख्याधिकारी राजू घोडके यांनी कठोर भूमिका घेत ३१ मार्चपासून थकीत मालमत्तांचे अधिग्रहण आणि जप्तीची कारवाई प्रस्तावित केली आहे. सध्या ५० हजार रुपयांपेक्षा जास्त थकबाकी असलेल्यांची यादी बॅनरद्वारे शहरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. आता २० हजार रुपयांपर्यंत थकबाकी असलेल्यांची नावे वर्तमानपत्र व बॅनरद्वारे प्रकाशित करण्याची तयारी प्रशासनाने केली आहे. कटू कारवाई टाळण्यासाठी नागरिकांनी चालू व थकीत कराचा त्वरित भरणा करावा आणि काही तांत्रिक अडचण असल्यास नगर परिषद कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन मुख्याधिकारी राजू घोडके यांनी केले आहे.

## थोडक्यात



### आर्णी शहरात श्रीराम जन्मोत्सवानिमित्त भव्य शोभायात्रा

**आर्णी :** शहरात श्रीराम जन्मोत्सवानिमित्त श्रीराम नवमी शोभायात्रा उत्सव समिती, विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाच्या वतीने भव्य शोभायात्रा काढण्यात आली. गणपती मंदिर चौक येथून सायंकाळी सुरू झालेल्या या सोहळ्यात शेकडो आबालवृद्ध सहभागी झाले होते. प्रभू श्रीरामाप्रती भक्तीभाव व्यक्त करण्यासाठी आणि जन्मोत्सव साजरा करण्यासाठी या सामूहिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शोभायात्रेची सुरुवात गणपती मंदिर येथे आरतीने झाली. यामध्ये विठ्ठल मंदिर महिला भजनी मंडळाचे पथक आणि सजीव हनुमान वेशभूषेतील सुजल ठवकर मुख्य आकर्षण ठरले. रामराज्य चौकात ठाणेदार निलेश सुरडकर, गोपाल शर्मा, राजेश श्रीवास, विशाल देशमुख आणि राजेश माहेश्वरी यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. दुर्गावाहिनी व बजरंग दलाच्या सदस्यांनी लाठीकाठीची प्रात्यक्षिके सादर केली. संपूर्ण मार्गावर पुष्पवृष्टी करण्यात आली असून विविध संस्थांनी पेयजल, खिचडी व सरबतचे वाटप केले. शोभायात्रा मुख्य बाजारपेठ, बसस्थानक आणि शिवनेरी चौकामार्गे ग्रीन पार्क येथील श्रीराम मंदिरात पोहोचली, जिथे रात्री १० वाजता आरतीने समारोप झाला. यात्रेच्या यशस्वीतेसाठी हिंदू उत्सव समिती, विहिंप, बजरंग दल आणि दुर्गावाहिनीच्या कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.



### घाटंजी येथे श्रीराम जन्मोत्सव सोहळा साजरा

**घाटंजी :** घाटंजी येथे श्रीराम जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त भव्य शोभायात्रा व मिरवणूक काढण्यात आली. या शोभायात्रेत प्रभू श्रीरामचंद्र, भ्राता लक्ष्मण व माता सीता आणि रामभक्त हनुमान यांच्या सुंदर झाँकींनी नागरिकांचे लक्ष वेधून घेतले होते. भजन-कीर्तन, ढोल-ताशांच्या निनादात आणि श्रीरामनामाच्या गजरात शहर भक्तिमय झाले होते. राम जन्मोत्सवानिमित्त शहरातील विविध मंदिरांमध्ये भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. ही भव्य शोभायात्रा श्री संत जलाराम मंदिराजवळून निघून शहरातील मुख्य रस्त्याने वाजत-गाजत निघाली. दरम्यान, आयोजन समितीच्या वतीने डीजे वापरण्यासाठी परवानगी मागण्यात आली होती. मात्र, न्यायालयाच्या आदेशानुसार पोलिस प्रशासनाने नियमांचे पालन करत समितीला विश्वासात घेऊन डीजेला परवानगी देता येणार नसल्याचे सांगितले. विशेष म्हणजे, यावर्षीची मिरवणूक डीजे मुक्त होती. या मिरवणुकीत शहरातील व परिसरातील हजारो नागरिक सहभागी झाले होते. घाटंजी पोलिस निरीक्षक केशव ठाकरे यांनी मिरवणुकीदरम्यान चोख बंदोबस्त ठेवला होता.

### साहित्य चोरी

**पांढरकवडा :** पांढरकवडा येथील कोंधारा शिवारात टोल प्लाझाच्या कामासाठी ठेवलेले लोखंडी साहित्य चोरून नेताना २५ मार्च रोजी रात्री ११:३० वाजता दोघांना रंगेहाथ पकडले. कार्तीक शामलराव मददीला यांच्या कंपनीचे १८ लोखंडी बार, ज्याचे वजन १२६ किलो आणि किंमत १०,०८० रुपये आहे, अमोल शंकर आसोले आणि आकाश शंकर सोयाम चोरून नेत होते. ही बाब उघडकीस येताच पोलिसांनी मुद्देमालासह आरोपींना ताब्यात घेतले असून, त्यांच्यावर चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पांढरकवडा येथे स्मार्ट कार्ड नोंदणी शिबिर

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी




**पांढरकवडा, दि. २८ :** येथील साई मंदिर परिसरात तिरळे कुणबी समाज संघटनेच्यावतीने 'एमएसआरटीसी स्मार्ट कार्ड नोंदणी शिबिर' आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात १७० नागरिकांनी एसटी प्रवासातील सवलतीसाठी आवश्यक असलेल्या स्मार्ट कार्डची नोंदणी केली. ग्रामीण भागातील महिला व ज्येष्ठ नागरिकांना प्रवासाची सुविधा सुलभ व्हावी, या उद्देशाने हे शिबिर राबविण्यात आले.

सदर उपक्रम केवळ समाजापुरता मर्यादित न ठेवता सर्व धर्मीय गरजू नागरिकांसाठी खुला ठेवण्यात आला होता. संघटनेचे अध्यक्ष अशोक बेले, सचिव अक्षय कडू, उपाध्यक्ष वसंता, कोषाध्यक्ष वसंतराव पडोळे, सल्लागार दिलीप गावंडे, डॉ. अभिनय नहाते आणि प्रभाकरराव राऊत यांनी या शिबिराचे नियोजन केले. कार्यकारिणी सदस्य अशोक भोयर, नारायण वानखडे, नामदेवराव पडोळे, कृष्णा चरडे आणि बाबाराव भोंग यांनी नोंदणी प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेतला. तसेच महिला आघाडीच्या अध्यक्षा रेखा भोयर व सचिव सुवर्णा नवाडे यांच्यासह अनेक समाजबांधव उपस्थित होते. एसटी सवलत कार्डमुळे प्रवासाचा खर्च कमी होणार असल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. भविष्यातही असे लोकहितकारी उपक्रम राबविले जातील, अशी माहिती अध्यक्ष अशोक बेले यांनी दिली.

## नाली साफ करण्यासाठी अग्निशमन गाडीचा वापर

### नगरसेविकेची घाटंजी मुख्याधिकाऱ्याविरूद्ध जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**शासकीय साधनसामग्रीचा खासगी कामासाठी वापर करणे ही गंभीर बाब आहे. या प्रकरणाची निःष्पक्ष चौकशी होऊन संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई व्हायला हवी.'**

**-पंकजा सारंग कहाळे**
**नगरसेविका, न.प. घाटंजी.**

**घाटंजी, दि.२८ :** नगरपरिषदेचे मुख्याधिकारी राजू घोडेकर यांच्या मनमानी कारभारावर बोट ठेवत, अग्निशमन वाहनाचा खासगी कामासाठी गैरवापर केल्याचा खळबळजनक आरोप करण्यात आला आहे. विद्यमान नगरसेविका पंकजता सारंग कहाळे यांनी याप्रकरणी जिल्हाधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार दाखल करून चौकशीची मागणी केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, एका खासगी कंत्राटदाराला सुट्टीच्या दिवशी झुकते माप देत मुख्याधिकाऱ्यांनी अग्निशमन वाहन उपलब्ध करून दिले. या वाहनाचा वापर संबंधित कंत्राटदाराच्या घरासमोरील नाली साफ करण्यासाठी आणि घरगुती कामासाठी करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे. आपत्कालीन परिस्थितीसाठी राखीव असलेल्या या शासकीय वाहनाचा वापर खासगी हितासाठी केल्याने 'कुंपणानेच शेत खाल्याचा' प्रकार घडल्याची चर्चा शहरात रंगली आहे. नियम धाब्यावर बसवल्याचा आरोप अग्निशमन दलाची सेवा घेताना रीतसर पावती फाडणे आवश्यक असते. मात्र, सुट्टीच्या दिवशी आवक-जावक नोंदवहीत कोणतीही नोंद न करता मुख्याधिकाऱ्यांच्या तोंडी आदेशाने हे वाहन देण्यात आल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. शासकीय साधनसंपत्तीचा असा खासगी वापर करणे म्हणजे पदाचा दुरुपयोग असल्याचे नगरसेविका कहाळे यांनी म्हटले आहे.

## कळंबचा प्रभाग १५ अंधारात; नगरपंचायतीचा गलथान कारभार

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**कळंब, दि.२८ :** नागरिकांच्या सुरक्षेसाठी लाखो रुपये खर्चून उभारलेले प्रभाग १५ मधील हायमास्ट दिवे सध्या पूर्णपणे बंद आहेत. प्रशासनाच्या या दुर्लक्षामुळे सर्वत्र अंधाराचे साम्राज्य पसरले असून, नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

अनेक दिवसांपासून हे दिवे बंद असल्याने परिसरात रात्रीच्या वेळी भीतीचे वातावरण असते. या संदर्भात स्थानिक रहिवाशांनी वारंवार तक्रारी केल्या आहेत. मात्र, नगरपंचायत प्रशासन याकडे सोयीस्कर दुर्लक्ष करत असल्याचा आरोप होत आहे. विशेष म्हणजे, संबंधित प्रभागाचे नगरसेवकही या गंभीर समस्येकडे लक्ष द्यायला तयार नाहीत.

परिसरात दाट अंधार असल्याने चोरी आणि लूटमारीच्या घटनांची भीती वाढली आहे. महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना रात्री बाहेर पडणे कठीण झाले आहे. 'एखादी मोठी दुर्घटना घडली तर त्याला जबाबदार कोण?' असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. कळंब नगरपंचायत नियमित करवसुली करते, मात्र मूलभूत सुविधा देण्यात प्रशासन अपयशी ठरले आहे. हा हलगर्जीपणा त्वरित थांबवून हायमास्ट दिवे सुरू न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा संतप्त नागरिकांनी दिला आहे.

## तहसील कार्यालयात जागतिक ग्राहक हक्क दिन

### ग्राहक जागरण पंधरवडा; सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. निवृत्ती पिस्तुलकर यांचे मार्गदर्शन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी




**आर्णी, दि.२८ :** तहसील कार्यालय, अखिल भारतीय ग्राहक पंचायत, अखिल भारतीय ग्राहक कल्याण परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने ग्राहक जागरण पंधरवडा अंतर्गत जागतिक ग्राहक हक्क दिन समारंभाचा कार्यक्रम तहसील कार्यालयाच्या सभागृहात घेण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष नायब तहसीलदार डॉ. संतोष अदमुलवाड हे होते. सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. निवृत्ती पिस्तुलकर प्रमुख मार्गदर्शक होते. प्रमुख पाहुणे म्हणून अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे अध्यक्ष लक्ष्मीकांत राठी, सचिव अजय छल्लानी, अखिल भारतीय ग्राहक कल्याण परिषदेचे अध्यक्ष चिंतामण चहांदे, अखिल भारतीय ग्राहक संरक्षण परिषदेचे सदस्य संजय जोशी, तालुका पत्रकार संघाचे सचिव राजेश माहेश्वरी, तहसील कार्यालयाचे निरीक्षक अधिकारी जे. यु. राठोड आदी उपस्थित होते. पुरवठा निरीक्षक सचिन बिन्नोड यांनी प्रास्ताविक केले. त्यानंतर मान्यवरांचे मार्गदर्शन झाले. सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. निवृत्ती पिस्तुलकर यांनी ग्राहकांच्या संरक्षणाबाबत माहिती दिली. त्यांनी सांगितले की आधुनिक काळातील बदलत्या जीवनशैलीमुळे विविध वस्तू व सेवांच्या मागणीकडे प्रचंड कल वाढत चाललेला आहे. तर वर्तमान बाजारप्रणालीत अतिरिक्त नफ्याच्या हव्यासापोटी अनेकदा काही उत्पादक व विक्रेते अवाजवी किंमत आकारून किंवा वस्तूंचा निम्न दर्जा अथवा न्यून परिमाण देऊन ग्राहकांचे संपूर्ण संतोषाधिक्य हिरावून घेतात. त्यासाठी ग्राहकांनी सदैव जागरूक असले पाहिजे असे सांगितले. कार्यक्रमाचे संचालन प्रदीप भगत यांनी केले. आभार अविनाश पवार यांनी मानले. या कार्यक्रमाला ए. एस. कांडलीकर, एस. एस. गंगलवार यांच्यासह तालुका रास्तभाव धान्य वितरण संघटनेचे सदस्य, तहसील कार्यालयातील कर्मचारी, ग्राहक पंचायत समिती पदाधिकारी, रास्तभाव धान्य वितरक, नागरिक आदी उपस्थित होते.

## घाटंजीतील तालुकास्तरीय पशुप्रदर्शन वादाच्या भोवऱ्यात

### अपुऱ्या सोयी आणि धोकादायक वीजजोडणीमुळे पशुपालकांचे हाल

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**घाटंजी, दि. २८ :** जिल्हा परिषद यवतमाळ आणि पंचायत समिती घाटंजी यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. २२) येथील एस.पी. एम. गिलानी महाविद्यालयाच्या मैदानावर आठवे तालुकास्तरीय पशुप्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. मात्र, नियोजनाचा अभाव, उन्हाचा तडाखा आणि धोकादायक वीजजोडणीमुळे दूरवरून आलेल्या शेतकरी व पशुपालकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागले.

घाटंजी येथील या प्रदर्शनात व्यवस्थापनातील गंभीर त्रुटी समोर आल्या आहेत. कार्यक्रमस्थळी मूलभूत सोयींचा अभाव असल्याने पशुपालकांची मोठी गैरसोय झाली. उभारलेला मंडप अपुरा पडल्यामुळे अनेक जनावरे, शेळ्या आणि कोंबड्या भरउन्हात ठेवाव्या लागल्या. उन्हाच्या कडाक्यामुळे काही शेतकऱ्यांनी आपली जनावरे प्रदर्शनातून परत नेणे पसंत केले. कार्यक्रमाची सुरुवात ठरलेल्या वेळेपेक्षा दोन ते तीन तास उशिरा झाल्याने ग्रामीण भागातून आलेले शेतकरी आणि सांस्कृतिक कार्यक्रमासाठी आलेल्या विद्यार्थ्यांना ताटकळत राहावे लागले. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे वीजपुरवठ्याबाबत झालेली हलगर्जी. अधिकृत तात्पुरती वीजजोडणी न घेता लांबून केबल ओढून वीज पुरविण्यात आली होती. या जिवंत केबल्स जमिनीवरूनच टाकल्या होत्या आणि अनेक ठिकाणी केवळ टेप गुंडाळून जोडण्या दिल्या होत्या. मैदानावर शेतकरी, लहान मुले आणि जनावरांची मोठी गर्दी असताना अशा प्रकारच्या उघड्या तारांमुळे मोठा अपघात घडण्याची शक्यता निर्माण झाली होती. एखादे जनावर सुटून धावले असते किंवा कोणाचाही पाय या तारांना लागला असता, तर मोठी जीवितहानी झाली असती. या गंभीर जोखमीमुळे उपस्थितांनी प्रशासकीय कारभारावर संताप व्यक्त केला. पशुसंवर्धनाच्या नावाखाली आयोजित हा कार्यक्रम केवळ नावापुरताच ठरल्याची भावना शेतकरी व्यक्त करीत आहेत. शासनाचा निधी खर्च करूनही पशुपालकांना सन्मानाऐवजी मनस्ताप सहन करावा लागल्याने या गैरव्यवस्थापनाला जबाबदार कोण, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. भविष्यात अशा कार्यक्रमांचे नियोजन करताना शेतकऱ्यांच्या आणि जनावरांच्या सुरक्षिततेचा विचार व्हावा, अशी मागणी होत आहे.

## सामूहिक विवाह मेळाव्याचे आयोजन

**दिग्रस, दि. २८ :** अंजुमन फिदांयाने मुस्तफा व गुलशन बहुउद्देशीय शिक्षण संस्थेच्यावतीने १७ मे २०२६ रोजी दिग्रस येथील अंजुमन उर्दू हायस्कूलच्या प्रांगणात सायंकाळी ७ वाजता १९ व्या मुस्लिम समाज सामूहिक विवाह मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. गोरगरीब कुटुंबातील मुला-मुलींचे विवाह अल्प खर्चात आणि रितीरिवाजाप्रमाणे लावून देण्यासाठी हा सामाजिक उपक्रम राबविला जात आहे. या मेळाव्यात विवाहबद्ध होणाऱ्या जोडप्यांना पलंग, अलमारी, कुलर आणि भांडी असे संसारोपयोगी साहित्य आयोजकांतर्फे विनामूल्य दिले जाईल. नोंदणीसाठी अतीक सेठ, आरीफ भाई बॅटरीवाले, अनसार शेख इंजिनिअर, इस्तीयाक, डॉ. राजीक अहेमद, शारीक अ. वहाब, वसीम खान, महेमुद खान, जाकीर मास्तर, तन्वीर अहेमद खान व अनवर अली यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रसिद्धीप्रमुख अफजल खान यांनी केले आहे.

## महत्वाचे

### गौण खनिजाची अवैध वाहतूक

**वडगाव जंगल :** महसूल विभागाने २७ मार्च रोजी सायंकाळी ४:५३ वाजता मौजा हातगाव शिवारात गौण खनिजाची अवैध वाहतूक करणाऱ्या पाच हायवा ट्रक आणि एका पोकलंड मशीनवर जप्तीची कारवाई केली. तहसीलदार सविता देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. आरोपींनी विनापरवाना मुरमाचे उत्खनन करून शासनाची फसवणूक केली आहे. पोलिसांनी या कारवाईत ७५ लाख रुपये किमतीचे ट्रक आणि २० लाख रुपयांचे पोकलंड मशीन असा एकूण ९५ लाख ३ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### बंद घराचे कुलूप तोडून चोरी

**नेर :** नेर तालुक्यातील पिंपरी कलगा येथे २२ ते २७ मार्च दरम्यान अज्ञात चोरट्याने बंद घराचे कुलूप तोडून कपाटातील रोख रक्कम लांबविल्याची घटना उघडकीस आली आहे. फिर्यादी सुनीता तुपटकर या घरी नसताना ही चोरी झाली. चोरट्याने घराच्या दरवाजाचा कडीकोंडा तोडून आत प्रवेश केला आणि लॉकरमध्ये ठेवलेली १८ हजार रुपयांची रोकड चोरून नेली.

### ट्रक विक्री प्रकरणात आर्थिक फसवणूक

**उमरखेड :** उमरखेड येथील महागाव रोडवर २७ मार्च रोजी ट्रक विक्रीच्या करारातील अटींची पूर्तता न करता एका व्यक्तीने ३५ लाख रुपयांची फसवणूक केल्याचे समोर आले आहे. फिर्यादी मोहम्मद युनुस हुसेन यांनी आरोपी अब्दुल रहीम परवेज याच्याशी ट्रक क्रमांक एमएच २४ जे ९८०८ बाबत हप्ते भरण्याचा करार केला होता. मात्र, आरोपीने हप्ते न भरता सदर ट्रक परस्पर दुसऱ्याला विकून फिर्यादीची आर्थिक फसवणूक केली. या प्रकरणी उमरखेड पोलिसांनी आरोपीविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा नोंदवला आहे.

### चाकूने हल्ला

**मारेगाव :** मारेगाव येथील दक्षता पेट्रोल पंप समोर २६ मार्च रोजी सकाळी ११:३० वाजता जुन्या वादाच्या कारणावरून एका तरुणावर चाकूने हल्ला करून जखमी करण्यात आले. फिर्यादी अमेय ठिकरे हा आपल्या मित्रासोबत उभा असताना आरोपी त्रिभुवन पोटफोडे याने तिथे येऊन वाद घातला. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले आणि आरोपीने जवळ असलेल्या चाकूने अमेयच्या डाव्या हाताच्या तळहातावर वार करून त्याला जखमी केले. या गंभीर हल्ल्याप्रकरणी मारेगाव पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# 'यवतमाळ महोत्सवा'कडे लोकांची पाठ

## उद्योजकांच्या स्टॉल्सचे भाडेही निघणे कठीण, प्रदर्शनाचे ठिकाण बदलल्याचा परिणाम

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी







**यवतमाळ, दि.२८ :** राज्य शासनाच्या विविध जिल्हास्तरीय विभागांमार्फत येथे काल (शुक्रवार) पासून सुरू असलेल्या 'यवतमाळ महोत्सवा'कडे शेतकऱ्यांनी पाठ फिरविल्याचे चित्र पहिल्याच दिवशी दिसून आले. आज (शनिवारी) या परिसराला आमच्या प्रतिनिधीने भेट दिली असता याठिकाणी शुकशुकाट दिसून आला. शेतकऱ्यांसह यवतमाळकर नागरिकांनीही पाठ फिरविल्याचे चित्र दिसून आले. असे असले तरी जिल्हा प्रशासन आपली पाठ आपल्याच हाताने थोपटून घेवून या 'महोत्सवा'ला उदंड प्रतिसाद असल्याचे केविलवाणे सांगत आहे.

शनिवारी दुपारी महोत्सवाला भेट दिली. या ठिकाणी छत्रपती संभाजीनगर येथून जवस विक्रीसाठी आणलेल्या चंद्रा गुलाजी गोटी या शेतकरी बांधवांची भेट झाली. त्यांनी स्टॉल बुक केले असून 'जवस' विक्रीसाठी आणले आहे. त्यांच्याशी संपर्क साधला असताना त्यांच्या स्टॉलचे भाडेही निघणे कठीण असल्याचे त्यांनी सांगितले. दरवर्षी यवतमाळ महोत्सव हा शहरातील पोस्टल ग्राऊंड भरत असे, परंतु यंदा ठिकाण बदलून त्याचे कृषी विज्ञान केंद्राच्या परिसरात आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे ऑटोचे साठ रूपये भाडे देऊन याठिकाणी कुणाला यायला परवडत नाही. गेल्या तीन वर्षांत पोस्टल ग्राउंडवर या महोत्सवाला चांगला प्रतिसाद मिळाला होता, असेही सांगण्यास ते विसरले नाही. त्यानंतर आमच्या प्रतिनिधीने ज्ञानेश्वर कदम या जालन्यावरून आलेल्या उद्योजकाची भेट घेतली. त्यांनी येथे स्टॉल घेतलेला आहे. त्यांची तक्रार अशी की, डोम दूर दूर असल्याने येथे गर्दी दिसतच नाही. नाशिक येथे आयोजित कार्यक्रमाला साडेतीनशे बसेस भरून शेतकरी आले होते. यांनी महोत्सवाचे ठिकाण बदलल्याने इकडे नागरिक फिरकत नाहीत. त्यामुळे आमच्या स्टॉल्सचे भाडेही निघणे कठीण आहे. लोकच नाहीत, तर वस्तुंची विक्री कशी होणार, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. त्यांनी यापूर्वी शहरातील पोस्टल ग्राउंडवर महोत्सवाचे आयोजन केले होते, त्यावेळी चांगला प्रतिसाद मिळाला असल्याची आठवण करून दिली. आज महोत्सवाचा दुसरा दिवस होता. याकडे नागरिकांनी अक्षरशः पाठ फिरविल्याचे दिसून आले. याशिवाय, सोयी सुविधांचा अभाव दिसून आला. वाहतूक शाखेचे पोलिस निरीक्षक ज्ञानोबा देवकते यांनी सांगितले की, इव्हेंट मॅनेजरला सांगू सांगू थकलो, परंतु त्याने पार्किंगची व्यवस्था करून दिली नाही. त्यामुळे या ठिकाणी पार्किंगचाही प्रमुख प्रश्न आहे. याठिकाणी असलेल्या कुलरमध्ये पाणी नाही. त्यामुळे थंड हवेचा प्रश्नच नाही. तर, या ठिकाणी विक्रीस आणलेल्या पशूंना चांगल्या दर्जाचा चारादेखील उपलब्ध नाही. मात्र, जिल्हा प्रशासन आणि इव्हेंट मॅनेजर मात्र या महोत्सवाला लोकांचा प्रतिसाद मिळत असल्याची शेकी हाकत आहे.

### 'महोत्सवा'ला उत्स्फूर्त प्रतिसाद : जिल्हा प्रशासन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**यवतमाळ:** राज्य शासनाच्या विविध जिल्हास्तरीय कार्यालयांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पाच दिवसीय 'यवतमाळ महोत्सवा'ला शेतकरी, महिलांसह नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात आले.

या महोत्सवात आयोजित कृषी प्रदर्शनी, पशू प्रदर्शनी, महिला आर्थिक विकास महामंडळाच्या नवतेजस्वीनी आणि उमेच्या खाद्य जत्रेला नागरिकांनी भेट देवून विविध कृषीपुरक यंत्रांची, नव्या जातीच्या पशुंची आणि शासनाच्या योजनांची माहिती घेतली. तसेच माविमंच्या महिला बचत गटांच्या स्टॉल्सवरून महिला, नागरिक विविध गृहोपयोगी वस्तूंची खरेदी करताना आणि उमेदच्या खाद्य जत्रेत स्वादीष्ट खाद्यपदार्थांचा आस्वाद घेताना दिसून येत आहे. या पाच दिवसीय यवतमाळ महोत्सवाला यवतमाळ शहर आणि जिल्ह्यातील शेतकरी, महिला, युवा आणि नागरिकांनी भेट देवून सेवा, सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

# तासलोट जंगलातील तरुणीच्या खुनाचा छडा

## पोलिस अधीक्षक कुमार चिंता : संशयातून प्रियकरानेच बालकाच्या मदतीने केला प्रेयसीचा अंत

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. २८ :** कळंब तालुक्यातील तासलोट जंगलात १५ मार्च २०२६ रोजी आढळलेल्या अर्धवट जळालेल्या तरुणीच्या खुनाचा छडा लावण्यात यवतमाळ पोलिसांना यश आले आहे. मृत तरुणी चापडोह येथील राणी किशोर वानखडे असल्याचे निष्पन्न झाले असून, चारित्र्याच्या संशयावरून प्रियकर सतीश रमेश कश्यप याने एका विधीसंघर्षग्रस्त बालकाच्या मदतीने हा खून केल्याचे पोलिस तपासात उघड झाले आहे. जिल्हा पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांनी शनिवारी (दि. २८) पत्रकार परिषदेत या थरारक प्रकरणाचा उलगडा केला.

मृत राणी वानखडे ही पतीपासून विभक्त राहत होती आणि तिचे सतीश कश्यपसोबत प्रेमसंबंध होते. सतीशने तिला पुणे येथे नोकरी मिळवून दिली होती, मात्र तेथे तिचे दुसऱ्या कोणाशी संबंध असल्याचा संशय सतीशला आला. याच रागातून त्याने कट रचला आणि ११ मार्च रोजी राणीला यवतमाळ व माहूर येथे फिरवून रात्री जोडमोहा जवळील तासलोट जंगलात नेले. तिथे तिचा गळा आवळून व शस्त्राने वार करून खून केला. पुरावा नष्ट करण्यासाठी आरोपींनी तिच्या अंगावर पेट्रोल टाकून तिला पेटवून दिले होते. १५ मार्च रोजी मृतदेह आढळल्यानंतर ओळख पटविणे कठीण होते, कारण जनावरांनी मृतदेहाचे लचके तोडले होते. पोलिसांनी जिल्ह्यातील व शेजारील जिल्ह्यांतील बेपत्ता ८४ महिलांच्या माहितीची पडताळणी केली. तांत्रिक विश्लेषण आणि सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलिसांनी सतीश कश्यपला ताब्यात घेतले असता त्याने एका बालकाच्या मदतीने गुन्हा केल्याची कबुली दिली. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात, पोलिस उपअधीक्षक दिनेश बैसाणे, स्थानिक गुन्हे शाखा प्रमुख सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक राजेश राठोड, सहाय्यक पोलिस निरीक्षक मनीष गावंडे, पवन राठोड, गजानन राजमल्लू आणि धनराज हाके यांनी यशस्वी केली. पोलिसांनी अकोला, वाशिम, अमरावतीसह तेलंगणा राज्यातील ४७ बेपत्ता प्रकरणांचीही समांतर माहिती घेतली होती. केवळ संशयापोटी एका तरुण महिलेचा क्रुर अंत करणाऱ्या मारेकऱ्याला अखेर कायद्याने जेरबंद केले आहे.

# बेंबळा प्रकल्प व डेहणी उपसा सिंचन योजनेला गती द्या

## आदिवासी विकासमंत्री प्रा. डॉ. अशोक उईके यांनी घेतला प्रगतीचा आढावा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि.२८ :** जिल्ह्यातील महत्त्वपूर्ण बेंबळा प्रकल्प, बेंबळा कालवे पुनर्वसन आणि डेहणी उपसा सिंचन योजनेच्या प्रगतीचा सविस्तर आढावा राज्याचे आदिवासी विकासमंत्री प्रा. डॉ. अशोक उईके यांनी शुक्रवारी घेतला. तसेच संबंधित अधिकाऱ्यांशी संवाद साधला. त्यांना या योजनांना गती देण्याचे निर्देश दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवन येथे आयोजित या बैठकीस जिल्हाधिकारी विकास मीना, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की, जलसंपदा व जलसंधारण विभागाचे अधिकारी तसेच प्रकल्पग्रस्त शेतकरी उपस्थित होते. बैठकीदरम्यान प्रकल्पाच्या विविध कामांचा आढावा घेताना पुनर्वसन प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी, प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या समस्या आणि त्यांच्या अपेक्षा यावर सखोल चर्चा करण्यात आली. प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळावा, कामे वेळेत पूर्ण व्हावीत आणि सिंचन व्यवस्थेचा जास्तीत जास्त लाभ शेतकऱ्यांना मिळावा, यासाठी आदिवासी विकासमंत्री प्रा. डॉ अशोक उईके यांनी अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना दिल्या. 'शेतकऱ्यांच्या हितासाठी राबविण्यात येणाऱ्या सिंचन योजनांचा प्रत्यक्ष फायदा त्यांच्यापर्यंत पोहोचणे अत्यावश्यक आहे. यासाठी प्रशासनाने समन्वयाने काम करत सिंचन प्रकल्पांना गती द्यावी,' असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

# बहिण-भावांच्या आयुष्यात प्रकाशाचा किरण!

## प्रहारचे रवी जाधव यांचा माणुसकीचा हात : दोन मनोरुग्णांना नवजीवन!'

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ मनोज माघाडे

### राजकारणापलीकडली सामाजिक बांधिलकी



**रवी जाधव यांना या कुटुंबाची व्यथा समजताच त्यांनी कोणताही राजकीय स्वार्थ न ठेवता धाव घेतली. केवळआश्वासन न देता, त्यांनी तत्काळहालचाली करून यवतमाळच्या 'नंदादीप'बेघर मनोरुग्ण केंद्रात या दोघांनाही उपचारासाठी दाखल केले. तिथे आता तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली त्यांच्यावर मोफत उपचार सुरू झाले आहेत.**

**आर्णी, दि.२८ :** 'राजकारण विरहित समाजकारण' हा मंत्र जपणारे नेतृत्व समाजात दुर्मिळ होत चालले असताना, आर्णी तालुक्यातील दाभडी येथील एका घटनेने माणुसकीचे दर्शन घडवले आहे. प्रहार जनशक्ती पक्षाचे तालुकाप्रमुख रवी जाधव यांनी दीर्घ काळापासून मानसिक आजाराने ग्रस्त असलेल्या बहिण-भावांना मदतीचा हात देऊन, त्यांना यवतमाळच्या 'नंददीप बेघर केंद्रात' दाखल केले आहे. त्यांच्या या कार्यामुळे 'नेता असावा तर असा!' अशी भावना परिसरात उमटत आहे.

दाभडी येथील प्रमोद श्रावण जाधव आणि संगीता श्रावण जाधव हे बहिण-भाऊ गेल्या १५ वर्षांपासून गंभीर मानसिक आजाराने त्रस्त होते. घराचे छत्र हरवलेले आणि गरिबीने गांजलेले हे कुटुंब अक्षरशः वाऱ्यावर होते. हलाखीच्या परिस्थितीत आईने मदतीसाठी अनेक नेत्यांचे उंबरठे झिजवले, पण 'निवडणुकीपुरते राजकारण'करणाऱ्यांकडून तिला फक्त आश्वासनेच मिळाली. माऊलीच्या पदरी निराशा आल्याने हेकुटुंब 'हवालदिल' झाले होते. 'दुसऱ्याचे दुःख पाहून ज्याचे मन द्रवते, तोच खरा लोकनेता,' हे रवी जाधव यांनी आपल्या कृतीतून सिद्ध केले आहे. केवळ सत्तेचा खेळ न खेळता, वंचितांच्या डोळ्यांतील आसवे पुसण्याचे काम त्यांनी केले आहे. आजच्या काळात जिथे राजकारण हा व्यवसाय झाला आहे, तिथे रवी जाधव यांच्यासारखे 'कार्यकर्ता' समाजासाठी आशेचा किरण ठरत आहेत.

# घमापूरच्या मातीतील 'काका-पुतण्या'बनले डॉक्टर!

## वर्तमानपत्र विक्रेत्याच्या कष्टाचे चीज : 'कष्टाची भाकरी आणि शिक्षणाची जिद्दीतून साकारले स्वप्न!'

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ बाळू राठोड



### वर्तमानपत्राच्या उत्पन्नातून घडले डॉक्टर

**या यशाचे खरे वैशिष्ट्य म्हणजे, घरची आर्थिक परिस्थिती बेताची असताना केवळ वर्तमानपत्र विक्रीतून मिळणाऱ्या उत्पन्नावर नंदकिशोर जाधव यांनी या दोघांचेही वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले. या संघर्षात त्यांना बंधू शंकर जाधव आणि घरातील महिलांची मोलाची साथ लाभली.**

**टाकळी (ई.), दि..२८:** उमरखेड तालुक्यातील अतिदुर्गम घमापूर येथील एका सामान्य कुटुंबाने गरिबीवर मात करत यशाचे शिखर गाठले आहे. 'दैनिक पुण्यनगरी'चे स्थानिक अंक वितरक नंदकिशोर जाधव यांच्या अथक परिश्रमातून त्यांचे लहान भाऊ आणि मुलगा, असे दोघेही आज डॉक्टर झाले आहेत. साधनांची मर्यादा असूनही अमर्याद स्वप्ने पाहणाऱ्या या काका-पुतण्याची कहाणी संपूर्ण तालुक्यासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

नंदकिशोर जाधव गेली १०वर्षे वर्तमानपत्र विक्रीचा व्यवसाय करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत आहेत. 'शिक्षण हाच परिवर्तनाचा एकमेव मार्ग आहे,' ही खूणगाठ बांधून त्यांनी स्वतः कष्ट सोसले, मात्र भावाच्या आणि मुलाच्या शिक्षणात कधीही खंड पडू दिला नाही. त्यांचे लहान भाऊ डॉ. विठ्ठल जाधव यांनी घमापूर, नांदेड आणि ढाणकी येथे प्राथमिक शिक्षण पूर्ण केले. 'नीट' परीक्षेत यश मिळवून त्यांनी नागपूर येथून बीएएमएस पदवी संपादन केली. सध्या ते संगमनेर येथील अश्विन रूरल आयुर्वेदिक कॉलेजमध्ये सर्जरी विषयात उच्च शिक्षण घेत आहेत. त्याचप्रमाणे, नंदकिशोर यांचा मुलगा डॉ. गोपाल जाधव यानेही जिद्दीच्या जोरावर 'फिजिओथेरपी'ची पदवी मिळवली असून, तो आज एक कुशल फिजिओथेरपिस्ट म्हणून कार्यरत आहे. जाधव कुटुंबातील या यशाची चर्चा आज संपूर्ण उमरखेड तालुक्यात होत आहे. नागपूर आणि नांदेड येथे या दोन्ही डॉक्टरांचा विशेष सत्कारही करण्यात आला. नंदकिशोर यांचा धाकटा मुलगा जयपाल सध्या पुण्यात 'बीबीए'शिक्षण घेत आहे. 'जिद्द आणि कष्टाची जोड असेल, तर परिस्थितीवर मात करता येते,' हेच या कुटुंबाने सिद्ध करून दाखवले आहे.

# हमीभावापेक्षा ५०० रुपयांनी कमी दरात गव्हाची विक्री!

## गव्हाच्या दरात मोठी घसरण; केंद्र सरकारच्या धोरणामुळे शेतकऱ्यांची 'आर्थिक कोंडी'; 'अच्छे दिन'ऐवजी भ्रमनिरास

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी





### हमीभावाचा केवळ कागदोपत्री गाजावाजा?

**केंद्र सरकारने गव्हासाठी २५८५ रुपये आधारभूत हमीभाव जाहीर केला आहे. मात्र, प्रत्यक्षात व्यापाऱ्यांकडून २२०० रुपयांपेक्षा जास्त दर मिळत नाही. म्हणजेच प्रतिक्विंटलमागे शेतकऱ्याला ५०० ते ६०० रुपयांचा फटका बसत आहे. महाराष्ट्रात १५ लाख २७ हजार ०६७हेक्टरवर गव्हाची लागवड असतानाही शासकीय खरेदी केंद्रांचा पत्ता नसल्याने व्यापाऱ्यांचे फावते आहे.**

**यवतमाळ, दि.२८ :** कडाक्याची थंडी, अंगाची लाहीलाही करणारे ऊन आणि वन्य प्राण्यांचा त्रास सहन करून, जीव धोक्यात घालून रक्ताचे पाणी करणाऱ्या शेतकऱ्याच्या नशिबी पुन्हा एकदा उपेक्षाच आली आहे. केंद्राच्या धरसोड वृत्तीच्या धोरणामुळे सोन्यासारखा पिकविलेला गहू आज 'मातीमोल' भावाने विकण्याची वेळ बळीराजावर आली असून, केंद्र शासनाच्या 'कृषीद्रोही' धोरणामुळे शेतकऱ्यांचे स्वप्न धुळीस मिळाले आहे, अशी संतप्त भावना महागाव तालुक्यातील शेतकरी मनीष जाधव यांनी व्यक्त केली आहे.

२० मार्च २०१४ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यवतमाळ जिल्ह्यातील दाभडी येथे 'चाय पे चर्चा' करून शेतकऱ्यांना प्रगतीचे स्वप्न दाखवले होते. मात्र, आज १२ वर्षांनंतरही परिस्थिती 'जैसे थे' असून उलट शेतकऱ्यांचे आर्थिक कणा मोडण्याचे काम सुरू असल्याचे मत मनीष जाधव यांनी व्यक्त केले. ते म्हणाले की, 'गेल्या वर्षी गव्हाला ३२०० रुपयांपर्यंत भाव मिळाला होता, मात्र चालू रब्बी हंगामात (२०२६-२७) हाच दर १९०० ते २२०० रुपयांच्या घरात स्थिरावला आहे. तब्बल हजार रुपयाच्या फरकाने तोटा सहन करावा लागत आहे. पंजाब आणि हरियाणामध्ये 'भारतीय अन्न महामंडळ' थेट शेतकऱ्यांकडून गहू खरेदी करते, तिथे खासगी व्यापाऱ्यांना शिरकाव करता येत नाही. मग हीच व्यवस्था महाराष्ट्रात का राबवली जात नाही? असा सवाल मनीष जाधव यांनी उपस्थित केला आहे. केंद्राने हमीभावाने खरेदी टाळल्यामुळे व्यापाऱ्यांना शेतकऱ्यांची लूट करण्याची संधी मिळत आहे. राज्यातील गव्हाचे क्षेत्र मोठे असूनही 'नाफेड' किंवा इतर शासकीय यंत्रणांमार्फत खरेदी केली जात नाही, ही मोठी शोकांतिका आहे. शासनाने तातडीने हस्तक्षेप करून 'भावांतर योजने'च्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या नुकसानीची भरपाई द्यावी आणि महाराष्ट्रातही पंजाबच्या धर्तीवर कायमस्वरूपी खरेदी व्यवस्था उभी करावी, अशी मागणी आता जोर धरत आहे, असेही श्री जाधव यांनी सांगितले.

# ऊसतोड मजुरांचे दोन ट्रॅक्टर उलटले, एक ठार

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**पुसद, दि. २८ :** तालुक्यातील आडड गावाजवळ ऊसतोड मजुरांना घेऊन जाणारे दोन ट्रॅक्टर ट्रॉली उलटून भीषण अपघात झाला. लातूरहून हलगिरीकडे परतताना चालकाचे नियंत्रण सुटल्याने हा अपघात घडला. यामध्ये अर्चना राम व्यवहारे या महिला मजुराचा जागीच मृत्यू झाला, तर इतर नऊ मजूर गंभीर जखमी झाले आहेत.

ऊसतोडीचा हंगाम संपल्यामुळे धनज, वेणी, धनसळ व मनसळ येथील मजूर २७ मार्च रोजी लातूरहून दोन ट्रॅक्टरने परत निघाले होते. २८ मार्चला सकाळी ६ वाजता वारंगा येथून निघाले असता, आडड गावाजवळील उतारावर चालकाचे नियंत्रण सुटल्याने दोन्ही ट्रॉल्या उलटल्या. अपघातात जखमी झालेल्या अभिजीत धुर्वे, मथुरा हडसे, रामराव व्यवहारे, सुशिला हळसे, विलास ढंगारे, सुनिता गुहाडे, बालाबाई भडंगे, रेखा धुर्वे आणि अनिता ढंगारे यांना सकाळी ११ वाजता पुसदच्या सरकारी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. यातील दोन जणांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली. अर्चना राम व्यवहारे यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले असून, या घटनेमुळे मजूर कुटुंबांवर शोककळा पसरली आहे.